Peshavicha punar-vikas



कादंबरीमय पेशवाई

१४

पेशवाईचा पुनर्विकास

लेखक १८६८६४

विठ्ठल वामन हडप

मुंबई पुराणिक आणि ...
मुंबई नं. ४

कागदी बांधणी १॥८] किंमत [कापडी बांधणी २ रु.

"कादंबरीमय पेशवाई" मधील आजवरच्या कादंबऱ्या

पेशवाईचें पुण्याहवाचन
पेशवाईची प्राणप्रतिष्ठा
पेशवाईचें ध्रुवदर्शन
पेशवाईचा ध्रुव ढळला ?
पेशवाईचा पुनर्जन्म
पेशवाईचें पुनर्वैभव
पेशवाईचा दरारा
पेशवाईतील दुर्जन
पेशवाईतील पश्चिमदिग्विजय
पेशवाईतील धर्मसंग्राम
पेशवाईतील उत्तरादिग्विजय
पेशवाईवरील गण्डान्तर
पेशवाईचें मन्वंतर
पेशवाईचा पुनर्विकास

× ×

× ×

प्रकाशक-**बळवंत विष्णु परचुरे**, परचुरे पुराणिक आणि मंडळी, बुकसेलर्स व पब्लिशर्स, माधवबाग, मुंबई नं ४.
मुद्रक-**विठ्ठल वामन हडप**, आदर्श मुद्रणालय, सातारा सिटी.

‘ पेशवाईचा पुनर्विकास ’

ऐतिहासिक पाया

“ सांप्रत राजश्री स्वामींची प्रकृत तरी तिसरे प्रहरापासून अंग मोडून येत असतें. पोटावर बिब्ब्याच्या फुल्या घातल्या आहेत. ऐसेंही असतां दोन्ही वाड्यांतील (दोन राण्यांमधील) नित्य एक दुसरा कजिया ठेवलेलाच आहे. कजिया असा जालियास असे घाबरे होतात कीं गर्भगळित. देव मरण लौकर देईल तरी उत्तम म्हणतात. शरीरास उपाय करावयाची उपेक्षा करतात. याउपरी वांचून काय करणें आहे म्हणतात. बुधवारीं प्रातःकाळीं नागोजीराव केशवराव दरबारीं होते. राघोरामाच्या लोकांनीं शेणवी कर्जदार होता त्यास पैक्याकरितां मारला. त्याचा कजिया दरबारास आला. तो फैसल झाल्यावर राजश्रींनीं म्हटलें, ‘ हाच कजिया देवडीवर जाता आणि आपाजी रघुनाथ यांस नेऊन मारते तर कसें होतें ? माझे बळावर कोणीं जाऊं नये. आमची सत्ता उडाली. स्वामित्व दोन्ही वाड्यांत आलें. तीं जीं करतील तें आमचे वस्तु नको म्हणवत नाहीं...वाणी हरताळ पाडितात तें माझ्याच्यानें सांगवत नाहीं....नायकांशीं कजिया माझ्यानें होत नाहीं....या उपरी माझे वस्तु कांहीं होत नाहीं. ’ म्हणोन बहुतच भाषण केलें. हाच मजकूर दोन्ही वाड्यांत ऐकतों. दुश्चिन्हें दिसतात. वाड्यांत कोणता परिणाम कसा लागेल तें पहावें...”

—महादोबा पुरंदऱ्यांनीं इ. स. १७४६ च्या अखेरीच्या सुमारास पेशव्यांस लिहिलेलें पत्र. [भारतवर्ष, पुस्तक १ लें].

\+ + + +

रामराजा जन्मापासून अज्ञातवासांत वाढला. त्यास मारण्यासाठीं प्रथम जिजाबाई व पुढें सकवारबाई टपलेल्या होत्या. परंतु तो कोठें आहे हें ठाऊक नसल्यामुळें त्याचा उपाय चालला नाहीं....

—म. रि. मध्यविभाग २.

आपण जवळ राहिल्यानें शाहूला मोकळेपणानें व्यवस्था करितां येत नाहीं, शाहूच्या मनावर दडपण पडतें, तें न पडावें व शाहूनें वाटेल ती व्यवस्था निर्भीडपणें करावी, या हेतूनें बहुधा नानासाहेब बराच दूर रहात असे. अंतस्थ रीतीनें साताऱ्यास त्यानें सर्व बंदोबस्त ठेविला होता. परंतु तेथील भानगडींत आपण प्रत्यक्ष हात न घालतां काय होतें तें पाहात तो स्वतः बराच दूर राहिला...नाना बेफाम झाला आहे, तो नेहमीं व्यसनांत दंग असतो, प्रत्यक्ष शाहूसही तो आतां जुमानणार नाहीं, अशी विरुद्ध पक्षानें साताऱ्यास ओरड करून शाहूचें मन कलुषित केलें. तेव्हां खऱ्याखोट्याची परीक्षा शाहूनें पाहिली, तींत ते आरोप खोटे ठरले......यावरून 'हे एकनिष्ठ सेवक खरे, यांजपासोन कदापि अंतर पडावयाचें नाहीं' म्हणून सर्व प्रकारचे बहुमान आणवून प्रधानपद पुन्हा दिलें.

—म. रि. मध्यविभाग २.

शाहूच्या पश्चात् (कोल्हापूरच्या) संभाजीस साताराची गादी देऊन राज्य-व्यवस्था मजबूत करावी अशी कल्पना निघाली; आणि त्याप्रमाणें सन १७४० च्या भेटींत नानासाहेबानें संभाजीशीं त्याजबद्दलची वाटाघाट करून...कागद बाळाजी व चिमाजीअप्पा यांस करून दिला. त्यांतील मतलब, 'सातारचें राज्य स्वामींचें, आणि एकछत्री शिक्का महाराजांचा (संभाजीचा) चालावा. शाहूमहाराजांचा जीवात्मा आहे, तों बाह्यात्कारीं आम्ही त्यांचे सेवक, परंतु अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज यांनीं कैलासवास केल्यावर दोन्ही राज्यें स्वामींचीं आणि आम्ही सेवक स्वामींचे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करूं...'

—म. रि. मध्यविभाग २.

कर्नाटकची स्वारी : ह्या कादंबरींत प्रतापरावाच्या निमित्तानें ज्या कर्नाटकच्या स्वारीचा उल्लेख आला आहे, ती इ. स. १७४६–४७ मधील स्वारी होय. पेशव्यांच्या वतीनें ह्या स्वारीचें नेतृत्व पुढें पुढें सदाशिवराव-भाऊंकडे होतें.

भूमिका

'**पेशवाईचा पुनर्विकास**' ही 'कादंबरीमय पेशवाई' मालेंतील चौदावी कादंबरी होय. ह्या मालेंतील आजवरच्या कादंबऱ्या ज्या धोरणानें विरचिल्या गेल्या आहेत त्याच धोरणाला अनुसरून याही कादंबरीची रचना करण्यांत आली आहे. छत्रपतींच्या वंशांतील अंतस्थ गृहकलहांचा एकंदर वर्धमान मराठी साम्राज्यावर काय बरावाईट परिणाम झाला, याचें सुसंगत व अंतर्भेदी विवेचन प्रामुख्यानें असें प्रस्तुत मालेंतील याच कादंबरींत प्रथम देण्यांत आलें आहे. हें विवेचन कांहीं ठिकाणीं कटुसत्यात्मक आहे. छत्रपति शाहूमहाराजांच्या चाळीस वर्षांच्या दीर्घकालीन कारकीर्दींत एकंदर मराठी व हिंदी राजकारणावर त्या गृहकलहांची सर्वत्र घनदाट छाया पडली असल्यानें ह्या मालेंत त्यांचें विस्तारशः विवेचन न करणें हें रामाशिवाय रामायण सांगण्यासारखें विफल व हास्यास्पद झालें असतें.

असें ऐतिहासिक विवेचन करतांना ऐतिहासिक कालसंगति व प्रसंगसंगति राखणें अवश्य असल्यानें ह्या कादंबरीच्या मर्यादित क्षेत्रांत हें विवेचन संपणें शक्यच नव्हतें. यास्तव श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना पदभ्रष्ट करण्यासाठीं राणी सकवारबाई व तिचे इतर हस्तक यांच्याकडून जीं जीं कारस्थानें करण्यांत आलीं, तेथपासून तीं नानासाहेब पदभ्रष्ट होईतों तीं कारस्थानें यशस्वी कशीं झालीं, व परिणामीं मात्र तीं विफल होऊन नानासाहेबांना शाहूमहाराजांनीं त्यांची पुरी पारख करून पुन्हा पेशवेपद दिल्यामुळें तो पेशवाईचा पुनर्विकास कसा ठरला, एथवरचाच इतिहास ह्या कादंबरींत सांगण्यांत आला आहे. या मालेंतील याच्या पुढच्या '**पेशवाईची माध्यान्ह**' या १५ व्या कादंबरींत छत्रपति शाहूमहाराजांचें निपुत्रिकत्व व राणी सकवारबाईची दुर्दम राज्यतृष्णा यामुळें राज्याच्या भावी वारसाबद्दल पूर्वीपासून उपस्थित झालेल्या भानगडी किती भयंकर विकोपाला गेल्या याचें वर्णन शाहूमहाराजांचें निधन व छत्रपति रामराजाचें राज्यारोहण एथवर येईल; व त्या अनुरोधानें शाहुमहाराजांच्या राजवाड्यांतील अंतस्थ कलहांचें स्वरूप ह्या दोन कादंबऱ्यांत मिळून पूर्ण विशद होईल.

यापूर्वीच्या पेशवाईवरील कादंबऱ्यांत मी जागोजागीं ऐतिहासिक घटनेच्या स्पष्टीकरणार्थ टिपा देत असें. परंतु कथानकाच्या ओघांत मध्येंच टिपा देण्यांत आल्यानें वाचतांना वाचकाचा विरस होतो; यास्तव तसें न करतां कथानकाचा ऐतिहासिक पाया तेवढा प्रत्येक कादंबरींत अलगपणें विशद करावा, अशी सूचना माझ्या अनेक विद्वान मित्रांनीं केली, व मलाही ती ग्राह्य वाटली. म्हणूनच कथानकाच्या मुळाशीं असलेलें ऐतिहासिक सत्य स्थूल मानानें कोणालाही पडताळून पाहतां यावें यास्तव प्रारंभीं कथानकाला आधारभूत असा त्रोटक व सूचक ऐतिहासिक पाया (उतारे) देण्याचा उपक्रम मीं या वेळेपासून सुरू केला आहे, कादंबरीचा ऐतिहासिक पाया कळण्याला एवढें पुरेसें असतें. हीच पद्धत कै. हरिभाऊ आपटे यांनीं आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून अवलंबिली आहे; व त्याचेंच अनुकरण मी एथें करीत आहें. त्याप्रमाणेंच कथानकांतील ठळक ऐतिहासिक व्यक्तींचाही परिचय शेवटीं अलाहिदा करून देण्यांत आला आहे.

'कादंबरीमय पेशवाई'चें संकल्पित कार्यक्षेत्र, पहिले भट पेशवे यांना जंजिऱ्याच्या सिद्दीच्या छळामुळें कोंकण सोडून देशावर यावें लागलें व तेव्हांच शाहूराजांची बादशाही कैदेंतून मुक्तता होऊन ते दक्षिणेंत आले, एथपासून पुण्याच्या शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण फडकेपर्यंतचें आहे. अर्थात् एथवर आपण हें अर्धें क्षेत्र ओलांडून पुढें आलों आहों. एकंदर 'कादंबरीमय पेशवाई' अशा सुमारें पंचवीस कादंबऱ्यांत पूर्ण व्हावयाची; त्यांतील ह्या चौदा कादंबऱ्या तर हातावेगळ्या झाल्या. दरम्यान बराच मोठा खंड ह्या प्रकाशनाच्या कार्यांत पडला, याची लेखक व प्रकाशक या दोघांनाही पूर्ण जाणीव आहे. त्याबद्दल विशेष खुलासा करण्याचें सोडून वाचकांपाशीं 'क्षमस्व' म्हणणेंच उचित होय. यापुढें मात्र संकल्पाप्रमाणें हें प्रकाशनकार्य नियमित-पणें पार पडेल अशी सर्व जरूर ती तजवीज करण्यांत आली आहे. पुढील दोन तीन कादंबऱ्या आजलाच लिहून तयार असल्यानें यापुढें आजवरच्यासारखी दिरंगाई प्रकाशनाच्या कामीं होणार नाहीं.

ह्या मालेंतील कादंबऱ्या कथानकदृष्ट्या एकमेकींपासून अगदीं स्वतंत्र असाव्या व कोणतीही कादंबरी वाचतांना वाचकाला कथानकांत अथवा कथानकांतील ऐतिहासिक घटनेंत अपुरेपणा भासूं नये अशी खबरदारी मूळ-

पासूनच घेण्यांत आली आहे. तथापि कथानकाच्या ओघानें पूर्वकालीन ऐतिहासिक घडामोडींचे उल्लेख त्या त्या व्यक्तींपुरते मधून मधून येतात; ते स्वतंत्रपणें समजून घेण्यासाठीं या मालेंतील पूर्वींच्या कादंबऱ्या वाचाव्या.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट एथें सांगावयाची. विभूतींचें यशोगीतगान म्हणजे इतिहास असें कार्लाईल व आजवरचे बरेच इतिहासशास्त्रवेत्ते म्हणत आले. याच्या उलट इतिहास म्हणजे त्या त्या वेळच्या वर्गकलहाचें यथावत् निरूपण हीही इतिहासाची दुसरी व्याख्या आहे; व ती दिवसेंदिवस लोकमान्यही होत आहे. मला स्वतःला ही दुसरी व्याख्याच पूर्ण विचाराअंतीं पटूं लागली आहे. परंतु 'पेशवाई'वरील आजवरच्या कादंबऱ्यांतून विभूतिपूजेच्या आधारेंच इतिहासकथन करण्यांत आलें आहे; व आजवरचा हिंदुस्थानचा सर्व इतिहास व सर्व इतिहाससंशोधनही त्याच धोरणानें निरूपिलें जात आहे. यामुळें मी ह्या मालेंतील कादंबऱ्या लिहितांना केवळ विभूतिपूजेवर अवलंबून राहणार नसलों तरी त्यांत वर्गकलहात्मक इतिहासविवेचन मी कटाक्षानें न करण्याचें बंधन 'कादंबरीमय पेशवाई' मालेंत सुसंगति राखण्यासाठीं स्वतःला घालून घेत आहें. तथापि पेशवाईचा इतिहासही आदर्शतेच्या भूमिकेपेक्षां वास्तवतेच्या भूमिकेवरून कथन केला जाणें अवश्य आहे असें मला मनापासून वाटतें; व ही माला पूर्ण झाल्यावर अखेर मी ह्या वास्तववादी दृष्टीनें पेशवाईचें समालोचन करणारही आहें. पेशवाईच्या कादंबऱ्या ह्या वर्गकलहविवेचनात्मक वास्तववादी दृष्टीनें लिहिल्या तर जुन्या परंपरेचा इतिहास वाचकांच्या अंगवळणीं पडल्यानें ही नवी विवेचनाची दिशा त्यांना परकी वाटेल. म्हणून इतिहासाभ्याससाधनांच्या अभावीं विद्यमान परंपराच मीं एथें कायम ठेवली आहे. ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टीनें अभ्यासिलेल्या वर्गकलहात्मक इतिहासांत अनुभवाला येणारीं कार्यकारणभावात्मक सत्यें विभूतिपूजाप्रधान व भावनाप्रधान सत्यांपेक्षां कशीं व कां निराळीं असतात, व ह्या सत्याच्या दोन परींचा समन्वय कसा करतां येतो, हें वाचकांना माझ्या **'झांशीची राणी आणि सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य'** ह्या चरित्रात्मक ऐतिहासिक ग्रंथावरून दिसून येईल.

सातारा, ता. १।१२।३८. **विठ्ठल वामन हडप**

प्रकाशकांचें निवेदन


—:०:—

'कादंबरीमय पेशवाई' मालेंतील तेरावी कादंबरी 'पेशवाईचें मन्वंतर' ही आमच्या वाचकांच्या हातीं दिल्यानंतर संकल्पित काळापेक्षां पुष्कळच काळ मध्यें गेला; व आज पुन्हा ह्या प्रकाशनकार्याला प्रारंभ झाला आहे. मालेच्या ग्राहकांनीं व वाचकांनीं इतके वेळां मालेच्या पुढील कादंबऱ्यांबद्दल आस्थापूर्वक व आतुरतेनें चवकशी केली कीं, ही कादंबरी प्रसिद्ध करून मालेचें प्रकाशनकार्य पुन्हा पूर्ववत् नियमित सुरू करण्याखेरीज निराळें उत्तर आमच्या अस्थेवाईक पृच्छकांना देण्याला आमच्यापाशीं, व ह्या प्रकाशन-कार्याला आवश्यक असलेलें लेखनकार्य आस्थेनें, लौकर व नियमित करण्या-खेरीज निराळें उत्तर लेखकापाशीं नव्हतेंच. म्हणूनच या कार्यातील दिरंगाई कायमची टाळून प्रकाशन नियमित व्हावें व आम्हीं हातीं घेतलेलें हें फार मोठें जबाबदारीचें पण अत्यंत आवश्यक कार्य व्यवस्थितपणें सिद्धीला जावें याबद्दल आवश्यक ती खबरदारी घेऊन मालेची ही नवी चौदावी कादंबरी '**पेशवाईचा पुनर्विकास**' आमच्या ग्राहकांच्या व वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हांला मनापासून आनंद वाटतो.

महाराष्ट्राची–आपल्या मायभूमीची यथामति वाङ्मयसेवा घडावी, ह्या एकाच उदात्त भावनेनें प्रेरित होऊन प्रसंगीं झीज सोसून व नफ्यावर दृष्टि न ठेवतां हें 'कादंबरीमय पेशवाई'चें कार्य आम्हीं हातीं घेतलें आहे. या कार्याचें कोडकौतुक आजवर सर्वांनीं केलें तसेंच पुढेंही करावें, व आपला आश्रय कायम ठेवून आणि नवीन आश्रयदाते मालेला मिळवून देऊन ही सेवा हक्कानें करून घ्यावी, अशी आमची सर्वांना कळकळीची विनंति आहे.

आपले नम्र,

प्रकाशक



" महाराज ! महाराज ! ते पहा यमदूत—थोरल्या राणीसाहेबांचे ते हुजरे लांडग्यांप्रमाणें माझ्यावर तुटून पडत आहेत ! मला वांचवा ! "

पृष्ठ २२

पेशवाईचा पुनर्विकास

प्रकरण १ लें

म्हातारी

शालीवाहन शके १६७८ क्षयनाम संवत्सरे कार्तिक वद्य पक्षांतील एके दिवशीं मोठ्या पहांटेला नेहमींप्रमाणें राजधानी साताऱ्याच्या राजवाड्यांतील देवीमंदिरासमोरील नौबतखान्यांत नौबत सुरू झाली. चौघडा झडूं लागला. सूर–सनई भैरवीचे मंजुळ आलाप घेऊं लागली. ती नौबत ऐन रंगांत आली आहे, नगरवासी जन रात्रीच्या प्रशांत विश्रांतीनंतर आंथरुणांतल्या आंथरुणांत जागे होऊन आळस झाडीत आहेत, सभोंवारच्या वृक्षांवरील घरट्यांतून पक्ष्यांची किल्बिल् सुरू झाली आहे, देवीमंदिरासमोर थोड्या अंतरावर असलेल्या भव्य मोतीतलावावर व नगरांत अन्यत्र मुक्त जलदानासाठीं सिद्ध असलेल्या इतर प्रशस्त जलाशयांवर प्रातःस्नान करणाऱ्या शुचिर्भूत ब्रह्मवृंदांच्या हातचे धोतराचे घाव मधून मधून ऐकूं येत आहेत; अशा प्रशांत नव्हे पण शांत व मंगल कालीं देवीमंदिरासमोरच्या भव्य पटांगणांतून पुढील गीतालाप ऐकूं येऊं लागले.

येई काळाचा हा फेरा; ना परते माघारा ॥ ध्रु० ॥
राया रंगे रंगमहालीं, विलासलोलुप भारी–
दुबळा होई; शेजेच्या त्या प्रमत्त झाल्या नारी !
जिकडे तिकडे पुरी अनास्था केवळ मोंगलशाही !
कारभारि जन स्वैर वर्तती, कोणी पुसता नाहीं !
मराठमोळा थोर धिराचा बहु निधड्या छातीचा,
आज परी तो वारस केवळ उसन्या पुण्यायीचा !
स्वाभिमान भाषेंत राहिला मानधनाच्यासाठीं–
देशविघातक कर्में करिती सारे खोटीं नाटीं !

बेकीचा अंगार चेतवी देशहिताची होळी,
राजा रंगे रंगमहालीं, देश कोण सांभाळी !

हें गीत अगदीं प्रथम नौबतीच्या झडतींत देवीमंदिरावरील पहारेकऱ्यांना नीटसें ऐकूं गेलें नाहीं. नंतर ऐकूं गेलें तेव्हां ते कुतूहलानें तें ऐकूं लागले. त्या गीताचा अर्थ त्यांच्या ध्यानीं येऊं लागला तसतसा त्याचा जळजळीत-पणाही त्यांना जाणवूं लागला. सकाळच्या रामप्रहरीं असलें गीत उद्दाम-पणानें गाणारें माणूस तरी कोण असावें याचा शोध करण्यासाठीं दोघेही पहारे-करी त्या पटांगणांत गेले. गीत सुरूच होतें. त्यांपैकीं एकानें अंमळ दूरवर एका वृक्षाखालीं बसून कोणीतरी गात आहे असें ओझरतें पाहिलें. पण तें इतकें ओझरतें पाहिलें कीं तें कोणी मनुष्य गात आहे किंवा कांहीं भुताटकीचा प्रकार आहे अशी शंका त्याला वाटूं लागली ! तो जागच्या जागींच क्षणभर थबकून मनांतून रामनाम म्हणत मोठ्यानें ओरडला, " कोण आहे ? "

उत्तर कांहीं मिळालें नाहीं. पण गीतगायन मात्र पूर्ववत् सुरूच होतें. त्या दोघांही पहारेकऱ्यांना त्याची जास्त जास्त चीड येऊं लागली. त्या माणसाला पकडून चौकीवर न्यावें व त्याची आसुडांखाली खाशी पाठ फोडावयाला लावावी असें त्यांना वाटलें. अर्थात् तेथें भुताटकीचा कोणताही प्रकार नसून गीत गाणारी व्यक्ति खरीखुरी आहे अशी गीतालापांच्या स्पष्टपणावरून त्या दोघांचीही खात्री झाल्यानंतरचा हा सारा मामला होता.

त्या पहारेकऱ्यांनीं 'कोण आहे' असें एकदां हटकलें, पुन्हा हटकलें, पुन्हा तिसऱ्यान्दाही हटकलें, तरी उत्तर कांहीं मिळेना. आतां जावें आणि गाणाराच्या कंबरेंत खाशी लाथ घालावी अशा चिडक्या निर्धारानें ते दोघेही पहारेकरी त्या गाणाऱ्या व्यक्तीपाशीं जातात व लाथ उगारतात, तोंच उगार-लेली लाथ मागच्या ओढीनें मागें खेंचली गेली. कारण ती गाणारी व्यक्ति एक पिकल्या केंसांची व जर्जर शरिराची अशी म्हातारी होती. तिला जरा धक्का लागला तर देखील ती मरेल असें जिथें भय, तिथें तिला लाथ हाणण्याचें धैर्य कोणाला होणार ? ते दोघेही पहारेकरी तिच्याकडे पहात क्षणभर स्तब्ध उभे राहिले.

परंतु म्हातारीनें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. ती आपली स्वतःच्याच तंद्रींत गात होती.

पेशवाईचा पुनर्विकास

"ए थेरडे ! वटवट बंद करतेस कीं नाहीं?" एका पहारेकऱ्यानें विचारलें. तरीही म्हातारी कांहीं उत्तर न देतां गातच होती.

"ए थेरडे ! ऐकायला येत नाहीं का ? कान फुटले आहेत वाटतें ?" दुसरा पहारेकरी म्हणाला.

तरीसुद्धां म्हातारी गाणें थांबवीना. मात्र तिनें एकवार त्या पहारेकऱ्यांकडे वळून पाहिलें, व गाणें चालूच ठेवलें.

पहिला पहारेकरी आपल्या साथीदाराला म्हणाला, "अरे ! ही बहिरी तर दिसत नाहीं. आतां तिनें मागें वळून पाहिलें नाहीं का ?"

पुन्हा म्हातारीनें मागें वळून पाहिलें. गाणें सुरूच होतें.

"ही वेडी दिसते !" दुसरा पहारेकरी पहिल्याला म्हणाला, "हिला पकडून किंवा मारून झोडून काय होणार ?"

"ए पागल थेरडे ! तोंड आवरतेस कीं घालूं एक कंबरड्यांत लाथ ?" पहिल्या पहारेकऱ्यानें लाथ उगारून विचारलें.

"कां रे बाबा ?" म्हातारीनें त्यांच्याकडे पाहत बेफिकिरीच्या पण किंचित् हंसऱ्या चेहऱ्यानें प्रश्न केला.

"अगोदर तोंड बंद कर आणि इथून चालती हो. नाहींतर पाहा, चावडीवर पकडून नेतों आणि सारखी पाठीची चामडी लोंबेतों चोपायला लावतों." पहिला पहारेकरी म्हणाला.

"कां बरें ? मीं तुमचें काय घोडें मारलें आहे ?" म्हातारीनें पुन्हा प्रश्न केला.

"ही कांहीं केवळच वेडी दिसत नाहीं." दुसरा तिच्याकडे उजाडत्या अंधुक प्रकाशांत पाहत म्हणाला.

"चल ऊठ अगोदर इथून चालती हो." पहिला दुसऱ्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून म्हातारीवर पुन्हा लाथ उगारून म्हणाला.

"कां रे बाबा ? खरा तो चोर आणि खोटा तो शिरजोर !" म्हातारी किंचित् बावरल्यासारखी होऊन म्हणाली.

पहारेकऱ्याला म्हातारीच्या त्या उद्गारांचा राग आला. तो रागाच्या भरांत तिच्या कमरेंत एक जोराची लाथ हाणून चार शिव्या हांसडीत म्हणाला, "ए थेरडे ! आम्ही खोटे आणि शिरजोर काय ?"

म्हातारी निरुपायानें तेथून उठली व रागारागानें त्या दोघां पहारेकऱ्यांकडे चमत्कारिक दृष्टीनें पाहत गाणें गात वाटेला लागली.

कवडी किंमत शिपाइप्यादा कोण शिरशिला त्याचा !
शेंदाडापरि काळच दुसरा घरच्या म्हातारीचा !
जिकडे तिकडे जुल्लूम जबरी गरिबांना ना थारा
दाहि दिशांना जोरें वाहे बेबंदीचा वारा !

पहारेकरी तें म्हातारीच्या तोंडचें शीघ्रगीत ऐकून स्वतःशीं हंसले. त्यांनीं तिला वेड्यांत काढलें; मग त्या वेडीच्या उद्गारांत राग येण्याजोगें काय शिल्लक राहिलें ? ‘ थेरडी माथेफिरू आहे झालें. कशाला तिच्या नादाला लागा ! ’ असें म्हणत ते तेथून माघारे गेले.

म्हातारी राजवाड्याकडून किल्ल्याकडे जाणाऱ्या राजमार्गानें पूर्ववत् गाणें गात जाऊं लागली.

खुळे बावळे नगरभवाने बनले झाडुन सारे–
एक काळचे मर्द मराठे आज जनानी झाले !
राया लक्षी, रयतहि लक्षी, सदा सुखाच्या राशी,
हरहर ! आला काळ कसा हा राजवटीला नाशी !
मराठशाही वैभवरवि हा मावळतीला झुकला,
मराठमोळा जरी न जागा झणीं, वैभवा मुकला !
उठा उठा रे ! जागे व्हा रे ! हा काळाचा घाला
एकजुटीनें तत्परतेनें झणिं फिरवा माघारा !

एवढें गाऊन झाल्यावर म्हातारी तेंच गाणें पुन्हा पहिल्यापासून गाऊं लागली. मार्गानें कोणा कोणा कारभाऱ्यांचे सेवक येत जात होते, त्यांत कांहीं सरकारी शिपाईप्यादेही होते; त्यांना त्या गाण्याची चीड आली. त्यांनीं प्रथम म्हातारीला नुसत्या शिव्या हांसडल्या. पण म्हातारी तिकडे लक्ष्य न देतां गात गात पुढें चालली. कांहीं लोकांना राग आला व ते तिला जोराजोरानें शिव्या हांसडीत तिला पिटाळूं लागले. थोरांचें पाहून पोरेंही तिच्या दगड घेऊन मागें लागलीं. म्हातारी गात गात पुढें चालली आहे, पोरें तिला दगड मारीत तिच्या मागोमाग चाललीं आहेत, मधून मधून दगडांचा मार असह्य झाला कीं ती रडते विव्हळते आहे, ठेंचाळते आहे, अशी तिची धिंड कांहीं

थोरांनीं व कांहीं पोरांनीं मिळून चालविली ती पेशव्यांच्या अर्थात् अदालतीच्या वाड्यापावेतों जाऊन पोंहोंचली.

इतकी म्हातारीची फजिती झाली, दगडधोंड्यांनीं तिचें सर्वांग ठेंचाळून निघालें, तरीदेखील ती आपला हट्ट सोडीना. पेशव्यांच्या वाड्यापुढील चौकीसमोर ती येते न येते तोंच एका वात्यात पोरानें एक विटकराचा तुकडा फेंकला तो सणसणत तिच्या मस्तकांत जाऊन बसला. तिच्या मस्तकाला खोंक पडली व तिच्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. म्हातारी रक्तानें न्हावूं लागली. ती तिची दुर्दशा पाहून चौकीदाराला तिची दया आली. त्यानें तिला छळणाऱ्या पोर थोर गांवगुंडांना मागें परतून लावलें व तिला सामोपचारांनीं सांगितलें, "बाई ! हा श्रीमंत पेशव्यांचा वाडा आहे. इथें गडबड करशील तर फुकट हालांत पडशील."

"असें का ?" असें म्हणून म्हातारी पुन्हा गाऊं लागली.

मराठशाही मरूं लागली; नवी पेशवेशाही–
नव्या दमानें तिथें उफाडे, तुळा तियेला नाहीं !
दों दिवसांची आतां उरली राजधानि सातारा,
राजवटीच्या मान–धनाचा जणूं निखळला तारा !
पुण्यांत उगवे पुण्यपर्वणी तिथें पेशवेशाही–
फोफावे गाजतो दरारा तिचा दिशांना दाही !

कसा झाला तरी पेशव्यांचा चौकीदार तो ! त्याला आपल्या धन्यांची अवास्तव निंदा कशी सहन व्हावी ! इतका वेळ त्याला म्हातारीच्या दुबळेपणाची कींव येत होती; पण आतां त्याला संताप आला.

तो कमरेची तरवार सर्कन म्यानांतून बाहेर काढून म्हातारीवर उगारून तिला शिव्या हांसडून म्हणाला, "ए थेरडे ! खबरदार पुन्हा तोंडावाटे ब्र तरी काढशील तर ! जीभच छाटून टाकीन, याद राख !"

"कां रे बाबा ! मी खरें बोलल्यें हा माझा अपराध झाला वाटतें ! बरोबरच आहे ! तूं पेशव्यांचा चाकर. इमानी चाकर म्हणजे इमानी कुत्र्यासारखा. चाकराचा न्याय म्हणजे ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी. पण मी तरी वावगें काय रे बोलल्यें ?" असें म्हणून म्हातारी पुन्हा गाऊं लागली.

भट्ट पेशवा जबरा चाकर छत्रपती रायाचा,
रायाला बाजूस लोटुनी उद्यां धनी व्हायाचा !

तो चौकीदार कितीही क्षुल्लक मनुष्य असला, त्याला राजकारणांतील डाव-पेंच व अंतर्गत ओघ कळत नसले, तरी लोकमताचा वारा कोणत्या दिशेनें वाहत आहे, हें सामान्य लोकांइतकें तरी त्याला खास कळत होतें. म्हातारीनें आपल्या जाड्याभरड्या आवाजानें जाड्याभरड्या गाण्यांतून ज्या घटना गाऊन दाखविल्या, तें खरें पाहतां तत्कालीन प्रचलित लोकमताचें पुष्कळ अंशीं यथार्थ असें प्रतिबिम्ब होतें. तें लोकमत यथार्थ नसेल; किंवा त्यांत गैर-समजाचा व मत्सराचा बराच अंश असेल. कारण श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे हरएक बाबतींत महाराजांची पडत्या फळाची आज्ञा घेऊन स्वतंत्रपणें राज्यकारभार पाहूं लागले होते; या त्यांच्या वर्तनांत राज-वटीच्या कितिएक विचारवंत मातबरांना त्यांची धडाडी व कर्तबगारी दिसून येत होती, तर त्यांच्या विरोधकांच्या मतें त्यांनीं हें राजसत्तेचें निव्वळ अप-हरण चालविलें होतें. हे लोकमताचे दोन्ही प्रकार सर्वांच्या कानीं येत तसेच पेशव्यांच्या नोकरचाकरांच्याही कानीं येत. मनुष्यस्वभावाचा नैसर्गिक विशेष हा कीं एखाद्याची कोणीं अवास्तव स्तुति केली तर त्याबद्दल स्तुतिपाठकाला दोष देणारे फार थोडे; पण आपणावर योग्य कारणासाठीं टीका किंवा निंदा झाली तर तळपायाची आग ज्यांच्या मस्तकाला जाऊन झोंबेल असेच फार !

म्हातारी गाते तें खरें किंवा खोटें हें ओळखण्याची पात्रता चौकीदाराच्या अंगीं कोठून येणार ! त्याला एवढें माहीत कीं आपल्या धन्याविरुद्ध ब्र काढील तो आपला वैरी. म्हातारी हट्टानें मुद्दाम वाड्यासमोर उभी राहून पेशव्यांची निंदा करीत आहे असें पहातांच त्याचा राग कमालीचा वाढला. त्या रागाच्या सपाट्यांत त्याच्या हातांतील तरवारीनें म्हातारीचें शिरच धडा-वेगळें व्हावयाचें. परंतु म्हातारीच्या पिकल्या केंसांकडे, जर्जर शरीरयष्टीकडे व नुक्ताच मार खाऊन रक्तबंबाळ झालेल्या मस्तकाकडे पाहून त्याच्या मनांत भूतदयेचा किंचित् ओलावा उत्पन्न झाला. संतापाच्या भरांत म्हातारीच्या मानेकडे वळणारा तरवारीचा उजवा हात त्यानें आंखडता घेतला; आणि आतां तो म्हातारीला शिव्या देऊन कांहींतरी बोलणार, तोंच ती म्हणाली, “ मार बाबा ! मार. हात कां आंखडता घेतलास ? मार. मी तुझ्या आई-

सारखी आहें. तुम्हीं लेंकांनीं आईच्या मानेवर तरवार चालवून स्वामिभक्तीचें सोंग साजरें करायचें नाहीं, तर आणखी कसें करायचें? आणि ही सारी यातायात कशासाठीं?—चोर, लुटारू, दरोडेखोर, शिरजोर झाला तरी तो आपला धनी! राजा तुमचा कोणी नव्हे; त्याला गुंडाळून ठेवून राजाची सत्ता बळकावणारा तो पेशवा तुमचा धनी!—राजा म्हणायचा नाहीं, जात म्हणायची नाहीं, गोत म्हणायचें नाहीं, जसे कांहीं धन्याच्या दरवाजांत सांखळी-पट्ट्याला अडकवून ठेवलेले जातिवंत ठाणबंदी इमानी कुत्रे! धनी भला कीं बुरा याची त्यांना काय पर्वा? त्यांना माहीत कीं धन्याच्या विरुद्ध कोणीं कांहीं केलें कीं त्याच्यावर भुंकायचें; त्याला चावायचें!—मार बाबा! मला मार!—पोटाची वीतभर खळगी भरण्यासाठीं मनुष्य जगांत काय करील आणि काय नाहीं!—मार—मला मार! मी खरें बोलल्यें म्हणून मला ठार मार, आणि धन्यापाशीं आपल्या ह्या बहादुरीची फुशारकी गाजवून चौकीदाराचा बारगीर, बारगीराचा शिलेदार हो! देवाचें संपुष्ट मोडावें आणि रांडेची पिकदाणी करावी! देवाचा देव्हारा मोडावा आणि रांडेचा पलंग करावा! देवाचा पीतांबर फाडवा आणि रांडेची चोळी शिवावी! सारें जगच जिथें असें खोटें आहे, तिथें तूं तरी जगांतलाच.—असा थबकतोस कां? मार मला मार!"

म्हातारीचा प्रत्येक शद्व त्या चौकीदाराच्या हृदयाला जाऊन झोंबला. ती कांहीं वरवर दिसते तशी केवळ वेडी बाई खास नाहीं, राजवटींतील अन्यायांनीं गांजलेली ती कोणीतरी अनुभवी पोक्त बाई असावी, असें त्याच्या मनानें घेतलें. तिची चौकशी करावी असेंही एकदां त्याच्या मनांत आलें, व त्यानें तिला चांचणीदाखल एकदोन प्रश्न विचारून पाहिलेंही. पण ती कांहीं सरळ उत्तर देईना. ती उलट पूर्ववत् गाऊं लागली.

थंडीमध्यें साप गारठे अर्धामेला झाला,
भूतदयेनें शेकोटीचा तया आसरा दिधला!
ऊब लागली, दूध पाजलें, ताकद येई त्याला;
फुत्कारूं लागला तोच मग फणा उभारून बसला!
'साप साप हा' लोक बोलला, चिडे ऐकुनी नांवा,
दंश धरी तो मनांत, बसुनी बघी घ्यावया चावा!

त्या सापाचा तूं कैवारी खुळा बावळा एक,
मी आई तूं लेंक–परी ती नकोच ओळख–देख !
चोरांनीं हा राजलुटीचा मांडियला बाजार !
त्या चोरांचे तुम्ही खुळ्यांनो ! सारे भागीदार !

कुठची आई आणि कुठचा लेंक ! पण म्हातारी सहज बोलून गेली तें त्या चौकीदाराच्या मनाला लागलें. कारण आणखी कांहीं नाहीं; त्या चौकीदाराची आई त्याच्या अगदीं बाळपणींच त्याला मुकली होती. किंवा तो आईला मुकला होता असें म्हणावें पाहिजे तर. तिचें आणि तिच्या सासूचें पटेना, व मुलावर आईचें कमालीचें वजन असल्यानें तो बायकोचा कैवार घेईना. बरें; न पटण्याला दोष तरी त्या बाईच्या अंगीं कांहीं पाहिजे होता ! सासूच्या क्षणोक्षणीं पालटणाऱ्या लहरींप्रमाणें सुनेला वागतां येईना, हाच काय तो तिचा दोष ! पण तेवढ्यावरूनच सासूनें सुनेला छळावें, डागावें, भाजावें; तरीही सुनेनें तोंडांत मिठाचा खडा धरून तें सहन करावें. अखेर एकदां तर त्या कैदाशीण सासूनें सुनेवर दुर्वर्तनाचा वृथाऽरोप लादण्यालाही कमी केलें नाहीं; व तोच लोकापवाद पुढें वाढत जाऊन सुनेची घरांतून हकालपट्टी करण्याला पुरला. एवढाच त्या चौकीदाराला आपल्या आईविषयींचा पूर्ववृत्तान्त काय तो माहीत होता. अर्थात् तो तिच्या पूर्ण परिचयाच्या व जिव्हाळ्याच्या माणसांकडून कळलेला वृत्तान्त. मात्र बहुजनसमाज त्या माउलीविषयीं जें बोले, तें अर्थात् तिच्या सासूनें पिकविलेल्या दुर्वार्तेप्रमाणेंच बोले. पण आपल्या आईविषयीं जग दुतोंडेपणानें बरें व वाईट दोन्ही बोलूं लागलें कीं मुलाला त्यांतलें बरें तेवढेंच ग्राह्य वाटणार. समजा, एखाद्याची आई खरोखर दुराचारी असली, तरी तिला जगानें दुराचारी म्हटलेलें कोणत्या मुलाला रुचेल !

ती आपली आई व समोरची म्हातारी यांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध आहे किंवा कसें हें लेशमात्र माहीत नसतांही म्हातारीचे बोल–विशेषतः 'मी आई तूं लेंक, परी ती नकोच ओळखदेख' हे शब्द चौकीदाराच्या मनाला चटका लावून राहिले. स्वतःच्या आईविषयीं त्याच्या अंतःकरणांत उमाळा उत्पन्न झाला व म्हातारीविषयीं त्याला कळवळा वाटूं लागला. त्याचा म्हातारीला इष्ट असा एवढाच परिणाम झाला कीं त्या चौकीदाराला तिच्याविषयीं सहा-

नुभूति वाटूं लागली; तिच्यावर संकट कोसळूं नये, लोकांनीं तिला मारूं झोडूं नये, व राजदूतांच्या हातीं ती कैद होऊन कठोर शिक्षा तिच्या वांट्याला येऊं नये ह्या सद्भावनेनें त्यानें तिला गप्प करण्याची शिकस्त केली. तिला त्यानें विनवून पाहिलें, धाकदपटशा देऊन पाहिलें.

पण म्हातारी कसली विक्षिप्त! ती त्याला मुळींच दाद न देतां म्हणाली, "कां रे बाबा? माझी अशी मुस्कटदाबी करून पेशवा तुझा धनी त्याच्या घालमेलींवर पांघरूण घालूं पाहतोस होय? पण पोरा! जग जें बोलतें, त्याच्या तोंडाला तूं कसा हात लावणार?" आणि लगेच ती गाऊं लागली.

अब्रूचें आकाश फाटलें; ठिगळ कशाचें आतां?
अरिचा चावा कसा चुकविशी पाडुन अपुल्या दांता?

राजवाड्यापासून म्हातारीचा दगडफेकीनें पाठलाग करणारे लोक आजूबाजूला उभेच होते. चौकीवरचे इतर शिपायीही तिची कणिक तिंबण्यासाठीं कोणी दांत ओंठ खात तर कोणी त्या दुबळ्या जीवाचा छळ करून मनाची आसुरी करमणूक करून घेण्यासाठीं अस्तन्या वर सारूं लागले होते. त्यावेळीं चौकीदारानें मध्यें पडून जर त्यांची समजूत केली नसती, तर त्या लोकांनीं तिचा मुडदाच पाडला असता. आणि चौकीदारानें कैवार घेतल्यामुळें तरी त्या लोकांनीं तिच्यावर एवढीच दया केली,—तिच्या तोंडांत बोळा कोंबून व तिचे हात बांधून तिला एका शिपायाच्या स्वाधीन करून सांगितलें, "हिला खिंडीच्या गणपतीपाशीं नेऊन सोडून दे."

इतकी म्हातारीची विटंबना करण्यांत आली तरी ती आपली आनंदांतच! ती रडली नाहीं, ओरडली नाहीं, तिनें स्वतःची सोडवणूक करून घेण्यासाठीं धडपड केली नाहीं; कांहीं नाहीं. शिपायानें तिला आपल्याबरोबर खिंडीकडे चालविलें, तेव्हां तिच्या मागोमाग टवाळ लोकांचा घोळकाही तिची थट्टा करीत चालला. खिंडीकडे जातांना जसजसें रान लागूं लागलें, तसतसे लोक पांगूं लागले. गणपतीपाशीं जाईपावेतों तर एक शिपायी व ती म्हातारी हीं दोघेंजणेंच उरलीं होतीं. तो शिपायी म्हातारीला गणपतीच्या रानांत सोडून माघारा आला, पण त्यानेंही तिचें त्या रानांत पुढें काय होईल याची चौकशी केली नाहीं!

ती म्हातारी कोण बरें असावी? ती खरोखर वेडी होती का?

प्रकरण २ रें

रंगमहालांत

महाराज ! महाराज ! माझें रक्षण करा !"

सुमारें प्रहरभर दिवसाला मराठशाहीचे छत्रपति श्रीशाहू महाराज हे आपल्या रंगमहालाच्या गच्चीवर सूर्याचीं कोंवळीं किरणें थंडीच्या निवारणासाठीं अंगावर घेत शाल पांघरून बसले होते. आपल्या प्रकृतीची काळजी घेण्याइतकी स्वस्थता महाराजांच्या मनाला आज काल मुळींच नव्हती. महाराज विलासी खरे, व त्यांनींच बादशाही विलासविहारांची परंपरा मराठशाहीच्या राजवटींत सुरू केली. परंतु विलासविहार हे कोणाचेही झाले तरी फावल्या वेळचे उद्योग होत. मन स्वस्थ नसल्यावर विलासविहारांची गोडी माणसाला कशी वाटणार ! शाहू महाराज हे भाग्यशाली छत्रपति खरे. परंतु त्यांच्यापुरतें बोलावयाचें तर त्यांचा भाग्यरवि आतां पश्चिमेकडे कलला होता. एवढेंच नव्हे तर तो अगदीं मावळण्याच्या बेताला आला होता म्हटलें तरी चालेल.

वरवर पाहतां मराठशाहीचा विस्तार तिकडे झपाट्यानें होत होता. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्यासारखा उमदा व कर्तबगार पेशवा मराठशाहीचा कारभार फार चतुराईनें व कर्तबगारीनें हांकीत होता, व मराठशाहीचा—नव्हे, पेशवाईचा दरारा सूर्यकिरणांच्या वाढत्या तीव्रतेप्रमाणें आसेतुहिमाचल व हळू हळू दुमदुमूं लागला होता. मराठशाहीच्या छत्रपतींचें सौभाग्य तें यापेक्षां आणखी निराळें असें कोणतें असणार ! पेशवे विजयी झाले, मराठशाही सरदारांनीं जागजागीं मर्दुमक्या गाजवून बादशाही मोंगलांसारख्या प्रबळ शत्रूंना पदोपदीं धूळ चारण्याचा सपाटा चालविला, अशी राजवटीची सर्वत्र आबादीआबाद झाली. म्हणजे वास्तविक छत्रपतींचाच

हा नांवलौकिक वाढला असें सकृद्दर्शनीं म्हणावेंसें वाटतें, व इतिहासाचा वरवर आधार घेऊन आजचे लोकही कदाचित तसेंच म्हणतील. पण वस्तुस्थिति त्यापेक्षां अगदी निराळी होती. स्वतः छत्रपति शाहू महाराज हे कधीं जातीनें स्वारीला जात नसत, व लढवय्येपणा त्यांना जवळ जवळ अपरिचित होता. त्यामुळें त्यांची सारी भिस्त त्यांच्या कारभाऱ्यांवर व सरदार–दरकदारांवर असे. त्याचा परिणाम स्वाभाविकपणेंच असा झाला होता कीं मारील त्याची तलवार व करील त्याचा कारभार! नांव केवळ छत्रपतींचें; पण गांव कारभाऱ्यांचा आणि सरदारांचा.

छत्रपतींची सत्ता अशी मुळांतच नामधारी ठरल्यामुळें सरदार, दरकदार व कारभारी त्यांना थोडेच वचकून राहणार! तशांत महाराजांनीं नानासाहेबांसारख्या अगदीं तरुण पेशव्याला सर्व कारभार देऊन राजवटींतील इतर अनेक वयोवृद्ध व अनुभववृद्ध कारभाऱ्यांना आणि सरदारांना दुखविलें होतें. या तरुण पेशव्याच्या कर्तबगारीकडे व शहाणपणाकडे निःपक्षपाती दृष्टीनें पाहण्याइतका मनाचा उदारपणा महाराजांप्रमाणें इतर कारभारी मंडळीच्या अंगीं असता तर गोष्ट निराळी होती. पण दुर्दैवानें खरा प्रकार त्याच्या अगदीं उलट होता. केवळ वयावर शहाणपण मोजणारे बरेच कारभारी महाराजांच्या व मराठशाहीच्या दुर्दैवामुळें त्या वेळीं महाराजांना लाभले होते. ते कर्तबगार नव्हते अशांतली गोष्ट नाहीं. पण ते तितकेच कुढ्या स्वभावाचे, व परोत्कर्षाविषयीं नेहेमीं असहिष्णु असे होते. त्यांना नानासाहेबांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें त्यांनीं आपसांत चुरशीचा इंधण चेतविण्याला सुरवात केली होती. नानासाहेब आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या या सर्व कारवायांना पुरून उरणारे होते, व त्यानीं आपल्या कर्तबगारीची चुणुक आपल्या अवघ्या सहा वर्षांच्या कारकीर्दींत अनेकांना अनेक प्रकारें दाखविलीही होती. तरीपण त्यांच्या सर्व कारभाराचा निष्कर्ष काढला तर जिकडे तिकडे चुरस, अहमहमिका व कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं अशी दैना!

रघूजी भोंसले यांनीं नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें मिळण्याच्या वेळेपासूनच त्यांना विरोध करण्याचा व कामकाजांत नानाप्रकारें बखेडे उत्पन्न करण्याचा सपाटा चालविला होता. त्यांच्या त्या उद्योगाला जरी फारसें यश

येत नसलें तरी असंतोषाचें विष त्यामुळें राजवटींत फार झपाट्यानें पेरलें जात होतें. नानासाहेबांना आपल्या अमोघ कर्तृत्वशक्तींपैकीं बरीचशी शक्ति हा घरचा विरोध भागविण्यासाठींच खर्च करावी लागे. रघूजी भोंसल्यांना महाराजांच्या विद्यमान धाकट्या राणीचा—सगुणाबाईचा रक्ताच्या नात्यानें पाठिंबा असल्यामुळें त्यांचा विरोधाचा कारभार अव्याहत सुरूच होता. त्यामुळें उत्तरेकडील व इतरत्रही प्रत्येक ठिकाणच्या कारभारांत हरघडीं भोंसले वगैरे विरोधकांच्या कारवाईनें नाना प्रकारचे बखेडे उत्पन्न होत. त्यांचा बोभाटा महाराजांचे कानीं येई व महाराजांना 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' अशा धोरणानें त्या मंडळींचा समेट करण्याची खटपट करावी लागे. प्रथम धाकदडपशाही दाखवावा लागे. पण कोणी तरी मनापासून त्यांचें ऐकेल तर शपथ ! मग आपल्या राज्यकर्तेपणाची झांकली मूठ सव्वा लाखाची राखण्यासाठीं महाराजांनींच प्रत्येक बाबतींत मूग गिळून स्वस्थ बसावें व कारभारी मंडळींना तिकडे वाटेल तसा धांगडधिंगा घालूं द्यावा. आपल्या हातीं आपल्या नोकरांना काबूंत ठेवण्याची शक्ति नाहीं ही जाणीव महाराजांना अत्यंत तापदायक होत होती. तशांत नाना प्रकारच्या कौटुंबिक आपत्तींमुळें व वयोमानाप्रमाणें शरीरप्रकृतीही बिघडल्यामुळें महाराज अलिकडे नेहेमींच उदासवाणे व चिंतातुर असत.

एवढी प्रतिकूल परिस्थिति महाराजांचें आयुष्य दुःखमय करण्याला अपुरी पडेल म्हणून कीं काय, भवितव्यतेनें त्यांच्या कुटुंबांतही परस्पर मत्सराचा जबरदस्त वणवा पेटवून दिला होता. सवतीमत्सर हा एवढा जबरदस्त राक्षस आहे कीं तो मी मी म्हणणाऱ्या महापराक्रमी दशरथाला देखील दांतीं तृण धरून आपल्या पायांपाशीं शरण आणूं शकला. या सवतीमत्सरानें असेच आणखी कैक पराक्रमी पुरुषांचे कसे बळी घेतले आहेत याचीं उदाहरणें इतिहास व पुराणांत पाहिजे तितकीं सांपडतील. तरीही महापराक्रमी, व मी करीन ती पूर्व अशा नरवीरांची ही गोष्ट झाली; पण शाहू महाराज कांहीं तसे पहिल्या प्रतीचे नरवीर नव्हते. ते सज्जन असले तरी कर्तबगारीनें सामान्य होते. त्यांच्या अनेक राण्यांनीं या सवतीमत्सराच्या आहारीं जाऊन त्यांना त्राहि भगवान् करून सोडलें असल्यास नवल काय ? विशेषतः राणी सकवारबाई व राणी सगुणाबाई या दोन राण्यांकडून तर महाराजांना पदोपदीं इतका

त्रास होत असे कीं त्या त्यांच्या सहधर्मीणी नसून त्यांच्या पूर्वजन्मींच्या वैरिणी आहेत असें म्हणणेंच जास्त शोभलें असतें. त्यांतल्या त्यांत सकवारबाई तर निव्वळ पेटती ज्योत! तिच्या सहवासांतून आपण केव्हां एकदां सुटूं असें महाराजांना होऊन गेलें होतें. या दोन्ही राण्यांनीं घरांत तर नाना प्रकारचे बखेडे माजवावेतच; पण राजकारणांतही अशी कांहीं विलक्षण ढवळाढवळ करावी कीं त्यांनीं पायानें मारलेल्या गांठी सोडविण्यास महाराज, नानासाहेब पेशवे व राजवटीची आबादानी राखण्यासाठीं कायावाचामनानें झटणारे इतर कारभारी यांना पुरे जन्म व्हावा. महाराजांच्या ठायीं दुसरा कोणी तैल बुद्धीचा व कडव्या वृत्तीचा छत्रपति असता तर त्यानें आपल्या ढालगज राण्यांना त्यांच्या अपराधाबद्दल कठोर शासन अवश्य केलें असतें. पण तो करडेपणा महाराजांच्या अंगीं नव्हता, म्हणून तर ही सारी दुर्दशा! महाराजांना ह्या आपल्या आवांक्याबाहेरल्या गोष्टी आहेत याची पूर्ण जाणीव होती, व तो अनर्थ आपल्याला टाळतां येत नाहीं त्याअर्थीं अशा दुबळेपणानें जगण्यापेक्षां मरणें बरें असें वाटूनच ते अलीकडे नेहेमीं खिन्न असत.

अशा खिन्नतेच्या परमावधींतच महाराज आज रंगमहालाच्या गच्चीवर एकांतांत विचार करीत बसले असतांना " महाराज! माझें रक्षण करा! " ही आर्तवाणि त्यांच्या कानीं आली.

हा कोणाचा आर्तस्वर असावा, असा आपल्या मनाशीं प्रश्न करीत महाराज मागें वळून पाहतात तों एक तरुण स्त्री ते शब्द उच्चारीत घाबऱ्या घुबऱ्या धावत येतांना त्यांना आढळून आली.

" महाराज! महाराज! माझें रक्षण करा! " असें म्हणून त्या तरुण स्त्रीनें एकदम महाराजांच्या पायांवर लोटांगण घेतलें, व परोपरीनें त्यांची विनवणी चालविली.

" सजणे! सजणे! अशी घाबरूं नकोस. तुला कोण काय करतें आहे तें आम्हांला अगोदर सांग. " महाराज उद्गारले, व त्या तरुण स्त्रीला हातानें जवळ बोलवून तिचें सहानुभूतिपूर्ण शब्दांनीं सांतवन करूं लागले.

सजणा महाराजांच्या राणी सगुणाबाईची दासी होती. महाराजांनीं सगुणाबाईच्या शिफारसीवरून पूर्व दिवशींच तिला दासीपणांतून मुक्त करून तिला तिच्या पतीबरोबर घरीं जाण्याला परवानगी दिली होती.

" महाराज ! थोरल्या राणीसाहेबांपासून मला वांचवा ! " सजणा दीनवाणीनें कळवळून उद्गारली.

" थोरल्या राणीसाहेबांचें तूं काय केलेंस ? " महाराजांनीं विचारलें.

" मीं कांहीं देखील केलें नाहीं महाराज ! मीं कांहीं देखील केलें नाहीं. मी त्यांचा स्वभाव ओळखून नेहेमीं त्यांना भिऊन असतें. त्यांचा आणि धाकट्या राणीसाहेबांचा उभा दावा आहे हें आपण जाणतांच. आणि मी धाकट्या राणीसाहेबांची दासी, म्हणूनच केवळ त्या माझ्यावर जळत असतात. एरव्हीं मीं त्यांचा खरोखरच कांहीं अपराध केला नाहीं. "

" पण आजच थोरली राणी तुझ्यावर कां म्हणून रागावली ? "

" मी स्वतंत्र होऊन आतां माझ्या दादल्याबरोबर पुन्हा पूर्ववत् सोन्याचा संसार करणार हें त्यांना पाहवत नाहीं ! " असें उद्गारत सजणेनें एकदम दचकून मागें वळून पाहिलें. तों दोन हुजरे धावत मागोमाग आलेले पाहून ती पुन्हा महाराजांच्या पायांना विळखा घालून म्हणाली, " महा–राज ! महाराज ! ते पहा यमदूत–थोरल्या राणीसाहेबांचे ते हुजरे लांडग्यांप्रमाणें माझ्यावर तुटून पडत आहेत ! मला वांचवा ! "

तोंच ते दोघे हुजरे तेथें येऊन पोहोंचले व त्यांतल्या एकानें आपल्या हातांतील आसुडाचा कोरडा फाड्कन सजणेच्या पाठीवर ओढून तिचे केंस धरून तिला ओढीत उद्गार काढले, " हरामखोर ! ढालगज ! थोरल्या राणीसाहेबांची आज्ञा मोडून इकडे पळून आलीस काय ? चल अगोदर त्यांच्यासमोर. "

सजणा दीनवाणीनें रडत महाराजांच्या तोंडाकडे पाहूं लागली. महाराजांनीं त्या दोघां हुजऱ्यांना दरडावून म्हटलें, " हां ! खबरदार ! आमच्या देखत असा अतिप्रसंग करायला तुम्हांला लाज नाहीं वाटत ? "

सजणेला आसुडानें झोडपणारा हुजऱ्या महाराजांना दोन्ही हात जोडून नम्रपणें उद्गारला, " महाराज, आम्ही थोरल्या राणीसाहेबांचे नोकर आहोंत. त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानणें आम्हांला प्राप्तच आहे. "

" पण आतां आम्ही तुम्हांला आज्ञा करतों, त्या गरीब दासीच्या केंसाला तरी धक्का लावाल तर खबरदार. आमच्यासमोर तुम्ही एवढा अतिप्रसंग करूं शकतां, इतके तुम्ही अरेराव झालांत काय ? "

पेशवाईचा पुनर्विकास

" पण महाराज, थोरल्या राणीसाहेब— "

"खबरदार! आमच्या शद्बावर उलटून बोलतां? जा अगोदर येथून चालते व्हा. थोरल्या राणीसाहेब भेटल्या म्हणजे आम्ही त्यांना याचा जाब विचारूं."

महाराजांच्या तोंडचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच राणी सकवारबाई जणूं चंडिकेचा अवतार धारण करून संतापातिशयानें नखशिखान्त थरथर कांपत दांत ओंठ खात तेथें प्रविष्ट झाली आणि आवेशानें महाराजांना म्हणाली, " या पहा थोरल्या राणीसाहेब आपल्यासमोर उभ्या आहेत. त्यांचें काय डोकें मारावयाचें तें मारा म्हणे थोरल्या राणीसाहेबांना जाब विचारणार! थोरल्या राणीसाहेब म्हणजे आपण कोणी एखादी बटिक किंवा कुणबीण समजलांत काय? "

महाराजांना सकवारबाईचे ते उद्गार जणूं आकाशांतून वीज कडकडून मस्तकावर पडल्याप्रमाणें वाटले. पण ते आपला अपमान कोणापाशीं बोलून दाखविणार? आणि त्यांचें ऐकणार कोण? राणीकडून बोलून घेण्याचा हा प्रसंग कांहीं त्यांच्या आयुष्यांत पहिलाच नव्हता. बायको दुसरी आणि फजीती तिसरी म्हणतात, त्याचा अनुभव तीन राण्या केल्यामुळें व त्याशिवाय अनेक रक्षाही ठेवल्यामुळें तितक्या गुणाकारानें महाराजांना हरघडीं घ्यावा लागत होता. त्यांचें काय पूर्वजन्मींचें संचित असेल तें असो, पण विवाहित पत्नींपासून खरेंखुरें गृहसौख्य त्यांना उभ्या आयुष्यांत कधीं मिळालेंच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. नाहीं म्हणावयाला विरूबाई मात्र महाराजांची रक्षा असूनही महाराजांना राणीपेक्षांही प्रिय होती; व ती केवळ स्वतःच्या रूपामुळें अथवा महाराजांच्या विषय लोलुपतेमुळेंच प्रिय होती असेंही नव्हे; तर ती खरोखरच पहिल्या प्रतीची गुणवान होती व महाराजांना संसारांत विश्रांतीचें खरेंखुरें स्थान असें तेंच एक होतें. परंतु विरूबाई कांहीं काळापूर्वीं परलोकीं गेल्यामुळें गृहसौख्याच्या दृष्टीनें महाराज उघड्यावर पडल्यासारखे झाले होते. इतर राण्या या खरें सांगावयाचें तर केवळ लौकिकाच्या सहचारिणी होत्या. त्या स्वतःचे बहूरुपी चोज व हट्ट पुरविण्यापुढें महाराजांच्या सुखदुःखाची पर्वा तितपतच करीत. पण महाराजांनीं हें बोलून दाखवावें कोणापाशीं? काय म्हणतात त्यांतील अवस्था, मान सांगावा जनांत व अपमान सांगावा मनांत.

त्यांतल्या त्यांत हयात असलेल्या दोन राण्यांपैकीं डावें उजवेंच शोधावयाचें तर सगुणाबाई पुरवली पण सकवारबाई नको असें म्हणण्याचे प्रसंग महाराजांवर पावलोपावलीं ओढवत. आजचा प्रसंग हा देखील त्यापैकींच एक होता. सगुणाबाईनें तरी सजणेला आपल्या सेवेंतून मुक्त करण्याचें मनांत आणलें व महाराजांची तशी संमति मिळविली, याला सजणेविषयीं सगुणाबाईला वाटणारी सहानुभूति हें एक प्रधान कारण असेल; पण त्याशिवाय आणखी एक कारण असें होतें कीं, सजणा ही नेहेमीं सकवारबाईशीं बांकून वागे. राण्याराण्या जशा एकमेकींशीं सवतीमत्सराच्या चुरशीनें वागत, तसेच त्यांचे दासदासीजनही बांकून वागत. कोणाही नोकरांना आपला धनी किंवा आपली धनीण प्रिय असणारच. आणि ही प्रियता एरव्हीं जरी दृष्टोत्पत्तीला आली नाहीं, तरी अशा चुरशीच्या सामन्यांत हटकून यावयाची! तशांत त्या बायका! सकवारबाई सजणेच्या अरेरावी वर्तनाबद्दल तिच्यावर नेहेमीं दांतओठ खाई व तिनें अलिकडे सजणेला आपल्या सेवेंत रुजू करून घेण्याचे अनेक खोल डावपेंचही चालविले होते. त्या डावपेंचांत सकवारबाईला यश येण्याचाही संभव होता. सजणेचा इतके दिवस परागंदा असलेला बारगीर पति प्रतापराव हा प्रतिनिधींच्या नोकरींत होता व प्रतिनिधींशीं सकवारबाईचें चांगलेंच संधान होतें. त्या बाजूनें शह लावून सकवारबाई सजणेला आपल्या दासीगणांत ओढून घेईल व तिच्यावर सूड उगवील हा भावी प्रसंग टाळण्यासाठींच मुख्यतः सगुणाबाईनें महाराजांपाशीं रदबदली करून दास्यांतून आज तिची मुक्तता करण्याचें ठरविलें होतें.

पण आपला पाणउतारा करण्यासाठीं आपली सवत हा डाव खेळत आहे हें धूर्त सकवारबाईला कळण्यास कितीसा उशीर! लगेच तिच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन झोंबली. तिनें आपल्या पूर्वोक्त दोघां हुजुऱ्यांना सांगून सजणा राजवाड्याबाहेर जात असतांना त्यांच्या हातीं तिला अडविलें, व मारीत झोडीत आपणासमोर तिला आणविली. तेथून सजणा जी जीव घेऊन पळाली, ती किल्ल्यांतील भुयाराच्या मार्गानें महाराजांच्या पायांपाशीं रंगमहालांत धावून आली होती.

कसे झाले तरी महाराज जातीचे पुरुष होते. धनंतर मराठशाहीचे छत्रपति म्हणून एकतंत्री सत्ता गाजविण्याला त्यांना परिस्थितीनें फारसा अवसर

दिला नव्हता तरी प्रतिकूल परिस्थितींत देखील पुरुषाचा पुरुषपणा स्त्रीसमोर थोडाच माघार घेणार! महाराजांना सकवारबाईचे ते उद्दामपणाचे शब्द मुळींच रुचले नाहींत. त्यांनीं तिला कठोर स्वरांत विचारलें, "पण तुम्हांला या दासीच्या भानगडींत पडण्याचें काय कारण?"

"आणि आपणाला तरी आम्हां राण्यांच्या कारभारांत नसती लुडबुड करण्याचें काय कारण? मी पट्टराणी आहें; आपल्या जनानखान्यावर माझी एकतंत्री सत्ता आहे. तिथें माझी हुकमत मी माझ्या मर्जीप्रमाणें गाजविणार. त्यांत इतरांनीं ढवळाढवळ कां म्हणून करावी?" सकवारबाईनें अगदीं निर्भयपणें—आपल्या मनाला शालीनतेचा ओझरता स्पर्शही होऊं न देतां मनांतून महाराजांना कस्पटाप्रमाणें लेखीत विचारलें.

महाराज म्हणाले, "तुमचा ह्या दासीनें कांहीं अपराध केला असल्यास सांगा."

"पण मीं आपणापाशीं तशी फिर्यादच आणली नाहीं. माझा तिनें अपराध केला असला तर त्याचा सारा न्यायनिवाडा करायला मी पूर्ण समर्थ आहें" असें म्हणून सकवारबाईनें पुन्हा आपल्या त्या दोघां हुजुऱ्यांकडे वळून आज्ञा केली, "चला त्या सटवाईला एथून माझ्या राजवाड्यांत ओढीत घेऊन जा आणि तिथें तिला अंधारकोठडींत कोंडून ठेवा. मग मी तिचा न्याय काय करावयाचा तो करीन." ती तशीच सजणेकडे खवळलेल्या सिंहिणीप्रमाणें पाहत उद्गारली "सटवाई, माझा शब्द धिक्कारून तूं पळून जात होतीस नाहीं? तुला माझी दासी म्हणवून घेण्यांत लाज वाटते नव्हे का? थांब, तुला दासीच काय पण माझ्या दासीची दासी बनवून उभा जन्म तुझे हाल हाल करून तुला कुजवून ठार करीन तर नांवाची सकवार!"

सजणेनें पुन्हा अनन्यगतिक होऊन महाराजांच्या पायाला मिठी मारली व आपलें रक्षण करण्यासाठीं आर्तवाणीनें ती त्यांना विनवूं लागली. तेवढ्यांत ते दोघे हुजरे तिच्या दोन दंडांना धरून मागें खेंचीत तिला ओढीत नेऊं लागले.

"खबरदार तिच्या अंगाला हात लावाल तर!" महाराज आवेशानें उद्गारले व डोळे वटारून त्या दोघां हुजऱ्यांकडे पाहूं लागले. राजकारणाच्या अंतर्गत घडामोडी बाजूला ठेवल्या तर महाराजांच्या नेत्रकटाक्षांत अजूनही

एवढें जबरदस्त सामर्थ्य होतें कीं त्यांनीं प्रसन्नतेनें एखाद्याकडे पाहिलें कीं त्याचें जन्माचें कोटकल्याण व्हावें, व क्रोधानें पाहिलें कीं त्याच्यावर अनर्थ-परंपरा कोसळावी. पण हा नियम सामान्य जनतेसाठीं झाला. राजवाड्यांत व विशेषतः राण्यांच्या महालांत महाराज म्हणजे ‘ कुठच्या झाडाचा पाला ’ होऊन बसले होते. त्यामुळेंच त्या हुजुऱ्यांना महाराजांचा दरारा जाणवला नाहीं. त्यांनीं आपल्या धनिणीच्या आज्ञेची तामिली करण्यासाठीं महाराजांच्या देखत त्यांचा शद्ब लाथाडून बिचाऱ्या सजणेला भुयाराच्याच मार्गानें फरफरां ओढीत नेलें ! महाराज त्यांचा प्रतिकार करण्याला असमर्थ ठरले !

प्रकरण ३ रें

यमाजींची फेरी

त्या अतिप्रसंगाविषयीं महाराज विषण्ण चित्तानें स्वतःशीं चिंता करीत बसले असतांना कांहीं क्षणपावेतों सकवारबाई विजयी मुद्रेनें त्यांच्याकडे टक लावून पाहत होती. तिनें जेव्हां महाराजांच्या नेत्रांतून अश्रु टिबकूं लागलेले पाहिले, तेव्हां कुत्सितपणें विचारलें, " आधीं आमच्या भानगडींत नसती ढवळाढवळ करावी कां, आणि मागाहून बायकोसारखें रडत बसावें कां ? "

" तूं माझ्या संसाराचा नरक बनवून सोडला आहेस. आज इतकीं वर्षें मी पाहतों आहें, तूं एखाद्या जिवंत हडळीप्रमाणें हात धुवून माझ्या मागें लागली आहेस. विरूबाईसारख्या साध्वीला देखील तूं छळलेंस ! "

" राणीला सोडून राखेला भजणाऱ्या पुरुषांना बायकांनीं काय किंमत द्यावयाची तें मला कळतें. " सकवारबाई ताठ्यानें उत्तरली.

" विरूबाई राख असली तरी तुम्हीं राण्यांनीं तीन त्रिकाळ तिचें चरणतीर्थ प्राशन करावें इतकी श्रेष्ठ प्रतीची साध्वी ती होती. खरोखर, विरूबाई आम्हांला सोडून गेली म्हणजे साक्षात् लक्ष्मीच आम्हांवर रुसली व आम्ही तिच्या सहवासाला अंतरलों, असें मला वाटतें. तिच्यामागें परमेश्वरानें मला हा छळ सोसण्यासाठीं जिवंत ठेवलें आहे. "

" मग आपण छत्रपति आहां ना ? पुरुषांनीं आपल्या राखेबरोबर सती जावें असा एक नवीन पायंडा आपणाला आपल्या राज्यांत आपल्या उदाहरणानें पाडतां आला नसता का ? "

" सकवार ! खरोखरच तूं माझी सातां जन्मींची वैरीण आहेस. माझीं कैक पूर्वजन्मींचीं पापें तुझ्या रूपानें माझा झाडा घेण्यासाठीं भूतलावर अवतरलीं आहेत. परमेश्वर तुझ्या या जाचांतून मला कधीं सोडवील तो सुदिन ! "

" मग मीं मरावें अशी का आपली इच्छा आहे ? तसें असलें तर स्पष्ट सांगून टाका. मग आज सूर्यास्तानंतर ही सकवार आपल्याला जिवंत दिसली तर मला विचारा. एवढ्याशा गोष्टीनें आपलें पित्त इतकें खवळलें, मग मीं लग्न झाल्या दिवसापासून आपल्या पदरीं अपमान, उपहास, कसे बरें सहन केले असतील ? माझ्याशीं लग्न करतांना आपण मला काय वचन दिलें होतें, आठवतें का ? मला आपण पट्टराणी करणार होतां, आणि माझा मुलगा आपल्या पश्चात् मराठ्यांचा छत्रपति होणार होता. पण तीं सर्व वचनें आपलीं आपणच मातींत घातलीं ! विरूबाई हयात होती तोंवर इतर राण्यां-बरोबर आणि रक्षांबरोबर मला—ह्या आपल्या पट्टराणीलाही तिच्या हुकमतींत वागायला आपण भाग पाडलें. आपण विचार करा, राणीला-त्यांतून माझ्या-सारख्या खानदानीच्या व स्वाभिमानी राणीला आपल्या यःकश्चित एका कम् अस्सल सवतीच्या हुकुमतींत वागतांना कसें वाटलें असेल ? ती विरूबाई एकदां उलथून गेली, आतां तरी बरे दिवस वांट्याला येतील अशी आशा मी करीत होतें. पण ती आशाही फोल ठरली. आपणाला अजूनही आपल्या आवडत्या राणी सगुणाबाईची कड घ्यावीशी वाटते, व माझी आपण विचार-पूसही करीत नाहीं ! अशा स्थितींत मीं काय करावें ? देव मला मरणही एकदांचें देत नाहीं ! इतके दिवस वाटे, पोटीं पुत्र जन्माला आला असता तर फार बरें झालें असतें. तो छत्रपति झाला असता, व मी राजमाता म्हणून शोभलें असतें. राजपत्नी या नात्यानें मानमान्यता भोगण्याचें नशिबीं नाहीं तर नाहीं, राजमाता या नात्यानें तरी जिवाचा विरंगुळा करतां यावा म्हणून पुत्रवति होण्याची मला फार इच्छा होती. पण आतां वाटतें कीं देवानें मला पुत्रवति केलें नाहीं हें फार चांगलें केलें. हो—! त्याचा काय नेम ? आपल्या एखाद्या आवडत्या रक्षेच्या पोटीं पुत्र जन्माला आला असता, अगर जन्म-लेला जगता, तर आपण नादानपणानें त्याला छत्रपति करण्यालाही कमी केलें नसतें ! आणि मग खऱ्याखुऱ्या राजपुत्राला त्या डाकलग छत्रपतीच्या हुक-मतींत लाजिरवाणें जिणें जगावें लागलें असतें ! " यापुढें सकवारबाईच्यानें बोलवेना. तिचा कंठ दाटून आला व तोंडावाटे शद्ब निघेनासा झाला. हें ती नाटक करीत होती असें मात्र नाहीं. ती खरोखरच अत्यंत तामसी वृत्तीची व कठोर अंतःकरणाची स्त्री होती. प्रेम किंवा मार्दव याचा लवलेशही तिच्या

ठायीं नव्हता. महाराजांवर तिनें जे आरोप केले ते अगदींच निरर्थक होते असें मात्र नाहीं. महाराजांनीं तिला लग्नाच्या वेळीं पट्टराणीपद देऊं केलें होतें, व तिच्या पुत्राला छत्रपति करण्याचेंही वचन दिलें होतें हें खरें. पण एकतर महाराज मनदुबळे व विलासी. विलासलोलुपतेच्या भरांत पुरुष जीं जीं अघळ-पघळ वचनें आपल्या प्रियतमेला देतात तीं तीं त्यांनीं अक्षरशः पाळलीं असें क्वचितच घडतें. हें कांहीं सत्ययुग नव्हे. सत्ययुगांत इक्ष्वाकुकुलभूषण सम्राट दशरथ एवढा सत्यवचनी होऊन गेला; त्यानें कैकेयीला दिलेलीं वचनें पाळलीं हें खरें. पण तीं पाळतांनाही त्या धीरवीर पुरुषाला इतके अपरंपार मानासिक क्लेश झाले कीं त्यांतच अखेर त्याच्या आयुष्याचा शेवट झाला.

सकवारबाईच्या आंगचा कांगावखोरपणा जरी महाराजांच्या परिचयाचा होता, तरी आततायीपणाच्या गोष्टी सकवारबाई बोलूं लागल्यावर एक घाव दोन तुकडे अशा वृत्तीनें वागण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. सकवारबाईचे आतांचे उद्गार ऐकून त्यांचें अंतःकरण थोडेसें तरी द्रवलेंच. सकवारबाईला महाराजांच्या स्वभावांतील दुबळेपणाची ही गोम माहीत होती, म्हणूनच ती तरी जेव्हां तेव्हां अशा त्राग्याच्या गोष्टी बोले. आजही तिनें जेव्हां पाहिलें कीं आपला त्रागा महाराजांना भीति दाखवण्याला पुरून उरला आहे, तेव्हां तिनें तो आवेश कायम ठेऊन त्यावर आपल्या मानभावी रूदनाचा उजाळा देण्याला सुरवात केली. बायकांचें हें रुदनास्त्र एवढें जबरदस्त असतें कीं त्यासमोर इतर सर्व शस्त्रास्त्रें निस्तेज पडतात.

"आपणच जर मला अशी आपल्या पायांपासून दूर लोटली, तर मी जिवाच्या विसांव्यासाठीं दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पाहूं! मी कठोरपणानें बोलतें ती माझी इभ्रत राखण्यासाठीं नसून आपली इभ्रत राखण्यासाठीं बोलतें. आपली पट्टराणी चोरांपोरांच्या व नोकरांचाकरांच्या थट्टेचा विषय झालेली आपणाला आवडेल का?" एवढें बोलून सकवारबाईनें पुन्हा डोळ्यांना पदर लावला. पाण्याच्या उदरीं विस्तव असतो तो कसा, हें ज्यांना अजमावून पाहावयाचें असेल त्यांनीं तामसी वृत्तीच्या सकवारबाईच्या आतांच्या जळजळीत वृत्तींतून कांहीं क्षणापूर्वीं जेथें निर्दय शद्बांचे अग्निस्फूलिंग पडत होते तिथेंच इतक्या मायाळूपणाचे व करुणेनें थबथबलेले हिमबिंदु त्याच वाणींतून कसे स्रवूं लागले हें पाहावें.

महाराजांनाही त्या क्षणीं वाटलें कीं राणीला तिच्या एकांगी विचारसरणीमुळें कां होईना पण अपमान दुःसह होतो खरा. ते राणीचें शांतवन करण्याच्या भावनेनें म्हणाले, "आमच्याकडून तुमचा कधीं बुद्धिपुरस्सर अपमान झाला असल्यास सांगा."

"आपल्याकडून अपमान झाला असें मी कुठें म्हणतें? पण आपली बेफिकीर वृत्ति पाहून सभोंवारचीं माणसें शेफारून जातात, व तींच माझा पदोपदीं पाणउतारा करतात. हेंच पाहा, आपण नानासाहेबासारख्या तीन मिऱ्यांएवढ्या पोराला पेशवाईचीं वस्त्रें दिलीं, त्या वेळींच मी आपल्याला सांगत होतें कीं असें करणें बरें नव्हे. मीच कशाला; सारी कारभारी मंडळीही कंठरवानें तेव्हां तेंच सांगत होती! पण आपण तिकडे मुळींच लक्ष्य न देतां आपलाच हेका पुरा केला. त्याच वेळीं रघूजीबाबांना आपण पेशवाईपद दिलें असतें, तर आज जी राजवटींत जबरदस्त दुफळी माजून राहिली आहे व परिस्थिति सर्व बाजूंनीं आपल्या आवांक्याबाहेर गेली आहे, तसें झालें असतें का?" सकवारबाई समयसूचकतेनें उद्गारली.

विषयाला मूळ कुठें आरंभ झाला, आणि सकवारबाईनें आपल्या अंगच्या चतुराईनें तो कुठें नेऊन पोहोंचविला! महाराजांच्या तें ध्यानीं आलें नसेल; पण राजकारणाविषयींचे सकवारबाईचे आडाखे व डावपेंच आज इतक्या वर्षांच्या तिच्या अनुभवानें व उद्योगानें अगदीं ठरून गेले होते. पेशव्यांशीं तिचें हाडवैर होतें, व तें पेशव्यांनीं आपल्या अंगाचें कातडें सोलून त्याचे जोडे करून तिच्या पायांत घालण्यानेंही दूर होण्याजोगें नव्हतें. रघूजी भोंसले तिला नानासाहेबांऐवजीं पेशवे व्हावयाला हवे होते. तो डाव प्रथम महाराजांच्या दूरदर्शित्वामुळें हुकला, व नानासाहेबच थोरल्या बाजिरावांच्या पश्चात् पेशवे झाले; तरी सकवारबाई आपल्या अंगीकृत कार्याविषयीं निराश झाली नव्हती. रघूजी भोंसले एवढे पराक्रमी व मुत्सद्दी असूनही त्यांनीं पेशव्यांविरुद्ध महाराजांवर आपलें वजन पाडण्याची आशा आतां जवळजवळ सोडली होती, व ते आतां अन्य मार्गांनीं नसते बखेडे राजवटींत उत्पन्न करून नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द अयशस्वी करून दाखविण्याच्या उद्योगाला लागले होते. परंतु सकवारबाईला मात्र अजूनही आत्मविश्वास वाटत होता कीं आपण आज ना उद्यां व पेशव्यांच्या ताटांत विष कालवून आपला डाव साधूं.

पेशवाईचा पुनर्विकास

हा एक डाव सिद्धीला जाण्यावर सकवारबाईचे पुढील अनेक महत्त्वाचे बेत अवलंबून होते. तिला राजमाता व्हावयाचें होतें; मराठशाहीचे सर्वाधिकार आपल्या मुठींत यावे आणि आपणही ताराबाईसासूबाईप्रमाणें राज्य करून दाखवावें अशी महत्त्वाकांक्षा तिला होती. त्या मुख्य महत्त्वाकांक्षेच्या छायेखालीं आणखी किती बऱ्यावाईट महत्त्वाकांक्षा वावरत होत्या त्यांचा पत्ताच नव्हता. तिला स्वतःला आतां वृद्धापकाळीं पुत्रवति होण्याची आशा नव्हती. पण ती औरस संततीची उणीव आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या तंत्रानें वागणारा एखादा दत्तक मांडीवर घेऊन दूर करण्याची तिची मनापासून इच्छा होती. हा प्रश्न सकवारबाईनें अनेक वेळां महाराजांपाशीं काढलाही होता. पण महाराज प्रत्येक वेळीं त्या प्रश्नाला अचूक बगल देत व सकवारबाईचा नाइलाज होई. तरीपण सकवारबाई कमालीची प्रयत्नवादी होती. तिनें हेका सोडला नव्हता. "नानासाहेबांचा आणि तुमचा पूर्वजन्मींचा कांहींतरी दावा दिसतो!" महाराज सकवारबाईला म्हणाले.

"हो! आणि तोच ते या जन्मीं साधून घेत आहेत. म्हणूनच त्यांनीं मला धुळीला मिळविण्याचा विडा उचलला आहे." सकवारबाई उद्गारली.

"तुमचें मन त्यांच्याविषयीं निष्कारण संशयानें ग्रासलेलें आहे."

"संशय आहे तर खराच. पण तो निष्कारण कीं सकारण याचा आपण अंमळ दूर दृष्टीनें विचार केला तर आपणाला कळून येईल कीं कांहींतरी बोलायला कांहीं सकवारबाईला वेड लागलेलें नाहीं. मी बायको माणूस, मला काय कळतें, अशा भावनेनें आपण माझ्यावर विश्वास ठेवणार नसाल तर नका ठेवूं. पण आपल्या राजवटीचे इतर कर्ते कारभारी म्हणजे तर कांहीं बायका नाहींत ना? ते काय म्हणतात हें तरी ऐकायचें होतें. रघूजीबाबांची एक गोष्ट सोडून द्यावी. कानफाटेपणा एकदां त्यांच्या पदरीं आला आहे तो कांहीं आपल्या अनुभवाशिवाय दूर व्हायचा नाहीं. पण प्रतिनिधि तरी आपले एवढे विश्वासाचे ना? त्यांच्या मनाचा वारा कोणत्या दिशेनें वाहतो आहे हें तरी आपण ध्यानीं घ्यायचें होतें."

"त्यांच्या मनाचा वारा कोणत्या दिशेनें वाहतो आहे?"

"ही माझी परिक्षा पाहणें चाललें आहे का?" आपणाला आज माझ्या शद्बाची किंमत कळणार नाहीं. पण उद्यां आपणावरच आपल्या या राज–

वाड्यांत नाहींतर किल्ल्यावरच्या कोठींत सासूबाईंच्याप्रमाणें बंदीवान होऊन खितपत पडण्याची पाळी येईल तेव्हां आपले डोळे उघडतील." बोलतांना सकवारबाई तीक्षण दृष्टीनें महाराजांच्या चर्येकडे पाहत होती. नानासाहेब पेशव्यांविषयीं कोणीं उणा दुणा शब्द काढला तर ते महाराजांना बिलकूल सहन होत नाहीं हें तिला माहीत होतें. म्हणूनच ती आपल्या उद्गारांचा परिणाम महाराजांवर काय होतो तें त्यांच्या चर्येवर लक्षपूर्वक न्याहाळून पाहात होती. महाराजांना खरोखरच तिचे ते बोल रुचले नाहींत. राणी पडली, तिची मुर्वत मोडावयाची नाहीं, म्हणून तिला त्यांनीं गप्प बसा एवढें सांगितलें नाहीं इतकेंच काय तें. एरव्हीं त्यांची चर्या तेव्हां इतकी गंभीर झाली होती कीं ती पाहूनदेखील नानासाहेबांविरुद्ध असें निंदापुराण पुढें सुरू ठेवणाराची छातीच म्हटली पाहिजे. इतकी छातीबाज सकवारबाई असल्यामुळेंच ती महाराजांच्या चर्येकडे पाहून डगमगली नाहीं. ती पुढें म्हणाली, " आपणाला माझे कडू पण खरे बोल रुचत नसतील तर नशीब आपलें आणि महाराष्ट्राचें. पण माझें नशीबही आपल्याशीं दैवयोगानें बांधलें गेलें आहे, आपल्या सुखाविषयीं व मानमान्यतेविषयीं मला माझ्या प्राणापलिकडे काळजी वाटते, म्हणून बोलणें प्राप्त होतें. " इतक्यांत मागून कोणाची चाहूल लागली म्हणून तिनें मागें वळून पाहिलें. तोंच महाराजांच्या हुजुऱ्यानें पुढें येऊन वर्दी दिली, " प्रतिनिधींचे मुतालिक यमाजी शिवदेव महाराजांच्या भेटीसाठीं आले आहेत. "

यमाजी शिवदेव आल्याची वार्ता कळतांच एखादें उन्हाच्या तिरपेनें करपून गेलेलें रोपटें नवजलसिंचनानें टवटवीत व्हावें त्याप्रमाणें सकवारबाईची चर्या टवटवली. परंतु महाराजांना मात्र मनांतून वाटलें कीं याच वेळीं ही ब्याद इकडे कशाला आली? ते हुजुऱ्याला म्हणाले, " मुतालिकांना म्हणावें दोन प्रहरीं भेटा. "

इतक्यांत सकवारबाई म्हणाली, " मुतालिकांना भेटावयाला आपणाला यावेळीं सवड नाहीं हें बरोबरच आहे! त्यांना आपल्या तोंडदेखलें बोलतां येत नाहीं, हा त्यांचा अपराध कांहीं लहानसा नाहीं. तेच पेशवे आतां येऊंद्यात कीं आपणाला त्यांची एकांतांत भेट घेण्यासाठीं राणीदेखील परकीशी वाटूं लागेल. " ती मागें वळून त्याच हुजऱ्याला म्हणाली, " जारे, मुतालिकांना आंत पाठवून दे. " हुजुऱ्या बाहेर गेला. लगेच ती महाराजांकडे

वळून म्हणाली, " आपणांला मीं आतां जें आपल्या पेशव्यांविषयीं सांगितलें त्याची सत्यता या क्षणीं आपणाला पटवून देत्यें, मग तर झालें ना ? "

" ठीक आहे. काय ती सत्यता आमच्या निदर्शनाला येऊंद्या, म्हणजे आम्हांला सुद्धां आमच्या पेशव्यांची नेकी तुमच्या मनाला पटवून देण्याला निराळे श्रम घेण्याचें कारण नाहीं. " महाराज उत्तरले.

" आणि आपले पेशवे बद्नेकीचे ठरले तर ? " सकवारबाईनें खोंचदार प्रश्न विचारला.

" तसें होणेंच शक्य नाहीं. " महाराज उत्तरले.

" शक्य न झालें तर फारच चांगलें. पण शक्य झालें तर ? "

" तें मग पुढचें पुढें पाहतां येईल. " महाराज उत्तरले. तोंच यमाजी शिवदेव तेथें येऊन दाखल झाले. सकवारबाईच्या मनांतून महाराजांना शद्वाच्या पकडींत गुंतवून पेशव्यांना भविष्यकाळीं कोणतें शासन द्यावें हें त्याच्या तोंडून निश्चित करून घ्यावयाचें होतें. परंतु यमाजी शिवदेव आल्यामुळें तिला आपली ती मनीषा किंचित् आवरती घ्यावी लागली.

" यमाजी, आतां मीं विचारतें तें खरें खरें सांगा. बोला खरें सांगाल ना ?"

यमाजी शिवदेव चर्या एकाएकीं फुलवून म्हणाले, " राणीसाहेब, आजकाल या मराठशाहींत खरें बोलणें हें पाप ठरूं लागलें आहे. त्यामुळें माझ्यासारख्या निस्पृह माणसाची मोठी कुचंबणा होत आहे. खोटें बोलेल तो तूप रोटी खाईल आणि खरें बोलेल तो मात्र उपाशीं मरेल असा आजच्या राजवटीचा परिपाठ बनून गेला आहे. बाकी, खरें बोलून उपाशीं मरावें लागलें तरी मला मात्र त्याची पर्वा नाहीं. जोंवर माझ्या अंतःकरणांत महाराजांच्या आणि अलम मराठशाहीच्या चिरंतन कल्याणाविषयीं निःसीम कळकळ वसत आहे, तोंवर तें उद्दिष्ट साधण्यासाठीं मला कितीही यातना व कितीही आपत्ति भोगाव्या लागल्या तरी बेहेत्तर आहे. आपणाला काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा. आपणाला माझा स्वभाव माहीत आहेच. तोंडपुजेपणा माझ्या गांवीं नाहीं. मी खरें तेंच बोलेन. मग तें कोणाला रुचो वा न रुचो. "

प्रकरण ४ थें

ठिणगी पडली

सकवारबाईच्या इतक्या सुटसुटीत प्रश्नावर यमाजी शिवदेव एवढें लांबलचक भाष्य करूं शकले यांत वरवर दिसावयाला त्यांनीं राणीची अमर्यादा केली असें दिसतें खरें. पण निदान सकवारबाईला तरी त्यांत अमर्यादा मुळींच वाटली नाहीं. नानासाहेब पेशव्यांच्या विरुद्ध व राजवटीच्या इतर बाबींसंबंधीं सकवारबाईच्या तंत्रानें एकावर एक गूढ कारस्थानें रचणारी सकवारबाईच्या विश्वासांतील जी मंडळी होती, त्यांत यमाजी शिवदेवांचा प्रामुख्यानें समावेश होत होता. सकवारबाई आपल्या मतें त्या सर्व कारस्थानांची सूत्रचालक होती; परंतु वास्तविक यमाजी शिवदेव, रघूजी भोंसले, बाबूजी नाईक वगैरे पेशव्यांच्या प्रतिस्पर्धी मंडळीनें आपलीं कुटिल कारस्थानें तडीला नेण्यासाठीं तिला आपल्या हातांतील कळसुत्री बाहुली बनविलें होतें ! ते सूत्रचालक नाचवितील तशी ती बाहुली नाचत होती ! यमाजी शिवदेव हे थोरल्या बाजिरावांना पेशवाईचीं वस्त्रें मिळण्याच्या वेळेपासून भट पेशव्यांना पाण्यांत पाहत होते. त्यावेळीं कैलासवासी श्रीपतराव प्रतिनिधींचा त्यांना पाठिंबा असल्यामुळें कांहीं काळ त्यांची चलती होती. परंतु थोरल्या बाजिरावांच्या निधनानंतर त्याच श्रीपतरावांनीं नानासाहेबांची कड घेतली, आणि नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें मिळावीं म्हणून महाराजांपाशीं शिकस्तीची शिष्टाई केली; तेव्हांपासून यमाजी शिवदेवांचें मराठी राजवटींतील सार्वजनिक अस्तित्व निर्माल्यवत् झालें होतें. ती त्यांची प्रतिकूल ग्रहदशा श्रीपतरावांच्या निधनाबरोबर संपली, व श्रीपतरावांच्या पश्चात् जगजीवनरावांना प्रतिनिधिपदाचीं वस्त्रें मिळून त्यांची मुतालिकी याच यमाजी शिवदेवांना मिळाली. त्यापूर्वीं देखील सकवारबाईशीं संधान राखून कारस्थानें करण्याचा यमाजी शिवदेवांचा

उद्योग अव्याहत सुरूच होता. पण तो प्रत्यक्ष सत्तेच्या अभावीं कांहींसा लंगडा पडला होता. ती सत्ता मुतालिकीच्या निमित्तानें हातीं येतांच यमाजी शिवदेव पेशव्यांना नामोहरम करण्यासाठीं नव्या जोमानें झटूं लागले, व त्याच जोमांत ते आतां बोलत होते.

"नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें मिळण्याच्या सुमाराला कोल्हापूरकर संभाजीराजे साताऱ्यांत वास्तव्य करीत होते ना?" सकवारबाईनें यमाजी शिवदेवांना विचारलें.

"हो! हें काय विचारतां? ही गोष्ट सूर्य–चंद्रांइतकी स्पष्ट आहे." यमाजी शिवदेव उत्तरले.

लगेच सकवारबाईनें महाराजांकडे वळून विचारलें, "कोल्हापूरकर तेव्हां इकडे कशाला बरें आले असावे?"

"पण त्या शिळ्या कढीला ऊत आणण्यांत तात्पर्य काय?" महाराजांनीं विचारलें.

"तात्पर्य काय तें मी सांगतें. ते साताऱ्याची गादी आणि कोल्हापूरची गादी यांचा सलोखा करण्यासाठीं आले होते ना?" सकवारबाईनें यमाजी शिवदेवांकडे पाहून विचारलें, "होय ना हो? तुम्हांला माहीत आहे ना?"

"मला सर्व कांहीं माहीत आहे. पण कान असून ऐकावयाचें नाहीं, डोळे असून पाहावयाचें नाहीं, तोंड असून बोलावयाचें नाहीं, असा सर्व बाजूंनीं कोंडमारा झाल्यावर कोणीं काय बोलावें!" यमाजी शिवदेव गंभीर चर्या करून उद्गारले.

"आणि आपले आवडते नानासाहेब सातारा आणि कोल्हापूर यांचा एकजीव करून देण्यासाठीं तेव्हां जिवापाड झटत होते खरे ना?" सकवार-बाईनें महाराजांना विचारलें.

"हें आम्ही न सांगतांच कोणालाही कळण्याजोगें आहे." महाराज उत्तरले.

"आणि ती नानासाहेबांची साताऱ्याच्या गादीविषयींची कळकळ पाहू-नच महाराजांनीं इतर कारभारी मंडळींचा शब्द कस्पटासमान मानून नाना-साहेबांना पेशवाईचीं वस्त्रें दिलीं!" सकवारबाई उद्गारली.

"आमच्या सेवकांची किंमत इतरांपेक्षां आम्हांला चांगली कळते. त्या बाबतींत इतरांनीं बोलण्याचें कारण नाहीं." महाराज उत्तरले.

" पण आपले आपले म्हणून आपण ज्यांना जवळ करतां, त्यांच्या कृष्ण-कारस्थानांचे फांस आपल्या मानेसभोंवार आंवळले जात असतांना पाहून-देखील आम्ही कांहीं बोलूं नये असें आपलें म्हणणें का ?"

" आमच्यापाशीं वाऱ्यावर वरात आणि भुसावर चिठ्ठी देऊन कोणाचा पल्ला यावयाचा नाहीं हें तुम्हांला माहीत आहे ना ?"

" हो हो माहीत आहे. म्हणूनच बोलतें आहें. आपल्या आवडत्या पेशव्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं कोणतीं कारस्थानें चालविलीं आहेत, याची आपणाला दाद तरी आहे का तें मला अगोदर सांगा तर खरें !"

" कोणतीं कारस्थानें चालविलीं आहेत ?" महाराजांनीं रागानें विचारलें.

" यमाजी !" अशी हांक मारून सकवारबाईनें एकवार यमाजी शिवदे-वांकडे सूचक दृष्टीनें वळून पाहिलें.

" कोणतीं कारस्थानें चालविलीं आहेत तीं सांगा ना ? उगाच आपसांत वैमनस्य उत्पन्न करून मराठशाहीच्या चालत्या गाड्याला खीळ घालण्याचे रिकामटेकडे उपद्व्याप करूं नका." महाराज तिरस्कारानें उद्गारले.

" महाराज, माझ्यासारख्या सामान्य सेवकासमोर तरी थोरल्या आई-साहेबांचा असा पाणउतारा करणें बरें नाहीं. मी आपलें लेंकरूं, मी लहान तोंडीं मोठा घांस घेत आहें याबद्दल मला क्षमा करा. पण चोराला सोडून संन्याशाला सुळीं देण्यासारखा हा प्रकार होतो आहे, एवढें स्पष्टपणें बोल-ल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं." यमाजी शिवदेव गंभीर चर्या करून म्हणाले.

" पण यांत चोर कोण आणि साव कोण हें आम्हीं कसें ओळखावें ?"

" चोर मी, आणि बाकीचें सारें जग साव ! आणि त्यांतल्या त्यांत आपले पेशवे सावांतले साव !" सकवारबाई डोळ्यांत आंसवें आणून हुंदके देत म्हणाली.

" हा काय प्रकार आहे तें स्पष्ट बोला." महाराज किंचित् सौम्यपणें म्हणाले.

" महाराज, मी पुन्हा स्पष्ट बोलतों याबद्दल क्षमा असावी. पण आपले पेशवे आपणाला दिसतात तसे नाहींत." यमाजी शिवदेव पूर्ववत् गंभीरतेनें म्हणाले.

" म्हणजे काय ? " महाराजांनीं विचारलें.

" शेळी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड, त्यांतली अवस्था पेशव्यांनीं चालविली आहे. " यमाजी शिवदेव म्हणाले, " महाराजांनीं कारभारीमंडळाच्या विरोधाला न जुमानतां नानासाहेबांना पेशवे केलें, त्या आपल्या उपकारांचे ते उतराई कसे झाले तें महाराजांना माहीत आहे काय ? "

" कसे उतराई झाले ? "

" महाराजांच्या मनांत त्यांच्याविषयीं त्यावेळीं जेव्हां कळकळीचे विचार उसळून राहिले होते, तेव्हांच त्यांच्या मनांत महाराजांच्या प्रतिस्पर्ध्यांशीं संगनमत करण्याच्या विचारानें धांगडधिंगा मांडला होता ! कोल्हापूरकर हे आपले प्रतिस्पर्धी आहेत हें तर खरें ना ? "

" बरें; मग ? "

" त्यांच्याशीं त्याच वेळीं नानासाहेबांनीं महाराजांच्या डोळ्यांत धूळ फेंकून दोस्तीचा गुप्त करार केला, असें ऐकल्यावर महाराजांना काय वाटेल ? "

" काय वाटावयाचें ? उलट आनंद वाटेल. " त्यांनीं तो दोस्तीचा करार केला असला तरी तो आमच्याच वतीनें केला; तो आम्हांला मान्यच आहे. "

" आपल्या वतीनें त्यांनीं करार केला नाहीं, स्वतःच्या वतीनें केला. त्यांत त्यांनीं धन्याचें हित पाहिलें नाहीं, राजवटीचेंही हित पाहिलें नाहीं; त्यांनीं केवळ स्वार्थ पाहिला. माझ्यापाशीं त्या कराराची नक्कल नाहीं; पण त्यांतला खडान् खडा मजकूर मला या घटकेला आठवतो. आपण जन्मभर अंतःकरणापासून कोल्हापूरकरांचे सेवक व बाह्यात्कारीं दाखवावयाला मात्र साताऱ्याचे महाराज आपले धनी, असें पेशव्यांनीं त्या गुप्त करारनाम्यांत स्पष्ट म्हटलें आहे. " यमाजी शिवदेव उद्गारले.

" यमाजी, तुम्ही आमच्या पेशव्यांवर केवढा आरोप करीत आहांत याची तुम्हांला कल्पना आहेना ? " महाराज म्हणाले.

"पूर्ण कल्पना आहे. मीं पूर्वीच महाराजांना सांगितलें आहे कीं या वेळीं लहान तोंडीं मोठा घांस घेण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे. पण आतां तें बोलून काय उपयोग ! आजवर मी मूग गिळून स्वस्थ राहिलों. परंतु आपल्या डोळ्यांदेखत पेशवे हे मराठशाहीच्या जिवावर मारेकरीसे उठलेले पाहून उघड्या डोळ्यांनीं मरण साहवत नाहीं. मीं पेशव्यांविरुद्ध केलेलें विधान

असत्य ठरलें तर त्याबद्दल महाराजांनीं खुशाल माझी गर्दन उडवावी. मग तर झालें ना?"

"ठीक आहे. आम्ही याची चौकशी करूं." महाराज उत्तरले.

"आतां तरी चोर कोण व साव कोण हें आपल्या ध्यानीं आलें का?" सकवारबाईनें विजयप्राप्तीच्या तोऱ्यांत विचारलें.

"पेशवे आमच्या अपरोक्ष इतका पाताळयंत्रीपणा करतील असें आम्हांला अजूनही वाटत नाहीं." महाराज उद्गारले.

"म्हणूनच आपणाला सारें जग भोळ्या सांबाचा अवतार म्हणतें. या चौकशीअंतीं पेशवे अपराधी आहेत असें जर आपणाला आढळून आलें, तर आपण त्यांचें काय पारिपत्य करणार?" सकवारबाईनें विचारलें.

"प्रथम आम्हांला चौकशी तर करूं द्या! मग पुढचें पुढें काय तें पाहूं. जर पेशवे खरोखर अपराधी ठरले, तर त्यांना कळून येईल कीं शाहूमहाराज जसे मनाचे लोण्यासारखे मऊ कनवाळू आहेत, तितकेच ते वज्रासारखे कठोरही आहेत."

सकवारबाईनें पाहिलें कीं इतके दिवस आपण ज्या संधीची वाट पाहत होतों ती संधी आज अनायासें लाभली. आतां महाराज त्या गुप्त करार-नाम्याविषयीं चौकशी करणार, व त्याचा खरेपणा उजेडांत येतांच नाना-साहेबांना पेशवेपदाला मुकावें लागणार! त्यानंतर पेशवा कोणाला करावयाचें या विषयींचीं मनोराज्यें त्याच क्षणाला तिच्या मनांत सुरू झालीं. या आपल्या सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याला आतां फारशा अडचणी उरलेल्या नाहींत या आनंददायक विचाराच्या भरांत सकवारबाईनें महाराजांचा निरोप घेतला. ती तेथें आली कोणत्या हेतूनें आणि जातांना काय करून गेली! पण तिच्या दृष्टीनें तिचा आजचा डावच खरा साधला. अर्थात् त्या क्षणापुरता तरी सज-णेचा प्रश्न मागें पडला. नगाऱ्याच्या घाईपुढें टिमकीचें काय?

"यमाजी, तुम्हीं आतां सांगितली ही गोष्ट खरी आहे काय?" महा-राजांनीं थोडा वेळ स्वतःशीं विचार करून मग विचारलें.

"मीं सांगितलें ना? महाराजांनीं स्वतः त्याची चौकशी करवावी, व खोटें ठरल्यास माझी गर्दन उडवावी. मात्र महाराजांच्या पायांपाशीं माझी एवढीच विनंति आहे कीं चौकशी करणें ती सावधपणानें करावी. नाहींपेक्षां

ते नानासाहेब पेशवे आहेत ! ते केव्हां काय कारस्थान रचतील आणि त्यांत माझ्यासारख्या गरिबाचा केव्हां कसा बळी घेतील याचा मला देखील थांगपत्ता लागावयाचा नाहीं. ” यमाजी शिवदेव म्हणाले. ते शद्ब उच्चारतांना त्यांची चर्या बरीच चिंतातुर झाली होती. त्याचें कारण त्यांना नानासाहेबांची खरोखरच भीति वाटत होती. महाराज हे नानासाहेबांच्या हातांतलें कळसूत्री बाहुलें आहेत हें त्यांना पूर्णपणें माहीत होतें. न जाणो, नानासाहेबांनीं आपल्यावर सूड घेण्याचा प्रयत्न करण्याचें ठरविलें तर त्यांनीं महाराजांपाशीं नुसता एक शद्ब बोलण्याचा अवकाश; त्याच क्षणीं आपल्या सर्वस्वाची राखरांगोळी व्हावयाला उशीर लागणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. परंतु या भीतीबरोबरच आत्मविश्वासही यमाजी शिवदेवांच्या ठायीं असा होता कीं कारस्थानेंच करावयाचीं झालीं तर आपण नानासाहेबांसारख्या एक सोडून छपन्न कारस्थानी पुरुषांना पुरून उरूं. यमाजी शिवदेवांचा हा आत्मविश्वास अगदीं यथार्थ होता. आजवर उणींपुरीं पंचवीस वर्षें पेशव्यांना गुप्तपणें कोंपरखळ्या मारून हैराण करण्यांत त्यांचा जन्म गेला होता. श्रीपतराव प्रतिनिधि व थोरले बाजीराव यांच्यांत स्पर्धेचा अग्नि जो धुमसत राहिला होता, त्याला कारण तरी असले हे श्रीपतरावांचे हस्तकच ! साताऱ्याच्या कारभारी मंडळांत प्रथम थोरल्या बाजिरावांविषयीं व नंतर नानासाहेबांविषयीं नाहीं नाहीं ते गैरसमज पसरविण्यांत यमाजी शिवदेवांचें बरेंच अंग होतें. इकडे महाराजांच्या रंगमहालांत शिरून राण्यांच्या अधिकारलालसेचा फायदा घेऊन त्यांच्यापाशींही त्यांनीं चांगलेंच बस्तान मांडलें होतें !

यमाजी शिवदेवांनीं आज जेव्हां महाराजांपाशीं त्या गुप्त करारनाम्याचा स्फोट केला, तेव्हांच त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला, “सापावर आधीं दगड टाकूं नये; आणि एकदां दगड टाकल्यावर त्याला अर्धवट जिवंत ठेवूं नये. एकदां पेशव्यांविषयीं चुगलखोरपणा करूं नये तो केला खरा! आतां तो तडीला नेला पाहिजे. पेशव्यांचा मीं पेटविलेल्या या कारस्थानाच्या होमकुंडांत बळी पडलाच पाहिजे.”

यमाजी शिवदेव आज नेहमींप्रमाणेंच सहज महाराजांच्या भेटीला आले होते. मधून मधून वेळीं अवेळीं महाराजांना कसल्या तरी निमित्तानें भेटून वारे कोणत्या दिशेनें वाहत आहेत याचा अंदाज घ्यावयाचा, व साधल्यास

त्यांतच आपल्या भल्याबुऱ्या विधानांची भर घालून परिस्थिति नानासाहेबां-विरुद्ध भडकेल तितकी भडकूं द्यावयाची, हा त्यांचा उद्योग. आज महाराजांपाशीं येण्यांत देखील तिकडे रघूजी भोंसले आणि पेशवे यांची आपसांतील चुरस पुन्हा सांधी–कोपऱ्यांनीं विकोपाला जाऊं पहात आहे याचें रसभरित वर्णन तिकडून आलेल्या पत्रांच्या आधारें महाराजांपाशीं करावयाचें व पेशव्यांची राज्यकारभार चालवण्याविषयींची नालायकी पुन्हा एकदां ठळकपणें महाराजांच्या नजरेला आणावयाची, हा त्यांचा हेतु. ते साळसूदपणें महाराजांना म्हणाले, "महाराज, आज मी निराळ्याच कामासाठीं आलों होतों. तों मध्येंच हा विषय निघाला, त्यामुळें माझें काम तसेंच राहून गेलें." इतक्यांत मागाहून कोणी आल्याचा भास होऊन त्यांनीं मागें वळून पाहिलें. तों पूर्वींचा तोच महाराजांचा हुजऱ्या आंत येतांना त्यांना दिसला. त्याबरोबर त्यांनीं आपलें भाषण संशयानें आवरतें घेतलें.

"काय रे ?" महाराजांनीं हुजऱ्याला विचारलें.

हुजऱ्या हात जोडून उद्गारला, "महादाजीपंत पुरंदरे सरकारांच्या भेटीला आले आहेत."

महादाजीपंत पुरंदरे हे पेशव्यांचे हितचिंतक. त्यांचें नांव ऐकतांच यमाजी शिवदेवांनीं मनांत ठरविलें कीं आतां यावेळीं येथें कांहीं मनकवड्या गोष्टी बोलण्याची सोयच नाहीं. ते महाराजांना म्हणाले, "महाराज, मी आतां येतों. पुन्हा मी आपली भेट घेईन."

"कां ? पुरंदरे आले म्हणून कीं काय ? ते पाहिजे तर थोडा वेळ वाट पाहतील. किंवा पुन्हा येतील. तुम्हांला काय बोलावयाचें तें बोला." महाराज म्हणाले.

पुरंदरे म्हणजे पेशव्यांचे विश्वासू मुतालिक; व म्हणूनच ते पेशव्यांइतकेच महाराजांना प्यार. पुरंदरे आले असें ऐकतांच महाराजांनीं सभोंवारच्या इतर मंडळींना रजा द्यावयाची व त्यांची भेट घ्यावयाची, असा नेहेमींचा शिरस्ता. त्याच पुरंदऱ्यांना महाराज आतां टाळण्याची इच्छा करूं लागले, यावरून पेशव्यांविषयीं महाराजांच्या मनांत विकल्प आला असला पाहिजे असा कयास यमाजी शिवदेवांनीं तेव्हांच बांधला. त्यांना तरी तेंच पाहिजे होतें. मात्र आपला हा कुटिल हेतु उघडकीला येऊं नये यासाठीं ते शिक-

स्तीची खबरदारी नेहेमींच घेत असत. तसेंच आजही ते महाराजांना म्हणाले "तसें नको. आपण बाहेर पुरंदरे आले आहेत त्यांची प्रथम भेट घ्यावी मी आपणाला पुन्हा भेटेन. पुरंदरे हे पेशव्यांचे मुतालिक आहेत, व मी पडलों यःकश्चित् प्रतिनिधींचा मुतालिक ! प्रतिनिधि पेशव्यांपेक्षां थोर असले तरी तो थोरपणा आतां केवळ नांवांतच उरला आहे. आज पेशवे करतील ती पूर्वदिशा आहे. अशा स्थितींत माझ्यासारख्यांनीं सर्व मंडळीशीं जरा जपूनच वागलें पाहिजे."

एवढें बोलून ते बाहेर जावयाला निघाले. महाराजांच्या मनांतून त्यांना पुन्हा आग्रह करून घडीभर बसवून घ्यावयाचें होतें. तेवढ्यांत पुरंदरे महाराजांच्या आज्ञेची वाट न पाहतांच आंत आलेही. त्यांना पाहून यमाजी शिवदेव गालांतल्या गालांत हंसत बाहेर गेले. महाराजांच्या मनांत पेशव्यांविषयीं विकल्प येण्याला सुरुवात झाल्याबद्दल आनंदाचें तें हंसें होतें.

"महादाजीपंत, आम्ही तुम्हांला मानानें वागवितों याचा अर्थ तुम्ही आम्हांला कस्पटाप्रमाणें लेखावें असा नाहीं." महाराज महादाजीपंत पुरंदऱ्यांकडे पाहून तिरस्कारानें एकदम उद्गारले.

महादाजीपंतांना महाराजांचे हे आकस्मिक उद्गार चमत्कारिक वाटलें. महादाजीपंत हे वृत्तीचे फारच सालस माणूस. तसेंच ते धूर्त व कर्तबगारही होते. इतकें असूनही ते मनाचे क्षुद्र नव्हते. ते पेशव्यांचे अंकित होते व नानासाहेब पेशव्यांनीं त्यांना दरबारी बित्तंबातम्या काढण्यासाठीं साताऱ्यांत ठेवलें होतें, त्याअर्थीं पेशव्यांच्या हितासाठीं जागरूकपणें जपणें हें त्यांचें कर्तव्यच होतें. परंतु पेशवे झाले तरी महाराजांचे सेवक होत, व म्हणूनच पेशव्यांच्या हितासाठीं जपतांना महाराजांच्या व राजवटीच्या हिताला धक्का लागणार नाहीं अशी खबरदारी घेण्याला महादाजीपंत कधींही चुकत नसत. महाराजांविषयीं त्यांच्या मनांत अलोट आदर वसत होता. इतका कीं त्यांनीं अनेक वेळां महाराजांची कड घेऊन पेशव्यांपाशीं बोलावें. मात्र महाराजांच्या भेटीला येतांना ते फारच घरगुतीपणानें वागत. महाराजही त्यांच्याशीं तसेंच वागत. मग आजच महाराजांना असें कां वाटावें, याचा स्वतःशींच विचार करीत ते उभे राहिले. "असें कां व्हावें ? महाराजांच्या कानीं कोणीं आपल्याविरुद्ध किंवा आपल्या धन्यांविरुद्ध विष तर ओतलें नाहीं ना ?"

तें कांहीं असलें तरी क्षमस्व म्हटल्यानें सर्व कांहीं साजरें होईल अशा विश्वासानें ते महाराजांना हात जोडून लगेच म्हणाले, "माझ्या हातून कांहीं चूक झाली असली तर महाराजांनीं मला क्षमा करावी."

"तुमचें कांहीं काम असेल तर तें लवकर आटोपून घ्या. पण यापुढें लक्षांत ठेवा कीं महाराजांचा राजवाडा म्हणजे कांहीं धर्मशाळा नव्हे." महाराज पूर्ववत् तिरस्कारानें कपाळाला आंठ्या घालून उद्गारले.

"पण असें मी कधींच समजलों नाहीं. उलट महाराजांचा राजवाडा हें पवित्र देवालय आहे व महाराज हे त्या देवालयांतले आमचे उपकारकर्ते देव आहेत अशा पूज्य भावनेनेंच मी आजवर वागत आलों व यापुढेंही वागेन. महाराजांच्या मनांत माझ्याविषयीं विकल्प आला तरी महाराज थोर आहेत, समर्थ आहेत, सर्व–सत्ताधारी आहेत; त्यांना असें नव्हे असें विचारण्याचा अधिकार माझा नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र मी आतां ओघालाच आलें आहे म्हणून विचारतों, महाराजांची वृत्ति आजच माझ्याविषयीं इतकी कां बरें पालटली?"

"त्याच्याशीं तुम्हांला काय करावयाचें आहे? यापुढें कोणाचींही असलीं साखरघोळ घरगुती बोलणीं ऐकून फंसण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्ही पेशव्यांचे कारभारी आहांत, आणि जसे पेशवे तसेच तुम्ही हें आम्ही ओळखतों."

महादाजीपंत हे राजवटींत रुळलेले गृहस्थ होते. त्यांनीं राजवाड्यांत पाऊल टेवतांच प्रथम महाराजांविषयीं नोकरांपाशीं चौकशी केली तेव्हां राणी सकवारबाई व यमाजी शिवदेव हे महाराजांपाशीं असल्याचें त्यांना कळून आलें होतें. त्यांच क्षणीं त्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधली होती कीं हीं दोघेंजणें महाराजांच्या कानीं कांहींतरी विष ओतीत असलीं पाहिजेत खास. प्रतिपक्षाच्या हालचाली राजधानींत काय काय चालतात हें महादाजीपंत नित्य डोळ्यांत तेल घालून पाहत असल्यानें पेशव्यांना स्थानभ्रष्ट करण्याविषयींचीं कारस्थानें सकवारबाई, यमाजी शिवदेव, रघूजी भोंसले, बाबूजी नाईक, आनंदराव सुमंत वगैरे मंडळींच्या एकजुटीनें कशीं शिजविलीं जात आहेत याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांनीं विचार केला कीं या वेळीं स्पष्ट बोललेंच पाहिजे; संशयाच्या विषाचें रोपटें उगवतें न उगवतें तोंच तें मुळासकट खुडून नाहींसें केलेंच पाहिजे.

त्यांनीं नम्र पण निश्चयी वृत्तीनें महाराजांना म्हटलें, "आज महाराजांचें मन आमच्याविषयीं बिथरलेलें उघड उघड दिसत आहे."

"तुम्ही कोणत्या कामासाठीं आलां आहांत तें काम लवकर उरकून घ्या. इतर चांभारचौकशी कशाला पाहिजे?" महाराज कठोर शब्दांत पुन्हा उद्गारले.

"कामांचा उरक करण्याच्या स्थितींत महाराज आज असलेले दिसत नाहींत, त्याअर्थीं मी या वेळीं कांहींच बोलत नाहीं."

"ठीक आहे, तर मग तुम्ही जावें."

"मीं जातों. महाराजांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. पण जाण्या-पूर्वीं महाराजांना माझी पुन्हा विनंति आहे कीं आमच्याविषयीं इतका रोष वाटण्याचें कारण काय तें कळल्यास शक्य तर वेळींच त्याचें निराकरण करतां येईल. गैरसमज तसेच राहूं देणें परिणामीं हिताचें नाहीं."

"महादाजीपंत, तुम्ही पेशव्यांचे मुतालिक असलांत तरी मुतालिकी आम्हीं तुम्हांला बहाल केली आहे, याची तुम्हांला जाणीव आहेना?"

"हें काय विचारणें? महाराजांच्या उपकारकर्तेपणाची मला पूर्ण जाणीव आहे, आणि ज्या वेळीं प्रसंग येत गेला त्या वेळीं ती जाणीव मला अस-ल्याचें मी स्पष्टपणें महाराजांच्या निदर्शनाला आणून देत आलों आहेंही. मी देवाला सोडून पुजाऱ्याला भजण्याइतका भोळा किंवा बदनेकीचा नाहीं."

"मग ती वेळ आजच आली आहे असें समजा. अशा वेळीं महाराज आणि पेशवे यांपैकीं कोणातरी एकाला राखावयाचें आणि एकाला तोडाव-याचें; अशी वेळ प्राप्त झाल्यास तुम्ही कोणासारखे वागाल?"

महाराजांचा हा प्रश्न ऐकून महादाजीपंत क्षणभर गोंधळल्यासारखे झाले. पेशव्यांवर महाराजांचा रोष झाला हें त्यांना आतां पूर्णपणें कळून चुकलें, व प्रतिपक्षानें अखेर आपला डाव साधला या जाणिवेनें त्यांचें चित्त व्याकूळ झालें. परंतु महाराजांच्या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें हें त्यांना कळेना. महा-राजांचा तर स्पष्ट सवाल कीं तुम्हांला पेशवे जवळचे कीं आम्ही जवळचे! आतां पेशवे जवळचे म्हणावें तर महाराज हे पेशव्यांचेही धनी, व त्यांच्याच अनुज्ञेनें महादाजीपंतांना पेशव्यांची मुतालिकी मिळालेली. बरें; महाराज जवळचे असें त्यांनीं म्हणावें तर खाल्ल्या घरचे वांसे मोजल्याच्या अन्याया-ला ते पात्र ठरले असते. असा महादाजीपंतांचा दोन्हीकडूनही कोंडमारा

झाला होता. बराच वेळ झाला तरी महादाजीपंतांच्या तोंडून शब्द उमटेना असें पाहून महाराजांनीं पुन्हा विचारलें, " विचार कसला करतां ? समजा, यापुढें आम्ही आणि पेशवे एकविचारें वागणें अशक्य आहे असें दिसून आल्यास तुम्ही कोणत्या बाजूला वळणार याचा आम्हांला आगाऊ अंदाज असलेला बरा. "

" महाराज, यावर मी दोन शब्द बोलूं का ? "

" बोला—खुशाल बोला. तुमच्यावर आमचा किती विश्वास आहे हें तुम्हांला माहीतच आहे. तुम्ही बोलाल तसें आम्ही अजूनही मानावयाला तयार आहों. काय बोलावयाचें तें स्पष्ट बोला. "

" पेशव्यांवर एखाद्या तरी अपराधाची शाबिती होण्यापूर्वींच त्यांच्यावर महाराजांची इतराजी होणें योग्य आहे काय ? "

" ती शाबिती करण्यासाठींच आम्हांला तुमचें सहाय्य पाहिजे आहे. आतां स्पष्टच विचारतों, कोल्हापूरकर आणि पेशवे यांचें परस्परांशीं कोणतें नातें आहे याची तुम्हांला दखलगिरी असेलच ? "

महाराजांचा हा प्रश्न ऐकून महादाजीपंतांच्या डोक्यांत एकदम लख्ख प्रकाश पडला. नानासाहेब पेशव्यांनीं कोल्हापूरकर छत्रपतींशीं जो गुप्त करार केला होता, त्याचा मसुदा महादाजीपंतांच्या समोरच तयार झालेला होता. महादाजीपंतांना तो करार मान्य होता असा त्याचा अर्थ नव्हे. किंबहुना त्यावेळीं अगर केव्हांही नानासाहेब पेशव्यांनीं महाराजांच्या नकळत असें राजकारण खेळावयाला नको, असें महादाजीपंतांचें मत असेलही. पण नानासाहेब पेशवे हे फार दूरदृष्टि व पूर्ण विचार करून काय तें करणारे; त्यांनीं कांहींतरी महत्त्वाच्या विशिष्ट हेतूनें हा करारनामा करण्याचें मनावर घेतलें असलें पाहिजे, व आपण त्याला नापसंती दर्शविली तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें महादाजीपंत पूर्णपणें ओळखून होते. तो करार गुप्त होता; त्याला महाराजांची संमति घेण्यांत आली नव्हती. हें महादाजीपंतांच्या ध्यानीं येण्याचें कारण असें कीं नानासाहेबांनीं त्यांना त्याच वेळीं त्या करारनाम्याची कोठेंही वाच्यता न करण्याविषयीं बजाविलें होतें. ती गुप्त गोष्ट आज सहा वर्षांनंतर एकाएकीं बाहेर फुटलेली पाहून महादाजीपंतांना वाटलें कीं आतां पेशव्यांची धडगत नाहीं. तो करारनामा आपणाला माहीत होता

असें म्हणावें तर महाराज म्हणणार कीं तुम्ही आणि पेशव्यांनीं संगनमत करून हें कारस्थान तडीला नेलें. बरें; माहीत नाहीं म्हणावें तर ही गोष्ट लपवून थोडीच लपविली जाणार होती !

अखेर ' काय होईल तें होवो. आपण खोटें बोलावयाचें नाहीं पण पेशव्यांची बाजू तर राखावयाची ' असा आपल्या मनाशीं निश्चय करून महादाजीपंत धीरोदात्तपणें महाराजांना म्हणाले, " कोणींतरी श्रीमंत पेशव्यांविषयीं महाराजांचें मन कलुषित करण्यासाठीं आजच ही चुगली केली असली पाहिजे."

" तुम्ही लोकांच्या हेतूंचें पृथक्करण आमच्यासमोर करीत बसूं नका. बोलणारे बोलतील व त्यांचें काय ध्यानीं घ्यावयाचें तें आम्ही घेऊं. तुम्ही विचारल्या प्रश्नाचें उत्तर द्या." महाराज किंचित जास्त संतापून म्हणाले.

परंतु महादाजीपंत किंचित्‌देखील न डगमगतां पूर्ववत् धिमेपणानें उद्गारले, " कोणत्याही गोष्टीला जें महत्त्व प्राप्त होतें, तें ती गोष्ट करणाऱ्याच्या हेतूला अनुसरूनच प्राप्त होतें. म्हणूनच एखाद्या गोष्टीचा अगर एखाद्या कृतीचा व शब्दांचा अर्थ ध्यानीं घेतांना त्या अर्थामागें असलेल्या हेतूचा विचार प्रथम करणें अवश्य असतें."

" असें आडपडद्यानें बोलूं नका; सरळ काय तो जबाब द्या. हेतु तुमचा ढोंग असेल कीं महाराजांच्या मस्तकावर पुष्पवृष्टि करावी. परंतु त्या हेतूनें तुम्हीं जळते निखारे जर आमच्या मस्तकावर ओतले तर त्याचा परिणाम काय होईल याचा विचार करावयाला नको काय ? राजकारणाचे डाव खेळणारीं जबाबदार माणसें आमच्याशींच कृति आणि हेतु यांतील फरक झांकण्यासाठीं डावपेचानें वागूं लागलीं तर तें आम्हीं कसें सहन करावें ?"

" महाराजांनीं कोणाचाही हेतु ध्यानीं न घेतां एखाद्याच्या कृतीचा भलताच अर्थ ध्यानीं घेतला तर तिथें माझ्या पारख्या पामरानें काय बोलावें ?"

" बोलावयाला तोंड असेल तर काय वाटेल ते बोलावें. मनःपूत वाटतें तें बोलावयाला कुणाला कोणाच्या देवाचीही भीति नाहीं. पण यावेळीं तुमचें मनच तुम्हांला सांगतें आहे कीं, पेशव्यांनीं केली ती चूक अगदीं अक्षम्य आहे. इतके दिवस आम्हीं पोटच्या अपत्याप्रमाणें पेशव्यांचें पालन पोषण केलें, व त्यांना सर्व कारभारीमंडळाचा विरोध असतांही पेशवेपद दिलें. त्या उपकाराची फेड त्यांनींही खाशी केली ! अशा लोकांच्या हातीं आम्हीं आमचीं

राज्यसूत्रें आणखी कांहीं काळ ठेवलीं कीं मराठशाहीचे बारा वाजावयाला मुळींच विलंब नाहीं." महाराज स्वतःशींच विचार करीत स्तब्ध राहिले व अंमळशानें पुन्हा म्हणाले, "बरें; नानाचा मुक्काम सध्यां कोठें आहे?"

"पुण्यांतच आहे." महादाजीपंत उद्गारले.

"ठीक आहे. तुम्ही आतां जाल तेव्हां प्रतिनिधींना सांगा कीं ताबडतोब येऊन आमची भेट घ्या. आजच्या आज पुण्याला खलिता रवाना झाला पाहिजे. असल्या विश्वासघातकी दगलबाज माणसाला त्याचीं कारस्थानें उजेडांत आल्यावर देखील जर आम्हीं पंतप्रधानपदावर कायम ठेवलें, तर मग आमच्या त्या वेडेपणाला तोडच उरणार नाहीं."

"पण महाराजांच्या पायांपाशीं माझी पुन्हा एवढीच विनंति आहे कीं महाराजांनीं श्रीमंत पेशव्यांची भेट झाल्यावर प्रथम त्यांना याचा सर्व खुलासा विचारावा, व तेवढ्यानें महाराजांचें समाधान झालें नाहीं तर मग काय तें करण्याला महाराज समर्थ आहेतच." महादाजीपंत जोडत्या हातानें हातानें महाराजांना म्हणाले.

यानंतर बराच वेळपावेतों दोघेही एकमेकांशीं कांहीं न बोलतां स्वतःशीं विचार करीत जागच्या जागीं स्तब्ध होते. महादाजीपंतांच्या मनांतून बोलावयाचें पुष्कळ होतें. परंतु अशा वेळीं त्यांना बोलण्याचा धीर कसा होणार! अखेर त्यांना महाराजांनींच कंटाळवाण्या वृत्तीनें पुन्हा सूचना दिली, "तुमचें काम झालें ना? आतां तुम्हांला जावयाला हरकत नाहीं."

ती आज्ञा शिरसावंद्य मानून महादाजीपंत महाराजांना वंदन करून बाहेर जाऊं लागले. तेव्हां महाराजांनीं त्यांना पुन्हा हाका मारून म्हटलें, "हें पहा महादाजीपंत! झाल्या विषयाची वाच्यता कोठें जितकी न होईल तितकी चांगली. उगाच लोकांनीं तमाशा पहावयाला नको."

प्रकरण ५ वें

सजणा व प्रतापराव

महादाजीपंत निघून गेले, महाराज त्याच गच्चीवर बराच वेळपावेतों एकटेच विचार करीत बसले होते. " आम्हीं अमृताचें म्हणून जें रोप लाविलें तें फळांफुलांच्या बाजाला येतांच विषारी फळें आणि फुलें प्रसवूं लागलें! नानावर आमचा केवढा दांडगा विश्वास! पण त्यानें त्याच विश्वासाच्या सुरीनें आमच्या जिव्हारीं घाव घालावयाला कमी केलें नाहीं. इतके दिवस आमच्या राण्या ओरडत होत्या, कारभारीमंडळीही परोपरीनें सांगत होती, त्याचा प्रत्यय आम्हांला आज आला. नाना हें सर्पाचें पिलूं आहे यांत संशय नाहीं. पण सर्पाचें पिल्लूं म्हटल्यानें त्या पराक्रमी महापुरुषाचा निष्कारण उपमर्द होतो आहे. बाजिरावांनीं आमच्याशीं यावज्जन्म कधीं नेकी सोडली नाहीं व आमच्या एकनिष्ठ सेवेंत कधींही अंतराय केला नाहीं. त्यांना त्यांच्या पुत्राच्या अन्यायाबद्दल दोष कां म्हणून द्यावा? ... "

असे एकापेक्षां एक दारुण विचार महाराजांच्या डोक्यांत घोळून त्यांना अगदीं त्रस्त करून सोडूं लागले. तोंच महादाजीपंतांना जाऊन पाव घटका होते न होते इतक्यांत सगुणाबाईच्या महालांतील एक दासी घाबऱ्याघुबऱ्या धावत तेथें आली, व महाराजांना म्हणाली, " महाराज! धाकट्या राणीसाहेबांना घेरी आली आहे. "

" तें आम्हीं ओळखलेंच होतें. " महाराज स्वतःशीं उदासपणानें म्हणाले. तें खरोखरच महाराजांनीं ओळखलें होतें. सकवारबाई व सगुणाबाई यांच्या सवतीमत्सरामुळें आजवर महाराजांचे धिंडवडे कांहीं थोडेथोडके निघाले नव्हते. हे धिंडवडे नव्हेत तर काय? सवतीसवतींनीं भांडावें, त्यांचा कड घेऊन त्यांच्या नोकरचाकरांनीं भांडावें, त्याचा बोभाटा महाराजांच्या कानां-

पावेतों यावा, तीं भांडणें तोडण्यासाठीं मध्यें पडण्याची पाळी महाराजांवर यावी, नोकराचाकरांदेखत राण्यांनीं महाराजांना रागाच्या भरांत उणेंदुणें बोलावें आणि तें महाराजांनीं निमूटपणें ऐकून घ्यावें! हे धिंडवडेच नव्हेत तर काय? कांहींही करा; धाकटीचा कैवार घेतला कीं थोरली खवळणार, व थोरलीचा कैवार घेतला कीं धाकटी चंडिकेचा अवतार धारण करणार?

पण तें मागाहून कळून काय उपयोग!

महाराज तसेच उठले व राणी सगुणाबाईच्या महालाकडे जाऊं लागले. तों मार्गातच त्यांना सकवारबाईनें गांठलें.

"कुठें चालली स्वारी? आपल्या लाडक्या राणीचा रुसवा काढायला असेल!" सकवारबाई तोऱ्यानें म्हणाली.

महाराजांची खात्री झाली कीं हीच बया सगुणाबाईला चिडविण्याला कारण झाली असली पाहिजे. ते गप्प उभे राहिले.

"हें पाहा, आपण जर आतां पुन्हा धाकट्या राणीच्या तंत्रानें वागूं लागाल, तर सायंकाळच्या आंत ही सकवार आपणाला जगांतून नाहींशी झालेली दिसेल. मीं बोललेला शब्द खरा केला नाहीं तर शिर्क्यांची लेंक नाहीं; सांगून ठेवत्यें." असें महाराजांना बजावून सकवारबाई माघारी गेली.

"शिर्के!—शिर्क्यांच्या लेंकीचा इतका अहंपणा अं!" महाराज त्या क्षणाला स्वतःच्या मनाशीं विचार करूं लागले, "आम्हीं कैक पूर्वजन्मीं एकसारखीं पापें पुजीत होतों, म्हणून ही शिर्क्यांच्या कुळांतली विषारी नागीण आमच्या राणीच्या नात्यानें आमच्या गळ्यांत पडली. तीर्थरुपांनीं शिर्क्यांचें शिर्काण केलें, त्याचा आमच्यावर सूड घेण्यासाठीं ही वैरीण जन्माला आली काय? कुठेंही पहा, शिर्क्यांचें कूळ व सर्पाचें कुळ सारखेंच. स्वर्गवासी थोरल्या आबासाहेबांनीं शिर्क्यांच्या कुळांतली राणी केली ती त्यांना नडली. तीर्थरुपांनीं तिचें पारिपत्य केलें त्यामुळें शिर्के चिडून त्यांचे वैरी बनले; मिळून तीही त्यांना नडली. कोल्हापूरकर संभाजीची राणी शिर्क्यांची माहीरवाशीण, ती तिकडे तसें पाणी जाळते आहे! तीर्थरुपांनीं शिर्क्यांचें शिरकाण केलें तो अविचार—क्रूरपणा झाला असें आम्हांला प्रथम वाटत होतें. पण आतां वाटूं लागलें आहे कीं त्यांनीं केलें तें अगदीं बरोबर केलें. त्यांचें चुकलें तें एवढेंच कीं त्यांनीं तें शिर्काण पुरें तडीला नेलें नाहीं. तें तडीला नेलें असतें म्हणजे

आज मराठशाहीचा ह्या घरगुती दुहीमुळें असा विध्वंस झाला नसता!" महाराज आपल्या मनाशीं म्हणाले; व तेथून मुकाट्यानें मागें वळले!

पण सगुणाबाईची दासी महाराजांच्या पाळतीवर होतीच. महाराज माघारे वळलेले पाहून तिनें त्यांना जवळ जाऊन नम्रतापूर्वक म्हटलें, "महाराज! हें काय? धाकट्या राणीसाहेब बेशुद्ध पडल्या आहेत ना?"

"कां म्हणून? त्या बटकुरासाठींच ना?" महाराजांनीं विचारलें.

दासीला सर्व कांहीं माहीत होतें. पण ती बळेंच भोळेपणा पांघरून उत्तरली, "तें मला कांहीं माहीत नाहीं."

"पण आम्हांला माहीत आहे. धाकट्या राणीसाहेबांना आणि त्याप्रमाणेंच थोरल्या राणीसाहेबांनादेखील म्हणावें, तुम्ही तिकडे एकमेकांशीं भांडा, मारामारी करा, एकमेकींच्या झिंझ्या ओढा, त्या सजणेला कच्ची खा नाहीं-तर भाजून खा. पण आम्हांला आणखी सतावूं नका; आणखी छळूं नका."

एवढें बोलून महाराज माघारे गेले. इतका महाराजांना उद्वेग आलेला ती दासी आज प्रथमच पाहत होती. कितीही त्रास एरव्हीं झाला असला तरी महाराजांच्या तोंडून राण्यांना अनुलक्षून अपशब्द यावयाचे नाहींत ते आज आले. दासीला वाटलें कीं हीं कांहीं बऱ्याचीं लक्षणें नाहींत. पण ती किती झाली तरी दासी! ती महाराजांच्या शद्बावर काय बोलणार! मुकाट्यानें माघारी गेली.

सकवारबाईचा काय किंवा सगुणाबाईचा काय, तो निव्वळ कांगावखोर—पणा होता. त्यांत सकवारबाईचा डाव साधला व सगुणाबाईचा डाव फंसला. सकवारबाईनें महाराजांवर वजन पाडून सजणेच्या बाबतींत आपल्या मान्यतेला हरताळ फांसला, त्याचें हातोहात उट्टें काढण्यासाठीं सगुणाबाईनें हा त्रागा आरंभिला होता. तिची अटकळ होती कीं दासी धावत महाराजांना जाऊन आपणाला घेरी आल्याचें सांगणार, महाराज घाबरून धावून येणार, आपली चौकशी करणार, आपण त्यांच्यापाशीं सजणेला सोडण्याचा हट्ट धरणार तो महाराज ऐकत नाहींतसें दिसतांच आपण अधिक त्रागा करणार, आणि अखेर महाराजांकडून आपला शद्ब खरा करून घेणार!

पण आज सगुणाबाईचा तो डाव हुकला. ती प्रथम खोटी संतापली, महालांत गडबडां लोळली; स्नानाला उठेना, जेवणखाण जागच्या जागींच

पे. ६

राहिलें; तरी सवतीचा—सकवारबाईचा नक्षा कांहीं उतरेना. अखेर निर्वाणीचा उपाय म्हणून ती त्याच दिवशीं आपल्या माहेरीं निघूनही गेली. तिचा विचार प्रथम माहेरीं जाण्याचा नव्हता, महाराजांना पोकळ भय घालून नरम आणण्याचा होता. आपण माहेरीं निघालों म्हणजे तरी महाराज आपल्या समाचाराला धावून येतील व त्यांच्या आग्रहास्तव आपण माहेरीं जाण्याचा बेत रहित करूं, असा तिचा मनांतला बेत होता. सजणेचा प्रश्न ती आतां विचाराबाहेर टाकण्याला तयार झाली होती. कारण त्या बाबतींत आपला शब्द सकवारबाई खरा होऊं देणार नाहीं हें तिला पूर्णपणें कळून चुकलें होतें. आतां नुसती घेतल्या सोंगाची बतावणी यथासांग झाली म्हणजे मिळविली; महाराजांनीं आग्रह केल्यामुळें आपण हट्ट आवरता घेतला व माहेरीं जाण्याचा बेत रहित केला असें सांगण्याला आपणाला मान्यतेचा मार्ग मोकळा झाला म्हणजे पुरे, एथवर तिनें आपल्या अपेक्षा आवरत्या घेतल्या होत्या. परंतु तें सर्वच प्रकरण तिच्या अंगाशीं आलें. महाराजांनीं तिची कांहींच विचारपूस केली नाहीं, व तिला मात्र आपला शब्द खरा करण्यासाठीं माहेरीं जावें लागलें !

सकवारबाई मनांत म्हणाली कीं बरें झालें; सुंठीवांचून खोकला गेला. त्या क्षणापासूनच तिनें रंगमहालांत आपली एकतंत्री सत्ता गाजविण्याला सुरुवात केली. महाराजांनीं तिच्यासमोर हात टेंकले, सवत आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून माहेरीं निघून गेली ! आतां सकवारबाईला विरोध कसला ? यमाजी शिवदेव वगैरे निम्मी शिम्मी कारभारी मंडळी तर पूर्वींच तिच्या बाजूची होती. तिनें ती सोन्याची संधी साधून सर्वसत्ताधारी होण्याचें ठरविलें. सगुणाबाईवर सजणेच्या बाबतींत तिला आज मिळालेला विजय हा बाह्यतः दिसावयाला क्षुल्लक असला तरी त्याला अंतर्गत महत्त्व फार होतें. त्या सवती—सवतींचे भांडणतंटे नेहमीं चालावयाचे व ते तोडतांना महाराजांचा जीव बेजार व्हावयाचा. त्यांनीं कोणाचीही कड घेतली व कसाही न्याय केला तरी दोघींपैकीं एकजण हटकून असंतुष्ट असावयाचीच; व प्रत्येकीनें एखादी कुरापत निर्माण करून दुसरीवर मात करण्याची शिकस्त करावयाची. परंतु त्यामुळें होई काय कीं दोघीही महाराजांच्या मताविषयीं साशंक असत व आपलें घोडें नानापरींच्या डावपेचांनीं पुढें दामटण्याची शिकस्त करीत ! आजचा

दिवस सकवारबाईला शुभकारक ठरला व सगुणाबाईला अशुभकारक ठरला. सकवारबाईनें घेतलेला हट्ट महाराजांनीं आज पुरविला व सगुणाबाईला 'गौर रुसली आणि कोंपऱ्यांत जाऊन बसली' या न्यायानें हट्टाच्या बाबतींत माघार घ्यावी लागली. आजूबाजूच्या सर्व सेवक–सेविकांना कळून चुकलें कीं महाराजांवर धाकट्या राणीसाहेबांचें वजन कांहीं पूर्वींप्रमाणें राहिलें नाहीं; त्यांची सद्दी संपली. सगुणाबाईलाही स्वतःला तसेंच वाटलें, व म्हणूनच आपण जेथें सोनें वेंचलें तेथें गोंवऱ्या वेंचण्याचें कपाळीं आलें अशा मानखंडित भावनेनें ती माहेरीं निघून गेली.

ज्या सजणेमुळें एवढा सारा अनर्थ झाला, ती सशस्त्र शिपायांच्या खड्या पहाऱ्यांत सकवारबाईच्या महालांतील कैदखान्यांत रडत बसली होती. तिचा नवरा प्रतापरावही सकवारबाईच्या हुकुमावरून कैद होऊन किल्ल्याच्या देवडीवर तिष्ठत बसला होता. सायंकाळपावेतों त्या दोघांचीही जेवलां कीं उपाशी आहां अशी विचारपूसही कोणीं केली नाहीं. नाहीं म्हणावयाला दोघांचीही उपहासपूर्वक थट्टामस्करी मात्र पुष्कळांनीं पुष्कळच केली.

प्रतापराव व सजणा यांचा वृत्तांत असा कीं, प्रतापराव हा प्रतिनिधींच्या सैन्यांतील एक बारगीर होता. कर्नाटकच्या स्वारींत तो प्रतिनिधींबरोबर होता. त्या स्वारींत तो एका भयंकर चकमकींत जखमी होऊन शत्रूच्या हातीं लागला. पुढें तो तशाच स्थितींत बरेच दिवस पराधीन असल्यानें मराठ्यांचें संयुक्त सैन्य जेव्हां कर्नाटकांतून माघारें परतलें तेव्हां त्याची व त्या सैन्याची ताटातूट झाली, व प्रतापरावानें स्वतंत्रपणें नशीब काढण्याच्या इराद्यानें तंजावरांत जाऊन प्रतापसिंह महाराजांच्या सैन्यांत नोकरी धरली. प्रतापरावाचें सजणेशीं लग्न पूर्वींच झालें होतें. तो कर्नाटकच्या स्वारींत गेला तेव्हां त्याचें वय वीस वर्षांचें होतें.

प्रतापरावाशीं सजणेचें लग्न झालें तेव्हां ती वयानें लहान होती. पुढें नोकरीपेशाच्या व स्वारीशिकारीच्या निमित्तानें प्रतापराव जो एकदां घराबाहेर पडला, तेव्हांपासून आजवर तीं दोघेंही एकमेकांना पारखीं झालीं होतीं. प्रतापरावाविषयीं कांहींच वार्ता कानीं येईना, व आधार कोणाचाही नाहीं, त्यामुळें सजणेनें श्रद्धापूर्वक साधुसेवेंत आपलें आयुष्य वेंचण्याचें ठरविलें, व ती आपल्या एका सोबतिणीच्या ओळखीनें धावडशीला ब्रम्हेंद्रस्वामींच्या

सेवेला जाऊन राहिली. निर्वाणसमयीं स्वामींनीं आपल्या सर्व सेविकांची जिच्या तिच्या मर्जीप्रमाणें सुव्यवस्था लावून दिली; तेव्हां सजणा राणी सगुणाबाईकडे आली. महाराजांची सेवा सजणा अत्यंत भक्तिभावानें करते हें सगुणाबाईनें पाहिलें असल्यामुळें सजणेवर सगुणाबाईचा अगोदरच लोभ जडला होता. म्हणूनच तिनें सजणेला मागून घेतलें. सजणा भाविक होती. ‘तूं कांहीं चिंता करूं नकोस. श्री भार्गवरामाच्या कृपेंकरून तुझें कल्याणच होईल’ असा स्वामींचा सजणेला आशिर्वाद होता; व दोघींच्याही भोळ्या भावाप्रमाणें तो आशिर्वाद आज फळाला येऊं पाहात होता.

प्रतापराव वास्तविक कर्नाटकांतून बरा झाल्यावर माघारा यावयाचा. परंतु तो तेथेंच एका मुसलमान तरुणीच्या प्रेमपाशांत सांपडल्यामुळें अडकून पडला. तिच्या नादानें बाटून तो मुसलमानही झाला होता. परंतु मनुष्याचा नाद म्हणजे कांहीं प्रेम नव्हे, व त्या नादाला सत्कर्तव्याच्या मनोमय जाणिवेचें पाठबळही नसतें. आपण करतों किंवा केला तो अन्याय आहे अशी बोंचणी मनाला एकसारखी लागलेली असते. पण मन दुबळें असल्यानें तो अन्याय टाळतां येईनासा होतो व पश्चात्तापाच्या ज्वालांत मन होरपळूं लागतें. अशा स्थितींत अन्यायापासून परावृत्त होण्याची उपरति होण्याची वेळ एकच; ती नादाची हौस भागल्यावर! प्रतापराव जेव्हां त्या यवन तरुणीच्या मोहपाशांत गुरफटला गेला, तेव्हां त्याला सजणेची आठवण नव्हती असें नाहीं. पण तो नाद ओसरेपावेतों त्याला घरीं येण्याची ओढ लागली नाहीं. ती तो नाद भागल्यावर लागली. त्याला त्या यवन तरुणीचा चार पांच वर्षांनंतर हळूहळू कंटाळा येऊं लागला. अखेर एके दिवशीं तो तिला नकळत अचानक तिला फसवून सजणेचा शोध करीत महाराष्ट्रांत निघून आला. त्याला सजणा सगुणाबाईकडे कुळंबीण आहे असें कळतांच तो सगुणाबाईला जाऊन भेटला; व तिनें त्याची विनवणी ऐकून सजणेला सोडून देण्याचें कबूल केलें. मध्यंतरीं लोकांनीं त्याचे सजणेविरुद्ध नानाप्रकारें कान भरण्याचे प्रयत्न केले. पण सजणेविषयीं त्याला आतां कळकळ वाटूं लागली होती म्हणून असो, किंवा कांहींही असो, प्रतापरावानें तिकडे लक्ष न देतां सजणेशीं प्रामाणिकपणें संसार करण्याचें ठरविलें होतें. मात्र आपण पूर्वी बाटून मुसलमान झाल्याची गोष्ट तेवढी त्यानें गुप्त राखिली होती.

पेशवाईचा पुनर्विकास

त्या दिवशीं सगुणाबाई माहेरीं निघून जाईतों सजणा व प्रतापराव दोघेंही अटकेंतच होतीं. सकाळपासून पोटांत अन्नाचा कण नाहीं कीं पाण्याचा घोट नाहीं, त्यामुळें प्रतापराव त्रासून अगदीं रडकुंडीला आला व पहारेकऱ्यांना विनवूं लागला, " मला निष्कारण अटकेंत कां ठेवतां ? सजणेला सोडावयाचें नसेल तर राणीसाहेबांना म्हणावें नका सोडूं. पण मलातरी सोडा ! "

पहारेकऱ्यांनीं प्रथम प्रतापरावाची मनमुराद थट्टामस्करी केली. 'बायको फुकटची मिळते का ?' असें विचारावयाला व राजवाड्यांतील कुळंबिणी नवऱ्याचा विश्वासानें संसार करण्याच्या लायकीच्या नसतात असें बोलून त्यांनीं त्याला खिजवण्यालाही कमी केलें नाहीं. पण त्यानें तें निमूटपणें सहन केलें. सहन न करून काय करणार ! अखेर त्या पहारेकऱ्यांनाच त्याची दया आली व त्यांनीं सकवारबाईपावेतों त्याची पुन्हा दाद लावून दिली.

त्यावेळीं सकवारबाई सजणेची पूर्वोक्त चौकशी करीत होती. चौकशी कसली ? भयंकर दिव्यच तें !

" बोल. धाकटी राणी चांगली का मी चांगली ?" सकवारबाईनें सजणेला विचारलें.

सजणा आधींच आसुडाचा मार खाऊन खाऊन बेजार झाली होती. ती जर नरम आली नाहीं, तर तिला अन्नपाण्याशिवाय हालहाल करून ठार मारण्याचें सकवारबाईनें ठरविल्याची कुणकुण सजणेच्या कानीं गेली असल्यानें तिला प्राणभयानें सकवारबाईच्या मताप्रमाणें बोलणें प्राप्तच होतें. ती उत्तरली, " आपण चांगल्या."

" मग इतके दिवस तिच्या तंत्रानें कां वागत होतीस ? "

" त्यांची सेवाचाकरी करणें वांट्याला आलें म्हणून ! "

" पण आतां माझी सेवाचाकरी तुला करायची आहे कीं नाहीं ?"

" आनंदानें."

" कीं नवऱ्याबरोबर निघून जायचें आहे ?"

" राणीसाहेबांची आज्ञा होईल तसें."

" माझी आज्ञा कीं तूं माझ्याच पदरीं कुळंबीण म्हणून राबलें पाहिजेस."

" आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. "

" मग तुझ्या नवऱ्याला काय सांगूं ?"

" आपल्या मनाला येईल तें सांगा."

" तूं त्याच्याबरोबर नांदायला तयार नाहींस असें सांगूं ?"

" सांगा."

त्याच वेळीं पहारेकऱ्याबरोबर प्रतापराव सकवारबाई जेथें सजणेची चौकशी करीत होती, त्याच्या बाहेरच्या बाजूला येऊन पोंचल्यामुळें सकवारबाईचा शेवटचा प्रश्न व त्याला मिळालेलें सजणेचें शेवटचें उत्तर हीं दोन्ही त्याला व पहारेकऱ्यालाही ऐकूं गेलीं. पहारेकऱ्यानें तो सजणेचा शद्ब ओळखला. पण प्रतापरावानें कांहीं ओळखला नाहीं. आज सहा वर्षें तो परागंदा होता, व तो घरांतून गेला तेव्हां सजणा अवघी बारा वर्षांची होती. तिला तेव्हां पदर देखील आला नव्हता. तितक्या लहान वयांत तिची व नवऱ्याची ओळख ती काय होणार!

" तुझी बायको काय म्हणते ऐकलेंस का ?" पहारेकऱ्यानें प्रतापरावाला विचारलें.

"काय; तीच माझी बायको ?"

" होय. तीच तुझी बायको. ती तुझ्याबरोबर संसार करावयाला आपण तयार नाहीं असें थोरल्या राणीसाहेबांना सांगते आहे."

" नशीब माझें!" असें म्हणून प्रतापरावानें कपाळावर हात मारून घेतला.

"मीं इतका वेळ सांगितलें त्याचा अनुभव आला कीं नाहीं ?" पहारेकऱ्यानें पुन्हा विचारलें.

प्रतापरावाला उत्तर देण्याला तोंड कुठें होतें! त्यानें शरमून खालीं मान घातली.

प्रकरण ६ वें

ताटातूट

पहारेकरी तरी इतका वेळ सकाळपासून प्रतापरावाला तेंच सांगत होता, " तुझी सजणा आतां तुझ्याशीं संसार करण्याच्या लायकीची राहिलेली नाहीं. तिच्या कानांत वारा शिरला आहे; तिची वृत्ति फार चवचाल बनली आहे. कुळंबिणी म्हणून राबणाऱ्या बायका सभोंवारच्या माणसांच्या सपाट्यांतून कधींतरी बचवतात का ? "

पण प्रतापरावाचा त्यावर विश्वास बसला नाहीं. आपली सजणा इतक्या हलक्या मनाची नाहीं, ती आपणाशीं बेइमान खास झाली नसेल, असें त्याचें मन त्याला सांगत होतें. इतका सजणेविषयीं प्रतापरावाला अढळ विश्वास वाटण्याचें कारण, सजणा ही तशाच थोर व खानदानीच्या कुळांत जन्माला आली होती. तिच्या वडील बहिणीची अशी एक गोष्ट प्रचलित होती कीं, गांवांतल्या कोणा यवन नरपशूनें पापबुद्धीनें तिच्या अंगाला स्पर्श केला. परपुरुषाचा स्पर्श तो काय आणि त्यांत इतकें मनाला लावून घेण्याजोगें काय आहे ! पण सांवळीला तसें वाटलें नाहीं. तिच्या मनाला ती गोष्ट अत्यंत झोंबली. नेहमीं पडद्यांत वावरणाऱ्या थोर मातेच्या पोटीं जन्माला आलेली स्त्री ती ! रविराव शिंद्यांचें घराणें म्हणजे कांहीं सामान्य नव्हे ! शाहूमहाराजांची अंबिकाबाई या नांवाची राणी जी पूर्वींच दिवंगत झाली होती, ती त्या शिंद्यांच्याच घराण्यांतली होती. तें एक शिंदे घराणें संपन्न होतें, म्हणून त्या घरची माहेरवाशीण अंबिकाबाई शाहूमहाराजांची राणी होऊं शकली, व त्याच घराण्यांतील भाऊबंदांच्या दुसऱ्या एका गरीबशा घराण्यांत सांवळी आणि सजणा यांच्या आईचा जन्म झाल्यामुळें ती एका खानदानीच्या पण गरीब कुळांतील मराठी शेतकऱ्याच्या गळ्यांत पडली होती.

पण सुंभ जळालें तरी त्याचा पीळ थोडाच जळतो! दुर्दैवानें गरिबी वांट्याला आली तरी घराण्याची जुनी खानदानी पद्धत कशी सुटणार! परपुरुषाला त्यांच्या स्त्रीचें नखदेखील कधीं दिसावयाचें नाहीं; त्या सांवळीला परपुरुषाचा स्पर्श कसा सहन व्हावा! तिनें लगेच विहिरींत उडी टाकून आत्महत्या केली. आपला देह परपुरुषाच्या स्पर्शानें अपवित्र झाला, त्याचा नाश केलाच पाहिजे, अशा प्रामाणिक समजुतीनें तिनें आपल्या जीविताची आपल्या हातानें तशी वाताहात केली! गांवकऱ्यांनीं चंदनाच्या लांकडांनीं तिची चिता रचली, व त्या जागीं तिची समाधही बांधली! अर्थात् सांवळीच्या ह्या तेजस्वी चारित्र्याबद्दल इतकी कळकळ व इतका आदर बाळगणाऱ्या लोकांना तिच्या देहाला स्पर्श करणाऱ्या नराधमाबद्दल तितकीच चीड आली हें सांगावयाला नकोच. त्यांनीं त्याला भरचवाठ्यावर दगडांनीं चेंचून ठार मारलें.

त्याच सांवळीची बहीण सजणा. तिच्याविषयीं प्रतापरावाला पूर्ण विश्वास व तितकाच अभिमानही कां वाटणार नाहीं!

ज्याप्रमाणें प्रतापरावाला देवडीवरील लोक सजणेच्या बाबतींत भलभलतें बोलून छळीत होते, त्याप्रमाणेंच सजणेचाही ती आपल्या दादल्याबरोबर संसार करावयाला जाणार हें माहीत झाल्यापासून वाड्यांतल्या हुजरे वगैरे मंडळीकडून बुद्धिभेद करण्याचें कार्य अव्याहत सुरू होतें. तिला ज्यानें त्यानें शिकवावें, "तुझा नवरा इतके दिवस दूर देशीं राहिला, तो कोणातरी बयेच्या प्रेमपाशांत खास सांपडला असेल. आणि तुला तो आतां घेऊन जाणार तो तरी तिचीं लुगडीं धुण्यासाठीं. तुझ्यावर त्याचें प्रेम थोडेंच आहे!" त्याप्रमाणेंच कांहींना ज्यांना प्रतापरावानें मुसलमान तरुणीशीं लग्न केल्याची कुणकुण माहीत होती, त्यांनीं ती वार्ता देखील सजणेच्या कानीं घालावयाला कमी केलें नाहीं; व वर सांगितलें, "त्या मुसलमान बयेची—सवतीची दासी म्हणून तुला यापुढें राबावें लागेल, तुला गोमांसही खावें लागेल."

ही मुसलमान सवतीची कल्पनाच सजणेला मरणापेक्षांही जास्त असह्य होत होती. ती सवतीला पाण्यांत पाहत होती अशांतली गोष्ट नाहीं. तिला माहीत होतें कीं सवती कोणाला नसतात? कितीतरी पुरुष मारे दोन दोन चार चार देखील लग्नें करतात. अनेक बायका करणें हा पुरुषांचा नैसर्गिक व

धार्मिक हक्कच आहे असा सजणेचा भोळा भाव होता. जी गोष्ट तिला तिच्या वयाच्या बाराव्या वर्षी प्रतापराव कर्नाटकच्या स्वारींत गेला त्या वेळीं पोरपणामुळें कळूं शकली नाहीं, ती तिला आतां कळूं लागली होती. आपण लहान असल्यानें आपल्या दादल्याला दुसऱ्या एखाद्या तरुणीवर प्रेम करावेंसें वाटलें तर त्यांत वावगें कांहींच नाहीं असें तिनें वेळीं म्हटलें असतेंही. पण तें प्रेम मुसलमान तरुणीवर? सजणा प्राणांतींही तें मान्य करावयाला सामान्यतः तयार नव्हती. तिच्या बहिणीच्या—सांवळीच्या नाशाला एक मुसलमानच कारण झाल्यामुळें मुसलमान म्हटला कीं सजणेच्या पायाची आग मस्तकाला जाऊन झोंबे. असला अधर्म करण्याइतका आपला दादला अधर्मी अधमवृत्तीचा खास नाहीं असा सजणेला भरंवसा वाटत होता. तिनें लोकांच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. इतकेंच काय पण निंदकांचीं तोंडें कायमचीं बंद करून टाकण्यासाठीं तिनें त्राग्याच्या भावेंत व पतिविषयींच्या नैसर्गिक आदरातिरेकामुळें त्यांना असेंही सांगावें, " ते बाटले आहेत, व एक मुसलमान पोरगी त्यांच्या गळ्यांत पडली आहे, हें सारें मला माहीत आहे. पण मला तें मान्य आहे."

" मग काय; तूं तुझ्या मुसलमान सवतीचीं लुगडीं धुणार? तिची सेवा—चाकरी करणार?"

" होय करणार."

" आणि बाटून मुसलमान होणार?"

" होय. मुसलमानही होणार. त्यांत ह्या लोकांचें काय जातें?" सजणा जशास तसें या न्यायानें म्हणाली. इतका जिचा आपल्या पतीच्या ठायीं ओढा व अढळ विश्वास, त्याच सजणेनें सकवारबाईसमोर आपण पतीशीं नांदण्याला कबूल नाहीं असें म्हणावें हें एकपरीनें आश्चर्यच नाहीं काय?

पण सकवारबाईचा तामसी व क्रूर स्वभाव, आणि सगुणाबाई माहेरीं गेल्यामुळें सजणेच्या वांट्याला आलेला पोरकेपणा व सभोंवारची प्रतिकूल परिस्थिति ध्यानीं घेतां सजणेला स्वतःच्या इच्छेविरुद्ध तशी निष्ठुरपणाची कबुली देण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. ती जर पतीबरोबर जाण्याचा व त्याच्याशीं कोणत्याही परिस्थितींत संसार करण्याचा हट्ट धरती, तर सकवारबाईनें तिचा तो हट्ट चालूं दिला नसताच; पण वर तिचे हालहाल करून तिची नाहीं

नाहीं त्या कठोर उपायांनीं विटंबना करण्याला, तिला जिवें मारण्यालाही कमी केलें नसतें. त्या भयानें सजणा सकवारबाईच्या लहरीकडे नजर देऊन तोंडदेखलें बोलत होती. ते शब्द उच्चारतांना तिला मनांतून मात्र भरंवसा वाटत होता, " आजची ही वेळा निघून गेली कीं राणीसाहेबांचा राग आपोआप कालांतरानें शांत होईल, व आपण त्यांच्या मनाप्रमाणें वागून त्यांची मर्जी संपादन करूं शकूं. आपल्या पतीला आज राग आला असला तरी आपण तोही दूर करूं शकूं."

ह्या भविष्यकालीन आशावादाबरोबरच सजणा त्या वेळीं वर्तमानकाळाविषयींदेखील जबर आशा करीत होती, " थोरल्या राणीसाहेबांचा आपणावर जो राग आहे तो आपण आजवर धाकट्या राणीसाहेबांच्या तंत्रानें वागत आलों म्हणून. पण आतां ती परिस्थिति आपोआप पालटली. आतां माझ्यावर दांत ठेवण्याचें थोरल्या राणीसाहेबांना तरी काय कारण? त्या ज्या आपल्या संसारसुखाच्या आड येत आहेत, त्या आपल्या मनाची परीक्षा पाहत असतील. पण ही सजणा आतां सर्वस्वी आपल्या तंत्रानें वागावयाला तयार आहे असें त्यांना आढळून येतांच त्या आपण होऊनच सांगतील कीं सजणे, जा. आपल्या दादल्याशीं सुखानें संसार कर जा." त्यांची दावेदारी असली तर ती सवतीशीं. सवतीच्या कुळंबिणीशीं कसली आली आहे दावेदारी!

* * *

अशी सकवारबाईपासून अपेक्षा करण्याला सजणेला थोड्या दिवसापूर्वीचें सकवारबाईच्या तऱ्हेवाईक स्वभावाचें एक उदाहरण आठवत होतें. रामाजी या नांवाच्या सकवारबाईच्या एका हुजऱ्याची बायको माहेरीं होती; व तिचीं आईबापें मरणोन्मुख स्थितींत असल्यानें त्यांना सोडून तिला आपल्या घरीं येऊन राहतां येण्याजोगें नव्हतें. तीं दोघेंही अगदीं म्हातारीं झालीं होतीं; व तीं पिकलीं पानें आज किंवा उद्यां झडावयाचींच होतीं. रामाजीनें त्यांना पुष्कळ आग्रह करून पाहिला कीं आपल्या घरीं येऊन रहा. पण तीं दोघेंही कसलीं पीळदार स्वभावाचीं! तीं कांहीं जांवयाच्या घरीं येऊन राहण्याला तयार होईतात. बरें; त्यांना अखेरच्या दिवसांत पाणी तोंडाला लावायलाही जवळचें माणूस लेंकीखेरीज दुसरें कोणीही नाहीं. त्यामुळें रामाजीची बायको माहेरीं अडकून पडली होती. तें जोडपें तरुण असल्यानें एकत्र राहून मौजेनें

संसार करावा असें त्या दोघांनाही स्वाभाविकपणेंच वाटणार. पण तें जुळून यावें कसें !

शेवटीं रामाजीबरोबरच्या कांहीं हुजऱ्यांना रामाजीची कींव आली. त्यांना सकवारबाईच्या तऱ्हेवाईक स्वभावाची माहिती असल्यानें त्यांपैकीं एकाला रामाजीनें हाताशीं धरून सिद्ध—साधकपणा करण्याचें ठरविलें. रामाजीची बायको फार आजारी आहे अशी बातमी एकानें जाऊन सकवारबाईच्या कानां-वर घातली.

सकवारबाईचा रामाजी हा आवडता हुजऱ्या होता. त्याला हांक मारून तिनें विचारलें, "तुझी बायको माहेरीं आजारी आहे ना?"

रामाजी उत्तरला, "नाहीं; तशी कांहीं ती विशेष आजारी नाहीं."

रामाजीनें मथवून ठेवलेल्या त्याच्या सहकाऱ्यानें त्याच वेळीं बतावणी केली, "आईसरकार! आपली सेवा टळेल ह्या भयानें हा खोटें बोलतो आहे. आज महिनाभर याची बायको अंथरुणाला खिळली आहे, व ती आतां ह्या दुखण्यांतून वांचेल असा कांहीं भरंवसा नाहीं. तिचे ह्याला निरोपांवर निरोप येत आहेत."

"तूं तुझ्या बायकोला भेटायला गेलें पाहिजेस." सकवारबाईची आज्ञा झाली.

"आईसरकार! आपल्या पायांपेक्षां मला बायकोच्या जिवाची मुळींच पर्वा नाहीं. मी जाणार नाहीं." रामाजी उत्तरला.

"तूं गेलेंच पाहिजेस." सकवारबाईची पुन्हा आज्ञा झाली.

"पण आईसरकार! त्याच्यापाशीं घोडा नाहीं." रामाजीचा मित्र म्हणाला.

"घोडा नाहीं तर माझ्या पागेंतला एक घोडा सोडून आण जा. या घटकेला आण जा." सकवारबाई उत्तरली.

रामाजीचा मित्र पागेंतून घोडा आणण्यासाठीं ताबडतोब निघून गेला. रामाजी गयांवयां करून कुरकुरूं लागला, "आईसरकार! मला घोड्यावर नीट बसतां येत नाहीं."

रामाजी पट्टीचा घोडेस्वार होता. कसलेंही नाठाळ जनावरही तो वठणीवर आणूं शकत असे. पण सकवारबाईच्या हेकेखोर व दुराग्रही स्वभावाचा पुरे-

पूर फायदा सासुरवाडीला जाण्याकडे करून घेण्याचें त्यानें मनांतून ठरविल्या-मुळें त्या धोरणानें त्या दोघांची ही सारी बतावणी चालली होती. आपणाला घोड्यावर बसतां येत नाहीं असें रामाजीनें म्हणतांच सकवारबाई म्हणाली, " बसतां आलें नाहीं तरी तुला बसलेंच पाहिजे. "

तेवढ्यांत तो दुसरा मनुष्य तबेल्यांतला घोडा घेऊन तेथें हजर झाला.

" बैस त्या घोड्यावर, आणि आतांच्या आतां आपल्या सासुरवाडीला जाऊन बायकोला भेट. " सकवारबाई रामाजीला म्हणाली.

" केवळ आईसरकारांची आज्ञा उल्लंघन करावयाची नाहीं म्हणून मी जातों. परंतु तेथें आठ दिवसांपेक्षां जास्त दिवस थांबणार नाहीं. मग बायको बरी होवो कीं न होवो. आईसरकारांच्या सेवेपेक्षां मला बायको जास्त नाहीं." रामाजी घोड्याकडे पाहत म्हणाला, " आणि मी पायींपायींच जातों. मला घोडा नको. घोड्यावर मला नीट बसतां येत नाहीं. '

" घोड्यावरूनच गेलें पाहिजे. तूं वाटेंत घोड्यावरून पडलास तरी बेहेत्तर. आणि इकडे येण्याची घाई करतां कामा नये. तेथें महिनाभर तरी रहा, आणि मग बायको बरी झाल्यावर साधल्यास तिलादेखील घेऊन ये. " सकवारबाई म्हणाली.

" आईसरकार ! त्याला घोडयावर बसतां येत नाहीं हें मात्र साफ खोटें. घोडयाला व स्वतःला पोसायला त्याच्यापाशीं पैसा नाहीं ही त्याची खरी अडचण आहे. " रामाजीचा मित्र म्हणाला.

लगेच सकवारबाईनें आपल्या खासगी कारभाऱ्याला तेथल्या तेथें बोला-वून आणून वीस मोहरा रामाजीला खर्चासाठीं आदा करविल्या. रामाजी त्या घेऊन घोडयावर स्वार होऊन सासुरवाडीला निघून गेला.

* * *

हा सकवारबाईचा स्वभाव सजणेच्या पूर्ण परिचयाचा असल्यानें तिला वाटलें कीं ' आपले पाय सोडून मला नवऱ्यापाशीं राहावयाचें नाहीं ' असें आपण सांगितलें, कीं थोरल्या राणीसाहेब आपणाला बळेंच नवऱ्याशीं संसार करावयाला भाग पाडतील.

पण सजणेचा तो अंदाज अगदीं चुकीचा ठरला. सकवारबाईला प्रत्यक्ष सगुणाबाईवर जी सवतीमत्सरपूर्ण सूड उगविण्याला संधी मिळाली नाहीं, ती

संधी सजणेच्या निमित्तानें तिला साधावयाची होती, व तिचा कोंडमारा करून आपली दुधाची तहान ताकावर भागवावयाची होती. सजणेच्या हृदयाची तिला काय कल्पना ! इतक्या इतर कुळंबिणी आपल्या पदरीं आहेत त्यां-तील ती एक असें सकवारबाई धरून चालली होती. मनुष्य स्वतःच्या करमणुकीसाठीं पोपटाला पिंजऱ्यांत बंदिवान करून ठेवतो तेव्हां तो पोपट आपलें स्वातंत्र्य हिरावलें गेल्यामुळें बंदिवासांत झुरत असेल अशी कल्पनादेखील त्याच्या धन्याच्या ध्यानींमनीं येत नाहीं. तात्पर्य, सजणा व प्रतापराव हीं दोघेंही त्यावेळीं प्रतिकूल परिस्थितीच्या एकाच नावेंत बसलेलीं होतीं. दोघांच्या मनोवृत्तींत फरक असेल तर एवढाच कीं, प्रतापराव सजणेच्या तोंडचे ओझरते शब्द ऐकून संतप्त झाला व तिच्याविषयीं त्याच्या मनांत कमालीचा अविश्वास उत्पन्न झाला; परंतु सजणेचा प्रतापरावाच्या ठायींचा विश्वास मात्र अढळ होता. नारीहृदयाला चंचल म्हणणारे खुशाल म्हणोत. पण सजणेनें त्या परिस्थितींत नारी होऊन मनाचा जो समतोलपणा राखला, तो प्रतापरावाला पुरुष होऊनही राखतां आला नाहीं.

सकवारबाईनें सजणेच्या तोंडची जबरीच्या खुषीची संमति घेतल्यावर प्रतापरावाला आंत हांक मारून विचारिलें, “ ही तुझी बायको तुझ्यापाशीं नांदावयाला तयार नाहीं. असला हा पेटता निखारा पदरीं घेऊन तूं काय करणार ? ”

प्रतापराव खिन्न मनानें उद्गारला, “ तिला जर माझी गरज नाहीं, तर मलादेखील तिची गरज नाहीं. यांत मला वाईट एवढेंच वाटतें कीं, ह्या अवदसेनें आपल्या सासरच्या आणि माहेरच्या दोन्ही कुळांचीं तोंडें काळीं केलीं. बायका काय सतराशेंसाठ मिळतील. ”

“ तर मग तुला आतां या बायकोची गरज नाहीं ना ? ” सकवारबाईनें विचारलें.

“ मला तिची मुळींच गरज नाहीं. असल्या गांवामुलुखावरून ओंवाळून टाकलेल्या बायकांचें मी तोंडदेखील पाहणार नाहीं. ” प्रतापराव उत्तरला.

“ आणि ती तरी तुझें तोंड पाहावयाला कुठें तयार आहे ? ” असें म्हणून सकवारबाईनें सजणेकडे वळून विचारलें, “ सजणे, असल्या बेमुर्वतखोर नवऱ्याशीं नांदायला तूं तयार आहेस का ? ”

सजणेच्या तोंडून शद्बच निघेना. तिच्या डोक्यांत अनेक परस्परविरोधी विचारांचें भयंकर काहूर माजलें होतें. पति ही चीज काय असते याचा तिला प्रत्यक्ष अनुभव फार थोडा होता, किंवा जवळजवळ मुळींच नव्हता असें म्हटलें तरी चालेल. ती बारा वर्षांची असतांना प्रतापराव कर्नाटकच्या मोहिमेवर गेला होता. त्या पोरवयांत तिला पतीची ओळख ती काय असणार! त्यानंतर ती जेव्हां वयांत आली, बरोबरीच्या मुलींचे नांदते संसार तिला पाहावयाला मिळाले, आणि त्याबरोबरच संसारांतील सुखदुःखांची ओळख तिला झाली, तेव्हांपासून तिनें पतीचें कल्पनारम्य चित्र आपल्या स्त्रीहृदयावर अत्यंत परिश्रमपूर्वक नाना प्रकारच्या रमणीय आशाआकांक्षांच्या कुंचल्यांनीं चित्रित करून ठेवलें होतें. स्त्रीला पति हा भूलोकावरील परमेश्वराप्रमाणें पूज्य होय, पतिखेरीज स्त्रीला गति नाहीं, इतकी पतीची थोरवी तिला वाटे. अशा पतिदेवाशीं स्त्रीनें इमानदारी राखलीच पाहिजे; फार काय पण पतीची नुसती आठवण करून आपणाप्रमाणें कोणाही अभागी स्त्रीला दीर्घकाल—नव्हे, सारा जन्म पतिविरह सहन करावा लागला तरी तो प्रत्येक स्त्रीनें सहन केला पाहिजे, असे निर्बंध तिनें स्वसंतोषानें आपल्या मनाला घालून घेतले होते. लहानपणीं सजणा पुराणकालीन सतींच्या कथा आपल्या वडील माणसांच्या तोंडून ऐके. त्यानंतर तिचें प्रतापरावाशीं लग्न झाल्यावर 'हा इचा नवरा' आणि 'ही त्याची बायको' अशा भाषेंत लोक बोलूं लागले, तेव्हां तिला अचंबा वाटे कीं पतीसाठीं ह्या पतिव्रता इतकें जिवाचें रान करतात, असा पति हा प्रतिपरमेश्वर आहे कीं काय? पण तें कोडें सजणेला कालांतरानें आपोआप उलगडलें होतें. पतीची स्त्रीजीवनांतील थोरवी तिच्या मनाला पटली होती, व अशा पतीसाठीं आपण स्वार्थाचाच काय पण सर्वस्वाचा त्याग केला तरी तो अपुरा पडेल अशा प्रामाणिक भावनेनें ती प्रतापराव परागंदा असतांना आपलें चारित्र्य उज्ज्वलतेनें सांभाळून होती.

सजणेला संसारसुखाची इच्छा कधींच झाली नसेल का? ती तरुण होती, सुंदर होती, तिला वैभवाच्या मोहजालांत अडकविण्याचा प्रयत्न कोणींच केला नसेल का? एकदांच नव्हे तर दहादां असे प्रयत्न तिच्या बाबतींत झाले होते. आणि ते देखील केवळ हुजऱ्या किंवा शिपाईप्यादा अशा सभोंवारच्या सामान्य दर्जाच्या पुरुषांकडूनच केवळ नव्हेत; तर बारगीर-शिलेदारांसारख्या

मान्यतेच्या लोकांकडूनही तिला वश करण्याचे प्रयत्न झाले होते ते निराळेच. त्या बोलून चालून दुर्जनांच्या लीला. पण सारें जग असल्या दुर्जनांनीं भरलेलें आहे असें कांहीं नाहीं. त्यांचे प्रयत्न एथें जमेला धरण्याचें कारण नाहीं. अगदीं सामान्य स्त्रियादेखील अशा वांकड्या वाटेनें जाण्याला सहसा तयार होत नाहींत; मग सजणेसारखी तेजस्वी स्त्री तशी कशी फंसेल! पण ती मनांत आणती तर लौकिकदृष्ट्या न फंसतां प्रामाणिकपणेंही आजवर केव्हांच पर-दारा होऊन बसली असती. इतरांची गोष्ट सोडली तरी रावजी जगदाळे या नांवाचा वडूथचा एक रहिवासी संपन्न व खानदानीचा मराठा शिलेदार प्रतिनिधींच्या सैन्यांत होता. तो वृत्तीनें व दिसावयालाही उमदा होता. कर्नाटकच्या मोहिमेवर तो प्रतापरावाबरोबर होता. प्रतापराव परागंदा झाला, त्याचा अर्थ तो कोठेंतरी कामाला आला असाच सर्वजण घेऊन चालले होते, व रावजीचाही तसाच प्रामाणिक समज होता. तो प्रतापरावाचा केवळ जिव्हा-ळ्याचा नाहीं तरी बराच जवळचा मित्रही होता. त्यानें जेव्हां पाहिलें कीं सजणा ऐन तारुण्यांत विधवा झाली—तिच्या संसाराचा मांडव झाला, तेव्हां त्यानें तिच्याशीं पाट लावण्याची इच्छा दर्शविली होती. सजणेच्या ठायीं दुसरी कोणी स्त्री असती, तर ती तेव्हां आनंदानें पुन्हा सौभाग्यवती होऊन रावजीशीं संसारही करूं लागली असती. तिच्या वडीलधाऱ्या माणसांचाही तिला या बाबतींत पूर्ण पाठिंबा होता. समाजही तिला उदाहरणें देऊन सांगत होता कीं रावजीसारख्या अनुरूप वराशीं पाट लावण्यांत कांहींदेखील वावगें नाहीं. खुद्द तिला स्वतःलाही रावजी पाट लावावयाचाच झाल्यास अमान्य अथवा न शोभणारा होता असेंही नाहीं. असें असतांही सजणा त्या वेळीं पाटाला तयार झाली नाहीं. "देव आपल्या पतीला सुखरूप घरीं आणणार नाहीं कशावरून? तो घरीं आला आणि त्यानें आपणाला दुसऱ्याचा संसार करतांना पाहिलें, तर त्याच्या मनाला किती वाईट वाटेल?" असा विचार करून तिनें हालअपेष्टेंत दिवस काढण्याचें पत्करलें, व प्रतापराव माघारा येईतों तें असिधाराव्रत यथावत् पाळलेंही. तिला जेव्हां प्रतापराव इतक्या वर्षांनीं सुखरूप माघारा आलेला आढळून आला, तेव्हां तिनें मनांतून परमेश्वराची शतशः करुणा भाकली, व आपल्या पातिनिष्ठाव्रताचें हें गोड फळ देवानें आपल्या पदरांत टाकलें असें तिला वाटलें.

इतक्या सायासांनीं व कष्टानें सजणेनें पातिव्रत्याचें व्रत आजवर अखंड पाळलें असतां त्या व्रताचा मोबदला प्रतापरावानें अशा प्रकारें दिलेला पाहून सजणेला कमालीची हळहळ वाटली तर त्यांत नवल तें काय ! तिला नुसतीच हळहळ वाटली नाहीं; हें सारें जग स्वार्थ, अन्याय व असत्यता यांनीं भरलेलें आहे, ह्या जगांत नीतीला व प्रामाणिकपणाला कवडीचेंही मोल नाहीं, असेंही तिच्या मनानें घेतलें. प्रतापरावाविषयीं सकृद्दर्शनींच तिला पराकाष्ठेचा संताप आला. हा नवरा नसून काळ आहे; हा आपला सातां जन्मांचा वैरी आहे असें तिचें मन तिला सांगूं लागलें.

सकवारबाईनें पुन्हा विचारलें, "बोल. लवकर बोल. असल्या बेपर्वा नवऱ्याशीं नांदायला तूं तयार आहेस का ?"

प्रतापरावही सजणेइतकाच चिडला होता. तो उतावळेपणानें मध्येंच उद्गारला, "आईसरकार, ती नांदावयाला तयार असली तरी मी तिला नांदवावयाला मुळींच तयार नाहीं. ती उनाडलेली स्त्री आहे; त्या वेसवेला उभ्या देशावर खुशाल मोकाट सुट्ट द्या ! मला तिची मुळींच गरज नाहीं."

जखमेवर मिठाचें पाणी शिंपडावें तसे प्रतापरावाचे ते निष्ठुरपणाचे उद्गार सजणेचें अंतःकरण सपासप कापीत गेले. ती आवेशाच्या सपाट्यांत उत्तरली, "तर मग आईसाहेब, मीही असल्या नादान नवऱ्याशीं क्षणभरदेखील संसार करावयाला तयार नाहीं. माझा नवरा परागंदा झाला तेव्हांच मेला. आहे हा माझा नवराच नव्हे. याच्याशीं मला कांहींच कर्तव्य नाहीं."

प्रकरण ७ वें

आगींत तेल

त्यावेळीं तेथें आणखी इतर लोक होते म्हणून बरें. नाहींपेक्षां प्रतापरावानें सजणेचा जीव घ्यावयालाही कमी केलें नसतें. तो अस्तन्या वर सारून तिच्या अंगावर धावलाच होता. परंतु बाकीच्यांनीं त्याला आवरलें.

" झालें ? आटोपलें ? " सकवारबाईनें विचारलें.

" आटोपलें आईसरकार ! मी येतों आतां. " असें म्हणून प्रतापरावानें सकवारबाईचा निरोप मागितला.

" तुला माझ्या पदरीं नोकरीला राहावयाचें आहे काय ?" सकवारबाईनें प्रतापरावाला विचारलें.

" आतां मला नोकरी धंदा करून काय करावयाचें आहे आईसरकार ? माझ्या संसाराचा मांडव हा इथेंच झाला. आतां नोकरी धंदा कुणासाठीं करावयाचा ? "

" तुझी इच्छा असली तर तुला एखादी मनाजोगी बाईलही पाहून देतां येईल. " सकवारबाई म्हणाली.

" कांहीं नको. बायकोची जात बेइमान असते अशी माझी आतां पक्की खात्री होऊन चुकली. मी आज इतकीं वर्षें संकटपरंपरा टाळून जिवंत राहिलों आणि जिवाचें रान करून कर्नाटकांतून एथवर धावत आलों तो केवळ —पण जाऊंद्या ! त्या गोष्टी बोलून आतां काय करावयाच्या आहेत !—" असें म्हणून प्रतावराव तीरासारखा तेथून वेगानें निघून गेला. त्याची तडफ पाहून सकवारबाईलाही अचंबा वाटला. पण आपणामुळें त्या तरुण जोडप्याच्या संसाराचा विजोड झाला अशी कल्पनाही तिच्या मनाला शिवली नाहीं. आपण सजणेवर पुरेपूर सूड घेतला यांतच समाधान मानून ती आपल्या

महालांत निघून गेली. इतर हुजरे वगैरे मंडळीही, पुढेंमागें सजणा आपणाला वश होईल अशा आशेनें मनांतल्या मनांत मांडे चुरींत झाल्या प्रकाराबद्दल समाधान मानीत तेथून निघून गेली.

सजणा मात्र कांहीं वेळ तेथेंच स्वतःच्या परिस्थितीचा विचार करीत उभी होती. आपलें आणि आपल्या पतीचें जमूं नये असा सकवारबाईचा कावा होता, हें सकवारबाईनें त्याच क्षणीं प्रतापरावापाशीं दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढली त्यावरून सजणेला पूर्णपणें कळून चुकलें होतें. ती रागाच्या भरांत प्रतापरावाला उणे बोल बोलून गेली खरी; पण थोड्याशा विवेकाअंतीं तिचें तिलाच वाटूं लागलें, " त्यांनीं माझा त्याग केला यांत त्यांचा तरी काय दोष ? आईसाहेबांच्या बोलण्याचा एकंदर रोंख कोणाही ऐकणाराला माझ्याविषयीं तिरस्कार येईल असाच होता. कुळंबिणींच्या पेशांत वागणाऱ्या बायकांपैकीं वर्तनाच्या धड अशा फारच कमी सांपडतात हें कांहीं खोटें नाहीं. तरीही त्यांनीं माझ्यावर विश्वासून माझा स्वीकार करण्याची इच्छा दर्शविली. परंतु आईसाहेबांनीं घात केला; त्यांनीं माझ्यावर पुरा सूड घेतला....कांहीं हरकत नाहीं म्हणावें, तुम्ही महाराणी असलां आणि मी यःकश्चित कुळंबीण असल्यें तरी मी देखील तुमच्यावर याचा पुरेपूर सूड घेईन तरच नांवाची सजणा ! मला तुम्हीं बळजबरीनें आपल्या गुलामगिरींत डांबून ठेवली आहे; व माझ्या आयुष्याचा उन्हाळा करून सोडला आहे. तसाच तुमच्या आयुष्याचाही ही सजणा उन्हाळा करून सोडील. तेवढ्यापुरतीच ही सजणा आतां जिवंत राहिली आहे. तिच्या साऱ्या आशा–आकांक्षांचा असा निर्दयपणें चुराडा करणाऱ्या चांडाळणी !–पण माणसानें आधीं करावें आणि मग बोलावें..."

असा विचार करीत सजणा विमनस्क स्थितींत तेथें एका कोंपऱ्यांत उभी होती. तोंच मैना या नांवाची तिच्या ओळखीची राणी ताराबाईच्या दिमतींतील दुसरी एक कुळंबीण तेथें येऊन म्हणाली, " तुला एखादी पिशाच्चसिद्धि आहे का ग ?"

" ती कशी काय ?" सजणेनें अचंब्यानें विचारलें.

" तुझें सामर्थ्य एवढें मोठें आहे कीं तुझ्या पायीं धाकट्या राणीसाहेबांना रागानें माहेरीं जावें लागलें. आणि महाराजदेखील वैतागून वनवासवाडीला निघाले आहेत."

" खरेंच ? "

" तर ? मी खोटें कशाला सांगेन ? ते इतक्यांत वनवासवाडीला जाऊन जुनेपुराणे देखील झाले असतील. सवतीमत्सरानें विखारलेल्या ह्या वाड्यांत अन्नग्रहणदेखील करावयाचें नाहीं, असा निर्धार करून महाराजांनीं कारभाऱ्यांना वनवासवाडीला डेरे देण्याची आज्ञा केली आहे. "

" अर्थात् थोरल्या आईसाहेब त्यांच्याबरोबर जाणार नसतीलच ! "

" त्या जातील. पण महाराज त्यांना बरोबर न्यायला तयार आहेत कुठें ? त्याच तर महाराजांना संसाराचा आणि राज्याचा इतका वीट यायला कारण झाल्या आहेत. आणि ह्या सर्व भानगडींच्या मुळाशीं तूं ! "

याप्रमाणें त्या दोघीं कुळंबिणीचें संभाषण चाललें आहे, तोंच एक हुजऱ्या सजणेचा शोध करीत तेथें आला व तिला म्हणाला, " चला सजणाबाई ! माझे आई ! चला ! "

" कुठें चला ? " सजणेनें कपाळाला आंठ्या घालून विचारलें. तिला हुजऱ्यांचें तें खोंचक बोलणें रुचलें नाहीं.

" थोरल्या आईसाहेब तुम्हांला बोलावीत आहेत. " हुजऱ्या म्हणाला.

" कशाला ? " सजणेनें विचारलें.

" डोल्हाऱ्यांत गौर मांडून तुमची पूजा करायला ! "

इतक्यांत आणखी एक हुजऱ्या सकवारबाईकडून बोलावणें घेऊन आला. हें प्रकरण आहे तरी काय अशी सजणेला चिंता पडली. ती तशीच घाईघाईनें सकवारबाईच्या महालाकडे वळली. मैना ह्या भानगडीची हकिकत आपल्या मालकिणीला अर्थात् ताराबाईला कळविण्यासाठीं लगबगीनें तिकडे निघून गेली. तों हुजऱ्या म्हणाला, " थोरल्या आईसाहेब आपल्या महालांत नाहीं आहेत. "

" तर ? " सजणेनें विचारलें.

" त्या रंगमहालांत आहेत. तिकडे तुला त्यांनीं ताबडतोब बोलावलें आहे. " हुजऱ्या म्हणाला.

सजणेला मैनाकडून शाहूमहाराजांच्या वैतागाविषयीं जो वृत्तांत कळला होता, तो खराच होता. सकाळपासून ह्या एक बाबतींत महाराजांचा दोन्ही राण्यांकडून पावलोपावलीं पाणउतारा होत होता, तो महाराजांना अगदीं

असह्य झाला होता. दोघी राण्यांपैकीं कोणीच समजुतीनें वागण्याला तयार नाहीं; सगुणाबाईही सवतीमत्सराच्या भरांत रागावून महाराजांना न विचारतां माहेरीं निघून गेली. पण सजणेच्या बाबतींत माघार घेऊन मिळतें घेण्याइतकें सौजन्य तिला दाखवितां आलें नाहीं; बरें, सकवारबाईही वडीलपणाच्या नात्यानें रेंसभरदेखील मिळतें घेण्याला तयार नाहीं! ही आपली विटंबनाच दोघी राण्यांनीं चालविली आहे असें महाराजांच्या मनानें पक्कें घेतलें. त्यांतच पेशव्यांविषयींच्या चुगलखोरीची भर पडली होती. आधींच प्रकृति आजारीपणामुळें हळुवार झालेली, त्यांत ही भर पडल्यानें वैतागाच्या भरांत महाराजांना वाटलें कीं नको हें घर, नको हा संसार आणि नको हें राज्य. त्यांनीं ताबडतोब आपल्या विश्वासांतले गोविंदराव चिटणीस, रामचंद्रबाबा शेणवी व नारोराम मंत्री वगैरे मंडळीला व यशवंत महादेव पोतनीस यांना बोलावून आज्ञा केली, "आतांच्या आतां डेरे वनवासवाडीला द्यावयाचे. आजचा सूर्य अस्ताला जातांना त्यानें आम्हांस वनवासी पाहिलें पाहिजे. वनवासवाडीस गेल्याखेरीज आम्ही अन्नग्रहण करणार नाहीं. ही वार्ता इतर कारभारी मंडळीला कळवूं नये. निष्कारण येतील आणि बखेडे उत्पन्न करतील; तें आमच्या कामीं यावयाचें नाहीं."

त्या सर्व मंडळीनें महाराजांना परोपरीनें समजावून पाहिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. महाराजांनीं एकच निर्वाणीचें वाक्य बोलून त्यांचीं तोंडें बंद केलीं, "आमच्या निर्धाराआगळा एक शद्ब तरी बोलाल तर आमच्या गळ्याची आण!"

महाराजांच्या त्या निर्वाणीच्या शद्बावर कोणाला एक शद्बही बोलतां येणें शक्य नव्हतें. त्यांना महाराजांच्या वनवासगमनाची तयारी करणेंच प्राप्त झालें. त्यांतल्यात्यांत त्यांनीं एक मात्र केलें; महादाजी पुरंदरे वगैरे वडीलधारी मंडळी जी राजवटीला होती, त्या सर्वांना त्यांनीं महाराजांच्या निर्धाराची खबर ताबडतोब जाऊन दिली.

खाशी मंडळी महाराजांची समजूत करण्यासाठीं रंगमहालांत जमा होतात तोंच महाराजांचें चित्त अस्वस्थ करणारी आणखी एक आपत्ति परमेश्वरानें पाठविल्यासारखी तेथें येऊन थडकली. एक मध्यम वयाचा मनुष्य सर्वांग रक्तानें भिजून चिंब झालें आहे असा विव्हळत तेथें आला, व महाराजांच्या

पायांवर लोटांगण घालून महाराजांची करुणा भाकूं लागला, “सरकार, मला गरिबाला वांचवा. राघोराम सावकार माझा प्राण घेत आहेत. आपल्या पायांशिवाय मला आतां कोठें आसरा उरला नाहीं. मला वांचवा.”

“राघोरामाचा तूं काय अपराध केलास?” महाराजांनीं त्या माणसाला हातानें धरून वर उठवून विचारिलें.

“मी त्यांचा ऋणको आहें महाराज! यापेक्षां मीं त्यांचा कांहीं देखील अपराध केला नाहीं. मी त्यांचें फार दिवसांपासूनचें देणें लागतों, ही खरी गोष्ट आहे. पण ह्या वडिलार्जित देण्याचें व्याज मी आजवर नियमानें देत आलों. तसेंच तें या वर्षींही देण्याचा माझा मानस होता. पण सावकाराच्या तगादेवाल्यांनीं माझें उभें पीक रुपयाला शिवराई या भावानें मातीमोलानें लिलावांत फुंकून टाकिलें. आतां कोठले पैसे देऊं!”

“तुझें नांव काय?” महाराजांनीं त्या मनुष्याला विचारिलें.

“रंगनाथ शेणवी मला म्हणतात.” तो मनुष्य उत्तरला.

“तुला इतका मार बसला ही गोष्ट राघोरामाला माहीत आहे?”

“होय महाराज! त्यांच्या आज्ञेवरूनच तर त्यांच्या नोकरानीं माझी पाठ आसुडाखालीं अशी सोलून काढली.” रंगनाथ हुंदक्यांचा ओघ आवरीत डोळे पुसून उद्गारला.

“जा. तुला आम्हीं ऋणमुक्त केलें आहे. राघोरामाला जाऊन सांग कीं, तुझे पैसे काय घेणें लागत असतील ते आमच्या खाजगींतून येऊन घेऊन जा. राघोरामाचें तूं किती देणें लागतोस?”

“ऐनजिनसी दोन हजार रुपये आणि चालू सालचें व्याज.”

“ठीक आहे. तूं जा आणि राघोरामाला आम्हीं सांगितलें तसें सांग.”

“जशी आपली आज्ञा महाराज!” रंगनाथ हात जोडून उद्गारला, “पण महाराज! राघोराम जर ऐकेनासा झाला तर मी काय करूं?”

“तो ऐकत नाहीं म्हणजे काय बिशाद आहे?” महाराज गोविंदराव चिटणिसांकडे वळून म्हणाले, “गोविंदबाबा! आम्ही आतां बोललों त्याप्रमाणें राघोरामाला बोलावून त्यांचें लफडें तोडून टाका.” ते लगेच रंगनाथाकडे वळून म्हणाले, “तूं आतां निर्धास्तपणें जा. आमच्या राजधानींत यापुढें तुझ्या केंसालाही धक्का लागणार नाहीं.”

"पण महाराज! आपलें देणें मी सवडीनें एक सालानंतर भरणा केलें तर चालेल ना?" रंगनाथानें विचारिलें.

"तूं आमचें कांहीं देणें लागत नाहींस. आमच्या राजधानींतल्या बेबंद-शाहींत अन्यायानें तुझें रक्त सांडलें; आमच्या राजधानींत असा अन्याय होणें हें आम्हांला लांछनास्पद आहे. अन्यायानें सांडलेल्या तुझ्या रक्ताचें मोल म्हणून ही सर्व रक्कम आम्हीं तुला बहाल केली आहे."

"ईश्वर महाराजांना उदंड आयुरारोग्य देवो. आणि महाराजांच्या राज्याची यावच्चंद्र दिवाकरौ अशीच वाढती भरभराट होवो." असा दुवा देत पुनःपुन्हा महाराजांचे व परमेश्वराचे आभार मानीत रंगनाथ तेथून निघून गेला.

प्रकरण ८ वें

म्हातारीचें रहस्य

'महाराजांच्या चित्ताच्या व्यग्रतेंत आणखी भर घालण्याला हा भिकारडा रंगनाथ याच वेळीं नेमका इकडे कसा आला ? याला पहारेकऱ्यांनीं तरी आंत कसा सोडला ?' असें आपसांत रागारागानें बोलत सर्व कारभारी मंडळी तेथें स्तब्ध उभी होती. महाराज त्या मंडळीच्या आगमनांतील आशय ओळखून चुकले होते. तिकडे त्यांनीं बळेंच दुर्लक्ष केलें व महादाजीपंतांना म्हटलें, " हाच कज्जा जर त्या शेणव्यानें चावडीवर नेला असता, व त्याला राघोरामानें अन्यायानें बडवून काढल्याबद्दल त्याच्या मुलाला आप्पाजीला कोतवालानें आसुडाखालीं झोडपून काढलें असतें, तर पोराची ती दुर्दशा पाहून राघोरामाला काय वाटलें असतें ? "

" असल्या क्षुल्लक गोष्टींत महाराजांनीं निष्कारण मन घालून चित्ताला नसती व्यथा देऊं नये. हा कज्जा वास्तविक महाराजांपावेतों यावयालाच नको होता. " महादाजीपंत म्हणाले.

महादाजीपंतांना महाराज पुरतेपणीं बोलूं न देतां मध्येंच उद्गारले, " महाराजांपावेतों यावयाला नको होता ! तिकडे महाराजांची गरीब रयत माजोरी मातबरांच्या दंडेलीखालीं रडेना कां ? आणि मरेना कां ? तुम्हां कारभाऱ्यांना त्याची काय पर्वा ? पण यांत अब्रू आमची जाते. सारा देश आमच्या तोंडावर थुंकतो कीं रयतेचें यथान्याय पालन करतां येत नाहीं तर छत्रपति कशाला झाला ? खरोखर, आम्हीं कैक पूर्वजन्मीं जीं पापें केलीं, त्यांची फेड करण्यासाठीं परमेश्वरानें आम्हांला राजवंशांत जन्माला घालून दुबळा बनवून सोडलें आहे. तिकडे पेशव्यांनीं आमच्या डोळ्यांत धूळ फेंकून आमच्याशीं बेइमानी करावी, सावकार तर आमच्या कपाळाचें कातडें काढीतच आहेत, रघूजी-

बाबासारखे राजवटीचे कर्ते अनुभवी पुरुष सवते सुभे स्थापून भलत्या अह-महमिकेकारणें राजवटीला कोंपरखळ्या मारीत आहेत; असल्या ह्या कलहप्रिय मातबरांना हाताशीं धरून आमच्या राण्यादेखील आमच्या कपाळाचें कातडें सोलून काढण्याला कमी करीत नाहींत ! नको नको ! परमेश्वरा ! ह्या यातना आतां सहन होत नाहींत. एकदां आमचे लौकर डोळे मिटूंदेत. ”

महादाजीपंत, यशवंतराव, गोविंदराव वगैरे सर्वांच्याच हृदयाचें महाराजांचे ते उद्वेगपूर्ण बोल ऐकून अगदीं पाणीपाणी होऊन गेलें. तेथें जमलेल्या मंडळींत महादाजीपंत व यमाजी शिवदेव यांच्याखेरीज इतरांना पेशव्यांनीं कोल्हापूरकरांशीं केलेल्या गुप्त करारनाम्याविषयीं कांहींच माहिती नसल्यानें ते आश्चर्यानें महादाजीपंतांच्या तोंडाकडे पाहूं लागले. नानासाहेब पेशवे हे महाराजांच्या गळ्यांतले ताईत, त्यांनीं सूर्य पश्चिमेला उगवला म्हणावें व महाराजांनीं त्याला मान तुकवावी, एवढें पेशव्यांचें महाराजांवर वजन असल्याचें सर्वत्र मशहूर होतें. त्याच पेशव्यांविषयीं त्याच महाराजांच्या तोंडून असे विपरीत उद्गार निघालेले ऐकून त्यांना विस्मय कसा वाटणार नाहीं !

परंतु त्या व तशाच इतर भानगडींविषयीं चर्वितचर्वण करीत बसण्याची ती वेळ नव्हती. महाराज वैतागून वनवासवाडीला जावयाला निघाले आहेत, त्यांचा वैताग दूर कसा होईल व ते शांत कसे होतील, हा एकच विचार त्या क्षणीं सर्वांच्या मनांत घोळत होता. त्याविषयीं युक्तिवाद केला तरी तो ऐकून घेण्याइतकीदेखील महाराजांची मनस्थिति ठिकाणावर नाहीं असें पाहून महादाजीपंतांनीं महाराजांच्या पायांपुढें आपल्या उपरण्याचा पदर पसरून दोन्ही हात जोडून त्यांना विनविलें, “ तें कांहीं असलें तरी महाराजांनीं ते सारे अन्याय आम्हां मंडळीचे आहेत असें समजून एकवार आम्हांला क्षमा करावी व वनवासवाडीला जाण्याचा विचार रहित करावा. आजवर झालें तें झालें; यापुढें तरी महाराजांना कोणत्याच कज्जाकफावतीच्या बाबतींत यत्किंचित् देखील त्रास होणार नाहीं, आम्ही सर्वजण महाराजांच्या आज्ञेबरहुकूम वागूं, असें मी आम्हां सर्व कारभाऱ्यांच्या वतीनें व श्रीमंत पेशव्यांच्याही वतीनें महाराजांना आश्वासन देतों. ”

महादाजीपंतांमागोमाग जगजीवनराव प्रतिनिधि व इतर सर्व कारभारी मंडळी यांनीं महाराजांपुढें पदर पसरून त्यांची क्षमा मागितली, व पुढें

गुण्यागोविंदानें वागण्याचें आश्वासन दिलें. सर्वांनीं महाराजांच्या पायांपाशीं तशा आणाशपथाही वाहिल्या. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. महाराज कोणत्याही कारणामुळें आपला वनवासी होण्याचा निर्धार मागें घेण्याला तयार होईनात. ते उलट सर्वांना उद्देशून म्हणाले, "तुम्ही आमच्या जिवावर मारेकऱ्यांसारखे तुटून पडत आहां. पण तुम्हांला आमची हात जोडून विनंति आहे कीं आम्हांला आतां सोडा."

"महाराजांनीं असें म्हणावें; मग बाकीचे सारे लोक आम्हांला काय बरें म्हणतील?" जगजीवनराव म्हणाले. त्यांनीं महाराजांचे शब्द आपल्या मनाला लावून घेतले होते असें मुळींच नाहीं. उलट महाराजांचे ते स्वतः व्यक्तिशः नाहीं तरी, त्यांचे जीवश्चकंठश्च स्नेही श्रीपतराव प्रतिनिधि यांचे बंधु होते. श्रीपतराव निवर्तल्याला व जगजीवनरावांना प्रतिनिधिपद प्राप्त झाल्याला अजून तीन चार महिनेदेखील लोटले नव्हते. अर्थात् जगजीवनराव कसा काय कारभार करतात हें अद्यापि महाराजांच्या नजरेला यावयाचें होतें. असें असतांही जगजीवनरावांनीं महाराजांचे शब्द आपणावर ओढून घेतले हा त्यांचा निव्वळ मानभावीपणा होता. मुतालिकांनीं सकाळची पेशव्यांविषयींची वाटाघाट त्यांच्या कानीं घातली होती. ती ध्यानीं घेऊन वळणावळणांनीं महाराजांच्या मनांत पेशव्यांविषयीं अधिकाधिक वितुष्ट कसें आणतां येईल, व आपल्या प्रतिनिधिपदाच्या पोकळ मोठेपणाला भरींवपणा प्राप्त होऊन पेशव्यांच्या हातांतील अमोघ राजसत्ता आपल्या हातीं कशी येईल, इतकें दूरवरचें धोरण ठेवून जगजीवनराव नेहमीं वागत असत.

"लोकांनीं म्हणावयाचें आतां काय बाकी राहिलें आहे? आम्हांला आमच्या राजवटीसह पद्धतशीर रीतीनें घशांत टाकण्याचा डाव पेशव्यांसारख्यांनीं कितीही गुप्तपणें व सावधपणें रचिला तरी त्याचा बोभाटा झाल्याखेरीज थोडाच राहतो! हे असले गुप्त मारेकरी फार भयंकर. त्यांचें आम्हांला फार भय वाटतें. संभाजीबाबानें मागें उघड उघड मारेकरी आमच्यावर घातले होते ते यांच्यापेक्षां शतपटींनी पुरवले. पण हे नकोत." महाराज म्हणाले.

महाराज नानासाहेब पेशव्यांवर चिडले आहेत एवढें त्यांच्या बोलण्यावरून सर्वांना कळून चुकलें. पण त्याचा परिणाम मात्र निरनिराळ्या मंडळीच्या मनावर निरनिराळा झाला. महादाजीपंतांना एवढें जबर वितुष्ट

आपल्या धन्यांविरुद्ध महाराजांच्या मनांत आलें तें कसें दूर होणार याची चिंता वाटूं लागली. यशवंतराव, गोविंदराव वगैरे जी कारभारी मंडळी सद्‌वृत्त होती, त्यांना राजवटीच्या भरभराटलेल्या चालत्या गाड्याला यामुळें खीळ पडणार व रघूजी भोंसल्यांसारख्या स्वार्थी अदूरदृष्टि सरदारांना नसते बखेडे उत्पन्न करण्याला फावणार, अशीं दुःस्वप्नें पडूं लागलीं. जगजीवनराव प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांना मात्र त्यापासून खरा आनंद झाला.

"आपण ठिणगी टाकली; तिची आग चांगलीच भडकत चालली. ह्या आगींत आतां पेशवेपंतांचा अरेरावी अंमल जळून खाक होणार, व आपणाला आणि आपल्या धन्यांना खास बरे दिवस येणार." यमाजी शिवदेव तेव्हां मनांत हर्षून म्हणाला.

त्याच वेळीं जगजीवनराव आपल्या मनाशीं म्हणाले, "ईश्वर आमचा साह्यकारी आहे. देवी आईला आमची दया येत आहे यांत संशय नाहीं. उपऱ्या भट पेशव्यांनीं मराठी राजवट ग्रासून टाकली व अष्टप्रधानमंडळाचे मुकुटमणि आम्ही प्रतिनिधि असतांना त्यांनीं आम्हांला निर्माल्यवत् करून सोडलें! दादांनीं ही परिस्थिति पालटावी व भट पेशव्यांचें मराठशाहींतून उच्चाटण व्हावें, निदान त्यांच्या हातचे सर्वाधिकार निघून ते तरी पूर्ववत् आपल्या हातीं यावे, अशी आपल्या परीनें शिकस्त केली. पण त्याचा कांहीं-देखील उपयोग झाला नाहीं. इतका महाराजांचा पेशव्यांच्या ठायीं असलेला अढळ विश्वास व आपलेपणा आज अकस्मात् ढांसळला, ही ईश्वराची खैरच म्हटली पाहिजे. हाच महाराजांचा पेशव्यांवरील राग कायम टिकला तर पेशवे पदभ्रष्ट होऊन मराठशाहीची सर्व सत्ता आपल्या हातीं येणें दुरापास्त नाहीं."

परंतु हे ज्याच्या त्याच्या मनांतले विचार झाले. बाह्यात्कारीं सर्वांनीं महाराजांच्या निर्धाराला नम्रपणें कां होईना पण नापसंतीच दर्शविली. तरीही त्या मंडळीनें महाराजांना त्या निर्धारापासून परावृत्त करण्याचा आणखीही प्रयत्न करून पाहिला असता. पण तेवढ्यांत सकवारबाई सजणेला घेऊन तेथें आली. एखाद्या बैरागिणीप्रमाणें केंस मोकळे सुटले आहेत, अंगावर वस्त्रालंकारही कसेतरी आहेत, चर्या चिंताग्रस्त आहे, डोळे अश्रूंनीं डबडबलेले आहेत, असा सकवारबाईचा वेष पाहून सर्व मंडळीनें तर्क केला कीं, जी चिंता आपणां सर्वांना तीच राणीसाहेबांच्याही जिवाला लागून राहिली आहे; त्या

महाराजांचें मन वळविण्यासाठींच आल्या असल्या पाहिजेत. नेहमींचा परिपाठ असा कीं परकी पुरुषमंडळी महाराजांपाशीं कोणी असल्यास कोणाही राणीनें अथवा राजघराण्यांतील कोणाही स्त्रीनें तेथें अशा उघड्या माथ्यानें यावयाचें नाहीं. बरें, जरूरीच्या कामासाठीं कोणा स्त्रीला—ह्या स्त्रिया म्हणजे तरी महाराजांच्या दोन राण्या, लक्ष्मी व सखू ह्या दोन रक्षा, किंवा महाराजांची एकुलती एक कन्या गजराबाई माहेरीं आली असल्यास ती; यांपैकीं कोणाला महाराजांची भेट तांतडीनें घ्यावयाचीच झाली, तर प्रथम हुजऱ्या किंवा दासी कोणीतरी वर्दी देण्यासाठीं पुढें यावयाची, ती सूचना ऐकतांच पुरुषमंडळीनें महाराजांचा निरोप घ्यावयाचा, व मग महाराजांनीं स्त्रीजनांना भेट द्यावयाची. यमाजी शिवदेवांसारखे दुय्यम दर्जाचे लोक जे असत, त्यांची इतकी भीड मात्र सहसा कोणीच पाळीत नसे. पण अशी पाळी अर्थात् विशेष कारणाखेरीज येत नसे. हा निर्बंध सर्व कारभारी मंडळीला माहीत होता. परंतु तशी आगाऊ सूचना न देतां सकवारबाई तेथें आलेली पाहून एथून आतां पाय काढणें बरें असा सर्वांनीं पोक्त विचार केला व महाराजांचा तांतडीनें निरोप घेतला. त्या धांदलींत व विमनस्क स्थितींतही महाराजांनीं प्रतिनिधींना सर्वांसमक्ष नानासाहेब पेशव्यांना सरकारी खलिता लिहून ताबडतोब भेटीला येण्याबद्दल आज्ञा केली. सकाळचा वृत्तान्त प्रतिनिधींना मुतालिकांमार्फत कळला असल्यानें ‘ कां कशाला ’ असा संदेह त्यांना मुळींच पडला नाहीं. त्यांच्यावर ती एक जणूं इष्टापत्तीच आली. ती त्यांनीं आनंदानें स्वीकारली. सकवारबाई त्यांना महालाच्या दरवाजापाशींच भेटली. तिची त्यांनीं जातां जातां प्रार्थना केली, “ महाराजांना परावृत्त करण्याचे आमचे सारे उपाय थकले. आतां आपण तरी त्यांना समजुतीच्या दोन गोष्टी सांगून त्यांचें चित्त ठिकाणावर आणावें; व ईश्वरानें आपल्या शद्बांना यश द्यावें. ”

सकवारबाईदेखील महाराजांचा वनवासवाडीला जाण्याचा तांतडीचा निर्धार ऐकून फारच अस्वस्थचित्त झाली होती. तिला महाराजांच्या प्रकृतीची व मनोव्यथांची कितपत जाणीव होती तें परमेश्वर जाणे. परंतु ‘ आपल्या तापटपणाला व हट्टीपणाला वैतागून महाराज वनवासवाडीला चालले आहेत, यामुळें आपणाविषयीं त्यांच्या मनांत अनादर उत्पन्न होणें शक्य आहे; अशा स्थितींत आपली सवत जर माघारी आली व महाराजांच्या मर्जीत जाऊन

बसली, किंवा पेशव्यांविषयीं महाराजांच्या मनांत उत्पन्न झालेलें वितुष्ट जर शमलें, तर आपली राजमाता या नात्यानें राज्याचे सर्वाधिकार उपभोगण्याची महत्त्वाकांक्षा तडीला जाणें शक्य नाहीं. न जाणो, महाराज पेशव्यांच्या संमतीनें आपल्या आहारीं न राहणारा भलताच एखादा मुलगा दत्तक घेतील. सगुणाबाई आपणावर सवतीमत्सराचा सूड घेण्यासाठीं पेशव्यांशीं संगनमत करून आपल्या वर्गीचा मुलगा शोधून काढून स्वतः राजमाता होण्याचे प्रयत्न करण्यालाही चुकावयाची नाहीं. ही भावी संकटपरंपरा तर्कानें ओळखून सकवारबाई त्याचें निवारण होण्यासाठीं महाराजांनीं सतत आपल्या नजरेखालीं असलें पाहिजे असें इच्छीत होती.

आपण सजणेच्या बाबतींत जो एवढा दुराग्रह धरला तोच ह्या अनर्थाला कारण झाला, ही गोष्ट सकवारबाईच्या मनांत रुखरुखत होती. तेवढीच गोष्ट जर महाराजांच्या मनाला लागून राहिली असेल तर तिचें निराकरण व्हावें एवढ्यासाठीं ती सजणेला मुद्दाम बरोबर घेऊन आली होती. ती तिला महाराजांसमोर उभी करून म्हणाली, " ह्या अपशकुनी बयेमुळेंच एवढा अनर्थ झाला. हिला मीं आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक दिली आहे." ती सजणेला म्हणाली, " जा, महाराजांच्या समक्ष मी तुला वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक देत्यें. तूं नवऱ्याशीं संसार कर किंवा आणखी कांहींही कर." पुन्हा ती महाराजांकडे वळून म्हणाली, " आतां तरी आपल्या मनाचें समाधान झालें ना? आतां तरी माझी विनंति ऐकावी, व वैराग्य सोडावें."

" तुम्ही पुन्हा आमच्या राशीला आलां! माझे आई! आमचा छळ झाला तेवढा पुरे नाहीं का झाला? आम्हांला सोडा. तुम्हांला आम्ही दोन्ही हात जोडून विनवितों; आमच्यावर एवढे उपकार करा. आम्ही स्वतःच्या समाधानासाठीं वनवासी झालों तरी तुम्ही आमचा पिच्छा सोडीत नाहीं; ही आमच्या नशिबाची कटकट आम्ही परलोकवासी झाल्यानें तरी टळेल काय तें सांगा. म्हणजे तेवढेंही आम्ही करूं!" महाराज म्हणाले. ते संतापातिशयानें अगदीं रडकुंडीला परतले, व ' कांहीं झालें तरी ही बया आपला पिच्छा सोडणार नाहीं ' असें मनांत म्हणत महालाबाहेर पडले. सकवारबाई व सजणा दोघीही हतबुद्ध होऊन तेथेंच उभ्या होत्या.

पेशवाईचा पुनर्विकास

महाराज जे रंगमहालांतून बाहेर पडले ते उघड्या बोडक्यानें अनवाणीच राजवाड्याबाहेर आले. नोकर चाकर टकमकां एकमेकांच्या तोंडाकडे पाहत स्वतःशीं चिंता करूं लागले, " महाराजांनीं हें आरंभिलें आहे तरी काय ?"

परंतु महाराजांनीं कोणत्याच गोष्टीकडे लक्ष्य दिलें नाहीं. ते एकेक चौक ओलांडून जाऊं लागले असें पाहून सेवकजन कोणी पादुका तर कोणी पालखी घेऊन धांवले. तोंवर महाराज रंगमहालाच्या मुख्य दरवाजापार होऊन मार्गाला लागले होते. त्या सेवकांनीं महाराजांसमोर भर रस्त्यावर लोटांगण घालून विनविलें, " महाराजांना असेंच अनवाणीं पायीं जावयाचें असेल तर त्यांनीं आमच्या देहाच्या पायघड्या तुडवीत जावें."

सेवकांच्या त्या निःसीम स्वामिभक्तीमुळें महाराजांचें अंतःकरण द्रवलें. ते उभे राहिले. एका हुजऱ्यानें पादुका पुढें ठेवल्या त्या त्यांनीं पायीं घातल्या, व पालखींत बसतां बसतां म्हणाले, " आम्हांला वनवासवाडीला जावयाचें."

भोई वगैरे सेवक इतर लवाजमा येण्याची वाट पाहत तेथल्या तेथें रेंगाळूं लागले. पण 'तुम्हांला यावयाचें आहे कीं आम्ही पायीं जाऊं' असें निक्षून विचारीत महाराज जेव्हां पालखींतून बाहेर येऊं लागले, तेव्हां भोयांनीं त्यांची मनःपूर्वक क्षमा मागून पालखी वनवासवाडीकडे चालविली.

राजमार्गानें महाराजांची पालखी गेली. पण त्यापूर्वीच महाराजांच्या वैतागाची बातमी साऱ्या नगरभर वाऱ्याच्या वेगानें पसरली होती. कैक धनवान शेटसावकार महाराजांच्या पालखीसमोर येऊन दर्शनाची विनवणी करूं लागले; पण दर्शन नाहीं. महाराजांची भोयांना सख्त ताकीद कीं पालखी मध्यें थांबविल्यास पायीं जाऊं; पुन्हा पालखीला स्पर्श करणार नाहीं. तेथें भोयांचा नाइलाज झाला.

महाराजांची पालखी नगराच्या मुख्य भागांतून वेशीपावेतों जाऊन पोंचली असेल किंवा नसेल, तोंच मागोमाग सर्व कारभारी त्याच राजमार्गानें निघालेले सर्व नगरवासीयांना आढळून आले. त्या सर्वांच्या चर्या अत्यंत चिंतातुर दिसत होत्या. त्यावरून नगरवासीयांना भय वाटूं लागलें होतें कीं आजचा हा प्रसंग आहे तरी कोणता ? प्रत्येकाच्या मनाला कमालीची अस्वस्थता प्राप्त झाली होती कीं पुढें राजवटीवर ओढवणाऱ्या अज्ञात महासंकटाची ही पहिली ओझरती झुळुक आहे का ?

याप्रमाणें नगरांतील प्रत्येक माणूस हवालदिल झाला असतां त्या त्यांच्या अवस्थेंत भर घालण्यासाठींच कीं काय, प्रातःकाळीं नगरवासीयांनीं मारून झोडून हैराण करून सोडलेली ती वेडी म्हातारी इतका वेळ कोठें दडी मारून बसली होती ती अकस्मात् पुढें आली व पूर्वीचेंच शोकगीत गात रस्त्यानें जाऊं लागली. परंतु आश्चर्य हें कीं प्रातःकाळच्याप्रमाणें आतां नगरवासी तिच्यावर तुटून पडण्याचें बाजूला राहून ते उलट तिच्या पायां पडूं लागले. थोरांचें पाहून पोरेंदेखील त्यांचेंच अनुकरण करूं लागलीं. कांहीं वात्रट लोक मात्र प्रातःकाळच्याप्रमाणेंच त्या वेड्या बाईला शिव्यागाळी देऊन तिला हाकलूं लागले. परंतु आतां श्रद्धेमुळें समंजस बनलेल्या बहुजनसमाजानें त्यांना आवरलें व त्यांची समजूत करण्याला सुरुवात केली, "बाबांनो! ती देव-ऋषीण आहे. सकाळीं ती मराठी राजवटीवर संकट कोसळणार असें गाणें गात हिंडत होती, त्या गोष्टीला पुरे चार प्रहरही लोटले नाहींत, तोंच तिचा शद्ब कसा खरा झाला पाहा! तिला आतां आणखी चिडवून नवीं संकटें आपल्यावर ओढवून घेऊं नका."

समाजाची मौज ती हीच!–झालें. एकानें तिला देवऋषीण म्हटलें, दुसऱ्यानें म्हटलें, तिसऱ्यानें म्हटलें, हां हां म्हणतां सर्वजण तिच्या भजनीं लागले. सकाळीं तिच्यावर दगड फेंकणारे लोक आतां तिच्यावर फुलें उधळूं लागले; सकाळीं जीं तोंडें तिला शिव्या देत होतीं तीं आतां तिच्या ओंव्या गाऊं लागलीं. लोकांनीं तिच्या गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या; पालखींतून तिची मिरवणूकही काढली. तिन्हीसांजांच्या वेळीं सर्व सातारा नगर त्या बाईच्या गौरवपूर्ण उद्गारांनीं उचंबळून आलें.

प्रकरण ९ वें

यमाजी व सकवारबाई

आपली सद्दी संपली अशा दुःखकारक जाणिवेनें सकवारबाई किल्यावरील नजरमहालांत महाराजांचें प्रयाण पाहात स्तब्ध उभी होती. आतां कांहीं महाराज माघारे येणार नाहींत ह्या भावनेनें तिच्या हृदयाचें पाणी पाणी होत होतें. तो दिवस वास्तविक सर्व नगरवासीयांना पराकाष्ठेच्या दुःखाचा जावयाचा. पण तेच लोक कोणा वेड्या बाईला डोक्यावर घेऊन नाचत आहेत असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां तिला त्याचा अर्थच कळेना. तिनें आपल्या कांहीं विश्वासू सेवकांना नगरांत पाठवून बातमी आणली, तेव्हां त्याच वेड्या म्हातारीनें सकाळीं राजवटीची बेसुमार निंदा केल्याचें तिला कळून आलें. वस्तुतः म्हातारीनें आपल्या गाण्यांतून शाहू महाराज, त्यांच्या राण्या, कारभारी, पेशवे तों तहद हुजऱ्यांपावेतों सर्वांची खरडपट्टी काढली होती. पण 'राण्यांच्या संगतींत महाराजांना राज्यकारभाराचा विसर पडला व जिकडे तिकडे अनास्था माजली' एवढाच निष्कर्ष सकवारबाईच्या चटकन् ध्यानीं आला. तो राजवटीचा काळच असा होता कीं प्रत्येकजण कारभारी, प्रत्येकाच्या मनांत राजकारणाचे कांहींना कांहीं डावपेंच अष्टोप्रहर घोळत असावयाचे. कोणाचा कोणावर विश्वास नाहीं. त्यामुळें प्रत्येकाच्या गुप्त बातमीदारांचा नगरांत सुळसुळाट झाला होता, व त्यांतच अनाहूत स्वार्थसाधु चुगलखोरांची एवढी जबरदस्त भर पडली होती कीं त्यामुळें नगरांत कोठें जरा खाट्खुट् झालें कीं त्या बातमीवर चुगलखोरीचीं पुटें चढत चढत शेवटीं अगदीं विकृत स्वरूपाची बातमी ठिकाणावर येऊन पोंहोचे.

म्हातारीच्या प्रलापांची वार्ता पेशव्यांच्या गुप्तचरांमार्फत पेशव्यांच्या वाड्यांत जाऊन पोंचली, ती 'म्हातारीनें पेशव्यांना भरमसाट शिव्या दिल्या

व पेशव्यांनीं मराठशाही गिळंकृत केली ' अशा आशयाची जाऊन पोंहचली. परंतु तीच वार्ता सकवारबाईच्या गुप्तदूतांकडून सकवारबाईच्या कानीं आली, ती गाळून ' महाराज राण्यांच्या मोहपाशांत गुरफटून पडले आहेत व त्यामुळें राण्यांना राज्यकाभारांत मन मानेल तशी ढवळाढवळ करावयाला फावतें; त्यामुळें राजवटीची घडी पार विस्कळित झाली आहे ' अशी आली ! अर्थात् पेशव्यांच्या घरच्या मंडळीचा समज झाला कीं म्हातारीला सकवारबाई, प्रतिनिधि, रघूजी भोंसले वगैरे प्रतिस्पर्धी मंडळीकडून पेशव्यांची निंदा करण्याला चिथावणी मिळाली असावी. याच्या उलट सकवारबाईचा समज असा झाला कीं पेशव्यांनीं मराठशाही घशांत टाकण्याच्या दुष्ट हेतूनें प्रेरित होऊन राण्यांविरुद्ध आणि त्याबरोबरच महाराजांविरुद्ध लोकमत कलुषित करून मराठशाहीचा सारा कारभार एकतंत्री आपल्या हातीं आणण्याच्या भावी मनोरथांचा पेशवे आजपासून असा पाया रचीत असले पाहिजेत.

खुद्द नानासाहेब पेशवे त्या दिवशीं राजधानींत असते तर त्यांनीं ताबडतोब त्या म्हातारीला पकडून आणावयाला लावून ताबडतोब काय तो सोक्षमोक्ष करून टाकला असता. पेशवेच कशाला ? त्यांच्या वाड्यांतील इतर अधिकाऱ्यांनींही तेवढी खबरदारी घेण्याला कमी केलें नसतें. किंबहुना वाड्यांत त्याविषयीं वाटाघाट होऊन, म्हातारीला ती सांपडेल तिथून पकडून आणावें आणि चौकशीसाठीं तुरुंगांत डांबून ठेवावें असेंही ठरलें होतें. त्याप्रमाणें शिपाई कामगिरीवर निघावयाचे, तोंच महादाजीपंत पुरंदरे महाराजांच्या भेटीनंतर वाड्यांत येऊन पोंहचले. त्यांची सल्ला म्हातारीच्या बाबतींत विचारण्यांत येतांच ' आधींच महाराजांच्या रागाची आग भडकली आहे व ती वाढत्या सार्वत्रिक गैरसमजानें जास्त भडकण्याचा संभव आहे, त्यांत आणखी हा तेलाचा शिडकाव नको ' अशी पोक्त सल्ला त्यांनीं दिली. ती सर्वांना पसंत पडून म्हातारीला शासन करण्याचा पेशव्यांच्या वाड्यांतील विचार तेवढ्यापुरता लांबणीवर पडला. मात्र त्या दिवशींचा सर्व प्रकार खुलासेवार लिहून तो खलिता महादाजीपंतांनीं ताबडतोबीनें सांडणीस्वाराबरोबर पुण्याकडे नानासाहेब पेशव्यांच्या मुक्कामीं रवाना केला.

परंतु सकवारबाईची गोष्ट निराळी होती. तिचा स्वभाव मूळचाच तापट, मानी व हेकेखोर. तशांत विरूबाईच्या निधनापासून तिनें आपलें प्रस्थ बरेंच

वाढविलेलें. प्रतिनिधि, सुमंत, रघूजी भोंसले, बाबूजी नाईक वगैरे अनेक शेलकी कारस्थानी मंडळी तिच्या मुठींत. त्यांतच राजवाड्यांतील आजच्या प्रसंगानें तिच्या विमनस्कतेंत व संतापांत भर पडलेली. तशा स्थितींत त्या म्हातारीनें आपली निंदा केल्याचें आणि त्याच म्हातारीचे नगरवासीयांनीं एवढे देव्हारे माजविल्याचें सकवारबाईच्या कानीं आलें, त्याबरोबर तिनें आपल्या विश्वासांतल्या सेवकांना आज्ञा केली, "जा. असेच्या असे जा आणि त्या थेरडीला पकडून माझ्यासमोर घेऊन या." त्याच वेळीं तिनें दुसऱ्या एका नोकराहातीं मुतालिकांच्या घरीं यमाजी शिवदेवाचा मुलगा गमाजी याला तांतडीनें येऊन जाण्यासाठीं निरोप पाठविला.

म्हातारीला पकडून आणण्यासाठीं सकवारबाईनें दूत पाठविले यांत सभोंवारच्या दासदासींना कांहींच वाटलें नाहीं. परंतु गमाजीला बोलावणें गेलेलें पाहून मात्र बहुतेकांना भावी दुश्चिन्हें आठवूं लागलीं. गमाजीचा क्रूरपणा व आडदांडपणा ऐकून सर्वांना माहीत होता. यमाजी शिवदेव केवळ नांवानें यमाजी होता, त्याचें आचरण तंतोतंत त्या नांवाला शोभण्याइतकें भयंकर व निष्ठुर नव्हतें. परंतु गमाजी हा आपल्या क्रूरपणानें साक्षात् यमच काय पण यमाचाही यम शोभण्याजोगा होता. त्या यमाच्या हातून राणीसाहेब आतां कोणाकोणाच्या मानेसभोंवार यमपाश टाकणार याची कोणालाच कांहीं कल्पना करतां येईना. तरीही राणीसाहेबांच्या गैरमर्जींतले कोणकोण लोक आहेत त्यांचीं नांवें मात्र जें तें माणूस आपल्या मनाशीं आठवून हळहळूं लागलें.

सकवारबाईचे शिपायी म्हणजे जणूं शिकारी कुत्रे! ते कोणीं छूः म्हणतांच म्हातारीला पकडून आणण्यासाठीं निघाले. ते म्हातारीला पकडून घेऊन येण्याच्यापूर्वींच गमाजी तेथें येऊन पोंहचला.

"राणीसाहेबांची काय आज्ञा आहे? सेवक सेवेला तयार आहे." गमाजीनें विचारलें.

"नगरांत एक म्हातारी पिसाळली आहे तें तुला माहीत आहे ना?" सकवारबाईनें विचारलें.

"होय. आज सकाळपासून तिचा गोंधळ पाहतों आहें खरा. कां; तिला पकडून आणावयाचें आहे काय?"

" नाहीं. तिला पकडून आणण्याची कामगिरी मीं दुसऱ्या लोकांना सांगितली आहे. तुला कामगिरी सांगायची आहे ती त्याहीपेक्षां महत्त्वाची आहे. "

" ती कोणती; सांगाना ! "

" त्या थेरडीच्या भजनीं लागलेले कोणकोण लोक आहेत, तिला पकडतांना कोणकोण अडथळा करतात, कोणकोण तिच्या बाजूनें बोलतात, तें तूं आज बारकाईनें नजरेखालीं घालून ये. "

" नुसतें नजरेखालीं घालून येऊं ? "

" नाहीं. त्या लोकांना मग सर्रास कैद करायचें आहे. तें कामही मी उद्यां तुलाच सांगणार आहें. पण प्रश्न एवढाच आहे, मीं जर माझ्या अधिकारांत त्या दगलबाज लोकांना कैद केलें, तर त्याचा परिणाम काय होईल? लोक चिडतील का?"

" लोक चिडतात! लोक चिडण्याचें काय कारण?"

" लोक म्हणतील कीं थोरल्या राणीसाहेबांनीं महाराज वैतागानें वनवासवाडीला जातांच मराठशाहीचीं सर्व राज्यसूत्रें बळकाविलीं. लोक असेंही म्हणतील कीं मींच महाराजांना वैताग आणून वनवासी व्हायला लावलें."

" त्याच गोष्टीचा इतका वेळ मी आणि बाबा विचार करीत होतों. आम्हीं पंतांकडे जाऊन त्यांचाही ह्या कामीं विचार घेतला."

" मग जगजीवनराव काय म्हणाले?"

" महाराज वैतागून वनवासवाडीला रहावयाला गेले, ही एक गोष्ट सोडून द्या. झालें तें एका अर्थी वाईट झालें. पण वाइटांतूनदेखील कधीं कधीं चांगलें निर्माण होतें. असें पाहा, आपण आज कितीतरी वर्षे पेशव्यांच्या जाचांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत आहां. ती सोन्याची संधी आज अनायासें चालून आली आहे. "

" तें खरें; पण त्या संधीचा कसा पुरेपूर उपयोग करून घ्यावा हेंच मला कळत नाहीं. "

" आतां त्यांत अवघड तें काय आहे ? हत्ती गेला आणि शेंपूट राहिलें. मुख्य गोष्ट अवघड अशी एकच होती. आपल्या कारस्थानाची नौका क्षणोक्षणीं एका प्रचंड खडकाला आदळून माघारी वळत होती; तो खडक अजून

फुटला नाहीं तरी आतां फुटण्याच्या बेतांत आला आहे. त्याला अखेरचा सुरुंग लागला आहे म्हणाना ! आतां त्या सुरुंगाला आपल्या हातून बत्ती मिळण्याचा अवकाश. कीं धाड्धुडुम होऊन खडक फुटलाच समजा. असें पाहा, आपणाला काय किंवा आम्हांला काय, आजवर राजवटींत खरा विरोध असा एकट्या पेशव्यांचा झाला. पण पेशव्यांची सद्दी जोरावर, त्यामुळें आम्हां विरोधकांचें आजवर कांहीं चाललें नाहीं. बरें; श्रीमंत बाजीराव पेशवे काल-वश झाले तेव्हां आम्हां सर्वांना मोठी आशा वाटली कीं आतां तरी भटांचें आपण पेशवाईपदावरून उच्चाटण करूं शकूं.— ”

“ त्या वेळीं आपला बेत खास तडीला गेला असता. पण श्रीमंत पंतच आम्हांला भोंवले. मेलेल्या माणसाचें उणें काढूं नये खरें; पण ओघाला आलें कीं बोलल्याखेरीज राहवत नाहीं. पंतांनीं त्या वेळीं त्या सर्पाच्या पिल्लाला पाठीशीं घातलें नसतें तर मी ह्याच पेशव्याच्या कांखोटीला पडशी अडकवून पुन्हा श्रीवर्धनांत भिक्षुकी करावयाला लावलें असतें. ”

“ पण त्या झाल्या गेल्या गोष्टी आतां उकरून काढून काय उपयोग ! आतां आपल्या पायाच्या पुण्याईनें पुन्हा डाव जुळून आला आहे. याचा पुरेपूर फायदा आपला कार्यभाग उरकून घेण्याकडे कसा करावयाचा हा प्रश्न तूर्त आपणांसमोर आहे. ”

“ जगजीवनरावांचा विचार काय पडतो ? ”

“ महाराजांच्या मनांतून तर श्रीमंत पेशवे अजिबात उतरले आहेत. ”

“ गोष्ट खरी. पण पेशव्यांच्या बाबतींत महाराजांच्या मर्जीचा चढउतार केव्हां कसा होईल याचा कांहींच भरंवसा देतां यायचा नाहीं. गोड मायावी भाषणें बोलून महाराजांना भुरळ कशी पाडावी व आपला डाव कसा साधावा ही कला पेशव्यांना चांगली अवगत आहे. इतक्या लहान वयांतदेखील नानानें महाराजांना कशी भुरळ पाडली ? आणि पंत एवढे पेशव्यांना पाण्यांत पाहणारे पण त्यांच्यादेखील डोळ्यांत कशी धूळ फेंकली पाहा. ओंठावर मिसरूड देखील उगवली नाहीं अशा एवढ्याशा पोरानें एवढें अचाट राजकारस्थान करावें ही खरोखरच शहामत आहे. ”

“ अहो ! त्यांत शहामत कसली ? नानासाहेब लहानपणापासून महाराजां-ाशीं होते, त्यांना राज्यकारभारांतल्या आणि कारभाऱ्यांच्या स्वभावांतल्या

साऱ्या खांचाखोंचा पुरेपूर माहीत झालेल्या, प्रतिबंध कुठेंच नाहीं, म्हणून त्यांना तें साधलें."

"मग तें दुसऱ्या कुणाला बरें नाहीं साधलें? पंत एवढे महाराजांच्या गळ्यांतले ताईत. पंतांच्या पायांत कांटा बोंचला कीं महाराजांच्या पायांना वेदना व्हायच्या. पंतांच्या सल्ल्याखेरीज महाराजांचें पानदेखील हलत नसे. पण त्यांना कुठें नाहीं महाराजांच्या स्वभावाचा फायदा घेतां आला? एकामागून एक पेशवा आला तो त्यांना पायांखालीं रगडूनच आला कीं नाहीं? अखेर त्याच पंतांना बाजीराव वारल्यावर मुठीएवढ्या त्याच्या पोरग्याची मनधरणी करून स्वतःचें बूड स्थिर राखण्यासाठीं त्याची महाराजांच्या तोंडावर स्तुति करून त्यालाच पेशवा करावें लागलें कीं नाहीं?"

"त्याला काय करणार! नानासाहेब कमालीचे पाताळयंत्री—"

"तेंच मी तरी म्हणत्यें. असल्या पाताळयंत्री माणसाशीं गांठ आहे, म्हणूनच भय वाटतें."

"भय वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. आजला तरी नानासाहेबांवर महाराजांची पुरी गैरमर्जी झाली आहे. महाराजांच्या आज्ञेवरून श्रीमंत पंतांनीं आजच त्यांना ताबडतोब भेटीला येण्यासाठीं निकडीची थैली पाठविली आहे.—"

"पण ते इकडे येऊन महाराजांना भेटतांच तुमच्या आमच्या बेतांची उलटी अंबारी करून सोडतात कीं नाहीं पहा!"

"शक्य नाहीं. तें शक्य नाहीं. त्रिवार सांगतों, तें कालत्रयींही शक्य नाहीं. नानासाहेबांनीं कोल्हापूरकरांशीं केलेला गुप्त करारनामा उजेडांत आला आहे व महाराजांचें मन त्याकारणें नानासाहेबांविरुद्ध पूर्णपणें बिथरलें आहे. तो करारनामा जर पेशवे या नात्यानें त्यांचा स्वतःचा मृत्युलेख ठरला नाहीं, तर हा यमाजी आपली मिशी पेशव्यांच्या नरकांत घालील." यमाजी आपल्या मिशीवरून आढ्यतापूर्वक हात फिरवीत म्हणाला.

"तुझ्या तोंडीं साखर पडो!" सकवारबाई म्हणाली.

"पण माझ्या तोंडीं साखर पडणें किंवा माती पडणें आतां सर्वस्वी आपणावर अवलंबून आहे. देवळांत देवी असली तर पुजाऱ्याच्या मंत्रजागराला मोल!"

"मला सांग, या वेळीं मी काय करूं?"

पेशवाईचा पुनर्विकास

" देऊळ रिकामें आहे; पुजाऱ्यांचा मंत्रजागर चालू आहे. आपण गाभाऱ्यांत देवी म्हणून बसा आणि पूजा घ्या."

" पण देवीला स्थापन करावी लागते."

" तें करायला आम्ही सारे आहों ना? त्याबद्दल तुम्हांला मुळींच काळजी करण्याचें कारण नाहीं."

" असे नुसते कोरडे आशिर्वाद मला नको आहेत. आजच्या घटकेला मीं काय केलें पाहिजे सांग."

" महाराज वैतागून वनवासवाडीला गेल्याचें आतां सर्वत्र जाहीर झालेंच आहे. त्याप्रमाणेंच पेशव्यांविषयीं महाराजांच्या मनांत किल्मिष आल्याची वार्ताही गुप्त राहिलेली नाहीं. अशा वेळीं आपण महाराजांच्या संमतीनें त्यांच्या गैरहजेरींत राज्यकारभार पाहूं लागल्याचें जाहीर करा. आपण एवढें पुढें पाऊल टाकलें कीं आपणांला श्रीमंत पंतांचा काय, रघूजी भोंसल्यांचा काय, सर्वांचा पाठिंबा आहेच. पेशव्यांची एक ना दोन शेंकडों कुलंगडीं आमच्यापाशीं आहेत. त्यांची पुन्हा महाराजांसमोर उजळणी होईलच. आणि महाराज पेशव्यांना त्या साऱ्या गोष्टींचा जाब विचारतील. मग पेशवे कोणत्या तोंडानें त्या अपराधांची नाशाबिती करतात पाहूंदे."

" पण इथें पेशवे येऊन महाराजांना भेटले नाहींत तोंवरच्या ह्या गोष्टी. आणि तोंवरदेखील पुरंदरे पेशव्यांची बाजू उचलून धरावयाला कमी करणार नाहींत. ह्या प्रसंगीं महाराज नगराबाहेर जायला नको होते. त्यामुळें पेशव्यांना व त्यांच्या पक्षपात्यांना महाराजांशीं तोंडदेखलीं साखरघोळ खलबतें करायला आणि आपला जम बसवून प्रतिस्पर्ध्यांचे दांत पाडायला रान मोकाट सांपडेल."

" तें कसें सांपडेल? पुरंदऱ्यांची तर तूर्त तरी महाराजांसमोर आपण होऊन जाण्याची छाती नाहीं. शिवाय श्रीमंत पंत आज रात्रौच वनवासवाडीला तळ देणार आहेत."

" खरेंच?"

" तर? मी खोटें कशाला सांगूं! श्रीमंत पंतांनीं इतर हस्तकांची सल्ला घेऊन तसें नक्की ठरविलें आहे, व तें आपल्या कानीं घालावयालाही त्यांनीं मला सांगितलें होतें. आपलें बोलावणें आलें नसतें तरीदेखील मी एवढ्यासाठीं आपणाकडे येणारच होतों."

" ठीक आहे. तूं आतां एक कर. जगजीवनरावांना म्हणावें, व
वाडीला जाण्यापूर्वी एकवार मला भेटून जायला चुकूं नका. त्यांच्या
रानें मी काय बेत ठरवायचा तो नक्की ठरवून टाकीन."

" जशी आपली आज्ञा. आतां वेऊं निरोप?"

" हो! पण मीं प्रथम सांगितलेली कामगिरी ध्यानीं आहे ना?"

" हें काय विचारावयाला हवें?"

याप्रमाणें विचारविनिमय झाल्यावर गमाजी आपल्या कामगिरीवर गेला, व सकवारबाई आपल्या महालाकडे वळली. ती महालापाशीं पोंचते न पोंचते तोंच सजणा पुढें येऊन चिंतेंत पडल्यासारखी सांगूं ल

" आईसाहेब! आतांच एक चमत्कारिक गोष्ट झाली. सांगूं का?"

" काय झालें?"

" लक्ष्मीबाईसाहेब आणि सखूबाईसाहेब दोघीही वनवासवाडीकडे ग
आहेत. त्या दोघींचाही महाराजांपाशीं राहण्याचा विचार आहे असें
लक्ष्मीबाई जातांना मलाही बोलावीत होत्या. पण मीं नाहीं म्हटलें. म्हणू
माझ्यावर फारच रागावल्या आहेत. त्या काय करतील आणि काय
याचा कांहीं नेम नाहीं."

लक्ष्मीचें नांव ऐकतांच जणूं काय वरून अंगावर पाल पडावी
पायांखालीं एखादें सापकिरडूं सांपडावें, तशी सकवारबाईची मनस्थिति झ
सकवारबाई राणी होती, आणि सजणा यःकश्चित दासी होती. पण
च्याची बुद्धिमत्ता व कर्तबगारी असल्या उच्चनीच दर्जावर थोडीच अव
असते! ही त्या दोघांमधील विषमता दृष्टीआड करून कोणीं दोघींची तु
केली असती, तर राणी आणि दासी दोघीही सारख्याच चतुर, सारख
तापट व सारख्याच निग्रही आहेत असें दिसून आलें असतें. त्यांतल्या
मुत्सद्देगिरीच्या ऊर्फ डावपेंचांच्या धोरणी दृष्टीनें पाहतां सजणेनें सकवारबा
हार खावयाला लावलें असतें. लक्ष्मी महाराजांकडे जाणार किंवा नाहीं
खरोखर माहीत नसतांही तिनें मुद्दाम दडपून हें विधान केलें होतें. आप
बोलण्याचा सकवारबाईच्या मनावर काय परिणाम होतो, तें सकवारबाई
चर्येवर प्रगट होणाऱ्या भावांतून ती लक्ष्यपूर्वक अजमावीत होती. लक्ष्
महाराजांकडे जाणें सकवारबाईला धोक्याचें वाटत असल्याचें तिच्या च

वरुन ओळखून सजणा आपण होऊनच पुढें म्हणाली, "लक्ष्मीबाईसाहेबांचा यांत कांहींतरी गैरबांका बेत मला दिसतो आहे. त्यांना आपणाविरुद्ध महाराजांचे कान भरायला व कारस्थानें रचायला अवसर सांपडूं नये एवढ्यासाठीं आपल्या विश्वासांतलें कोणीतरी माणूस त्यांच्या पाळतीवर असणें अवश्य आहे."

"होय! पण त्याची त्या अवदसेला दाद लागतां कामा नये!" सकवारबाई उद्गारली.

"हो! तें तर आहेच! त्यांना दाद लागली कीं साराच कारभार आटोपला म्हणायचा!" सजणा म्हणाली. ती बोलतां बोलतां सकवारबाईच्या मुद्रेवरील भाव पूर्वीप्रमाणेंच सावधपणें ओळखण्यांत गुंतली होती.

"लक्ष्मीचा इतक्या तांतडीनें तिकडे जाण्यांत काय हेतु असावा?" सकवारबाईनें विचारलें. सजणा यावर कांहींच उत्तरली नाहीं. सकवारबाईनें पुन्हा प्रश्न केला, "तिचे दोन्ही पोर देखील तिच्याबरोबर जाणार असतील?"

"होय" सजणा उत्तरली. सकवारबाईनें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें इतक्या तांतडीनें महाराजांकडे जाण्यांत लक्ष्मीचा काय हेतु असावा याचा अंदाज काढण्यासाठीं जो मोघम प्रश्न केला, त्या प्रश्नांतूनच सजणेला तिच्या कारस्थानाच्या सिद्धीचा पुढील धोपट मार्ग स्पष्ट दिसूं लागला. ती त्याच क्षणाला आपल्या मनांत म्हणाली, "आतताई अवदसे! तूं आपल्या राणीपणाच्या तोऱ्यांत ह्या नागिणीच्या शेंपटीवर पाय देऊन तिला निष्कारण जखमी केलें आहेस; आणि त्याच नागिणीच्या सोनेरी कांतीवर तूं आतां भुलूं लागली आहेस. भूल! अशीच भूल! ही नागीण तुझा चावा घेऊन तुला मसणांत नेईतों तूं अशीच भुलशील तेवढें मला पाहिजेच आहे!"

प्रकरण १० वें

सजणा

लक्ष्मी महाराजांमागोमाग वनवासवाडीला जाणार असें ऐकतांच सकवार-बाईचें चित्त एकाएकीं इतकें अस्वस्थ होण्याचें कारण लक्ष्मी ही तिची सवत–महाराजांची आवडती रक्षा तर होती; शिवाय ती पुत्रवती होति! येसाजी आणि कुसाजी असे दोन पुत्र तिला होते. औरस राण्यांच्या पोटीं महा-राजांना एकदोन वेळां पुत्ररत्नाचा लाभ होऊनही देवाच्या कोपामुळें औरस पुत्राच्या दृष्टीनें महाराज निपुत्रिकच होते. आणि लक्ष्मीला मात्र एक सोडून दोन पुत्र! ते रक्षापुत्र जगाला! पण महाराजांना तीं दोन्हीं मुलें प्रिय होतीं. त्या दोन पुत्रांपैकीं एखादा महाराजांच्या पश्चात् छत्रपति व्हावा असा लक्ष्मीचा दृढ मानस होता, व त्या दिशेनें तिचीं कारस्थानें सुरू होतीं.

महाराजांनीं त्या बाबतींत लक्ष्मीला स्पष्ट नकार दिला नव्हता, व आपल्या मनाशींही कांहीं निर्णय ठरविला नव्हता. किंवा ठरविला असला तर तो दुसऱ्या कोणालाही माहीत झाला नव्हता. परंतु महाराजांच्या त्या मौनाचा अर्थ आपल्या मुलाला छत्रपति करण्याचा महाराजांचा मानस बहुधा नाहीं असाच लक्ष्मी घेऊन चालली होती. मात्र त्याबद्दल ती महाराजांना मन–दुबळेपणा व भिडस्तपणा यापेक्षां जास्त दोष द्यावयाला तयार नव्हती. आपले दोन्ही पुत्र भोळसट–अर्धवट आहेत हें ती ओळखून होती. आपल्या पुत्रांचे ते नैसर्गिक दुर्गुण झांकून ठेवण्यासाठीं ती नेहमीं तत्पर असे. तें वैगुण्य पुत्रांच्या अंगीं होतें, म्हणून लक्ष्मी जरा भिऊन भिऊन वागत होती. तिला भय कारभाऱ्यांचें; आणि महाराजदेखील कारभाऱ्यांनाच भितात हें तिला माहीत होतें. म्हणूनच कारभारीमंडळांत शक्य त्या उपायांनीं फूट पाडून कांहीं कारभाऱ्यांना हाताशीं धरून आपला डाव सिद्धीला नेण्याचा अट्टहास

लक्ष्मीनें आज अनेक वर्षें चालविला होता. तिला ह्या कामीं महाराजांची दुसरी आवडती रक्षा धाकटी सखू इचें साह्य होतें. विरूबाई हयात होती तोंवर सर्व राण्या व रक्षा आबादाबानें वागत होत्या. पण विरूबाईच्या पश्चात् एका बाजूनें सकवारबाई वडील राणी म्हणून व दुसऱ्या बाजूनें लक्ष्मी महाराजांची आवडती पुत्रवति रक्षा म्हणून, अशा दोघीजणी प्रभुत्व गाजविण्यासाठीं निश्चयानें पुढें झाल्या. सखूदेखील लक्ष्मीप्रमाणेंच चतुर होती. तिनें अगोदरच ओळखलें होतें कीं लक्ष्मी महाराजांची रक्षा असली तरी ती पुत्रवति आहे, ती महाराजांना आपल्या राण्यांपेक्षांही आवडती असणार, व तिला अंधारांत लोटण्याची राण्यांचीही छाती नाहीं. मात्र आपली पायरी फारच खालची आहे; तेव्हां आपण लक्ष्मीच्या तंत्रानें वागावें.

लक्ष्मीच्या ह्या महत्वाकांक्षी उपद्व्यापांना खरें तोंड असें थोरल्या बाजिरावांच्या आयुष्यांतील अखेरच्या वर्षापासून लागलें होतें. पेशव्यांच्या घरांतील कलह त्या वेळीं मस्तानीच्या निमित्तानें अगदीं कडेलोटाला गेले होते. त्या संधीचा फायदा घेऊन बाबूजी नाईक बारामतीकारांनीं स्वतः पेशवे होण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन लक्ष्मीला हाताशीं धरलें होतें. लक्ष्मी व नाईक ह्या दोघांनीं महाराजांच्या मनांत बाजिरावांविषयीं काळेंबेरें भरवून द्यावें, लक्ष्मीनें महाराजांची मर्जी राखून बाजिरावांना पेशवेपदावरून काढून टाकण्याला लावावें, त्यांच्या जागीं नाइकांना पेशवे करावें, व नाइकांनीं संधी साधून लक्ष्मीच्या कोणातरी एका मुलाला महाराजांच्या पश्चात् छत्रपति करण्याचा मजबूत राजकारणी पाया घालावा असें तें कारस्थान होतें. लक्ष्मीच्या त्या मनोरथांच्या मनोऱ्याची मुहूर्तमेढ तिच्या कोणत्या तरी एका मुलाला महाराजांच्या संमतीनें युवराज्याभिषेक करण्यापासून रोंवली जावयाची होती.

बाजिरावांचे पापग्रह त्या वेळीं जोरावर असल्यानें घरांतले शत्रु आणि हे बाहेरचे शत्रु यांच्या कात्रींत त्यांचा अपार छळ झाला व त्यांतच त्यांचा अंत झाला. एथवर प्रतिस्पर्ध्यांचा डाव साधला. परंतु अखेर बाजिरावांच्या ऐवजीं नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यानें लक्ष्मी, नाईक, रघूजी भोंसले, सकवारबाई, वगैरे सर्वांचेच दांत त्यांच्या घशांत पडल्यासारखे झाले. पुढें नाइकांचा नानासाहेबांनीं अगदीं बोजवारा उडवून दिला; त्यामुळें लक्ष्मी निर्माल्यवत् होऊन सकवारबाईचें प्रस्थ वाढूं लागलें. तीच लक्ष्मी आज सहा

वर्षांनंतर पुन्हा संधी साधून डोकें वर काढीत आहे असें पाहून सकवारबाई-सारख्या ईर्षेच्या राणीचें चित्त अस्वस्थ होणें अगदीं स्वाभाविक होतें.

धाकट्या सखूविषयीं मात्र तशी भीति वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण ती निपुत्रिक होती. वास्तविक लक्ष्मी व सखू ह्या सवती सवती, त्यांनीं जगाच्या रीतीप्रमाणें एकमेकींना पाण्यांत पाहावयाचें. परंतु एथें तसा प्रकार नव्हता. त्याला सखूचा भलेपणा बहुतांशीं कारण होताच; पण समजा, सखूनें लक्ष्मीला विरोध करावयाचें व राण्यांशीं मत्सर मांडावयाचें डोक्यांत घेतलें असतें, तर त्याचा काय उपयोग होणार होता ? राण्यांनीं तिचा हेवा-दावा केला असता, लक्ष्मीनेंही तिला पाण्यांत पाहिलें असतें, व अशा भयंकर विरोधांत बिचारीचा चेंदामेंदा होऊन गेला असता. महाराज तिचा एक-टीचा कैवार घेऊन थोडेच भांडणार होते ! पायरी कितीही सुंदर असली तरी ती देवालयाला लावलेली आहे तोंवरच तिला लोक नमस्कार करणार. परंतु ती दूर काढली कीं तिची काय किंमत ? इतका दूरवर विचार करूनच सखू लक्ष्मीच्या तंत्रानें वागत असे. पुढेंमागें राजमाता होण्याचा संभव असलेल्या लक्ष्मीच्या तंत्रानें वागणेंच श्रेयस्कर होय, असा दूरवरचा विचार करून सखू लक्ष्मीची जणूं छाया बनली होती.

परंतु सकवारबाई लक्ष्मीप्रमाणें सखूलाही मनांतून भीत होती. तिनें सज-णेला विचारलें, " आणि सखूदेखील लक्ष्मीबरोबर जाणार आहे वाटतें !"

" होय. पण त्या गेल्या तरी त्याचें आपणाला एवढें भय वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. " सजणा उत्तरली.

" तुझी समजूत चुकीची आहे. निर्जीव तरवारीसारखी त्या सकवारबाई-ची अवस्था आहे. निर्जीव तरवार आपण होऊन कधीं कुणावर थोडाच वार करते ! पण तरवारीला हातीं धरूनच ना मोठमोठे योद्धे रणसंग्रामांत शत्रूंचा संहार करून विजयी होतात ? लक्ष्मीला सखूचा तरवारीसारखा उप-योग होईल. महाराजांनीं लक्ष्मीच्या तंत्रानें वागावें म्हणून सखू महाराजां-पाशीं रतबदली करायला चुकणार नाहीं; आणि महाराजांना त्या दोघींचेंच खरें वाटून ते त्यांच्या तंत्रानें वागूं लागतील. "

" हो ! तेंही खरेंच ! " सजणा गंभीर वृत्तीनें म्हणाली. तिला एवढें कळत नव्हतें असें मुळींच नाहीं. पण सकवारबाईवर पुरा सूड घेण्याच्या

निर्धाराची तड लागेतों तिनें असेंच वेड घेऊन पेडगांवाला जाण्याचें आपल्या मनाशीं ठरविलें होतें. त्याला अनुसरून ती वागत होती.

"तूं आतां सांगितलेंस त्यावरून तुझ्यावर लक्ष्मीचा विश्वास आहे असें दिसतें."

"विश्वास आहे काय आणि नाहीं काय! थोरांमोठ्यांची मर्जी म्हणजे केवळ अळवावरचें पाणी. यापूर्वी त्यांचा माझ्यावर विश्वास होता ही गोष्ट खरी. एरव्हीं त्यांनीं मला आपणाबरोबर बोलावलेंच नसतें. पण मीं नकार दिला, त्यामुळें त्या बिथरल्या असतील."

सकवारबाईनें थोडा वेळ स्वतःशीं कसला तरी गूढ विचार करून मग सजणेला विचारलें, "सजणे! तूं माझी ना?"

सजणेनें ओळखलें; आपण सहजासहजीं हातीं घेतलेल्या कारस्थानाला, रंग चढत चालला. तिनें मनाशीं ठरविलें होतें कीं राणीवर सूड घ्यायचा तो अस्वल ज्याप्रमाणें माणसाला हंसवून गुदगुल्या करकरून त्याचा जीव घेतें तसा घ्यायचा. सकवारबाईनें आपणाला विश्वासांत घ्यावें म्हणून तर सजणेनें तें कारस्थान रचिलें होतें. तिला लक्ष्मीनें आपणाबरोबर बोलावलें नव्हतें इतकेंच काय पण स्वतः लक्ष्मीनेंही इतक्या तांतडीनें महाराजांमागोमाग जाण्याचा बेत ठरविला नव्हता. सकवारबाईची तारांबळ उडावी व त्यांत आपणाला डाव साधतां आला तर पाहावा अशा इराद्यानें सजणेनें ती खोटीच वार्ता सकवारबाईच्या कानीं घातली होती. लावालावी करणें हा कांहीं सजणेचा उपजत स्वभाव नव्हता. पण तेव्हां सातार्‍याच्या राजघराण्यांत निर्माण झाली होती तसली परिस्थिति कोठेंही कोणत्याही निमित्तानें निर्माण झाली व एकाच कुटुंबांतील माणसांचीं मनें एकमेकांविषयीं विटून चुरस सुरू झाली, कीं तिथें तोंडपुजेपणाला व लावालावीला चांगला भाव येतो हें तिला पक्कें माहीत होतें. ह्या गृहकलहाचा फायदा घेऊन कैक कवडीकिंमतीचे तोंडपुजे लोक कोणा ना कोणा खाशाच्या मेहेरबानीला पात्र झालेले व सुखानें आणि मानमान्यतेनें कालक्रमण करीत असलेले तिला डोळ्यांसमोर दिसत होते. त्याच्या उलट प्रामाणिकपणें वागणारे लोक त्या बेबंदशाहींत कसे अयशस्वी ठरून हालअपेष्टा भोगतात, हेंही ती पाहत होती. त्या प्रत्यक्ष अनुभवावरून प्राप्त झालेलें व्यवहारचातुर्य ती आपल्या उपयोगीं आणण्याला सज्ज झाली

होती. सकवारबाईच्या इच्छेवर–नव्हे–लहरीवर आपली भवितव्यता सर्वस्वी अवलंबून आहे हें ती पूर्णपणें जाणून होती. लक्ष्मी व सखू यांच्याविरुद्ध आपण बोलल्यानें सकवारबाईला संतोष होईल असें अंदाजून तिनें हा डाव खेळण्याला प्रारंभ केला होता. सकवारबाई सकाळीं जी क्रूर वाघिणीसारखी तिच्यावर खाऊं कीं गिळूं अशा आवेशानें गुरगुरत होती, ती ' तूं माझी ना ' असले मवाळीचे बोल बोलण्याइतकी जणूं गरीब गाय बनलेली पाहून सजणेला वाटलें कीं आपली मनीषा आपल्या अपेक्षेपेक्षां कितीतरी पटीनें व झपाट्यानें सफल होणार. तिनें पुन्हा सकवारबाईवर मोठ्या चतुराईनें मायावी शब्दजाल फेंकलें, " आईसाहेब ! हें काय विचारणें ? आपणाला माझ्याविषयीं संशय येतो का ? "

" तसा संशय येत नाहीं; पण— "

" पण काय तें मीं ओळखलें. मी धाकट्या आईसाहेबांची कुळंबीण, तेव्हां त्यांच्याप्रमाणेंच माझ्या मनांतही आपणाविषयीं तेढ असेल असें आपणाला वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. "

" शिवाय मीं तुझ्या संसारसुखांत बिब्बा घातला आहे ! "

" जाऊंद्या ! त्या योगायोगाच्या गोष्टी असतात. आतां, मी धाकट्या आईसाहेबांची दासी म्हणून म्हणाल, तर— " असें अर्धवट बोलून सजणा अंमळ अडखळली.

" कां–अडखळलीस कां ? " सकवारबाईनें प्रश्न केला.

वास्तविक सजणा अडखळली ती आपणावर धाकट्या आईसाहेबांचें व त्यांच्यावर आपलें मनापासून प्रेम होतें असें कसें बोलावें याविषयीं अडखळली. परंतु दरम्यान् कांहीं पळांचा अवधि गेला, तेवढ्यांत सकवारबाईच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं काय बोलावें हें तिला सुचलें.

" अग बोल ना ! मनांत काय असेल तें एकदम खुल्या दिलानें बोलून टाक. अशी अडखळतेस कां ? " सकवारबाईनें पुन्हा विचारलें.

" मला आणखी कांहींच बोलायचें नव्हतें आईसाहेब ! झालें तें होऊन गेलें. आतां गेलें तें उदक व राहिली ती गंगा समजून आपण मला संभाळून घ्यावें एवढीच विनंति आहे. "

" पण माझ्याकडून तुला त्रास झाला— "

" त्रास कसला त्यांत ?— "

" ऐक—माझें अगोदर ऐकून घे. मी कबूल करत्यें, त्रास झाला खरा. पण त्याचीं कारणें मात्र निराळीं होतीं. " सारेंच केवळ नाटकी वृत्तीनें खोटें बोलावयाचें, तें बोलतांना मनुष्य एखादे वेळीं चांचरणारच. त्याप्रमाणेंच सकवारबाईही क्षणभर चांचरली. पण आपण थबकतांच सजणा आपल्या तोंडाकडे टकमक पाहूं लागली आहे असें पाहून ती पुढें खोटें खोटें उद्गारली, " हें बघ, मी वास्तविक महाराजांची पट्टराणी. खरें ना ? "

" हें काय विचारणें ? "

" माझ्या मोठेपणाला साजेसा मान मला सर्वांनीं—महाराजांच्या रक्षांनीं व राण्यांनीं देखील दिला पाहिजे. खरें ना ? "

" अगदीं खरें. आणि तो आपला मान हिरावून घेण्यासाठीं धाकट्या आईसाहेब रात्रंदिवस नाना खटपटी लटपटी करीत होत्या हेंही कांहीं खोटें नाहीं. "

" आतां कसें बोललीस ! हे तिचे सारे खेळ बरेचसे तुझ्या जिवावर चालत असत. तूं इकडच्या तिकडच्या बित्तंबातम्या काढून आपल्या धनिणीला कळवीत असस; आणि त्या रोंखानें ती आपल्या कारस्थानांचीं सूत्रें हलवीत असे. "

" आपण हा भलताच मोठेपणा माझ्या पदरीं बांधीत आहां. मी कसली एक यःकश्चित कुळंबीण; सांगितलेल्या कामाची आणि घातलेल्या अन्नाची. आपण काय किंवा धाकट्या आईसाहेब काय; आपल्या पायपोसाची तरी सर मला येईल का ? "

सजणा बोलली त्यांत बराच सत्यांश होता. आपली किंमत ती ओळखून होती. सगुणाबाई वाड्यांतल्या वाड्यांत किंवा अन्यत्रही बित्तंबातम्या काढण्याच्या कामीं तिचा उपयोग करी हें खरें. पण ती तिचा एकटीचाच उपयोग करीत असे असें नाहीं. तिच्याप्रमाणें आणखी कैक कुळंबिणी व कैक सेवक यांचा ती तसा उपयोग करीत असे. परंतु सजणेला त्या क्षणीं सकवारबाईच्या तोंडची स्तुति ऐकून मात्र वाटूं लागलें कीं आपण कांहीं अगदींच सामान्य कुळंबीण नाहीं; आपल्या चातुर्याचा सगुणाबाईला वेळीं अवेळीं चांगलाच उपयोग झाला असला पाहिजे; आणि त्यामुळें सिद्ध झालेल्या कार-

स्थानांची सकबारबाईला कधींतरी चांगलीच झळ लागली असली पाहिजे. हे तिचे विचार अर्थात् अनुमानधक्क्याचेच होते. पण आजच्या एकंदर प्रकारावरून मात्र तिचें मन तिला ग्वाही देऊं लागलें होतें कीं आपणही बेमालूम कारस्थानें करूं शकतों; व सकवारबाईसारख्या निष्ठुरहृदयी चपळ वाघिणीलाही अंगच्या मोहिनीनें आपणापुरती तरी गरीब गाय बनवून सोडूं शकतों.

याच्या उलट सकवारबाई स्वतःशीं समजत होती कीं भोळी सजणा, तिला आतां आपणाशिवाय दुसऱ्या कोणाचा आधार आहे! आपण नुसता एक नेत्रकटाक्ष तिच्याकडे फेंकला तरी ती त्याच्यावरून पंचप्राणांची ओंवाळणी करायला तयार होईल, इतका तो तिला मोलाचा वाटेल. स्वतःच्या दृष्टीनें पाहतां सकवारबाई सजणेशीं सहानुभूतीनें बोलत होती म्हणजे एकपरीनें तिच्यावर उपकारच करीत होती. पण त्या उपकारांबद्दल तिला मोबदला पाहिजे होता; सजणेनें लक्ष्मीमागोमाग जाऊन महाराजांच्या आणि तिच्या काय गुजगोष्टी होतील, त्यांची बित्तंबातमी आणावयाला हवी होती. तें काम सजणेनें आपुलकीनें व विश्वासानें करावें यासाठीं सकवारबाईनें आडपडद्यानें तिची मनधरणी चालविली होती.

तात्पर्य, ठकाला महाठक किंवा शेराला सव्वाशेर अशा प्रकारच्या डावपेंचानीं सकवारबाई आणि सजणा एकमेकींशीं वागत होत्या. आतां ठकाला महाठक किंवा शेराला सव्वाशेर कोण ठरतें याचाच उलगडा व्हावयाचा होता.

"अग! पायपोसाची किंमत तूं कमी का ठरवतेस? पायपोस धड असला तर कांट्याखुट्यांच्या अडचणलेल्या वाटेनें जातांना पायाचें रक्षण होतें. म्हणूनच पायांपेक्षां पायपोस जास्त शाबूत असायला हवेत."

"नाहीं. पाय अगोदर शाबूत असायला हवेत. पाय सलामत तर पायपोसांना काय दुष्काळ?" सजणा म्हणाली.

"बरें; तें राहूं दे. पण तुला मीं माझ्या विश्वासांतलें काम सांगितलें तर तें तूं करशील का?"

"असें कां विचारतां? मी तुमची सत्तेची कुळंबीण आहें. आपला अधिकार मला आज्ञा करायचा, आणि माझा अधिकार आपल्या आज्ञेवर

प्रसंग पडला तर जिवाभावाची देखील मीठमोहरी त्या आज्ञेवरून ओंवा-ळून टाकून तिची अंमलबजावणी करायचा. सांगावी आपली आज्ञा काय आहे ती."

सजणेच्या मनाची इतकी तयारी करण्यासाठींच सकवारबाई अशी वळणां-वळणांनीं बोलत होती. ती सजणा आपल्या आहारीं आली असें मनांत समजून म्हणाली, "तूं लक्ष्मीबरोबर वनवासवाडीला जा, आणि महाराजां-पाशीं तिचें काय बोलणें चालणें होतें तें मला कळव. एवढें काम तूं बेमालूम केलेंस तर तुझी जन्माची ददात फिटेल असें मी करीन. तुझ्या नवऱ्याचा शोध करून त्याला मी आतां हुडकून आणवत्यें, आणि त्याचें व तुझें पुन्हा सख्य करून देत्यें. एवढी कामगिरी तूं पार पाडलीस कीं त्या घटकेपासून तूं माझी कुळंबीण नाहींस, तूं माझी मैत्रीण. मी राजमाता होण्याला तूं मदत कर, कीं मग मी तुझ्या नवऱ्याला सरदारकी देऊन त्याला आणि त्याच्या-बरोबरच तुलाही तेवढ्या मान्यतेला कशी चढवतें पाहा तरी!"

"मला मान नको आणि मान्यताही नको. आपल्या पायांचा आश्रय मिळाला आहे तो जन्मभर टिकला आणि मरेतों आपली सेवा कांहींतरी आठवण राहण्याजोगी घडली, म्हणजे जन्माला आल्याचें सार्थक झालें. माझ्या हातून होईल तें करायला माझी तयारी आहे. पण—"

"पण काय?" सकवारबाईनें सजणेच्या खांद्यावर हात टाकून लडिवाळ-पणानें अगदीं बरोबरीच्या नात्यानें तिला विचारलें.

"आईसाहेब! स्पष्ट बोलत्यें त्याबद्दल क्षमा होईल ना?"

"बोल काय तें स्पष्ट बोल. तूं माझ्या जिव्हाळ्याची कुळंबीण आहेस, तुला सात खून माफ आहेत. काय तें स्पष्टपणें बोल."

"आपल्या ह्या चुरशीच्या भाऊबंदकींत माझ्यासारख्या कवडीमोलाच्या चाकरांनीं वागायचें म्हणजे निव्वळ सुळावरची पोळी आहे."

"कांहीं नाहीं सुळावरची पोळी! मी आहें ना? ह्या सकवारच्या जिवांत जीव आहे तोंवर जिथें तिचें स्वतःचें ताट तिथें तुझी वाटी. मग तर झालें ना?"

"आपल्या ताटाशेजारीं वाटी मांडून बसायची माझी योग्यता नाहीं हें मी जाणत्यें, माझी एवढीच अपेक्षा आहे कीं आईसाहेबांच्या पायांतळच्या धुळींतला कण होऊन रहाण्याचा मान मला मिळाला तरी पुष्कळ झाला."

" झालें तर. मग एवढी कामगिरी तूं पत्करलीस ना ?"

" हो ! पण एक मी अगोदरच सांगून ठेवत्यें."

" पुन्हा तेंच ! काय तें एकदां सांगून मोकळी हो ना !"

" सांगायचें आणखी कांहीं नाहीं; पण आपण मला हें बहुरूप्याचें सोंग आणायला सांगतां आहां; त्या सोंगाची बतावणी करण्यासाठीं मला करूं नये तें वेळीं करावें लागेल, बोलूं नये तें बोलावें लागेल. असल्या कांहीं वर वर विपरीत दिसणाऱ्या गोष्टी आपल्या कानीं आल्या तर आपण त्या मनावर घेतां कामा नयेत. हो ! आपलें आधींच सांगून ठेवत्यें. नाहींतर पुन्हा आपला माझ्याविषयीं गैरसमज व्हायचा !"

" अग ! माझा तुझ्याविषयीं गैरसमज व्हायचा नाहीं; मुळींच गैरसमज व्हायचा नाहीं. अगदीं कुणीं जरी मला येऊन सांगितलें कीं सजणा तुमचा गुप्तपणें खून करायचीं कारस्थानें रचते आहे, तरीदेखील माझा तुझ्यावरचा विश्वास रेंसभरदेखील ढळायचा नाहीं. माझ्या कुंकवाची शपथ !"

इतक्या अपूर्व आणाभाका सकवारबाईकडून मिळवून सजणा आपल्या कामगिरीवर निघाली. तिनें सकवारबाईवर बेमालूमपणें मोहिनीअस्त्र फेंकलें. राणी धूर्त खरी; पण सजणेपाशीं ती फसली. सजणेवर तिचा इतका विश्वास बसला कीं इतक्या एकनिष्ठपणें आपली सेवा करणाऱ्या दासीला आपण सकाळपासून उगीच छळलें असें तिला वाटूं लागलें. याप्रमाणें सकवारबाईचें मन सजणेविषयीं इतकें अजिबात पालटून गेलें. त्यांत गढूळपणाचा लवलेशही उरला नाहीं.

परंतु सजणेचें मन ?—त्याच वेळीं ती स्वतःच्या मनांत म्हणत होती, " ह्या अवदसेचा मी पुरा सत्यानाश करीन तरच नांवाची सजणा."

वरील आसुरी विचार मनांत घोळवीत त्याची रूपरेखा मनाशीं आखीत सजणा बाहेर पडली. त्याच क्षणाला सकवारबाईला आणखी एक दूरवरचा विचार सुचला, आपण सजणेला एवढी जबाबदारीची कामगिरी सांगितली खरी; पण ती पार पाडतांना तिला आपल्या कैवाऱ्यांकडून व राजसेवकांकडून अडथळा झाला तर ! लोकांना माहिती कीं ती थोरल्या राणीसाहेबांच्या तीव्र रोषाला पात्र झालेली अभागी कुळंबीण आहे. त्या भावनेनें तिला अडथळा होण्याचा संभव आहे.

लगेच सकवारबाईनें तिला हांक मारली, " सजणे ! सजणे ! "

" काय आईसाहेब ! " सजणेनें मागें वळून विचारलें.

" अग तूं निघालीस खरी; पण तुला कोणीं संशयानें अडवलें तर? "

" मग काय करूं ? "

" ही माझी आंगठी घेऊन तुझ्यापाशीं ठेव. माझ्या अत्यंत विश्वासांतल्या माणसाखेरीज मी कुणापाशींही ही आंगठी देत नाहीं, हें सर्वांना माहीत आहे. कुणीं तुला अडवलें तर ही आंगठी दाखव, म्हणजे तुला प्रत्यक्ष महाराजदेखील अडवूं शकणार नाहींत. " असें म्हणून सकवारबाईनें आपल्या बोटांतील आंगठी काढून ती सजणेच्या बोटांत घातली.

सजणेलाही आपल्या संकल्पसिद्धीचा मार्ग ह्या आंगठीमुळें जास्त सुगम होईल असें वाटून आनंद झाला. ती आंगठी घेऊन बाहेर निघून जाते न जाते तों सकवारबाईचे लोक त्या अशुभ भविष्यवादी म्हातारीला पकडून घेऊन येत असलेले आढळून आले. ते लोक त्या म्हातारीला मधून मधून हाणीत मारीत होते, शिवीगाळ करीत होते व म्हातारीवर विश्वास बाळगणारे लोक तिची मुक्तता व्हावी म्हणून राजदूतांच्या केंविलवाणीनें विनवण्या करीत त्यांच्या मागोमाग येत होते. म्हातारी त्याची यत्किंचित्‌देखील पर्वा न करतां आपल्याच तंद्रींत गीत गुणगुणत होती.

न्यायनिवाडा पुरा बुडाला, कली मातला चोंहिकडे !
मराठशाहीच्या मुड्द्यावर तुटून पडती कुत्तरडे ।
राजा झाला बाइलवेडा बाइल झाली शिरजोर ।
जिकडे तिकडे जुलुम माजला, दाहि दिशांना अंधेर ।

सजणेला कां न कळे, त्या म्हातारीची कींव आली. तिला एकदां वाटलें, आंगठी दाखवून तिला सोडवावें का ?—पण तिनें आपलें मन आवरलें. कारण ती म्हातारी सकवारबाईच्या रोषाला पात्र झाल्याचें तिला माहीत होतें. तरीही सजणेला त्या प्रकाराबद्दल चुटपुट लागून राहिली एवढें मात्र खरें.

प्रकरण ११ वें

असें कसें झालें ?

" कोण ही थेरडी ?" म्हातारीला राजदूतांनीं समोर आणून उभी करतांच सकवारबाईनें संतापाच्या भरांत विचारलें.

" मी तर थेरडी आहेंच. पण बाई ! तूं तरी तरुणपणांतल्या नव्यानवतीची आज कुठें दिसते आहेस ? आणि तूंदेखील आजच्यापेक्षां उद्यां म्हातारी होणारच आहेस !" म्हातारी उत्तरली.

" आईसाहेब ! ती कोणी वेडी दिसते आहे." दुसरा पहारेकरी म्हणाला.

" अरे बाबा ! राजवटीचे रोज रोज नवे नवे धिंडवडे पाहण्यापेक्षां वेड लागलेलें शतपटींनीं चांगलें नाहीं का ?" म्हातारी पुन्हा म्हणाली.

" ए थेरडे ! राजवटीचे धिंडवडे कुणीं काढले ?" सकवारबाईनें कड्यां स्वरांत पुन्हा प्रश्न केला.

" कुणीं काढले नाहींत ? माझे आई ! मला सांग, राजवटीचे धिंडवडे कुणीं काढले नाहींत ? राजा बायल्या बनला आणि दरारा गमावून बसला; हे राजेपणाचे धिंडवडे नव्हेत का ? राणी सत्तेच्या लोभानें राजवटीचे लचके तोडूं लागली; हे धिंडवडे नव्हेत का ? पेशवा राजाचा नोकर पण तो शिरजोर झाला आणि राजाची सारी सत्ता गुंडाळून ठेवून 'हम् करेसो कायदा' वागूं लागला; आणि सारे कारभारी कोणी राजाच्या तर कोणी पेशव्याच्या, कोणी राणीच्या तर कोणी परक्या शत्रूच्या कच्छपीं लागून आपल्या पोळीवर तूप ओढून घेऊं लागले, पाहा ! मान, सत्ता, पैसा, चैनबाजी यांना सोकावलेल्या ह्या साऱ्या आयतखाऊ शिरजोरांच्या मस्तींत बिचारा शेतकरी कसा पिळून निघतो आहे पाहा ! तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो ! तुम्हांला लढाई करून देश लुबाडतां येतात. पण आम्ही शेतकरी तुमच्या

दांडगाईच्या वरवंट्याखालीं ठार चिरडले जातों त्याची काय वाट? मला सांग, शिवाजीनें सुरू केलेल्या राजवटीचे धिंडवडे निघायचे यापेक्षां काय बाकी राहिले आहेत?"

"ही थेरडी वेडी नाहीं; चांगली शहाण्यांनाही वेड लावील असली कुभांडखोर आहे! भिकारडे, राजापासून–राणीपासून सर्वांची अशी उघड उघड निंदा करतेस काय? थांब. तुझी जीभच छाटून टाकायला लावत्यें." सकवारबाई राजदूतांकडे वळून म्हणाली, "जारे, आतांच्या आतां या क्षणीं माझ्या डोळ्यांदेखत ह्या थेरडीची जीभ छाटून टाका."

"खुशाल छाटून टाका. पण त्यापूर्वी मला तुमच्या राणीशीं एकान्तांत दोन शब्द बोलूं द्या. तेवढें काम माझ्या हातून पार पडलें कीं मी मग जीभच काय पण मानदेखील छाटून घ्यायला तयार आहें." म्हातारी निर्भयपणें उत्तरली.

"काय; माझ्यापाशीं तुझें काम?" सकवारबाईनें किंचित् आश्चर्यपूर्वक विचारलें.

"होय. तूंच राणी सकवारबाई का?" म्हातारीनें प्रश्न केला.

"होय."

"तर तुझ्याशींच माझें काम आहे."

"काय काम सांग लवकर."

"तें असें चारचौघांत सांगण्यासारखें नाहीं." म्हातारी सभोंवार तीक्ष्ण नजर फेंकीत म्हणाली.

सकवारबाई म्हातारीच्या मनांत डोकावणारा संशय ओळखून म्हणाली, "ही सारी मंडळी माझ्या विश्वासांतील आहेत."

"पण माझ्या विश्वासांतील नाहींत ना!" म्हातारी शांत चित्तानें पण आपल्या मनोमय ठरलेल्या निश्चयापासून रेंसभरदेखील न ढळतां म्हणाली, "हें पहा सकवार—"

"काय सकवार?" म्हातारीच्या तोंडचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच एक पहारेकरी म्हातारीवर हात उगारून रागानें म्हणाला, "ए थेरडे! तूं कुणाशीं बोलते आहेस तुला माहीत आहे ना? शुद्धीवर आहेस ना तूं? कीं घालूं कंबरड्यांत एक लाथ?"

म्हातारी पूर्ववत् शांत चित्तानें म्हणाली, " धनीण पुरवली पण धनिणीचें कुत्रें नको रे बाबा ! राणी झाली तरी ती राजाची; राणी रयतेची. पण माझ्यासारख्या म्हातारीला ती लेंकीसारखी. माझ्या पिकल्या केसांकडे तरी जरा तुम्ही पाहाल कीं नाहीं ? "

सकवारबाईलाही वाटलें कीं ज्या अर्थी ही म्हातारी इतकें बोलते आहे, त्याअर्थी त्यांत तसेंच कांहींतरी गूढ तथ्य असलें पाहिजे. तिनें आपल्या सर्व सेवकांना तेथेंच राहावयाला सांगून म्हातारीला आपल्याबरोबर आपल्या महालांत नेलें. सर्व सेवक बुचकळ्यांत पडले, हें प्रकरण आहे तरी काय ?

म्हातारीनें वर महालांत एकांतांत जातांच विचारलें, " सकवार ! तूं मला ओळखलेंस का ? "

" नाहीं. "

" तूं तान्हेपणीं कुणाचें दूध पिऊन लहानाची मोठी झालीस ? कुणाच्या अंगाखांद्यावर खेळलीस ? कांहीं आठवतें का ? "

तरीही सकवारबाईच्या तोंडून उत्तर निघेना. ती आपली पूर्वस्मृति मनोमनीं धुंडाळून पाहूं लागली.

" तुझी गंगा आई तुला आठवते का ? तीच मी ना ? राणी झालीस म्हणून बाळपण सारें विसरलीस वाटतें ? "

इतकें म्हातारी बोलल्यावर सकवारबाईला तिची ओळख तेव्हांच पटली. तिनेंच सकवारबाईला लहानपणीं दूध पाजून लहानाची मोठी केली होती. सकवारबाई जरा मोठी झाल्यावर एकदां कांहीं कारणानें सकवारबाईच्या आईबापांशीं म्हातारीचा बेबनाव आला व तेव्हांपासून म्हातारी व सकवारबाई यांचा संबंध तुटला. तेव्हांपासून ह्या घटकेपर्यंत सकवारबाईला म्हातारीचें कांहींच वृत्त कळलें नव्हतें. ती म्हणाली, " मीं तुला ओळखलें. गंगा ! पण इतके दिवस तूं कुठें ग होतीस ? "

" होत्यें झालें पृथ्वीच्या पाठीवर. त्या माझ्या कुळकथेशीं तुला काय करायचें आहे ? उगाच तुझा देखल्या देवा दंडवत हवा कशाला ? तूं आतां मोठी राणी झाली आहेस, माझ्यासारख्या गरीब दाईची तुला आठवण कशाला राहील ? पण परमेश्वरानें असलें वैभव मला दिलें नाहीं, त्यानें उलट मला हालअपेष्टांतच डांबून ठेवलें, म्हणून मला ऋणानुबंधाच्या माणसांचा विसर

मुळींच पडलेला नाहीं. माझी बाई राजाची राणी झाली हें ऐकून तेव्हां माझ्या अंगावर मूठभर मांस चढलें. आणि तूं जरी माझ्या मेल्या जित्याची मुळींच विचारपूस केली नाहींस, तरी मीं तुला तुझ्या तान्हेपणीं माझी मुलगी मानली होती, तें नातें मी मात्र मुळींच विसरलेली नाहीं. यांत मींही कांहीं जगांतल्या आयांवेगळें केलें नाहीं, आणि तूं देखील जगांतल्या मुलींसारखीच वागलीस. सकवार ! माणसांची दृष्टि नेहमीं पुढें असते. मुलें मोठीं झालीं, त्यांचीं लग्नकार्यें झालीं, कीं नवऱ्याला बायको आणि बायकोला नवरा. आई-बापांची ओढ त्यांना यथातथाच असते. पण तेंच मूल जन्माला आलें कीं तें आईचें परब्रह्म. मी तुझी आई, माझ्या पान्ह्यावर तूं वाढलेली, म्हणून तुझ्या-साठीं माझा जीव इतका ओढतो. ज्या दिवशीं तूं राणी झाल्याची मंगल वार्ता मला कळली, त्याच दिवशीं मीं स्वतःला सातारकर छत्रपतींच्या सेवेंत वाहून घेतलें. आणि परमेश्वरानेंही तुझ्या सासरच्या घराण्याची सेवा माझ्या हातून या क्षणापावेतों अखंड घडविली. ”

“ ती कशी काय ? ”

“ तेंच आतां मी सांगणार आहें. तें सांगण्यासाठींच तर मला रानो–माळीं वणवण हिंडत एथवर यावें लागलें. वास्तविक मी इतकीं वर्षें गप्प बसायची नव्हे, यापूर्वींच तुला येऊन भेटायची. पण माझा पण होता, जशी मीं तुला अंगाखांद्यावर खेळवून लहानाची मोठी केली, तसाच तुला बाळ-राजा व्हावा आणि तो मीं अंगाखांद्यावर खेळवावा. पण तेवढी माझी इच्छा परमेश्वरानें अपुरी ठेवली. तेवढेंच माझ्या हौसेला गालबोट लागून राहिलें. त्याला कांहीं इलाज नाहीं. तरीपण माझी पुण्यायी थोर म्हणून या नाहीं त्या नात्यानें उद्यांच्या छत्रपतीची सेवा मला घडलीच. ”

सकवारबाईच्या हृदयाला गंगाबाईच्या त्या शेवटच्या उद्गारांचा जोराचा धक्का बसला. उद्यांचा छत्रपति! हा उद्यांचा छत्रपति कोण ? तिला कांहींच कळेना. कंसानें आपला वैरी उपजतांच त्याला मारण्याचे भगीरथ प्रयत्न केले व देवकीचीं एकामागून एक सर्व अपत्यें शिळेवर आपटून ठार केलीं, तरीही देवकीच्या शेवटच्या अपत्याची हत्या करतांक्षणीं ‘ तुझा शत्रु गोकुळांत नांदत आहे ’ अशी त्या अपत्याच्या मुखानें आकाशवाणी ऐकतांच तो जसा अनन्यगतिक बनला, तशी अवस्था सकवारबाईची होऊन गेली. उद्यांचा

बाळराजा कोणीही असला तरी तिच्या दृष्टीनें तो तिचा वैरीच होता. पण तो सुगावा आपणाला लागणार नाहीं, इतक्या दूरदर्शीपणानें तिनें ती मनांतली तळमळ दक्षतापूर्वक आपल्या मनांत दाबून ठेवीत म्हातारीला म्हटलें, " कुठें आहेत ते आमचे बाळराजे ? "

" ताराबाई आईसाहेबांनीं तुम्हांला कुणालाच अजून यांपैकीं कांहीं सांगितलें नाहीं ? " म्हातारीनें आश्चर्यानें प्रश्न केला.

" नाहीं. "

" त्यांचें आणि तुमचें नीट नाहीं म्हणून त्यांनीं सांगितलें नसेल. "

" नसेल. कदाचित् तसेंही असेल. "

-' पण त्यांच्याशीं तुमचें वैर असलें तरी बाळराजांशीं तर वैर नाहींना ? "

" नाहीं. मुळींच नाहीं. आणि सासूबाईशींदेखील आमचें वैर आहे असें मुळींच नाहीं. त्या राजवटींत भलतीच ढवळाढवळ करतात आणि त्यांचा आमच्यापेक्षां कोल्हापुरकरांकडे ओढा जास्त, म्हणून त्यांना इथें नजरकैदेंत ठेवण्यांत आलें आहे इतकेंच. पण आमचे ते बाळराजे कोण कुठें आहेत तें सांग ना ? "

" सांगत्यें. पण तूं आपल्या सासूबाईवरचा राग त्या बाळराजावर काढणार नाहींस ना ? "

" नाहीं. "

" माझ्या गळ्याशपथ ? "

" तुझ्या गळ्याशपथ ! "

" दुसरे शिवाजीराजे वारले, त्यांचा बाळराजा आहे तो. आतां तरी आलें का ध्यानीं ? "

" सासूबाईचा नातू ? "

" होय. जरा हळू बोल. तो सध्यां पानगांवीं आहे दर्याबाई निंबाळकरांपाशीं. दर्याबाई माहीत आहे ना ? आजवर आम्हीं फुलांत घालून त्या बाळराजाला जतन केला आहे. त्याच्या जन्मापासून कोल्हापूरची कैदाशीण राणी जिजाबाई त्याच्या जिवावर टपली आहे. कैकदां त्याच्यावर मारेकरी पडले. अखेर तो बाळराजा मेला अशी निष्ठुरपणानें खोटी कंडीही आम्हीं पिकविली. तरीही अजूनसुद्धां त्याचा आणि त्याच्याबरोबर आमचा जीव

धोक्यांतच आहे. कोल्हापूरकरांचे गुप्त दूत बहिरीससाण्यासारखे बाळराजाच्या वासानें आमच्या पाळतीवर भिरभिर फिरत असतात."

"असें ! तो राजपुत्र सध्यां काय करतो ?"

"काय करणार ? गुरें ढोरें वळतो. शत्रूला सुगावा लागूं नये म्हणून त्याला आम्हीं गुराखी बनवून सोडला आहे. आणि त्याचें राजेपण इतकें गुप्त राखलें आहे कीं खुद्द त्यालादेखील आपण राजपुत्र आहों याची दाद नाहीं."

"त्याचें नांव काय ?"

"राजाराम आम्ही त्याला म्हणतों. पण ताराबाई आईसाहेब म्हणतात रामराजा."

"मग आजवर तूं ही महत्त्वाची बातमी गुप्त कां राखलीस ? इतर शत्रूंचें एक राहो परतें. पण मला तरी कळवायचें होतेंस !"

"तुला कळवायचें खरें. पण एकतर आम्हांला अमात्यांची आणि ताराबाई आईसाहेबांची सख्त ताकीद कीं राजपुत्राचा मागमूसदेखील कुणाला लागतां उपयोगी नाहीं."

"कोण अमात्य ? रामचंद्रपंत कीं भगवंतराव ?"

"बापलेक दोघेही."

"असें सांगण्यांत त्यांचा काय बरें उद्देश असेल ?"

"उद्देश आणखी कसला ? त्यांना झालें तरी कोल्हापूरकरांचेंच भय. शिवाय कुणी कुणी म्हणतात कीं श्रीमंत पेशव्यांनादेखील सातारच्या गादीला वारस निर्माण झालेला पाहवणार नाहीं."

"पेशव्यांना तो पाहवणार नाहीं हें मात्र खरें. कारण मग त्यांना सातारा-कोल्हापूर एक करून दुहेरी मराठशाहीची पेशवाई कशी हबकतां येईल ?"

"असेल, तसेंही असेल. नाहीं तरी कोणीं म्हणावें !"

"असेल कां; आहे. मला सारें माहीत आहे. बरें पण आतां मीं पुढें काय करावें असें तूं म्हणतेस ?"

"आतां पुढें काय करायचें तें जिचें तिनें मुखत्यारीनें पाहावें. मी मुद्दाम पानगांवाहून एथपावेतों इतकी चोरून मुठींत जीव घेऊन वेडीचें सोंग घेऊन आल्यें, तें माझें काम झालें. वास्तविक ताराबाई आईसाहेबांची आणि अमात्या-

चीही आम्हांला सक्त ताकीद कीं खऱ्या प्रकारची गंधवार्ताही बाहेर फुटतां उपयोगाची नाहीं. पण आम्हीं तरी हें तरवारीच्या धारेवरचें जिणें आणखी कोठवर जगावें? इकडून यांचें भय, तिकडून कोल्हापूरकरांचें भय, पेशव्यांचें भय, रघूजी भोंसल्यांचा हेरही दोन तीनदां येऊन बारकाव्यानें चौकशी करून गेलाच; अशा स्थितींत हा सारा प्रकार ताराबाई आईसाहेबांच्या कानावर एकदांचा घालावा आणि बाळराजांना स्वाधीन करून घेऊन आम्हांला एकदांच्या मोकळ्या करा असा दर्याबाईचा निरोप ताराबाई आईसाहेबांना कळवावा म्हणून मी अशी लपतछपत आल्यें. मात्र माझा मनांतून ओढा म्हणशील तर तुझ्याकडे आणि शाहूमहाराजांकडे खरा. पण महाराजांची भेट मला एरव्हीं कशी होणार; आणि किल्ल्यांत तरी प्रवेश कसा मिळणार?— म्हणून बाई, वेडी बनल्यें, आणि राजवटीच्या झाडून साऱ्या मातबर माणसांची एकजात निंदा वेडगाण्यांतून सुरू केली. मनांत म्हटलें, अपराधी म्हणून शासन करण्यासाठीं तरी मला महाराजांसमोर नेतील, आणि मग त्यांना सारें रहस्य उलगडून सांगतां येईल—"

"मग झाली का महाराजांची भेट?"

"छे! ते आजच वनवासवाडीला गेल्याचें कळलें. पण त्यांची भेट झाली नाहीं तरी तुझी झाली, साखरभाताऐवजीं बासुंदी प्यायला मिळाली."

"एकून गंगाबाई! तूं बरीच पाताळयंत्री आहेस कीं ग? बरें पण केवढासा आहे तो आमचा राजपुत्र?"

"चांगला आहे बापया पंचविशीच्या उमरीचा. आतां कांहीं लहान नाहीं."

"बरें, मी आतां काय करूं म्हणतेस?"

"आमच्या बाळराजाला आपला मुलगा मानून पदरांत घे; आणि त्याला महाराजांच्या संमतीनें राज्याचा धनी करून मोकळी हो!"

"ठीक आहे. तुझ्याबरोबरच रामराजाला घेऊन येण्यासाठीं माणसें देत्यें."

"पण महाराजांचें आणि ताराबाई आईसाहेबांचें मत अगोदर घे."

"महाराजांचें मत कांहीं घ्यायला नको. आणि सासूबाईंना मी म्हणत्यें आज मुळींच विचारूं नये."

"कां?"

पेशवाईचा पुनर्विकास

"समज, त्यांचा ओढा कोल्हापूरकरांकडे वळला तर? त्यापेक्षां एकदां बाळराजे इथें येऊन पोंचल्यावर त्यांना कळेलच कीं!"

"पण मला ही गोष्ट त्यांच्या कानीं घातलीच पाहिजे. दर्याबाईसाहेबांची मला तशी निक्षून आज्ञा आहे. त्यांच्याशीं खोटेपणा मी कसा करूं?"

सकवारबाईला विचार पडला, आतां हिला काय म्हणावें? ताराबाईचा स्वभाव सकवारबाई सर्वांपेक्षां जास्त चांगला ओळखीत होती. सुंभ जळलें तरी त्याचा पीळ जळत नाहीं, त्याप्रमाणें ताराबाई इतकी म्हातारी झाली होती, तरी राज्याधिकार पुन्हा एकवार गाजविण्याची तिची महत्त्वाकांक्षा कांहीं म्हातारी झाली नव्हती. मात्र ती कोल्हापूरकरांना सामील होईल हें सकवारबाईनें केवळ लटकें भय म्हातारीपाशीं प्रदर्शित केलें होतें. कोल्हापूरकरांशीं आतां ताराबाईचें नातें फुटलेल्या बांगडीसारखें राहिलें होतें. फुटलेली बांगडी पुन्हा सांधली जात नाहीं त्याप्रमाणें कोल्हापूरकर व ताराबाई यांचें परस्परांचें सख्य होणें आतां कालत्रयींही शक्य नव्हतें. परंतु महाराज अजूनही ताराबाईला मानतात, व हा नवा उगवलेला रामराजा साताऱ्याच्या गादीवर आल्यास तोही आपल्या आजीच्याच तंत्रानें वागणार! मग आपल्या हातीं सत्ताही नाहीं, व आपणाला राजमातेचा मानही नाहीं! तें सकवारबाईला कसें सहन व्हावें?

पण म्हातारीनें सकवारबाईला चांगलेंच पेंचांत पाडलें. आतां गंगाबाईला ताराबाईची भेट घेऊं द्यावी तरी पंचाईत व न घेऊं द्यावी तरी पंचाईत!—भेट घेऊं दिल्यास आपणाला रामराजाचा सुगावा लागल्याचें तिला कळणार व यापुढें रामराजाला गादीवर बसविण्याच्या बाबतींत आपणाला तिच्याच ओंजळीनें पाणी प्यावें लागणार!—गादीला वंशांतला खराखुरा वारस असल्यावर महाराज दत्तक घेण्याच्या भानगडींत मुळींच पडणार नाहींत, आणि हें शेंडेनक्षत्र छत्रपति झाल्यावर सर्वस्वी ताराबाईच्या तंत्रानें वागूं लागून आपण निर्माल्यवत् होऊन बसूं.—इतक्या चौफेर अडचणी सकवारबाईसारख्या क्रूर, नागमोड्या व तल्लख वृत्तीच्या राणीला डोळ्यांपुढें मूर्तिमंत दिसूं लागल्यावर ताराबाईच्या पक्षांतील राजपुत्राचा नाश कोणत्या गुप्त उपायांनीं करतां येईल असे नवे आसुरी विचार ओघानेंच तिच्या डोक्यांत घोळूं लागले.

" या कामीं ह्या म्हातारीचा आपणाला उपयोग होईल का ? " सकवारबाईनें आपल्या मनाशीं प्रश्न केला, व लागलीच म्हातारीला विचारलें, " गंगा! तूं माझी आई ना ? माझें कल्याण व्हावें असें तुला वाटतें ना ? "

" हें काय विचारतेस ! तुझ्यासाठीं तर मीं एवढें जिवाचें रान केलें ! "

" मग माझ्यासाठीं तशीच आणखी एक गोष्ट कर. "

" काय करूं ? "

पहिल्या क्षणाला सकवारबाईच्या डोक्यांत असा विचार आला होता कीं आपण आई आई करून गंगाबाईच्या गळीं पडावें व रामराजाचा नाश करण्याच्या कामीं तिचें साह्य मागावें. पण राजवंशाचा तो एकुलता एक अंकुर खुडून टाकण्याची कल्पना सकवारबाईला स्वतःलाच इतकी भयंकर आसुरी वाटूं लागली कीं ती आपण होऊनच आपल्या मनाशीं ओशाळली. मीं राणीनें असले अधमपणाचे उद्गार गंगाबाईसारख्या त्रयस्थ स्त्रीपाशीं कसे बोलून दाखवावे असें लाजून तिनें मोठ्या चतुराईनें दुसऱ्याच क्षणाला या बोटावरचें कुंकु त्या बोटावर केलें. ती म्हणाली, " हें पाहा, राजपुत्राचें कसें होईल ही हुरहूर माझ्या जिवाला एकसारखी लागून राहिली आहे. आणि सासूबाईच्या जिवालाही त्यामुळेंच जरादेखील चैन नसतें. "

" ताराबाई आईसाहेब तुझ्यापाशीं ती गोष्ट बोलल्या आहेत म्हणायच्या एकूण ! "

" तर ! इतकेंच काय; पण पानगांवला बाळराजांबाबत एखादा निरोप किंवा चिठीचपाटी पाठवणें झालें तरी त्या माझ्या संमतीशिवाय कांहींदेखील करीत नाहींत. "

" आम्ही इतके दिवस ऐकतों कीं तुझें आणि त्यांचें विळ्या भोंपळ्या— इतकें सरळ आहे म्हणून. आणि तूंदेखील आतांच कीं ग म्हणालीस ? "

" तें मी मुद्दाम म्हणाल्यें. आपणाला काशीला जायचें असलें आणि कुठें चाललां असें कोणीं विचारलें तर रामेश्वरचा रस्ता दाखवून द्यावा असें आमचें वागणें कधीं कधीं असतें. गोष्ट कांहीं साधी नाहीं, बाळराजांच्या जिवाशीं प्रसंग आहे. शत्रु कसे पण त्यांच्या जिवावर डोळ्यांत तेल घालून टपलेले आहेत. पेशवे, कारभारी वगैरे बाहेरचे शत्रु सोडूनच दे. घरांतल्या घरांत काय शत्रु कमी आहेत ! सगुणाबाईच्या मनांतून आपल्या मांडीवर

दत्तक बसावा व तो राजा होऊन आपण राजमाता व्हावें असें आहे. इतकेंच काय पण महाराजांच्या एका राखेलादेखील वाटतें कीं आपला पुत्र सातारचा छत्रपति व्हावा ! अशा अडचणीच्या स्थितींतून आम्हांला मार्ग काढायचा आहे. काय करतेस बाई ! यासाठीं तूं एक कर; तूं कोण, कुठली, कशा-साठीं आलीस, याचा कुणाला जरादेखील मागमूस लागूं देऊं नकोस. सासूबाईनादेखील भेटण्याचें कांहीं कारण नाहीं. उगाच पाहणाराला भलता संशय यायचा आणि पराचा पारवा व्हायचा. आमचा नाहीं तरी राजवटीच्या इतर मुत्सद्यांचा—विशेषतः शिरजोर पेशव्यांचा त्यांच्यावर दांत फार आहे. पेशव्यांचे गुप्त हेर त्यांच्यासभोंवार कोणत्या वेषानें आणि कोणत्या मिषानें कसे संचार करीत असतील याचा काय भरंवसा ! त्यांना राजपुत्र जिवंत असल्याचा नुसता ओझरता सुगावा लागला पुरे, कीं त्यांनीं त्याचीं पाळें मुळें खणून काढलींच म्हणून समजावें. म्हणून म्हणत्यें, नकोच तें. तूं आपली इथून गुपचूप निघून जा, आणि पानगांवच्या वाटेला लाग. आजची रात्र तूं कुठें बरें काढशील ?—हो असेंच. खिंडीच्या गणपतीच्या राईंत आजची रात्र राहा. पहांटेच्या सुमाराला माझ्याकडून विश्वासाचा माणूस तुझ्या सोबतीला येईल, त्याच्याबरोबर बाळराजाला रवाना करून दे. तूं देखील त्याच्याबरोबर आलीस तरी हरकत नाहीं. एकदां बाळराजा सुखरूपपणें इथें येऊन आमच्या हातीं लागला कीं मग कशाचेंही भय नाहीं."

होय नाहीं करतां करतां गंगाबाई त्या योजनेला कबूल झाली. त्या दोघींचें आणखी थोडा वेळ संभाषण झाल्यावर ती सकवारबाईकडून वाटखर्चीदाखल मिळालेल्या वीस मोहरा घेऊन बाहेर पडतां पडतां म्हणाली, "बरें आहे. आतां मी पुन्हा पूर्वीच्याप्रमाणें वेड पांघरून पेडगांवला जाणार बरें का ? आतां मी काय बोलेन बरळेन तें वेडाच्या लहरींतलें समजायचें."

सकवारबाईनें तेंही कबूल केलें, व म्हातारी आपलें पूर्वींचें वेडगाणें गात गात बाहेर पडली. आपल्या सेवकांकडून तिला पुन्हा त्रास होऊं नये एवढ्यासाठीं तिनें एकाला हांक मारून सांगितलें, "अरे! ती म्हातारी चेटकीण बिटकीण कांहीं नाहीं, वेडी आहे. देवाचा गरीब जीव, तिला पाहिजे तिकडे सुखानें जाऊं द्या. तिला कोणी छळूं नका कीं कांहीं करूं नका."

राणीची आज्ञा ती! कोण अमान्य करणार!

प्रकरण १२ वें

खलबत

म्हातारी निर्दोषी ठरल्यावर तिचे चाहते जे तिच्या सुरक्षितपणाची भिक्षा मागत किल्ल्याच्या मुख्य दरवाजापावेतों आले होते व जे तेथें कैद होऊन पडले होते, त्यांना संतोष वाटला. पण त्यांचा तो संतोष मात्र केवळ क्षणिक ठरला. म्हातारी मोकळी सुटली तरी त्यांच्यावर घोरपड यावयाची ती आलीच. कारण सकवारबाईची आज्ञा म्हातारीला उपद्रव न करतां जाऊं द्यावें अशी होती; तिच्या सर्व कैवारी लोकांना सोडून द्या अशी नव्हती. ती रात्रीची वेळ असल्यानें व सकवारबाई सकाळपासूनच्या दगदगीनें अतोनात श्रमली असल्यानें तिला त्या वहिमी लोकांबाबत त्याच वेळीं ताप देणें राजदूतांना श्रेयस्कर वाटलें नाहीं. त्यांनीं त्या लोकांना रात्रभर देवडीवरच डांबून ठेवून सकाळीं न्यायासाठीं सकवारबाईपुढें हजर करण्याचें ठरविलें.

रात्रौ सुमारें प्रहरभर रात्रीच्या सुमाराला गमाजी—सकवारबाईनें वहिमी लोकांची शिकार करण्यासाठीं मोकाट सोडलेला तो क्रूर चित्ता नगरांतील वहिमी लोकांची एक याद घेऊन किल्ल्यावर आला. त्याला जेव्हां कळलें कीं देवडीवर डांबून ठेवण्यांत आलेले नागरिक त्या म्हातारीचे कैवारी आहेत, तेव्हां त्यानें प्रथम आपल्या हातानें दोन दोन चार चार आसुडाचे कोरडे एकेकाच्या पाठीवर ओढले, व त्यांना शिव्या हांसडून सांगितलें, "हराम-खोरांनो! थोरल्या आईसाहेबांना नांवें ठेवणाऱ्या त्या म्हातारीचें कोडकौतुक करतां काय? थांबा. तुम्हां एकेकाला खासे मोटेला जुंपतों. खाशीं हाडें मोडतों गुलामांनो एकेकाचीं; कीं जन्माची आठवण राहावी. तुम्हांला पुढें जें शासन मी देणार त्याचा हा विसार घ्या आणि बसा इथेंच मी थोरल्या आईसाहेबांची परवानगी घेऊन माघारा येईतों कोंकलत."

पेशवाईचा पुनर्विकास

गमाजीनें नगरांतील वहिमी माणसांची म्हणून जी याद तयार करून आणली होती, तिच्यांत राजद्रोही किंवा विरोधी नागरिकांचाच भरणा होता असें नव्हे तर ज्या कोणीं पूर्वीं कधीं गमाजीच्या चवचालपणाला किंवा दंडेलीला विरोध केला होता, त्यांच्यावर सूड घेण्याची ती नामी संधी त्यानें साधली होती. एखाद्या धनवंताच्या धनंतर वाड्याला आग लागली कीं भुरट्या चोरट्यांना लुटालूट करण्याला ती जशी नामी संधी मिळते, एखाद्या घरांतला कर्ता पुरुष कालवश झाला कीं त्याच्या विधवेला फंसवून तिच्या अज्ञान मुलांच्या तोंडांत माती लोटून मृताच्या संपत्तीवर ताव मारण्याला ज्याप्रमाणें भाऊबंदांना अथवा शेजारीपाजारी आप्तेष्टांना फावतें, तशा नमुन्याची ही पर्वणी आज गमाजीला लाभली होती. गमाजीसारखा क्षुद्र पण क्रूर वृत्तीचा उच्छृंखल तरुण अशा पर्वणींत कनक आणि कांता—परवित्त आणि परदारा यापेक्षां निराळा कोणता लाभ साधणार!

तरीही म्हातारीला सकवारबाईनें शासन न करतां जाऊं दिल्याची वार्ता देवडीवर कळल्यापासून गमाजीचा आसुरी उत्साह किंचित् ओसरण्याच्या पंथाला लागला होता. त्याला पेंच पडला होता, म्हातारीनें चेटुक करून सकवारबाईला भारून टाकलें कीं काय!

पण सकवारबाई समक्ष भेटतांच गमाजीचा संदेह एका क्षणांत दूर झाला. सकवारबाईनें प्रथमच प्रश्न केला, "गमाजी! वहिमी माणसांची यादी तयार करून आणली काय?"

"आणली आईसाहेब!" असें म्हणून गमाजीनें बरोबर तयार करून आणलेली याद वाचून दाखविली. त्यांत नांवें कोणाचीं होतीं असें विचारण्यापेक्षां साधारणतः महत्वाच्या व प्रतिपक्षीय अशांपैकीं नांवें नव्हतीं कोणाचीं असा प्रश्न विचारणेंच जास्त सयुक्तिक दिसलें असतें. त्यांत विशेष महत्वाचीं नांवें महादाजीपंत पुरंदरे व भगवंतराव अमात्य यांचीं होतीं. इतरही आणखी अनेक होतीं. परंतु हीं दोनच नांवें एथें प्रामुख्यानें सांगण्याचें कारण सकवारबाईच्याच काय पण साऱ्या राजवटीच्या दृष्टीनें हीं दोनही माणसें नाकापेक्षां मोतीं जड होतीं. त्यांना शासन करणें म्हणजे कांहीं तोंडच्या गोष्टी नव्हत्या. गमाजी राजकारणाच्या नांवानें नुसता शंख! त्याला वाटलें कीं बाईसाहेबांच्या फर्मानावरून आपण ह्या मंडळीला पकडून खासे लोळवूं!

पण सकवारबाई दूरदर्शी व धोरणी होती. तिनें लगेच त्या दोनचार व्यक्तींना तेवढें वगळून बाकीच्यांना पकडून तुरुंगांत डांबून ठेवण्याची परवानगी गमाजीला दिली.

"आणि बाकीच्यांचें काय करावयाचें?" गमाजीनें विचारलें.

"त्यांचें तूर्त कांहींच करावयाचें नाहीं. आपण त्यांचा विचार मागाहून धीरेधीरे करूं. बरें; माझा विचार तूं कारभारी मंडळीला कळविलास का?"

"होय."

"कोणाकोणाला कळविलास?"

"पंतप्रतिनिधींना कळविला, बाबांना कळविला, व नाइकांनाही निरोप पाठविला आहे. इतरांना इतक्यांतच कळवूं नये असें मला वाटलें म्हणून कळविलें नाहीं."

"हरकत नाहीं. एकदम असल्या महत्वाच्या गोष्टीचा इतका बभ्रा होणें एका दृष्टीनें श्रेयस्करही नाहीं. बरें; ती मंडळी आतां इकडे केव्हां येणार आहेत?"

"ते माझ्या मागोमाग यावयाला निघालेच होते. आतां इतक्यांतच येतील."

"बरें; तुला मी आतां एक अत्यंत महत्त्वाची कामगिरी सांगणार आहें. ती जर तूं विश्वासानें पार पाडलीस तर नव्या राजवटींत माझा कारभारी तूं. काय समजलास?"

"कामगिरी काय ती सांगावी. आईसाहेबांनीं मला वाघिणीच्या गुहेंत शिरून तिचें दूध आणावयाला सांगितलें तर तेंदेखील करावयाला मी कमी करणार नाहीं. मग जीव गेला तरी बेहेत्तर. पण त्यापूर्वी मी आईसाहेबांना एक गोष्ट विचारणार आहें. ती म्हातारी—"

"तिच्याविषयींच मी तुला आतां कामगिरी सांगणार आहें."

"तिला आपण निर्दोषी ठरवून कां सोडली बरें? असें हातचें सोडावयाचें व पळत्याच्या पाठीं लागावयाचें हें बरें नाहीं."

"सारें सांगत्यें. पण मी आतां तुला सांगणार त्या गोष्टीची कोणापाशीं वाच्यता होतां कामा नये. या कानाची त्या कानाला ही गोष्ट कळतां कामा नये."

" कबूल ! "

" माझ्या पायांना हात लावून तशी शपथ घे पाहूं ! "

गमाजीनें सकवारबाईच्या पायांना हात लावून तशी शपथ घेतली.

सकवारबाई म्हणाली, " ती म्हातारी म्हणजे आपल्या कारस्थानाची गुरुकिल्ली आहे. तिच्यावर तर आपली सारी मदार आहे. "

" ती कशी काय ? "

सकवारबाईनें म्हातारीकडून रामराजाविषयीं कळलेला वृत्तान्त गमाजीला निवेदन केला, व विचारलें, " आतां तुझ्या ध्यानीं सारें आलें असेल. त्या म्हातारीबरोबर तुला पानगांवीं जावयाचें आहे. "

" कशासाठीं ? "

" ऐक. सारें सांगत्यें. मीं त्या म्हातारीचा विश्वास संपादन केला आहे, व तिनें त्या राजपुत्राला माझ्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें आहे. तूं तिच्याबरोबर पानगांवीं जा, व राजपुत्राला स्वाधीन करून घे. पण तूं करावयाची ती खरी कामगिरी पुढेंच आहे. " सकवारबाई किंचित् चांचरून म्हणाली, " पण ती तुझ्या हातून पार पडेल का ? "

" कोणती कामगिरी ती सांगाना ! मी ती पार पाडावयाला एका पायावर तयार आहें. "

" ती बरी कीं वाईट, योग्य कीं अयोग्य याचादेखील विचार करतां उपयोगी नाहीं. "

" कबूल ! "

" कायरे ! तूं राजनिष्ठ आहेस ना ? "

" याची आपणाला अजूनही शंका आहे का ? "

" म्हणूनच भय वाटतें, तुझी राजनिष्ठा माझ्या कामगिरीच्या आड येण्याचा संभव आहे. नेभळ्या राजनिष्ठ माणसाच्या हातून माझें काम व्हावयाचें नाहीं, मला माझ्या ठायीं—एकट्या सकवारच्या ठायीं अनन्यसामान्य निष्ठा ठेवून जिवाभावाच्या मोबदल्यांत माझें काम करायला तयार असणारा निष्ठावंत सेवक पाहिजे आहे. "

" आईसाहेब ! मी राजनिष्ठ आहें याचा अर्थ, माझा राजा, माझी राणी, माझे आईबाप, माझा परमेश्वर सर्व कांहीं आपण आहां. "

"मीं काय वाटेल तें करायला सांगितलें तरी तें करायला तुझी तयारी आहे?"

"अर्थात्! आपण जरी मला सांगितलें कीं प्रत्यक्ष महाराजांवर हात उचलला पाहिजे, तरी कबूल! इतकेंच काय पण आपण जन्मदात्या पित्याच्या मानेवर घाव घालायला सांगितला तरी त्यालादेखील हा गमाजी मागें पाऊल घेणार नाहीं. आपल्या आज्ञेपलीकडे त्याला कशाचीही पर्वा नाहीं."

"तर मग ऐक. तो राजपुत्र माझा शत्रु आहे. तो मला राजा व्हावयाला तर नकोच आहे; पण तो जिवंतही राहतां कामा नये...." एवढें बोलून सकवारबाई क्षणभर थबकली. तिचें मन तिला अद्यापि बोंचीत होतें कीं आपण हें बरें करीत नाहीं. इतकी स्वतःची फंसवणूक करीत असतांना गमाजीवर तरी ती पूर्ण विश्वास कसा ठेवणार? ती खुनशी व स्वार्थी होती तरी भोळी नव्हती. मनुष्याची तिला बरीच चांगली पारख होती. गमाजी आपल्या शद्वाप्रमाणें वागावयाला तयार झाला तो आपल्यावर त्याची अनन्यसामान्य निष्ठा आहे म्हणून नव्हे, तर आपणापासून पुढें मागें मोठा स्वार्थ त्याला साधून घ्यावयाचा आहे म्हणून तयार झाला, इतकें ती जाणत होती. राजवटींत आपण आरंभिलेले बखेडे हे राजवटीच्या खऱ्याखुऱ्या हितकर्त्या जबाबदार सज्जनांना मुळींच रुचणारे नाहींत हें ओळखूनच तिनें आपल्या तंत्रानें वागण्याला तयार असलेल्या मत्सरी व स्वार्थसाधु लोकांचा संग्रह चालविला होता. आज थोरल्या राणीची थोडीशी सरशी आहे व ह्या राणीच्या तंत्रानें वागल्यास आपला कार्यभाग साधणार आहे, म्हणून हीं सारीं शितांसाठीं भुतें आपणासभोंवार जमा झालीं आहेत; यांना जर याहीपेक्षां मोठें आमिष दाखवून कोणीं फितुर करण्याचें मनांत आणलें तर तेंही सहज शक्य आहे; इतका दूरवरचा विचार करूनच सकवारबाईला वागावयाचें होतें. गमाजीकडून आणभाक पुन्हा पुन्हा तिनें घेतली खरी; पण न जाणो! मध्येंच प्रतिपक्ष जोरावला व हा फितूर त्या प्रतिपक्षाला वाढत्या स्वार्थबुद्धीनें फितूर झाला तर! राजपुत्राच्या नाशाचा चक्रव्यूह रचतांना ऐनवेळीं तसा प्रसंग पडल्यास त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा ठेवणें तिला आवश्यक वाटलें. तेवढ्यापुरती आपल्या धोरणाला कशी मुरड घालावयाची याचा एक क्षणभर विचार करून ती गमाजीला म्हणाली, "तो राजपुत्र मला जिवंत राहा-

वयाला नको आहे. याचें कारण तो कुलीन नसावा, त्याच्या नसांनसांतून भोंसल्यांच्या अस्सल राजवंशांचें रक्त खेळत नसावें, तो कोणीतरी तोतया तयार करण्यांत आला असावा, अशी मला जबरी शंका आहे. सासूबाईनीं गादीला वारस कोणीतरी बाहुलें निर्माण करून त्याच्या नांवावर राज्य करण्याच्या मोहाला बळी पडून महाराजांना विरोध करण्यासाठीं हें कांहींतरी कवटाळ निर्माण केलें असेल. एरव्हीं त्या इतके दिवस स्वस्थ बसल्याच नसत्या. असला कोणीतरी उपटसुंभ कंगाल मराठशाहीचा छत्रपति होऊन भोंसल्यांच्या राजवंशाचा विचका होऊं नये, यासाठीं माझी ही सारी खटपट चालली आहे. तो तोतया राजपुत्र त्याच्या अस्तित्वाचा बोभाटा होण्यापूर्वीं ह्या जगांतून नाहींसा झाला पाहिजे."

"एवढेंच ना ? ठीक आहे. तें काम माझें. मी त्या म्हातारीबरोबर जातों व त्या राजपुत्राला ताब्यांत घेऊन या कानाची त्या कानाला दाद लागण्यापूर्वीं त्याचा फन्ना उडवितों. मग तर झालें ना ?"

"आणि त्याबरोबरच त्या म्हातारीलाही तूं ह्या जगांतून नाहींशी केली पाहिजेस. ज्या शिडीनें आपण वर चढणार, ती शिडी तशीच उभी ठेवली तर आपले प्रतिस्पर्धी त्याच शिडीनें वर चढूं पाहावयाचे!"

"समजलों. बरें; पानगांवला जावयाचें तें केव्हां ?"

"आजच्या आज."

"आणि आपण सांगितल्याप्रमाणें नगरांतील वहिमी लोकांची नोंद करून आणली आहे त्याची काय वाट ?"

"ती कामगिरी मी यमाजीपंतांच्या हातून उरकून घेईन."

गमाजी जात्याच क्रूर असल्यानें त्याला क्रूरपणाची सत्ता गाजविण्याची ती सोन्याची संधी वांयां गेली असें वाटलें. पण त्यांत त्यानें मोठासा विषाद मानला नाहीं. मराठशाहीच्या उद्यांच्या वारसाचा जीव घेण्याची संधी त्याला आतां लाभणार होती, व पर्यायानें तोच सकवारबाईला राजमातेच्या पदाला पोंचविणार होता. त्या यशापुढें त्याला सामान्य नागरिकांची लांडगेतोड करून प्राप्त होणाऱ्या समाधानाची काय पर्वा ?

"ही कामगिरी सोळा आणे पार पाडल्याची खूण मला दाखवायला तूं आणली पाहिजेस." सकवारबाई किंचित् थांबून म्हणाली.

" ती खूण कोणती आणूं ? "

" त्या दोघांचींही मुंडकीं. "

" ठीक आहे. जशी आपली आज्ञा ! "

एवढें त्या दोघांचें बोलणें झाल्यावर गमाजी सकवारबाईचा निरोप घेऊन तसाच तेथून निघाला. तो गेल्यावरदेखील सकवारबाई आपल्याशीं विचार करीत होती, " मीं आरंभिलेलें हें कारस्थान बिनबोभाट तडीला जाईल काय ? गमाजी विश्वासघात तर करणार नाहींना ?–छे ! तो तरी विश्वासघात करणें शक्य नाहीं. माझ्या राजवटींत एवढें जबरदस्त आमिष असल्यावर तो विश्वासघात कशाला करील ?–मात्र पुढें मागें ताराबाई सासूबाईकडून मला विरोध होण्याचा संभव आहे. राजपुत्राचा घात झाला आणि त्याला कारण मी असें जर त्यांना कळलें पण तें कळणार कसें ?–ही गोष्ट कारभारी आतां भेट घ्यायला येतील तेव्हां त्यांच्या कानीं घालावी का ?–पण नको. माझ्या बाजूचे असणारे कारभारी झाले तरी प्रत्यक्ष राजपुत्राचा वध करण्याच्या माझ्या योजनेला ते मान्यता देतील असें सांगवत नाहीं. त्यांचा विरोध पेशव्यांशीं असेल; पण छत्रपतींच्या राजवंशाशीं ते थोडाच विरोध करतात!–मात्र आतां एक केलें पाहिजे. ताराबाई सासूबाईंना भेटून त्यांच्या मनाचा ठाव एकवार घेतला पाहिजे. आपण तसा तरी प्रयत्न करावा का ?–पण इतक्यांत नकोच. प्रथम गमाजी आपली कामगिरी आटोपून तर येऊंदे ! मग त्या कृत्याच्या निरवानिरवीचा प्रश्न तेवढा उरेल, तो कसा मिटवायचा तें जेव्हांचें तेव्हां पाहातां येईल. "

याप्रमाणें सकवारबाई स्वतःशीं विचार करीत बसली असतां जगजीवनराव प्रतिनिधि, यमाजी शिवदेव, गोविंदराव चिटणीस, बाबूजी नाईक व भगवंतराव अमात्य तेथें येऊन पोंचले. इतक्या अपरात्रीं ही कारभारी मंडळी किल्ल्यावर आलेली पाहून सर्व नोकरांचाकरांना वाटूं लागलें कीं आज कांहीं तरी विशेष घडामोडी होणार. एरव्हीं ही मंडळी वनवासवाडीला महाराजांकडे जाऊन त्यांची समजूत करण्याचें सोडून थोरल्या राणीसाहेबांपाशीं कां जमा झाली असती ?

" आईसाहेबांनीं इतक्या तांतडीनें आम्हांला कशाला बोलावणें पाठविलें ?" प्रतिनिधींनीं आंत येतांच नम्रतापूर्वक विचारलें.

पेशवाईचा पुनर्विकास

" बोलावलें अशासाठीं;—महाराज तर राज्याचा पसारा असा उघड्यावर टाकून वैतागानें वनवासवाडीला निघून गेले. आतां हें पोरावळें आपणला सांभाळलें तर पाहिजे ना? कीं पेशव्यांसारख्या शिरजोर चोरांपोरांना राजवटीचें रान मोकाट मोकळें सोडायचें?" सकवारबाईनें विचारलें. हा प्रश्न करतांना ती प्रत्येकाची चर्या नीट न्याहाळून अवलोकन करीत होती. "प्रतिनिधि, नाईक व मुतालिक माझ्या मुठींतले आहेत. मी रेडा व्याला म्हटलें तर ते त्याला पांच शेर दूध आहे असें म्हणायला कमी करायचे नाहींत; इतके त्यांचे विचार माझ्या विचाराशीं तंतोतंत जुळतात. पण प्रश्न काय तो अमात्य आणि चिटणीस यांचा आहे. ते दोघेही पेशव्यांच्या विरुद्ध असले तरी त्यांचा पंथ सर्वांच्याहून निराळा आहे." असें स्वतःशीं म्हणत तिनें जितक्या तत्परतेनें चिटणीस व अमात्य यांच्या चेहऱ्यांकडे निरखून पाहावें तितक्या उत्कटतेनें तिला स्वतःच्या मनांतील संशयाचें प्रतिबिंब त्या दोघांच्या चर्येवर दिसून यावें. तिच्या प्रश्नावर कोणीच कांहीं बोलेना; जो तो एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागला. परंतु त्या पाहण्यांतही पर्याय होता. प्रतिनिधि, नाईक, यमाजी शिवदेव हे एकमेकांडे सूचक दृष्टीनें पाहतां पाहतां चिटणीस व अमात्य यांचे चेहरे सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळीत होते. चिटणीस व अमात्यही तसेच एकमेकांकडे पाहत होते.

प्रकरण १३ वें

अपेशाचें खापर नको!

सकवारबाईनें त्या मंडळीच्या मूकवृत्तींतील गुंतागुंत ओळखून संशयित वृत्तीनें सर्वांना अनुलक्षून विचारलें, "तुम्ही कोणीच बोलत कां नाहीं? आजच्या या अनवस्था प्रसंगीं थोरल्या आबासाहेबांनीं परिश्रमपूर्वक जोपासून वाढविलेल्या मराठी राजवटीचा उन्हाळा झालेला तुम्हांला पाहवेल का? चिटणीस, तुम्ही राजवटीचे जबाबदार कर्ते पुढारी आहां. भोंसल्यांच्या राजवंशाशीं तुमचें आज कैक पिढ्यांचें जिव्हाळ्याचें नातें आहे. तुम्ही राजवटीच्या आबादानीसाठीं आजवर अपार कष्ट सोसले आहेत. आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं मीं राज्याची धुरा उचलली तर तें कर्तव्य पार पाडण्याच्या कामीं मला तुम्ही मनापासून हातभार लावणार कीं नाहीं?"

"आईसाहेब! हा प्रश्न अंमळ गहन आहे. याचें इतक्या तडकाफडकी उत्तर देतां येणें शक्य नाहीं." चिटणीस गंभीर वृत्तीनें उत्तरले.

तोंच अमात्य उद्गारले, "मला वाटतें, हा प्रश्न सोडविण्याला महाराज समर्थ आहेत; त्यांच्या अपरोक्ष येथें या वाटाघाटी करण्याचें कारण नाहीं."

"अशीं उडवाउडवीचीं उत्तरें ऐकण्यासाठीं मीं तुम्हांला इथें बोलावलें नाहीं." सकवारबाई किंचित् रागानें म्हणाली.

"पण याहून जिव्हाळ्याची सल्ला यांच्यापासून आपणांला मिळणें शक्यच नाहीं. ही बोलून चालून पेशव्यांच्या पक्षाची मंडळी! यांचा आपणाला काय उपयोग?" प्रतिनिधि म्हणाले.

"पंत! आपण आमच्या हेतूंचा हा विपर्यास करीत आहां. हें बोलणें आपणाला म्हणूनच शोभतें." चिटणीस सकवारबाईकडे वळून म्हणाले, "हेंच आईसाहेबांना आमच्यापाशीं बोलावयाचें होतें काय?"

सकवारबाई उत्तरली, " होय. पण तुमच्यासारख्या जबाबदार मुत्सद्यांच्या तोंडून अशा बेपर्वाईच्या उत्तराची मीं अपेक्षा केली नव्हती."

" पेशव्यांचीं पापें आतां चव्हाट्यावर येऊं लागलीं आहेत. त्यामुळें त्यांना चैन पडेनासें झालें असेल." यमाजी शिवदेव मध्येंच म्हणाले.

" पण पेशव्यांप्रमाणें चिटणीस काय किंवा अमात्य काय, कोणीही उपरे नाहींत. दोघांनींही पिढ्यान्‌पिढ्या राजवटीच्या आबादानीसाठीं आपलीं हाडें झिजविलीं आहेत. पेशव्यांसारखे आयत्या पिठावर रेघा ओढणारे ते नाहींत. म्हणूनच त्यांच्यापासून अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सहाय्य होईल अशी अपेक्षा मला होती."

" पण ती अपेक्षा आमच्या दुर्दैवानें फोल ठरत आहे.—"

चिटणिसांच्या तोंडचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वी सकवारबाई म्हणाली, " तें तुमचें नाहीं, माझें दुर्दैव !"

" कोळसा उगाळावा तितका काळाच ! खरें बोलावयाचें झालें तर आपणांला कडू बोलावें लागतें व त्यामुळें आईसाहेबांची अमर्यादा होण्याचा संभव फार !" चिटणीस म्हणाले.

" ही तुम्ही जाणूनबुजून आईसाहेबांची अमर्यादाच चालविली आहे. राज्यकारभारांत आईसाहेबांनीं मन घातलेलें तुम्हांला पाहवत नाहीं !" प्रतिनिधि म्हणाले. बोलतांना त्यांची चर्या मात्र बरीच गोरीमोरी झाली होती.

" अमात्य ! चला, आतां ज्यास्त वेळ इथें बसण्यांत अर्थ नाहीं." असें म्हणून चिटणीस आपल्या जाग्यावरून उठले व बाहेर जाण्याला निघतां निघतां पुन्हा सकवारबाईला म्हणाले, " आईसाहेब ! हे प्रतिनिधि म्हणजे आम्हां सर्व कारभारीमंडळाचें नाक ! त्यांना आपली जी गोष्ट मान्य पडली ती आम्हां सर्वांना मान्य आहे असें आपण धरून चालावें. यापेक्षां ज्यास्त या प्रसंगीं आम्हांला कांहींही बोलतां येत नाहीं."

एवढें बोलून चिटणीस थेट बाहेर पडले. त्यांच्या मागोमाग अमात्यही निघाले. त्यांनीं बाहेर जातांना सकवारबाईचा शिष्टपणानें निरोप घ्यावयाचा तोही घेतला नाहीं. त्यांना अंमळ दूर गेलेले पाहून प्रतिनिधि सकवारबाईला हळूच म्हणाले, " आईसाहेब, पाहिलेंत ? आपण नाणें वाजवून घेऊं लागलों कीं तें बद्द आहे किंवा नाहीं हें कळतें."

" हे दोघेही मला कोणत्याही परिस्थितींत करून विरोध करणारसें दिसतें. राज्याधिकार मीं माझ्या हातीं घेतलेले यांना पाहवणार नाहींत. आतां याला इलाज काय ?"

" मला विचाराल तर मी सांगेन कीं याला इलाज दुसरा तिसरा कांहीं नाहीं; तुम्ही बेलाशक नगरांत द्वाही फिरवून महाराजांच्या गैरहजेरींत राज्य-सूत्रें हातीं घेतल्याचें जाहीर करा. या गोष्टीला महाराजांची संमति आहे असेंही जाहीर केलें तरी हरकत नाहीं. राज्यकारभारांत हरघडी आमचें सहाय्य तुम्हांला आहेच !"

" पण हें महाराजांच्या कानीं गेल्यावर महाराज काय म्हणतील ?"

" महाराज कांहींदेखील म्हणणार नाहींत. आज महाराजांच्या मनाची जी चलबिचल झाली आहे. ती शांत होण्याला साहाजिकच कांहीं काळ लोटणार ! दरम्यान पेशव्यांशीं वितुष्ट आल्यामुळें पेशवेही कांहीं वखेडे उत्पन्न करण्याला कमी करणार नाहींत. पाहिजे तर उद्यांच पाहा ! महाराजांकडून निकडीचा खलिता पेशव्यांना गेलाच आहे; ते तांतडीनें धांवून येतील, आणि महाराज विमनस्क बनून वनवासवाडीला गेले आहेत असें कळतांच सर्वत्र आपला एकतंत्री अंमल बसवून पाणी जाळावयाला ते कमी करणार नाहींत. फार काय सांगूं आईसाहेब ! उद्यां पेशव्यांच्या एकतंत्री आमदा-नींत तुमच्या आमच्या कपाळीं बंदिवास आला नाहीं म्हणजे मिळवली !"

प्रतिनिधींनीं आग लावण्याच्या उद्देशानेंच वरचे उद्गार मुद्दाम काढले होते. तो त्यांचा हेतु मर्यादेबाहेर सफल झाला. सकवारबाई संतापून दांत—ओंठ खाऊन म्हणाली, " तो कालचा पोर पेशवा मला बंदिवान करणार काय ? बस्स ! त्याला राजधानींत येऊं द्या तरी खरा, कीं त्यांची हालचाल सुरू होण्यापूर्वींच त्याला मी पायबंद लावणार. आजवर पेशवे मराठशाही-वर चरले तेवढें पुरे झालें. आतां मात्र ही सकवार त्यांना एक क्षणभरही डोकें वर काढूं देणार नाहीं. त्याबद्दल महाराज रागावले तर त्यांची मी नीट समजूत घालीन."

" महाराज मुळींच रागावणार नाहींत. मला विश्वसनीय माहितीवरून असें कळतें कीं पेशव्यांवर महाराजांची पूर्ण इतराजी झाली आहे; व आतां महाराज आणि पेशवे यांची जी पहिली भेट होईल त्या भेटींतच पेशव्यांना

पेशवाईचीं वस्त्रें महाराजांच्या पायांपाशीं ठेवून पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणें दुबळेपणानें बाहेर पळावें लागेल. तेव्हांच महाराजांना आपण सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं राजवटीचें रक्षण केलें असें कळलें तर महाराज न रागावतां उलट संतोष पावतील व स्वखुषीनें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं सोंपवतील."

"मग हें ठरलें ना? मला राज्यकारभार करण्याच्या कामीं तुमचा पूर्ण पाठिंबा आहे ना?" सकवारबाईनें विचारलें.

"नाईक! यावर तुमचें मत काय?" प्रतिनिधींनीं नाइकांकडे वळून विचारलें.

आपण इतका वेळ नाइकांशीं मुळींच बोललों नाहीं, हें नाइकांच्या जिवाला लागलें असेल असें धूर्त सकवारबाईच्या ध्यानीं येऊन ती आपली चूक सांवरून घेण्याच्या उद्देशानें म्हणाली, "नाईक माझें मन ओळखतात व मी नाइकांचें मन ओळखतें. त्यांच्यामाझ्यांत दुमत होणें कधींच शक्य नाहीं. मला अजूनही शंका वाटते ती तुम्हां इतरांविषयीं!"

"नाईक आतां बोलूनचालून भंगलेले देव आहेत. भंगलेल्या देवाला कोण भजणार? निर्माल्यांतल्या फुलाला कौतुकानें कोण शिरीं धारण करणार? तथापि आईसाहेब मला अजूनही इतका मान देतात याबद्दल त्यांचें उतराई कसें व्हावें हेंच मला कळेनासें झालें आहे. आईसाहेबांच्या प्रत्येक गोष्टीला माझी पूर्ण सहानुभूति आहे." नाईक आपल्या नेहमींच्या पद्धतीनें आंतल्या गांठीनें गंभीर चेहरा करून म्हणाले.

"ठीक आहे. उदयीक मोठ्या पहांटेला ही गोष्ट नगरांत सर्वत्र जाहीर केली जाईल अशी तजवीज करा. जाहीरनाम्याची काय शब्दयोजना करायची ती तुम्ही करालच." सकवारबाई म्हणाली.

"हो! तें सर्व काम नाइकांच्या संमतीनें मी पार पाडतों. त्याबद्दल काळजी नको." प्रतिनिधि उद्गारले.

"आणखी एक गोष्ट करावी कीं न करावी असें मघांपासून माझें मन द्विधा झालें आहे. मघां ते दोघे राहु केतु गेले ना? त्यांची ती मस्तवालपणाची वर्तणूक मला मुळींच पसंत पडली नाहीं. त्यांना शासन होणें अवश्य आहे असें मला वाटतें. त्यांना रातोरात कैद करून जर इथें गडावर नीट

बंदोबस्तानें आणून डाम्बून ठेवलें तर? त्यामुळें आपला मार्ग सोपा होईल कीं अवघड होईल?"

चिटणीस व अमात्य यांना कैद करण्याची कल्पना सकवारबाईला सुचली ती केवळ त्या दोघांच्या त्या बैठकींतील वर्तनामुळें असेंच कांहीं नव्हे. चिटणीस हे अत्यंत निस्पृह व महाराजांना कोणत्याही प्रसंगीं निःपक्षपातीपणानें सल्ला देणारे असल्यानें ते आपल्या कारस्थानाला फांटे फोडावयाला कमी करणार नाहींत हें तर भय सकवारबाईला होतेंच. पण शिवाय राजपुत्राचा विषय सकवारबाईच्या डोक्यांत प्रामुख्यानें घोळत होता. निक्षून बोलण्याची पाळी आली तर प्रतिनिधि, नाईक ही मंडळी योग्यायोग्याचा विचार न करतां आपल्या बाजूनें बोलतील अशी तिला खात्री वाटत होती. तसे प्रसंग आतां एकामागून एक क्रमानें येणारच होते. सकवारबाई राज्याधिकार धारण करूं पाहत होती हा एक प्रसंग अगदीं समोर दत्त म्हणून उभाच होता. त्याप्रमाणेंच नानासाहेब पेशवे पुण्याहून आल्यावर त्यांना पेशवेपदावरून हुसकून लावावयाचें होतें. राजपुत्राच्या नाशाची आसुरी कामगिरी सकवारबाईनें जी गमाजीच्या माथीं मारली होती, तीही एक मोठा प्रसंगच होता. चिटणिसांनीं पेशव्यांना स्थानभ्रष्ट करण्याच्या कामीं कधींच होकार दिला नसता. अमात्यांनाही ती उलथापालथ मानवली नसती. शिवाय राजपुत्राचें संगोपन आजवर ताराबाईच्या वतीनें अमात्यांनींच केलें होतें. त्या राजपुत्राचा नाश राणीनें केला अथवा नाश करण्याचा प्रयत्न केला अशी वार्ता जर तें कार्य पुरें होण्यापूर्वी षट्कर्णी झाली, तर अमात्य ती ऐकून स्वस्थ बसणारे नव्हते. त्यापेक्षां त्या दोघांनाही कैदेंत डाम्बून ठेवणें योग्य असें सकवारबाईच्या मनांत आलें.

पण प्रतिनिधींना भूत–भविष्य–वर्तमान परिस्थिति डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत होती. ते राणीच्या तंत्रानें वागायला तयार झाले होते याचें कारण पेशव्यांवर महाराजांची इतराजी झाली असल्यानें आतां पेशवेपद कांहीं त्यांच्याकडे कायम टिकत नाहीं, अशी प्रतिनिधींना खात्री वाटत होती. ती एक गोष्ट फळाला येण्याच्या कामीं–पेशव्यांची राज्यकारभारांतून उचलबांगडी करण्यापुरता सकवारबाईच्या चळवळीचा उपयोग करून घेण्याचा त्यांचा मानस होता. परंतु असे परस्पर बखेडे निर्माण करून राज्यकारभारांत गोंधळ माजवून पेशव्यांना

जेरीला आणणें व आपलें महत्त्व वाढविणें जितकें सोपें आहे तितकें चिटणीस, अमात्य वगैरे कारस्थानी मंडळीला बाजूला लोटणें सोपें नाहीं, हें प्रतिनिधि पूर्ण ओळखून होते. त्यांना सकवारबाईचा विचार अविचारीपणाचा वाटला. ते तिला म्हणाले, " तूर्त आपण चिटणीस व अमात्य यांच्या वाटेला जाऊं नये. एकदां आपली घडी बसल्यावर ते आपोआप सुतासारखे सरळ येतील. आणि नच आले तर मग आपणाला त्यांचें पारिपत्य करणें आजच्यापेक्षां सोपें जाईल. "

सकवारबाईला प्रतिनिधींची सल्ला पटली नाहीं. ती म्हणाली, " तुम्ही कारभारी, ते कारभारी. सर्वच एका माळेचे मणी. तुम्हांला त्यांची बाजू जेव्हां तेव्हां राखावीशी वाटणारच ! आतां नाईक काय सांगतील तें खरें." सकवारबाई म्हणाली.

नाइकांना राजकारण तितपतच कळत होतें. त्यांना सावकारी कशी करावी तेवढें माहीत. आतां, चिटणीस व अमात्य यांना अशा वेळीं दुखवणें हिताचें नाहीं, एवढेंही न कळण्याइतके ते राजकारणांत अप्रबुद्ध होते असेंच केवळ नाहीं. चंदनवृक्षाच्या मुळांना चिकटलेल्या मातीला थोडासा तरी चंदनाचा वास यावयाचाच. नाईक मध्येंच तोंड घालून म्हणाले, " माझें मत आई-साहेबांच्या मताशीं तंतोतंत जुळतें. "

" काय जुळतें ? नाईक, सावकारी आणि राजकारण या दोन्ही गोष्टी तुम्ही एका मापानें मोजूं पाहतां, पण तें खरें नाहीं. आम्ही इतकीं वर्षें राज-कारणांत प्रत्यक्ष खपत आहोंत. आम्हांला परिस्थितीची चांगली पारख आहे." प्रतिनिधि सकवारबाईकडे वळून म्हणाले, "आईसाहेब ! राजकारणाचे डाव-पेंच संधी साधूनच खेळावयाचे असतात. "

सकवारबाई म्हणाली, " ठीक आहे, तुमच्या मताप्रमाणें होऊं द्या. खरें कीं नाहीं नाईक ? "

" तें सर्व बरोबर आहे. परंतु मी स्पष्ट बोलतों याबद्दल क्षमा असावी. आईसाहेब आतां राज्यकारभार पाहूं लागणार, आणि तुम्ही प्रतिनिधि म्हणून मान्यतेला चढणार, यांत मला आनंदच आहे. तुम्ही मध्यें असल्यावर पेश-व्यांचा परस्पर कांट्यानें कांटा निघून राजवर्टींतील एक मोठा जिवंत विरोध अनायासें बाजूला लोटला जाणार ही देखील एक समाधानाची गोष्ट आहे.

परंतु आईसाहेबांच्या नव्या अमदानींत रिकामें होणाऱ्या पेशवेपदावर पेशवा म्हणून कोणाची नेमणूक होणार हें मला प्रथम कळूं दे, म्हणजे त्याप्रमाणें मला माझें पुढील धोरण आंखतां येईल. " नाइकानीं प्रतिनिधींना हटकलें. नाइकांच्या या प्रश्नाला इतिहास होता. थोरल्या बाजिरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईपद कोणाला द्यावें असा प्रश्न उपस्थित झाल्यापासून नाइकांचा पेशवाईवर डोळा होता. दरम्यान नानासाहेब पेशवे होऊन नाइकांचें दरबारांतील प्रस्थ पुष्कळच कमी झाल्यामुळें पेशवाईप्राप्तीची नाइकांची महत्त्वाकांक्षा जरी मृतप्राय झाली होती, तरी ती ठार मेली नव्हती. डबक्यांतील सांचलेल्या पाण्यावर ज्याप्रमाणें डांस घोंघावूं लागतात त्याप्रमाणें सकवारबाईनें राजवटींत बखेडे माजविण्याला सुरवात केलेली पाहून नाइकांच्या त्या महत्वाकांक्षेला पुन्हा नवे अंकुर फुटूं लागले.

" तुमचें म्हणणें काय ? नानासाहेबांच्या पाठीमागून पेशवेपद तुम्हांला दिलें पाहिजे एवढेंच ना ? तें तुम्हांला मिळेल. त्याची काळजी नको " सकवारबाई म्हणाली.

" मिळेल म्हणजे मिळालेंच पाहिजे. त्या पदावर माझाच खरा हक्क आहे. रघूजीबाबा भोंसल्यासारख्या मातबरांचा मला पूर्ण पाठिंबा आहे. आणि पंतप्रतिनिधींसारखे थोर लोकही माझ्याविरुद्ध जातील असें मला वाटत नाहीं. "

आपण नाइकांना पेशवे करण्याच्या विरुद्ध जाऊं नये म्हणून नाईक आपल्या तोंडाला हें मधाचें बोट लावीत आहेत हें प्रतिनिधींनीं तेव्हांच ओळखलें. परंतु असल्या भूलथापांना भाळण्याइतके ते साधे नव्हते. ते नाइकांचा वकूब ओळखून होते. पेशवेपद उभ्या जन्मांतही नाइकांच्या कपाळीं नाहीं हें त्यांना पूर्णपणें माहीत होतें. परंतु अशीं माणसें प्रत्यक्ष करामतीनें कांहीं कार्यभाग करूं शकलीं नाहींत तरी लावालावी व फितुरी करून कार्यनाश हटकून करूं शकतात हें प्रतिनिधि ओळखून होते. म्हणूनच तूर्त 'गप्प बसावयास काय घेशील ' या न्यायानें नाइकांशीं वागण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. त्यांनीं लगेच 'हो ' ला 'हो ' ठोकून दिली. आणखी थोडा वेळ याच बाबतींत वाटाघाट होऊन पहांटेच्या प्रहरीं पूर्वी ठरल्याप्रमाणें राणी सकवारबाई मराठेशाहीची सर्वाधिकारी झाल्याचें जाहीर करण्याचें नक्की ठरलें.

पेशवाईचा पुनर्विकास

"हें आमचें कृत्य ज्यांना मुळींच पसंत पडणार नाहीं असे विघ्नसंतोषी लोक नगरांत बरेच आहेत. त्यांची खबर तुम्हांला यमाजीकडून मिळाली असेलच! ते लोक ही वार्ता ऐकून नव्यानें बखेडे माजविण्यासाठीं कंबर कसावयाला कमी करणार नाहींत. त्यांनीं बखेडे करावे व आपण ते मोडीत बसावें, एवढा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षां त्यांना आपल्या कारभाराची घडी नीट जमेपावेतों कैदेंत ठेवणेंच इष्ट असें मला वाटतें. त्यांतले जे कोणी प्रत्यक्ष गुन्हेगार असतील त्यांना तडकाफडकीं शासन होणेंही अवश्य आहे." सकवारबाई म्हणाली.

"ती सर्व कामगिरी आम्ही आमच्या मुतालिकांच्या माथीं मारतों." प्रतिनिधि म्हणाले.

"विरोधकांचा बींमोड झालाच पाहिजे. शेत पेरल्यावर त्यांत हरळी उगवून शेताची नासाडी व्हावयाची, त्यापेक्षां हरळीच्या मुळ्या जमीन नांगरतांनाच उपटून टाकलेल्या चांगल्या." नाइक मध्येंच म्हणाले.

याप्रमाणें त्या रात्रीं अजिमतारा किल्ल्यावर जें कुटिल कारस्थान रचिलें गेलें, त्याची अंमलबजावणीही त्याच क्षणीं सुरू झाली. सकवारबाईनें किल्ल्यावरील चौकीपहाऱ्यांवर आपल्या नव्या अंमलाची वर्दी ताबडतोब पोंचविली, व जो कोणी अन्यथा वागेल त्याचें डोकें मारलें जाईल अशी कठोर शिक्षाही फर्मावण्यांत आली. वास्तविक सकवारबाईचा हा नवा अंमल उजाडत्या दिवसापासून जाहीर व्हावयाचा होता. परंतु यमाजी शिवदेवांना तेवढा धीर तरी कोठचा निघावयाला? त्यांनीं त्या बाबतींत प्रतिनिधींना सकवारबाईदेखत सल्ला दिली, "आपणाला नडणारीं माणसें ही बातमी या कानची त्या कानाला कळण्यापूर्वींच काबूंत आणलेलीं चांगलीं. नाहींपेक्षां थोडासा वाव सांपडतांच त्यांच्या अकलेला डेळे फांटे फुटावयाचेच."

हुकूम राणी सकवारबाई करणार, व त्याची अंमलबजावणी मुतालिक करणार! परस्पर संन्याशाच्या हातून साप मारावयाला प्रतिनिधींचें काय किंवा नाइकांचें काय, कोणाचें काय जातें? बाजू अंगाशीं येऊंच लागली तर परस्पर त्या आईसाहेब व ते मुतालिक; बोट दाखविलें कीं काम झालें. असा दूरवरचा विचार करून त्या दोघांनीही यमाजी शिवदेवांच्या योजनेला संमति दिली.

त्या रात्रौ त्या कूटमंडळापैकीं कोणालाच झोंप अशी लागली नाहीं. सकवारबाई आपला अंमल उदयीक जारी झाल्यावर पुढें काय, याचा विचार करीत आपल्या महालांत अलोचन जागत बसली होती; तर प्रतिनिधि व नाईक ह्या नव्या अंमलांत पेशव्यांना बेमालूम पायबंद लावून त्यांची मराठशाहींतून कायमची उचलबांगडी कशी करतां येईल ह्या भावी कारस्थानाचे धागेदोरे जोडून राजकारणाचा नवा पाटव रचण्यांत गढून गेले होते. यमाजी शिवदेव वाहिमी लोकांची धरपकड करण्यांत गुंतले होते. गमाजी त्यांचा निरोप घेण्यासाठीं व रात्रौ किल्ल्यावर काय काय खलबतें झालीं तीं जाणण्यासाठीं वाड्यांत वाट पहात बसला होता. त्यानेंही पित्याला धरपकडीच्या कामीं चांगलाच हातभार लावला.

प्रकरण १४ वें

मुत्सद्यांना पडलेला पेंच

भर रात्रौ नगरांतल्या एकेकाला वेंचून पकडून मारहाण करून तुरुंगांत लोटण्याचा सपाटा सुरू झाला, तेव्हां सर्वत्र हलकल्लोळ उडाला. मुतालिक पितापुत्रच राजघराण्यांतील अस्वस्थतेचा फायदा घेऊन ही अंदाधुंदी माजवीत आहेत असें बहुतेकांना वाटलें. त्यावेळीं अनेकांनीं त्या पितापुत्रांना कसून विरोधही केला, व थोरल्या राणीसाहेबांपाशीं दाद लावून घेण्याचेंही अनेकांनीं ठरविलें.

पण उजाडत्या पहांटेलाच नगरांत सर्वत्र राणी सकवारबाईचा अंमल जारी झाल्याची जाहीरखबर मिळाली, आणि त्याच जाहीरखबरीअन्वयें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना राणीसाहेबांनीं पेशवेपदावरून काढून टाकल्याचेंही जाहीर झालें. तेव्हां मात्र सर्वांची खात्री झाली कीं हें सारें राणी सकवार–बाईचें कारस्थान आहे. अर्थात् राणीसाहेबांकडे दाद मागण्याचा मार्ग त्यामुळें अजिबात खुंटला. बरें; महाराजांच्या पायांपाशीं दाद मागावी तर ते वैतागून वनवासी झालेले! अशा स्थितींत असहाय बनलेल्या नागरिकांना ह्या एकंदर परिस्थितीविषयीं तीव्र असंतोष व्यक्त करण्याचा तात्कालिक असा एकच मार्ग मोकळा होता. त्या मार्गाचा त्यांनीं अंगिकार केला. त्यांनीं नगरांत सर्वत्र हरताळ पुकारला. पेठेंतलीं सारीं दुकानें इथून तिथून बंद! सर्वच शुकशुकाट! भाजीपाला, दाणागोटा, कापडचोपड एक पैशाचें तरी मिळेल, तर शपथ! त्या शुकशुकाटाला अपवाद म्हणून हजारों नागरिक बोडक्यानें दाद मागण्यासाठीं सायंकाळीं किल्ल्यावर गेले, तेवढीच काय ती गर्दी!

सकवारबाई रात्रीपासूनच पुढें उद्‌भवणाऱ्या परिस्थितीकडे डोळ्यांत तेल घालून पाहत होती. नानासाहेब पेशवाईपदावरून दूर झाल्यावर पुढें पेश-

वाईचा कारभार कसा चालवावयाचा हा प्रश्न त्यामुळें तांतडीनें सोडविणें प्राप्त झालें; त्याची व्यवस्था लावण्यासाठीं सकवारबाईनें प्रतिनिधींना बोलावणें पाठविलें. तो दुसऱ्या सकवारबाईचा निरोप घेऊन जातांना किल्ल्याच्या मुख्य दरवाजांतून आंत जाऊं शकला. पण प्रतिनिधींना बरोबर घेऊन येईतों माचीच्या पायथ्यापासून तों किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रंजल्या गांजल्या नागरिकांची एवढी तुफान गर्दी लोटली कीं त्यांतून मुंगीलाही आंत रीघ मिळणें अशक्य होऊन बसलें. मग माणसाला रीघ कोठून मिळेल ! अखेर प्रतिनिधींना रंगमहालांतील भुयाराच्या मार्गानें वर जावें लागलें.

" पंत ! लोक फार खवळले आहेत नाहीं ? " सकवारबाई म्हणाली.

" होय. खवळले आहेत खरे. "

" काय बरें याचें कारण ? ही लोकांची स्वतःची ऊर्मि उसळते आहे कीं त्यांना कोणी चिथावणी देणारें त्यांच्या मागें आहे ? "

" चिथावणी देणारे असणारच. पेशव्यांच्या तर्फेची भुतावळ कांहीं ह्या साताऱ्यांत थोडीथोडकी नाहीं. "

" म्हणूनच पेशव्यांना पेशवेपदावरून दूर केल्याचें इतक्या तांतडीनें जाहीर व्हायला नको होतें. " सकवारबाई म्हणाली.

प्रतिनिधि ते उद्गार ऐकून नापसंतीच्या वृत्तीनें म्हणाले, " माझें प्रथमपासून तसेंच मत होतें. आपण काल अमात्य व चिटणीस यांचें पारिपत्य करावयाला तयार झालां असतांना मी त्याविषयीं अनुकूल बोललों नाहीं याचें कारण तरी तेंच. ते आपले प्रतिस्पर्धी असले तरी सामर्थ्यवान आहेत ना ! त्यांचें रयतेवर वजन आहे. आज त्यांच्या हांकेला जितके लोक धावून येतील तितके आमच्या हांकेला कांहीं धावून यावयाचे नाहींत. बहुतेक सर्व लोक त्यांना वश, व परक्या दरबारीं मराठाशाहीचे आजचे मुखत्यार म्हणून अग्रपूजेचा मानही आज त्यांनाच मिळतो. शिंदे–होळकर वगैरे मातबर सरदार म्हणजे त्यांचे केवळ डावे उजवे हात; व भोंसले वगैरे इतर बुद्रुक लोक घेतले तरी तेही त्यांचे मनांतून प्रतिस्पर्धी असले तरी जनांत त्यांनाच वचकून वागणारे. पेशवे एकदां पडले म्हणजे त्यांच्या छातीवर नाचावयाला सारे धावून येतील. पण ते उभे आहेत तोंवर उघड उघड त्यांना विरोध करण्याचें सामर्थ्य खुद्द महाराजांच्यादेखील अंगीं नाहीं. आणि तसें करणें राजवटीच्या

चिरस्थायीपणाच्या दृष्टीनें इष्टही नाहीं. परंतु आपणाला तें योग्य वाटलें, तिथें मी काय करणार?"

"मला तें मुळींच योग्य वाटलें नाहीं. मला जर तुम्ही अगोदर विचारलें असतें तर मी नको म्हणूनच सांगितलें असतें."

"म्हणजे आपणच नाइकांना तशी संमति दिली ना?"

"कोण सांगतें? मी तर तुमच्या देखतच दोघांनाही सांगितलें कीं एकमेकांच्या विचारानें काय करायचें तें करा!"

"त्यांनीं तर मला सांगितलें कीं आपणाला सर्व कांहीं थोरल्या आईसाहेबांनीं सांगितलें आहे."

"अस्सें! बायकोमाणूस पडल्यें म्हणून माझा असा फायदा घेऊं पाहतात काय? थांबा म्हणावें तुम्हांला पेशवा करत्यें!"

सकवारबाईचे हे उद्गार ऐकून प्रतिनिधींना डोकीवरील ओझें खांद्यावर उतरल्यासारखें वाटलें. सकवारबाई राजकारणाची सूत्रचालक झाल्यावर नाइक पेशवे झाले तर ते सर्वस्वी तिच्याच तोंडानें पाणी पिणार, व तीं दोघें एक विचारानें वागूं लागून आपण पुन्हा एकटेच बाजूला पडल्यासारखे होणार! तें प्रतिनिधींना नको होतें. सकवारबाईला कोणत्याही प्रकारें फंसविण्याचा त्यांचा हेतु नव्हता. पण स्वतःच्या पदरीं नामुष्की घेण्यालाही ते तयार नव्हते. राणी राजकारणाच्या दृष्टीनें अदूरदर्शी असल्यानें तिला इतके दूरवरचे डावपेंच कळणें शक्य नव्हतें. आपल्या होला हो ठोकून देईल तोच खरा आपला कैवारी अशी तिची आपल्या माणसांविषयींची व्याख्या होती. म्हणूनच नाइकांचा पुनः जम बसेल काय असें प्रतिनिधींना भय वाटत होतें. तें आतां अनायासें दूर झालें. सकवारबाई पुढील राजकारणाविषयीं प्रतिनिधींपाशीं वाटाघाट करणार होती. पण तेवढी उसंत तिला मिळाली नाहीं. किल्ल्यावरील देवडीवाल्यानें येऊन वर्दी दिली, "बाहेर तुफान गर्दी गाऱ्हाणें सांगण्यासाठीं लोटली आहे ती कशी हटवावयाची कांहीं कळत नाहीं."

सकवारबाई किंकर्तव्यमूढ होवून प्रतिनिधींच्या तोंडाकडे पाहूं लागली.

प्रतिनिधि म्हणाले, "लहानशी चूक जरी झाली तरी तिचा घोर परिणाम होतो तो हा असा. नाइकांचे उपद्व्याप आपणांला आणखी कोठवर भोंवणार न कळे! आज उभ्या नगरांत कडकडीत हरताळ पडला आहे."

देवडीवाला म्हणाला, " आणि लोकही फारच खवळलेले दिसतात. हातघाईवर येतात कीं काय अशीदेखील भीति आहे. "

" हातघाईवर येतात ! लोकांना काय वाटतें ? महाराजांपाशीं पोरखेळ चालतात तसे माझ्यापाशीं चालतील म्हणून ? प्रतिनिधि, सामोपचारानें जर गर्दी हटत नसेल तर हत्ती घोडे घालून त्यांची पांगापांग करून टाका. " सकवारबाई संतापानें आंतल्याआंत धुमसत उद्गारली. गर्दीची वार्ता ऐकून वास्तविक तिच्या तोंडचें पाणी पळालें होतें; अवघ्या अर्ध्या दिवसांत परिस्थिति आपल्याला अनावर झाली आहे हें तिला कळून चुकलें होतें. परंतु लोक आपल्या आज्ञा मानावयाला तयार नाहींत हा अपमान तिला दुस्सह झाला होता. क्षणभर थांबून ती पुनः प्रतिनिधींना म्हणाली, " ही सर्व चिटणीस आणि अमात्य यांची कारवाई आहे हें मी ओळखतें. पण त्यांना म्हणवें सकवारबाईशीं गांठ आहे. संभाजी राजांनीं बाळाजी आवजी चिटणिसांना हत्तीच्या पायाशीं बांधून ठार मारलें, याबद्दल लोक त्यांना नांवें ठेवतात. पण मला आतां वाटूं लागलें आहे त्यांनीं एकट्या चिटणिसांना ठार मारून त्यांचा बाकीचा वंश जिवंत ठेवला हीही मोठी चूक केली. विषवृक्षाच्या नुसत्या फांद्या तोडून भागत नाहीं; त्याची पाळेंमुळें खणून काढावीं लागतात. माझा थोडा जम बसूं दे, कीं मी चिटणिसांचें नांव देखील मराठेशाहींत जिवंत राहूं द्यायची नाहीं. तसेच ते अमात्य ! आपल्या तर्फेचा नवा छत्रपति घडविण्याचे त्यांचे उद्योग आजवर गुप्तपणें चालले आहेत. त्यांची मला दाद नाहीं असें त्यांना वाटत असेल ! परंतु त्यांनाही म्हणावें कीं या सकवारबाईच्या पाठीला डोळे आहेत. भूत, भविष्य, वर्तमान तिन्ही काळांतील आमच्या मुत्सद्यांची सर्व कारस्थानें मला कळतात. आणि म्हणूनच मी नेहमीं पायांतल्या वहाणा पायांत ठेवण्याची खबरदारी घेत असतें. "

सकवारबाई आवेशाच्या भरांत बोलून गेली खरी; परंतु नव्या छत्रपतींचा उल्लेख होतांच प्रतिनिधींची चर्या गोरीमोरी झालेली पाहून तिला पश्चाताप वाटूं लागला कीं आपण इतक्यांतच तो रहस्यभेद केला हें बरें केलें नाहीं. पण एकदां सुटलेला बाण पुन्हा माघारा थोडाच घेतां येतो ?

" आपण नव्या छत्रपतींविषयीं काय काय म्हणालांत तें माझ्या नीटसें ध्यानीं आलें नाहीं. " प्रतिनिधि म्हणाले.

सकवारबाई मनांतल्या मनांत संकोचल्यासारखी झाली. जी गोष्ट प्रतिनिधींसारख्या पाताळयंत्री मुत्सद्याच्या कानांवर जावयाला नको होती, ती आपल्याच चुकीमुळें गेली याचा तिला कमालीचा विषाद वाटूं लागला. ती आपली ढांसळलेली बाजू सांवरून घेण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, "महाराजांच्या पश्चात् गादीला वारस कोणाला करावें याविषयीं लांडे कारभार करणाऱ्या मंडळीपैकीं अमात्य हे एक आहेत. त्यांना वाटतें कीं, आपल्या वर्गीचा एखादा मुलगा महाराजांना दत्तक दिल्यानें भविष्यकाळीं आपली मराठ्यांच्या राजवटींत चांगलीच पोळी पिकेल...."

इतक्यांत दुसरा एक देवडीवाला घाईघाईनें तेथें येऊन म्हणाला, "आईसाहेब, दंगेखोर लोकांनीं दरवाजावर मारे हलकल्लोळ माजविला आहे. आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लागल्याखेरीज आपण कांहीं केल्या माघारे जाणार नाहीं असा त्यांचा निर्धार दिसतो. ते बाहेरच्या माणसांना आंत येऊं देत नाहींत आणि आंतल्या माणसांना बाहेर जाऊं देत नाहींत. त्यामुळें सारी रहदारी खुंटल्यासारखी झाली आहे."

सकवारबाई जास्तच चिडून म्हणाली, "लोक इतके बेताल बनले काय? बस्स! किल्ल्यावरून तोफांची सरबत्ती सुरू करा आणि सर्व दंगेखोरांना चेंचून भाजून टाका. सारें नगर बेचिराख झालें तरी बेहेत्तर, पण ह्या लोकांना ह्या सकवारबाईचा इंगा कळलाच पाहिजे."

"आईसाहेब! असें भडकलेल्या आगींत तेल ओतण्यांत काय अर्थ? शांतपणानें साऱ्या गोष्टी केल्या पाहिजेत. लोकक्षोभाच्या या पहिल्या वावटळींतच आपण जर इतक्या बावरून गेलां तर पुढें कसें होणार? खरे प्रसंग ते आपणांवर पुढेंच यावयाचे आहेत. त्या प्रसंगांना तोंड देण्याची तयारी आपण एव्हांपासून केली पाहिजे." एवढें बोलून प्रतिनिधि एकदम थबकले. दोन देवडीवाले आपल्या शेजारीं उभे आहेत, याचें इतका वेळ त्यांना भानच नव्हतें. त्यांच्या तोंडून आपल्या खलबतांचा बभ्रा होईल हें आतां अकस्मात् त्यांच्या ध्यानीं आलें. त्या दोघांकडे पाहत सकवारबाईला म्हणाले, "ह्या दोघांना जाऊं द्या."

"पण लोकांची ही गर्दी कशी आवरणार?" सकवारबाईनें विचारलें, "तुम्ही मुरलेले मुत्सद्दी आहां. तुम्हीच आतां काय तो उपाय सुचवा."

" प्रथम त्यांना जाऊं द्या; मग आपण बोलूं. " प्रतिनिधि त्या देवडीवाल्यांकडे वळून म्हणाले, " जारे तुम्ही ! आईसाहेब इतक्यांत लोकांची काय दाद लावायची ती योग्य प्रकारें लावतील असें त्यांना सांगा म्हणजे झालें. "

देवडीवाले सकवारबाईच्या तोंडाकडे पाहत निघून गेले. त्यांची अपेक्षा कीं सकवारबाई आपणाला कांहीं तरी आज्ञा करील. परंतु ती कांहींच बोलली नाहीं !

" आईसाहेब ! शेण पडलें तें माती घेतल्याखेरीज उठावयाचें नाहीं. हा लोकक्षोभ शांत करण्यासाठीं आपण एक पाऊल तरी माघार घेतलीच्च पाहिजे. त्या देवडीवाल्यांच्या देखत मी बोललों नाहीं; कारण पहिल्याच्च सपाट्याला राणी वठणीवर आली असा बोभाटा व्हावयाला नको. " प्रतिनिधि म्हणाले.

" मी माघार घेऊं म्हणजे काय करूं ? चिटणीस आणि अमात्य यांना शरण जाऊं ? "

" असें कुठें मी म्हणतों ? "

" तर काय करूं ? "

" आपण वहिमावरून रात्रौ पकडलेल्या सर्व लोकांना ताबडतोब सोडून दिलें पाहिजे. म्हणजे तेवढ्यापुरता तरी लोकक्षोभ शांत होईल. आपणाला माझी सल्ला पटली तर पाहा. "

" बरें आहे. मी त्या गोष्टीचा विचार करून काय तें करत्यें. तुम्ही असें करा, आतां खालीं जातांच नाइकांना निरोप पाठवून माझ्याकडे यायला सांगा. "

प्रतिनिधि ' बरें आहे ' असें म्हणून तेथून खालीं जावयाला निघाले. सकवारबाईच्या उत्तरानें त्यांचें समाधान मुळींच झालें नाहीं. उलट आपण नाइकांविषयीं इतकें सांगूनदेखील ही बाई अजून त्यांच्याच तंत्रानें वागूं पाहते त्या अर्थीं यांत आपणासारख्याला यश न येतां नांव मात्र फुकट बद्दू व्हावयाचें असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांनीं जातां जातां आपल्या मनाशीं निर्धार केला, " हा सारा पोरकटपणा थांबण्याला आणि पेशव्यांचा कांटा आपल्या वाटेंतून परस्पर दूर व्हावयाला उपाय म्हटला म्हणजे एकच्च, महाराजांपाशीं जाऊन एकतर्फी अनुसंधान काय राखतां येईल तें राखावें. "

प्रकरण १५ वें

बुरखेवाली

प्रतिनिधि निघून गेल्यावर सकवारबाई एकटीच चिंता करीत बसली असतांना एका घटकेंत पुन्हा दोन वेळां देवडीवाले बाहेरील दंग्याची खबर घेऊन आले. सकवारबाई आधींच मनस्वी संतापलेली होती; तशांत दंग्याची कटकट ऐकून तिला जास्तच चेव आला. त्या भरांत तिनें किल्लेदाराला बोलावून आणून आज्ञा केली, " किल्लेदार ! ताबडतोब हत्ती घोडे लोकांवर घालून गुलामांची खाशी खोड मोडा. "

किल्लेदाराला प्रश्न पडला; आईसाहेब आवेशाच्या भरांत बोलून गेल्या खऱ्या ! पण आपणदेखील तसा अविचार कसा करावा ?" तो जागच्या जागीं रेंगाळत उभा राहिला.

" तुम्हांला ऐकूं येत नाहीं काय ? मीं काय सांगितलें ? "

" आईसाहेब ! मला ऐकूं येतें. पण एकदम असा अविचार—"

" माझी आज्ञा म्हणजे आज्ञा ! अविचार असो कीं आणखी कांहीं असो. तुम्हांला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? तुम्हांला इमानें इतबारें नोकरी करावयाची आहे कीं नाहीं ? "

" मला इमानें इतबारें नोकरी करावयाची आहे, म्हणूनच मी असला अविचार करूं शकत नाहीं. महाराजांच्या आज्ञेखेरीज मला असलें भलतें-सलतें कांहींच करतां यावयाचें नाहीं, याबद्दल क्षमा करा. " किल्लेदारानें ठणठणीत उत्तर दिलें.

" क्षमा ? मगरूर मुसंड्या ! तुला क्षमा ? याद राखून ठेव, तुझें ह्या आज्ञाभंगाबद्दल डोचकें मारलें जाईल. महाराजांना सांगून तुझा मी कडेलोट करायला लावीन. मी राणी आहें. राणीची आज्ञा तूं अमान्य करतोस ? "

हा वेळपर्यंत किल्लेदार मूग गिळून स्वस्थ होता. राणी अन्यथा वर्तन करते आहे हें ऐकून त्याच्या अंगाचा तिळपापड होत असला तरी तो बोलून दाखविण्याला या क्षणापावेतों त्याला तोंड नव्हतें. परंतु सकवारबाईनें त्याच्या कर्तव्यावर आपल्या अरेरावीचा घाला घालूं पाहतांच तो स्वस्थ कसा बसेल? त्याला माहीत होतें कीं नगरांतील रयत चिडली ती सकवारबाईच्या जुलूम-जबरदस्तीमुळेंच! शाहूमहाराज यांच्या कारकीर्दींत असे कोणत्या ना कोणत्या कारणानें रयतेनें दाद मागावयाला येण्याचे प्रसंग अनेक आले होते. परंतु तशा एकाही प्रसंगीं महाराजांनीं कोणाला कधीं नाउमेद केलें नव्हतें. ती महाराजांची उज्ज्वल परंपरा आठवून किल्लेदाराला वाटलें, राणी हें काय करीत आहे! यामुळें महाराजांच्या थोर नांवाला निष्कारण बट्टा लागत आहे, या विचारानें त्याचें चित्त अत्यंत विव्हल झालें. तो सकवारबाईच्या धमकावणीला यत्किंचित् भीक न घालतां करारीपणानें उद्गारला, "आईसाहेब, महाराजांनीं माझा कडेलोट केला व तो आपली आज्ञा न मानल्यामुळें केला, तर त्या-बद्दल मला दुःख न वाटतां उलट धन्यता वाटेल. कारण त्या वेळीं मीं माझें कर्तव्य केल्याचें समाधान माझ्या मनाला पूर्णपणें लाभेल. परंतु त्या मरणाच्या भयानें मी आज महाराजांपाशीं बेइमान मात्र होणार नाहीं. रयत गाऱ्हाणें सांगण्यासाठीं आपल्या पायापाशीं मोठ्या आशेनें आली; तिनें आशेनें आपल्या कृपेचा तुकडा मुखीं लागावा म्हणून टाहो फोडीत तोंड उघडलें; त्या तिच्या तोंडांत आपण सहानुभूतीच्या तुकड्याऐवजीं जुलूमजबरदस्तीचे जळते निखारे टाकूं पाहतां, हें आपल्याला मुळींच शोभत नाहीं. ह्या दोन दिवसांत मला खरोखर वाटूं लागलें आहे कीं अशा दुतोंडी कारभारांत चाकरी करणें म्हणजे केवळ सुळावरची पोळी होय. महाराजांना मी तडक जाऊन सांगतों कीं ह्या आपल्या किल्ल्याच्या किल्ल्या सुपूर्द करून घ्या व मला मोकळा करा. मग महाराजांना माझें शासन करावयाचें असल्यास तेंही ताबडतोब करूंदेत." असें म्हणून किल्लेदार डिवचलेल्या सर्पासारखा रागानें सोंसावत तेथून निघून गेला. सकवारबाईदेखील त्याच्यावर दांतओंठ खात त्याच्या नांवानें कडाकड बोटें मोडीत, पाय आपटीत आपल्या महालांत निघून गेली. आपण भलतेंसलतें कांहीं करूं लागलों तर आपणाला या राजवटींत कुत्रादेखील विचारणार नाहीं असें चरचरीत अंजन आजच्या ह्या प्रसंगानें

तिच्या डोळ्यांत घातलें; तरीदेखील स्वतःची चूक वेळींच ओळखून शहाणी होणारी स्त्री ती नव्हती. म्हणून तर पुढें अनर्थ व्हावयाचे ते होण्याला चुकले नाहींत.

प्रतापरावाला हुजरे, देवडीवाले वगैरे लोकांनीं सजणेविषयीं भलभलत्या गोष्टी सांगून तिच्याविषयीं त्याचें मन कलुषित केल्यामुळें तो सकवारबाईच्या तोंडावर तिच्याविषयीं बोलूं नये तें बोलून गेला. त्या त्याच्या जोडीदारांनीं त्याला किल्ल्यांतून बाहेर येतांच पुनः गांठलें व विचारलें, "काय झालें?"

"काय होणार? असली उठवळ बायको घेऊन काय करावयाची?" प्रतापराव हताश हृदयानें म्हणाला व पुढें चालूं लागला. तें पाहून त्याचे जोडीदार खदूखदां हसूं लागले. प्रतापराव आणि सजणा यांचा परस्पर बेबनाव झालेला पाहण्यांतच त्यांना मौज! त्यांपैकीं एकानें हंसत हंसत प्रतापरावाला म्हटलें, "अरे वेड्या, तूं फसलास. तुला ह्या लोकांनीं नुसता बनवला. सजणा हे लोक म्हणाले तशी वाईट मुळींच नाहीं."

तेथल्या लोकांत सर्व टवाळ किंवा दुष्टबुद्धीचे होते असें नाहीं. त्यांतल्या त्यांत एकाला तर बाकीच्यांची ती कारवाई मुळींच पसंत नव्हती. तो रागीट मुद्रा करून प्रतापरावाला म्हणाला, "मूर्खा, तुझ्यासारख्या माकडाला त्या रत्नाची काय किंमत? तिच्या नखाचीदेखील सर तुला येणार नाहीं. वास्तविक तूं तिच्या पायांवर लोटांगण घेऊन तिची क्षमा मागायला हवी होतीस!"

कृष्णपक्षाच्या अंधाऱ्या रात्रींदेखील आकाशांत एखादी चांदणी उगवली तरी ती ज्याप्रमाणें आपल्या सौम्य तेजस्वितेनें भूतलावरील प्राण्यांच्या मनावर आल्हादाची छटा उमटविते, त्याप्रमाणेंच दुर्जनांच्या घोळक्यांतही एखादा सज्जन असला तरी त्याचें तेज कधीं लपून राहत नाहीं. इतक्या टारगट मंडळींनीं प्रतापरावाचे कान जरी सजणेविषयींच्या गैरसमजांनीं भरले होते, तरी त्या एका माणसाच्या उद्गारानें प्रतापरावाच्या मनांत उपरतीला सुरुवात झाली. त्याच्या विचारांचा दृष्टीकोण बदलला. तेथून तो जरी मुकाट्यानें खालीं मान घालून निघून गेला, तरी त्याचें मन त्याला हडसून खडसून सांगूं लागलें होतें, "तूं सजणेची उगाच अवहेलना केलीस!"

आणखी अंमळशानें त्याला राजवाड्यांतील लोकांकडून सजणेनिमित्त सकवारबाई आणि सगुणाबाई ह्या दोघां राण्यांची आपसांत सवतीमत्सरापायीं

कशी चुरस लागली होती, तेंही ऐकायला मिळालेंच. त्या दिवशीं सकाळीं राजवाड्यांत सजणेपायीं उडालेल्या अनर्थाचा वृत्तांतही हळूहळू त्याच्या कानीं येऊं लागला. आपण सजणेची निष्कारण अवहेलना केली असें त्याला वाटूं लागलें व केवळ आपली राक्षसी सूडाची वासना पुरी करण्यासाठीं सकवार-बाईनें खोडसाळपणानें आपली व आपल्या बायकोची ताटातूट केली; याबद्दल तिच्यावर सूड केव्हां घेईन असें त्याला झालें. आतां तो सजणेला पदरीं घेण्याला तयार होता इतकेंच नव्हे, तर हातून घडलेल्या प्रकाराबद्दल तिची मनःपूर्वक क्षमा मागण्यालाही त्याला कमीपणा वाटला नसता. पण एकदां चिडलेली सजणा पुनः आपला स्वीकार करील असें त्याला वाटेना. तरी पण हरप्रयत्न करून सजणेला भेटावें अशी उत्कट इच्छा धरून प्रतापरावानें तो हेतु तडीला जाईतों सातान्यांतच राहण्याचें ठरविलें होतें.

मनुष्य मूळचा दैववादी नसला तरी अडचणींनीं त्याचा कोंडमारा केला व त्याचे प्रयत्न एकामागून एक फोल ठरूं लागले कीं तो आपोआपच दैव-वादी दुबळा बनूं लागतो. प्रतापरावाचेंही तसेंच झालें होतें. किल्ल्यांत जाऊन सजणेच्या प्राप्तीची खटपट करण्याला त्याला आतां तोंड नव्हतें, व मार्गही मोकळा नव्हता. तशा स्थितींत त्याला म्हाताऱ्या गंगाबाईची माहिती मिळाली. ती म्हातारी किल्ल्यांतून निघून सकवारबाईशीं ठरलेल्या संकेतानुसार खिंडीच्या गणपतीकडे जावयाला निघाली तेव्हां प्रतापरावानें तिला पाहिलें होतें. तो तिच्या मागोमाग निघाला व म्हातारी गणपतीजवळच्या एका जाळींतील झोंप-डींत जाऊन थांबते न थांबते तोंच त्यानें तेथें जाऊन तिचे पाय धरले व तिची विनवणी केली, "आई ! मला तुझा आशिर्वाद पाहिजे आहे. तुझ्या आशिर्वादानें माझे मनोरथ पूर्ण होतील. एवढी कृपा माझ्यावर करशील का?"

प्रतापराव म्हातारीला साधूसंतांच्या तोलामोलानें ओळखीत होता. पण म्हातारीला मात्र तो प्रकार पाहून विस्मय वाटला. तिला तरी घेतल्या सोंगाची बतावणी करणें प्राप्तच होतें. तिनें प्रतापरावाच्या मस्तकावर हात ठेवून वत्स-लतापूर्वक त्याला आशिर्वाद दिला, "मुला, तुझे मनोरथ पूर्ण होतील."

म्हातारीच्या तोंडून ते शब्द निघतात न निघतात तोंच एक बुरखेवाली व्यक्ति तेथें येतांना म्हातारीला दुरून दिसली. तिच्या मनांतून आपला आशि-र्वाद मागणारा मनुष्य कोण कुठला वगैरे विचारणा करावयाची होती. पण

समोरून येणाऱ्या व्यक्तीला पाहतांच तिला सकवारबाईच्या ठरलेल्या संकेताची आठवण झाली. ती प्रतापरावाला म्हणाली, "जा तूं आतां; तुझे मनोरथ खात्रीनें पूर्ण होतील."

प्रतापरावाच्या मनांतून म्हातारीला मनमोकळेपणानें आपली कर्मकथा निवेदन करावयाची होती. तो तसा मोठा भाविक वृत्तीचा मनुष्य होता. परंतु म्हातारीनें त्याला जावयाला सांगतांच त्याला तिची आज्ञा मानणें प्राप्त झालें. तो तेथून माघारा जावयाला निघाला. जातां जातां त्याला ती बुरखेवाली व्यक्ति समोरून येतांना दिसली, त्याबरोबर त्याला साहजिकच ती व्यक्ति कोण असावी हें जाणण्याची उत्कंठा लागली. त्यानें त्या व्यक्तीला स्पष्टपणें हटकलेंही असतें. पण ज्या अर्थी तिनें बुरखा घेतला होता त्या अर्थी तिला आपली ओळख दुसऱ्या कोणालाही पटूं नये असें वाटत असावें, हें अजमावून त्यानें तिला कांहींच विचारलें नाहीं. ही कोणीतरी आपणासारखीच संकटांत सांपडलेली व्यक्ति असेल व आपणाप्रमाणेंच संकटनिवारणार्थ म्हातारीचा आशिर्वाद मागण्यासाठीं ती आली असेल, असा अंदाज करून प्रतापराव चट्कन एका बाजूला वळून तेथल्या मोठ्याथोरल्या करवंदीच्या जाळीमागें लपला. नंतर तेथून तो आवेशानें हळूहळू मार्ग काढीत त्या बुरखेवाल्या व्यक्तीच्या अनुरोधानें चालूं लागला. ती बुरखेवाली व्यक्ति प्रतापरावाच्या अपेक्षाप्रमाणें म्हातारी बसली होती तेथें जाऊन थांबली.

म्हातारी त्या बुरखेवाल्या व्यक्तीला सकवारबाईकडून आलेला माणूस समजून म्हणाली, "इथें भिण्याचें कारण नाहीं. तूं खुशाल तो बुरखा काढून टाक. तूं राणीसाहेबांकडूनच आलास ना?"

"होय. पण मी आतां जें तुमच्याशीं बोलणार आहें, त्याचा कांहीं झालें तरी या कानाचा त्या कानीं बोभाटा होणार नाहीं असें तुम्हीं मला अगोदर वचन दिलें पाहिजे." बुरखेवाली व्यक्ति म्हणाली.

"बोभाटा करण्यासारखी ही गोष्ट साधी नाहीं हें मी जाणतें." म्हातारी उत्तरली.

"तें खरें; पण मला अगोदर तुम्हीं तसें वचन दिलें पाहिजे."

"बरें; हें घे वचन. आतां तरी झालें ना?" म्हातारीनें त्या बुरखेवाल्या व्यक्तीच्या हातावर हात देऊन म्हटलें. पण तो हात हातीं येतांच म्हातारीला

बांगड्यांचा बारीक आवाज ऐकूं आला. तिनें संशयपूर्वक तो हात चाचपडून पाहिला, तों तो खरोखरच स्त्रीचा हात होता! त्याबरोबर म्हातारीनें दचक-ल्यासारखें करून विचारलें, "कोण तूं? तूं राणीसाहेबांकडूनच आलीस ना?"

"होय." ती बुरखेवाली व्यक्ति आपल्या तोंडावरील बुरखा हळूच दूर सारून म्हातारीला म्हणाली, "बाई, तुम्हीं माझें रहस्य कोठेंही न फोडण्याचें वचन मला दिलें आहे व तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे. आतां तुम्हां-पाशीं खरें बोलायला हरकत नाहीं. मी राणीसाहेबाकडून आलें आहें खरी; पण माझा इथें येण्यांतील हेतू राणीसाहेबांशीं ठरलेल्या तुमच्या संकेताहून अगदीं निराळा आहे."

म्हातारीच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला कीं राणीसाहेबांनीं पाठवि-ण्याचें कबूल केलें होतें, तें हें माणूस नव्हे. आपलें कारस्थान बाहेर फुटलें कीं काय, ही कोणी स्त्री कोल्हापुरकरांकडील आहे कीं काय, असे नाना प्रका-रचे संशय तिच्या मनांत पिंगा घालूं लागले. तिनें पुन्हा त्या तरुणीला विचारलें, "तूं कोण तें मला अगोदर सांग."

"मी थोरल्या आईसाहेबांची दासी. सजणा माझें नांव. माझ्याविषयीं जरादेखील अविश्वास बाळगण्याचें तुम्हांला कारण नाहीं. तुमचा आणि माझा हेतु एकच आहे. फरक इतकाच तुम्ही काशीला जाण्यासाठीं निघून पण दिशा चुकून रामेश्वराच्या वाटेनें चाललां आहां. राजपुत्राच्या मस्तकावर उधळण्यासाठीं तुम्हीं फुलांची ओंजळ म्हणून जी भरून घेत आहां तीं फुलें नसून ते पेटते निखारे आहेत." सजणा म्हणाली. तिनें तेवढी बित्तंबातमी काढली होती.

प्रतापराव आडून म्हातारी व सजणा यांचें संभाषण ऐकत होता. आपली ओळख सजणेनें आपल्या तोंडानें दिलेली त्याच्या कानीं पडली मात्र, त्याच क्षणाला सद्गद अंतःकरणानें तो स्वतःशीं म्हणाला, "अहाहा! याला म्हण-तात परमेश्वरी कृपा! म्हातारीनें मला आशिर्वाद द्यावयाला व माझी सजणा मला भेटावयाला एक योग जुळून आला." त्याच क्षणीं आपण पुढें जाऊन म्हातारीच्या पायांवर कृतज्ञतापूर्वक लोटांगण घ्यावें, व तिच्या साक्षीनें सज-णेची मनःपूर्वक क्षमा मागून तिला आपणाबरोबर घ्यावें, इतका तो उतावीळ झाला. पण त्यानें क्षणभर विवेक करून आपलें मन आवरलें. सजणा कांहीं-

तरी महत्त्वाच्या कामासाठीं म्हातारीकडे आल्याचें त्याला तिच्या संभाषणावरून कळून चुकलें होतें. त्या महत्त्वाच्या कामाचा बहुधा साताऱ्याच्याच कोणातरी राजपुत्राच्या जीविताशीं महत्त्वाचा संबंध असावा असें त्याला ओझरतें कळलें होतें. त्या महत्कार्यांत व्यत्यय येऊं नये व आपणालाही त्या रहस्याचा उलगडा व्हावा, अशा अपेक्षेनें त्यानें त्या दोघींचें संभाषण पूर्ण होईतों पुढें न जाण्याचें ठरविलें.

म्हातारीनें पुन्हा प्रश्न केला, "तुला सकवारबाईनें पाठविलें आहे का?"

"नाहीं. पण मीच आपण होऊन तुमच्या माहितींतील राजपुत्राचा जीव वांचविण्यासासाठीं इतक्या अपरात्रीं इथें आल्यें आहें. तुम्हांला सकवार–आईसाहेबांनीं फंसवून राजपुत्राचा घात करण्याचा डाव रचिला आहे."

"काय?"

"मी खोटें सांगत नाहीं. राजपुत्राच्या जीवितांविषयीं तुम्हांला जितकी काळजी आहे, त्यापेक्षां शतपटीनें आम्हांला काळजी आहे. सकवारबाई आईसाहेबांना तुम्ही अजून ओळखीत नाहीं!"

"ह्या राजपुत्राच्या बाबतींत काय करायचें तिनें ठरविलें आहे; तुला माहीत आहे?"

"मला सारें कांहीं माहीत झालें आहे. म्हणून तर मी जीव मुठींत घेऊन इथवर तुमचा शोध करीत आल्यें. तुम्हांबरोबर विश्वासाच्या एका माणसाला राणीसाहेब पानगांवापावेतों राजपुत्राला साताऱ्यांत आणविण्यासाठीं पाठविणार आहेत; खरें ना? त्या मनुष्याकडूनच मीं ही माहिती काढली. गमाजी त्याचें नांव. पोरगेलासा आहे पाहा! आला म्हणजे तुम्हांला कळून येईलच. थोरल्या आईसाहेबांकडून राजपुत्राला आणि तुम्हांलाही ठार करून आपल्या मार्गांतला हा कांटा दूर करण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली आहे. तुमच्याबरोबर तो पानगांवीं येणार तो एवढ्याचसाठीं."

म्हातारीला ती बातमी ऐकून भांबावल्यासारखें होऊन गेलें. ती कपाळाला हात लावून म्हणाली, "कर्म म्हणायचें आपलें; दुसरें काय?"

"पण आतां नुसत्या कर्माला हात लावून भागायचें नाहीं. तुम्ही तुमच्या स्वतःचें आणि राजपुत्राचें रक्षण करण्याची कांहींतरी युक्ति शोधून काढली पाहिजे."

" मी इथून या क्षणीं दुसरीकडे निघून गेलें आणि सकवारबाईच्या माणसाला भेटलेंच नाहीं तर ?"

" तुम्ही सप्तपाताळांत जरी जाऊन दडालां तरी तिथूनही तुम्हांला शोधून काढण्याला थोरल्या आईसाहेब कमी करणार नाहींत. तुम्ही बेपत्ता झालां तर उलट त्यांना ज्यास्त संशय येईल. राजपुत्राचा ठावठिकाणा तुम्हांकडून त्यांना कळलाच आहे."

" मग आतां काय उपाय करावा ?"

"मला तरी वाटतें कीं, तुमच्या डोळ्यांत जशी त्यांनीं धूळ फेंकली तशीच त्यांच्या डोळ्यांत तुम्ही धूळ फेंकली पाहिजे. त्यांनीं तुमचा केंसानें गळा कापायचें ठरविलें आहे, त्याच मापानें म्तुहीं त्यांची भरपाई केली तर त्यांत अन्याय होणार नाहीं."

" मी त्याला एकदां गांठून ठार करीन, मग तर झालें ना ?"

" नाहीं, तेवढ्यानें भागायचें नाहीं. शत्रूचा गळा इथें तरवारीनें कापून तुमचा पल्ला यायचा नाहीं, तो केंसानेंच कापला पाहिजे. गमाजीच्या शोधासाठीं थोरल्या आईसाहेब त्रिखंड उलथेंपालथें करतील. मग राजपुत्राला तुम्हीं कुठें लपविणार आणि स्वतः तरी कुठें लपणार ? तें पुढें काय करायचें तें तुम्ही सोयगैरसोय पाहून ठरवा.—मला जेवढें करतां येण्यासारखें होतें तेवढें मीं केलें. माझें काम झालें. आतां मी जात्यें." असें म्हणून सजणा पूर्ववत् बुरखा घेऊन तेथून माघारी जावयाला निघाली. तोंच तिला मागाहून हांक ऐकूं आली, " सजणे ! जरा थांब."

प्रकरण १६ वें

अचानक भेट

प्रतापराव सजणेला भेटण्यासाठीं अगदीं अधीर झाला होता. आपण तिला म्हातारीच्या देखत भेटावें कीं एका बाजूला भेटावें याचा विचार तो इतका वेळ करीत होता. शेवटीं त्यानें ठरविलें कीं जिच्या आशिर्वादानें आपणाला इतक्या लवकर सजणेची भेट झाली त्या म्हातारीपासून आनंदाची ही गोष्ट लपवून कां म्हणून ठेवावी ? शिवाय म्हातारीचा व राजपुत्राचा जीव धोक्यांत आहे, असें त्याला कळल्यापासून आपण या प्रसंगीं म्हातारीच्या रक्षणासाठीं जिवाभावाच्या मोलानें झटलें पाहिजे असेंही त्याला वाटत होतें. सजणा गैरसमजामुळें कां होईना पण अत्यंत बिथरली आहे, ती आपला स्वीकार करीलच, अशी प्रतापरावाला खात्री वाटत नव्हती. ती अत्यंत करारी व तेजस्वी मुलगी आहे हें तो ओळखून होता. ती जर स्वसंतोषानें वश झाली नाहीं तर तिचें मन वळविण्याच्या कामींही आपणाला म्हातारीच्या वडीलपणाचा उपयोग करून घेतां येईल, असा विचार करून प्रतापराव जाळीमागून एकदम पुढें झाला व त्यानेंच सजणेला ती हांक मारली.

अचानक ती हांक ऐकून सजणा व म्हातारी या दोघींच्याही छातींत धस्स झालें. सकवारबाईच्या वतीनें येणारा गमाजी तो हाच असें त्यांना सकृद्दर्शनीं वाटलें. दोघींनींही तोच प्रश्न केला, " कोण आहे ? "

" भिऊं नका, मी तुमचा प्रतिस्पर्धी नाहीं. मी प्रतापराव आहें. " असें म्हणून प्रतापरावानें प्रथम म्हातारीच्या पायांवर लोटांगण घेतलें व तिला विनविलें, " आई, तुझ्या आशिर्वादाचा प्रभाव हा असा विलक्षण आहे. तुझ्या आशिर्वादाचे शब्द हवेंत विरतात न विरतात तोंच माझी सजणा तुझ्या अलौकिक पुण्याईनें इथें ओढून आणली. ह्या तुमच्या उपकारांचें अंशतः

तरी उतराई व्हावें म्हणून मी तुझ्या रक्षणासाठीं जरूर तर जिवाचीदेखील रया करण्याला तयार आहें. त्या गमाजीची तुझ्या केंसाला तरी धक्का लावण्याची काय बिशाद आहे ? मी एकटाच त्याला या जगांतून नाहींसा करून टाकीन. " तो लगेच सजणेकडे वळून म्हणाला, " सजणे ! किल्ल्यावरच्या टारगट लोकांनीं तुझ्याविषयीं माझा भलताच गैरसमज करून दिल्यामुळें मी काल तुला इतका टाकून बोललों व तुझा अव्हेर केला, त्याबद्दल मला क्षमा कर. वस्तुतः खरा अपराधी मीच आहें. मी किल्ल्यांतून बाहेर आल्यानंतर ज्यास्त चौकशी केली तेव्हां एकंदर खरा प्रकार मला कळून आला. आपल्या संसारांत निष्ठुरपणें असा बिघाड घालणाऱ्या राक्षसिणीवर पुरेपूर सूड घेण्याचें मीं तेव्हांच ठरविलें होतें. त्यानंतर तुझा त्या बयेनें कसा छळ मांडला आहे हें मला कळल्यावर तर ती सूडाची भावना माझ्या मनांत ज्यास्त प्रबल झाली आहे. आणि आतांची राजपुत्राविषयींची हकीकत ऐकून तर त्या चांडाळणीला, त्या राणीला जगांतून नाहींशी करण्यासाठीं तरी आपण जगलेंच पाहिजे असें माझें मन मला सांगूं लागलें आहे. "

सजणेच्या मनांत प्रतापरावाविषयीं राग जरी होता, तरी त्याच्याविषयीं अनादराला मात्र तेथें मुळींच थारा नव्हता. अर्थात् तो आदर प्रतापरावाविषयीं तिच्या मनांत वसत होता असेंच केवळ नाहीं; तर तो आपला पति आहे व बायकांना पतीशिवाय गति नाहीं अशा ठाम विचारांची पतिव्रता ती होती. मनांतून ती प्रतापरावाच्या नांवानें जळफळत होती, त्याच्या नांवानें कडकडा बोटें मोडीत होती; पण कांहीं झालें तरी त्याचें जगांत वाईट व्हावें किंवा आपण त्याच्याशीं इमानदारीनें वागूं नये असला हलका विचार तिच्या मनाला शिवलादेखील नव्हता. प्रतापरावाला तिची भेट झाल्यामुळें जितका आनंद झाला असेल त्याच्या शतपटीनें आनंद तिला प्रतापरावाच्या भेटीमुळें झाला. तिनें त्याला विचारलें, " तुम्ही बोलतां हें खरें काय ? "

" तुझ्या गळ्याशपथ, ह्या आईच्या गळ्याशपथ. मी बोललों त्यांतलें एक अक्षरदेखील खोटें नाहीं. आणखी मीं काय केलें म्हणजे माझ्या खरेपणाविषयीं तुझी खात्री होईल ? "

" तो खरा आहे असें त्याच्या वर्तीनें मी सांगूं शकतें. " थोड्या वेळापूर्वीचें संभाषण आठवून म्हातारी प्रसन्न चित्तानें पुढें म्हणाली, " मात्र ह्या

परमेश्वरी कृपेची भरपाई तुम्हीं आपल्या शक्तीप्रमाणें केली पाहिजे. राजपुत्राच्या जिवावर कोणतें संकट ओढवलें आहे याची तुम्हांला कल्पना आहेच. मला माझ्या जिवाची कांहींच काळजी वाटत नाहीं; मी मेलें तरी बेहेत्तर. राजासाठीं मरण येण्यापेक्षां जगांत दुसरी थोर पुण्याई ती कोणती ? पण राजपुत्राच्या मात्र केंसालादेखील धक्का लागतां कामा नये. त्यासाठीं आपण सर्वांनीं डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे."

" माझ्या आणि तुमच्या जीवितांचें ध्येय यापुढें एकच आहे; म्हणूनच मी तुमच्या पूर्वीच्या सर्व अपराधांकडे कानाडोळा करायला तयार आहें. " सजणा प्रतापरावाला म्हणाली.

" कोणतें तुमचें ध्येय ? " म्हातारीनें विचारलें.

" राजपुत्राचें रक्षण आणि सकवारबाईचा सत्यनाश ! मी जर अगोदर मेलें, तर त्या चांडाळणीवर सूड घेण्यासाठीं पुन्हा जन्माला येईन; पण तिची पुरी वाताहात झालेली पाहिल्याशिवाय मी परमेश्वरापाशीं सद्गति मागणार नाहीं. " सजणा उद्गारली. त्या प्रत्येक शद्बाबरोबर तिचा कंठ अधिकाधिक दाटून येत होता. त्यामुळें तिला स्पष्ट बोलतांदेखील येईना.

" सजणे, आतां तूं स्वतंत्र आहेस का ? " प्रतापरावानें प्रश्न केला.

" माझी प्रतिज्ञा पूर्ण होईतों मी स्वतंत्र असूनही नसल्यासारखी आहें. बोलूनचालून मीं विस्तवाशीं हुज्जत मांडली आहे. यांतून मी यशस्वी होऊन बाहेर पडेन तरी, किंवा त्यांतल्यात्यांत भाजून मरून तरी जाईन. कांहीं झालें तरी ह्या दिव्यांतून पार पडून बाकी उरलें तर तुमची !" सजणा म्हणाली. त्या वेळीं प्रतारावाविषयीं तिच्या कानांवर आलेले नाना परींचे लोकापवाद तिला आठवत होते. तो बाटून मुसलमान झाला आहे ही ऐकीव वदंता तर तिच्या अंतःकरणाला चावे घेत होती. परंतु त्या एकाही लोकापवादाचा तिनें नामनिर्देशही केला नाहीं. तिला प्रेमामुळें अवांतर सर्व गोष्टी अगदीं कःपदार्थ वाटत होत्या. ती अंमळ थांबून पुन्हा म्हणाली, "आतां तरी माझ्याविषयीं गैरसमजाचें काहूर तुमच्या डोक्यांत उठणार नाहीं ना ?"

" नाहीं. आतां पुन्हा पुन्हा मला तीच तीच गोष्ट काढून हिणवूं नकोस. मनुष्य एकदां चुकला म्हणजे नेहमीं तीच चूक करीत राहतो असें नाहीं." प्रतापराव ओशाळ्या वृत्तीनें म्हणाला.

" बरें आहे तर चल आतां. तो काळ अचानक इथें येईल. त्यानें जर आपणाला पाहिलें तर आपले सर्व बेत ढांसळून पडायचे." सजणा तशीच म्हातारीकडे वळून म्हाणाली, " बाई, घेऊं आतां निरोप ?"

म्हातारीनें उदार मनानें त्या पतिपत्नींना निरोप दिला. प्रतापरावानें आपण बरोबर आलें पाहिजे का, असें कळकळीनें म्हातारीला विचारलें. पण म्हातारीनें त्याची समजूत करून त्याला सजणेबरोबर माघारें पाठविलें. सजणा जातां जातां म्हातारीला म्हणाली, " बाई, तुमचें आमचें आतां जें बोलणें झालें तें कोणालाही कळतां कामा नये. नीट सावध असा. पण गमाजी आतां तुमच्याकडे आल्यावर ह्या प्रकारणाचा शेवट एकंदरींत कसा झाला तें आम्हांला कसें कळणार ?"

" त्याविषयीं तूं अगदीं निष्काळजी राहा. तूं मात्र आतां एक कर. तुला किल्ल्यांत, राजवाड्यांत सर्वत्र प्रवेश आहे ना ?" म्हातारीनें प्रश्न केला.

सजणा आपल्या हातांतील मुद्रिका पुढें करून म्हणाली, " ही पहा थोरल्या आईसाहेबांची स्वाक्षरींची मुद्रिका. ही माझ्यापाशीं असल्यावर मला प्रतिबंध कोण कसा आणि कुठें करणार ?"

"तर मग तूं एक कामगिरी कर. तूं शक्य त्या प्रयत्नांनीं ताराबाईआई-साहेबांची भेट घे, आणि त्यांना हें सर्व कारस्थान नीट समजावून सांग. त्यांना म्हणावें कीं पानगांवची म्हातारी मुद्दाम तुमची भेट घेण्यासाठीं आली होती. पण सकवारबाईनें मानभावीपणानें तुमच्याशीं आपलें सख्य आहे असें सांगून या सर्व गोष्टी तुम्हांला कळविण्याची हमी घेतली, म्हणून मी तुम्हांला न भेटतां माघारी वळलें असेंही त्यांना सांग. त्यांना म्हणावें तुम्ही राज-पुत्राच्या जीविताविषयीं मुळींच काळजी करूं नका." म्हातारी थोडा वेळ थांबून स्वतःशीं कसलासा विचार करून पुन्हा म्हणाली, " महाराजांवर सक-वारबाईचें कितपत वजन आहे ?"

" कोणत्या बाबतींत ? महाराज थोरल्या आईसाहेबांना भिऊन असतात खरे. पण राजपुत्राचें—दत्तकाचें प्रकरण निघालें कीं, ते थोरल्या आईसाहेबां-वर विसंबून कधींच बोलत नाहींत. त्यांतूनही प्रत्यक्ष दत्तक घेण्याची वेळ आली तर थोरल्या आईसाहेबांचा शब्द प्रभावी ठरेल हें खरें. परंतु गादीला मालक असा एक औरस राजपुत्र हयात आहे असें कळतांच थोरल्या आई-

साहेबांनीं त्याला कितीही जरी विरोध केला तरी तो न जुमानतां त्या ते राजपुत्रालाच आपल्या मागें गादी देतील यांत संशय नाहीं." प्रतापराव म्हणाला. त्याला सजणेनें पुष्टि दिली.

"तर मग तुम्ही एवढें करा; असा असा एक राजपुत्र आहे ही गोष्ट अगोदर ताराबाई आईसाहेबांची संमति घेऊन महाराजांना कळवा. म्हणजे राजपुत्राच्या रक्षणाचा आमच्या शिरावरचा भार तेवढाच कमी होईल." म्हातारी म्हणाली.

प्रतापराव व सजणा हीं दोघेंही 'बरें आहे' असें म्हणून म्हातारीचा निरोप घेऊन मार्गाला लागलीं. आतां इतक्यांत गमाजी येईल व त्याची मार्गातच भेट झाली तर मोठा प्रसंग गुदरेल, हें ओळखून सजणेनें बुरखा पूर्ववत् तोंडावर नीट सांवरून घेतला, व अगदीं एका बाजूच्या गोंवड्या वाटेला वळून प्रतापरावाला म्हटलें, "माझ्या मागोमाग या."

पुढें ती आणि तिच्या मागोमाग तो अशीं दोघेंही त्या घनदाट जगलांतून चांचपटत मार्ग आक्रमण करूं लागलीं. ती रात्रीची वेळ, तशांत रात्र काळोखी. आणि शिवाय मार्ग असा अडचणींचा. हमरस्त्यानें गेल्यास सर्प–विंचवादि विषारी जनावरांचें भय तितकेंच कमी असतें, व वाघ–डुकरासारखे क्रूर वन्यपशूही सहसा हमरस्त्यानें हिंडत नाहींत. हें सर्व सजणेला माहीत होतें. तरीदेखील ती पुढें व प्रतापराव मागें अशीं दोघेंही निर्भय चित्तानें त्या कांटेऱ्या वाटेनें चाललीं होतीं. त्यांच्या पायांना मधून मधून कांटे बोंचत होते, पावलोपावलीं ठेंचा लागत होत्या, एकदां तर एका सर्पावर सजणेचा पायही पडला. पण तिचें तिकडे लक्ष्य देखील गेलें नाहीं. ती तशीच पुढें निघून गेली. तो सर्पही वळवळत तेथून जंगलांत निघून गेला.

इतक्यांत सजणेला मशालीचा प्रकाश दिसला. त्याबरोबर तिच्या मनांत किंचित् कालवाकालव झाली, आपल्या पाठलागावर तर कोणी येत नाहीं ना ? पण तिची संशयनिवृत्ति होण्याला वेळ लागला नाहीं. तिनें तिकडे निरखून पाहिलें तेव्हां तो गमाजीच पूर्वसंकेताप्रमाणें म्हातारीकडे हातांत मशाल घेऊन चालला आहे असें दिसून आलें.

"कसला उजेड दिसतो ?" प्रतापरावानें विचारलें.

"बोलूं नका. जागच्या जागीं उभे रहा." सजणा म्हणाली.

सजणेनें आपल्या मतें अगदीं निराळा म्हणून जो मार्ग शोधून काढला, तो खिंडीच्या गणपतीकडे साताऱ्यांतून येण्याच्या मार्गाला अगदीं लगतचा होता. पण सुदैवानें त्या दोघांची गमाजीला चाहूल लागली नाहीं. मुळींच चाहूल लागली नाहीं असें नाहीं, कोणीतरी त्या बाजूला असल्याचा त्याला भास झाला. पण ती कोणा जनावराची चाहूल असेल अशा समजुतीनें तो आपल्या हातांतील भाला तसाच प्रसंग आला तर स्वसंरक्षणाला उपयोगी पडावा म्हणून सावधपणें सांवरीत कावऱ्या बावऱ्या नजरेनें सभोंवार पाहत झप झप पावलें उचलूं लागला.

गमाजी बराच दूर गेला व त्याच्या हातांतील मशालीचा प्रकाश अगदीं अंधुक दिसूं लागला, तेव्हां सजणा प्रतापरावाला म्हणाली, " मी मघांशीं सांगितलें ना, तोच तो गमाजी मुतालिक राजपुत्राचा व म्हातारीचा दंश मनांत धरून तिकडे निघाला आहे. "

" मग; त्याला असाच्या असा जाऊन ठार करूं का ? " प्रतापरावानें विचारलें.

" मघां मीं त्या म्हातारीला काय सांगितलें तें तुमच्या ध्यानीं नाहीं काय ? त्याला ठार करून राजपुत्राचे प्राण वांचतील ही तुमची कल्पना खुळे-पणाची आहे. "

" तर मग काय करूं म्हणतेस ? "

" तें मी मग सांगत्यें. आपण जरा दूर जाऊं, आणि कोणी पहाणार नाहीं किंवा ऐकणार नाहीं अशा एकान्ताच्या जागीं बसूं. मला तुमच्याशीं आणखी बरेंच कांहीं बोलायचें आहे. "

या सजणेच्या शब्दांवर प्रतापराव आणखी कांहीं बोलला नाहीं. तीं दोघेंही बराच वेळपावेतों त्या अवघडीच्या वाटेनें चालत होतीं. नंतर एकदांची बेणी वाट सांपडली. तेथूनच थोड्या अंतरावर एक पिंपळाचा वृक्ष होता. सजणा प्रतापरावाला म्हणाली, " त्या पिंपळाखालीं आपण जाऊन थोडा वेळ बसूं. "

दोघेंही तेथें जाऊन बसलीं. पण सजणेच्या तोंडून शब्द निघेना. थोड्या वेळापूर्वी ' मला तुमच्यापाशीं बरेंच कांहीं बोलायचें आहे ' असें बोलतांना तिच्या अंगीं जें धैर्य होतें, तें आतां पार मावळलें होतें. याचा अर्थ ती



“ आतां तरी तुम्ही मला जन्मभर अंतर देणार नाहीं ना ? ” एवढें विचारून सजणेनें प्रतापरावाच्या वक्षस्थलावर मस्तक टेकलें. पृष्ठ १४५

भ्याली होती असा नव्हे. सूर्यास्ताच्या वेळीं आपल्या प्रियकर भ्रमराला सन्निध घेऊन मावळणाऱ्या कमलासारखी तिची अवस्था झाली होती. प्रतापरावाशीं झालेल्या पहिल्या वहिल्या दृष्टिभेटीच्या वेळीं तिला मारे खूप वाटलें कीं आपण जे अनेक परींचे आक्षेप आपल्या पतिविषयीं ऐकले आहेत, त्यांबद्दल त्याची खरपूस विचारपूस करावी; विशेषतः तो लोक म्हणतात त्याप्रमाणें बाटला आहे किंवा कसें याची माहिती काढून तो खरोखरच कोणा मुसलमान स्त्रीच्या नादानें बाटला असल्यास—— ?

एथवरचा विचारप्रांतांतील पल्ला सजणेला झपाट्यानें हां हां म्हणतां गांठतां आला. पण हें जें प्रश्नचिन्ह समोर तिच्या विचारांची धांव रोखून उभें राहिलें, तें कांहीं तिला ओलांडतां येईना. तिचा सारा क्रोध, सारा तिरस्कार सूर्यप्रकाशांत वाफेच्या रूपानें अदृश्य होणाऱ्या रानावनांतील हिरवळीवर इतस्ततः विखुरलेल्या दंवबिंदूप्रमाणें झपाट्यानें कोठच्या कोठें नाहींसा झाला, व पूर्वींची तीच सजणा आपल्या मनाशीं म्हणूं लागली, " उगाच अप्रिय व अनिवार्य गोष्टी काढून त्यांचें मन दुखवा तरी कशाला? मीं विचारलें आणि तें खोटें असलें व मीं खोटाच संशय घेतल्यामुळें त्यांना राग आला तर? बरें; तें खरें असलें, तरी माझ्यापासून ते आपली चूक गुप्त राखून ठेवतात म्हणजे मला भितात—माझ्याविषयीं त्यांच्या मनांत आदर आहे. आपण ही अक्षम्य चूक केली व आपण या बाबतींत आपल्या बायकोचे अपराधी आहों अशा पश्चात्तापाच्या भरांत त्यांना माझें जें आदरयुक्त भय वाटेल, तें मी उघड बोलल्यानें वाटेनासें होईल. माझ्या कानांपावेतों तो बोभाटा आला आहे हें त्यांना माहीत असलेंच पाहिजे. असें असतांही मी त्याविषयीं चकारशब्ददेखील काढला नाहीं तर तेच मनांत म्हणतील कीं सजणा किती थोर मनाची स्त्री आहे ! "

" बोल ना तुला काय बोलायचें आहे तें सजणे ! तूं अशी गप्प कां? " सजणा कांहींच बोलत नाहीं असें पाहून प्रतापरावानें पुन्हा विचारलें.

" आतां तरी तुम्ही मला जन्मभर अंतर देणार नाहीं ना? " एवढें विचारून सजणेनें प्रतापरावाच्या वक्षस्थलावर मस्तक टेकलें.

सजणेच्या हजारों कठोर वाक्ताडणांनीं जो परिणाम प्रतापरावाच्या मनावर घडून आला नसता, तो त्या एका प्रश्नानें घडून आला. त्याचा ऊर

दाटून आला व डोळ्यांवाटे कृतज्ञतेच्या गंगायमुना वाहूं लागल्या. त्या गंगा-यमुनांचा अभिषेक सजणेच्या मस्तकावर होऊं लागला. प्रतापराव थोडा वेळपावेतों कांहीं न बोलतां शून्य चित्तानें सजणेच्या केशकलापावरून हात फिरवीत होता. सजणेला तिच्या उभ्या आयुष्यांत पतीचें सान्निध्य असें आज प्रथमच लाभत होतें. त्याच क्षणीं तिला एथवरच्या सर्व हालअपेष्टा आठवल्या, व भविष्यकाळाचा विचार करतांनादेखील सकवारबाईसारख्या वाघिणीच्या जबड्यांत आपला केव्हां कसा चेंदामेंदा होईल याचा तिला कांहींच भरंवसा वाटेना. लग्न झाल्या दिवसापासून ह्या ना त्या निमित्तानें तिच्या संसारसुखाचा उन्हाळा झाल्यामुळें नानापरींच्या कष्टमय प्रसंगांत पोळून निघालेल्या तिच्या हळुवार मनाला अशी हुरहूर लागली होती कीं आपल्या पतीची व आपली भेट झाली, यांतही भवितव्यतेनें पुढें आपल्या वांट्याला येणाऱ्या एखाद्या आत्यंतिक दुःखाचें बीजारोपण केलें असावें. एरव्हीं दीर्घ-काल टिकणारें सुख आणि तें ह्या सजणेच्या नशिबीं ?—शक्यच नाहीं !

इतका भविष्यकाळाविषयीं अविश्वास वाटत असल्यावर सजणेला त्या तशा आत्यंतिक सुखाच्या अवस्थेंतच आपली चिरसमाधि लागावी—त्या आनंदीआनंदांतच आपल्या जीविताची इतिश्री व्हावी, असेंच वाटल्यास नवल काय? ती आपल्या नेहमींच्या संवईप्रमाणें मनांतल्या मनांत आपल्या गुरुदेवतेचें अर्थात् ब्रम्हीभूत परमहंस ब्रम्हेंद्रस्वामींचें नम्रतापूर्वक स्मरण करून अश्रुपूर्ण नयनांनीं प्रतापरावाच्या तोंडाकडे पाहत घोगऱ्या स्वरांत म्हणाली, "गुरुमाउलीच्या श्रीभार्गवरामाच्या कृपेनें आपलें यापुढील जीवन तरी सुखाचें जाईल का? कीं हा सुखाचा पहिला क्षणच आपल्या आयुष्यांत अखेरचा ठरेल?" पुन्हा तिला काय वाटलें, त्यासरशी ती चटकन् दोन पावलें दूर सरून एकदम भानावर आल्यासारखें करून म्हणाली, "पण आपण अशी भलत्याच गोष्टींत काय वेळ दवडीत बसलों आहों? आपल्या-वर बाळराजांच्या रक्षणाची केवढी मोठी जबाबदारी पडत आहे! तें कांहीं नाहीं. आपण शिरावर घेतलेली जबाबदारी फार मोठी आहे. खरें ना?"

"होय." प्रतापराव विस्मयचकित होऊन उद्गारला.

"ती जबाबदारी आपणाला प्रथम पार पाडली पाहिजे. ती पार पडे-पावेतों तुम्ही म्हातारीच्या आणि गमाजीच्या पाळतीवर राहून डोळ्यांत तेल

घालून जपलें पाहिजे. त्यासाठीं तुम्ही आजच्या आज या क्षणीं सातारा सोडला पाहिजे."

" त्याला माझी ना नाहीं. तूं सांगितल्यावर मी तुझ्या शब्दासाठीं काळाच्या जबड्यांतदेखील निर्भयपणें चालून जाईन. पण सजणे! तुला सोडून—" प्रतापराव थोडा रेंगाळून म्हणाला, " त्यापेक्षां मी म्हणतों, आपण दोघेंही त्या कामगिरीवर एकदमच जाऊं कशीं!"

त्या ठिकाणीं सजणेऐवजीं दुसरी एखादी सामान्य स्त्री असती, तर आपल्या पतीची आपल्या ठायीं इतकी लुब्धता आहे हें पाहून तिला इतका हर्ष झाला असता कीं तिनें प्रतापरावाचे ते शब्द सोन्याचे कान करून ऐकले असते. पण सजणेला ते बोल ऐकणेंदेखील नामुष्कीचें वाटलें. तिनें पहिल्या तडाक्याला प्रश्न केला, " आपण माणसें ना; कीं जनावरें?"

" मला वाटतें, मी तुम्हांला जिवंत भेटल्यें, हेंच तुमच्या माणुसकीला— तुमच्या मर्दानी बाण्याला ग्रहण लागलें. हें ग्रहण सुटल्याशिवाय तुमची धडगत नाहीं, आणि मी जिवंत आहें तोंवर हें ग्रहण सुटायचें नाहीं."

" सजणे! तूंच का बोलते आहेस ही? असें अभद्र बोलूं नये."

" तुम्ही कर्नाटकांतून इकडे आलां ते आपलें अपयशानें काळें झालेलें तोंड दाखविण्यासाठींच का? वीराला शोभेसें कर्तव्य करायचें सोडून बायकोसमोर गोंडा घोळीत बसणारा तो कसला मराठा? आणि असल्या बायल्या पुरुषाची बायको म्हणवून घेण्यांत तरी भूषण तें काय? लाखांच्या मोलाचा एक शब्द अखेरचा सांगत्यें, तुम्ही माझे दादले नाहीं आणि मी तुमची बाईल नाहीं. जा—तुम्हांला वाटेल तें तिकडे करा जा. आजपासून तुम्ही मला मेलां आणि मी तुम्हांला मेल्यें." एवढें बोलून सजणा तेथून जी तिरिमिरीनें उठली ती चालूं लागली. चार पावलें चालून जातांच पुन्हा एकदम मागें वळून तिनें प्रतापरावाला म्हटलें, " हें पाहा मीं तुमच्या नांवानें ललाटीं जतन करून ठेवलेलें कुंकू पुसलें. आतां माझा मार्ग मला मोकळा आहे."

ती चटकन कपाळाचें कुंकू पुसून पुन्हा आपल्या वाटेनें जाऊं लागली. प्रतापराव खट्टू वृत्तीनें तिच्या मागोमाग निघाला, तेव्हां ती क्षणभर थबकून त्याला म्हणाली, " पाहा बरें! माझ्या मागोमाग याल तर शपथ आहे. पाहा बरें! मी जीव देईन.—तसें नकोच मुळीं!—ही पाहा मी म्हणत्यें, मी

विधवा झाल्यें. तुम्ही आपली कामगिरी करून येऊन माझ्या कपाळीं आपल्या हातानें कुंकूं लावाल, तेव्हां मी सौभाग्यवति होईन. तोंवर मी विधवाच आहें." असें म्हणून सजणेनें तोंड फिरवलें.

प्रतापराव जरी कांहींसा मनदुबळा व बराचसा स्त्रैण होता, तरी तो हाडाचा नेकजात अस्सल मराठा होता. सजणेचा विरह त्याला दुःखकारक वाटत होता हें तर खरेंच. पण सजणेनें आपल्या सजीव वाणीनें त्याचें कर्तव्य मूर्तिमंत त्याच्यासमोर उभें केलें, तेव्हां त्यालाही पश्चात्तापपूर्वक वाटूं लागलें कीं, महाराष्ट्रदेशांत मी जन्माला येऊन लहानाचा मोठा झालों, त्या माझ्या मायदेशासाठीं आजवर मीं काय केलें आहे? —त्याबरोबरच त्याला त्याचें कर्नाटकांतील हिणकस पूर्वचरित्र आठवूं लागलें. सजणेची जाज्वल्य स्वदेशभक्ति पाहून त्याला वाटूं लागलें कीं आपण कांहींतरी महत्कार्य करून दाखविल्याखेरीज तिचा संसारांतील भागीदार या नात्यानें तिच्याकडे पाहणें पाप आहे. —कर्नाटकच्या मोहिमेंत मराठ्यांनीं अपूर्व विजय संपादन केला हें त्याला माहीत होतें. ते विजयी मराठे वीर जेव्हां विजयपताका फडकवीत महाराष्ट्रांत माघारे आले असतील, तेव्हां ठिकठिकाणच्या मराठा बंधुभगिनींनीं त्यांचा सत्कार केला असेल, घरीं गेल्यावर त्यांच्या बायका—बहिणींनीं त्यांना पंचारत्या ओंवाळल्या असतील; आणि मी?...आणि मी?... असा विचार करतां करतां प्रतापरावानें स्वतःच्या मनाशीं ओशाळून एकदम खिन्नतेनें खालीं मान घातली.

सजणा दूर निघून गेलेली पाहून तो त्याच क्षणीं जो तेथून वेगासरसा उठला तो अंधाराची, कांट्याकुट्यांची, दगडाधोंड्यांची, साप—विंचवांची किंवा वाघ—डुकरांची यत्किंचित् देखील भीति मनांत न आणतां आल्या वाटेनें जंगलांत घुसला.

सजणेलाही कांहींच वाटलें नाहीं असें मात्र नाहीं. आपण इतक्या निष्ठुरपणें बोललों त्याचें सार्थक झालें असें म्हणून तिनें त्याच क्षणीं आपल्या गुरुमाउलीचें व भार्गवरामाचें श्रद्धेनें स्मरण केलें. प्रतापरावाला अंगीकृत कार्यांत विजय प्राप्त व्हावा अशी अनन्यभावानें करुणा भाकली. आतां मात्र तिचें मन तिला आश्वासन देऊं लागलें, "सजणे! तूं खरोखरच भाग्यशाली वीरपत्नी आहेस. तुझा पति विजयी होऊन माघारा आला आणि तुला भेटला, तर

उद्यांच्या छत्रपतींचे प्राण वांचविणारा हा नरवीर धन्य असो असे सारा महाराष्ट्र त्याला धन्यवाद देईल. "

अशा विचारतंद्रींत सजणा अगदीं तदाकार होऊन त्या पिंपळाच्या झाडाखालीं आडवशाला उभी असतांना तिला कोणाचेसे शब्द ऐकूं आले, ' तो पाहा हरामखोर पळूं पाहतो आहे त्याला पकडा. चला अगोदर. एका क्षणाचाही विलंब लावूं नका. ' त्याबरोबरच घोड्याच्या टापाही ऐकूं आल्या. त्याबरोबर सजणा एकदम भानावर येऊन समोर पाहते तों हरणाच्या मार्गें पारधी लागावे त्याप्रमाणें दहाबारा लोक आपल्या अनुरोधानें धावत येत आहेत असें तिला आढळून आलें. तिला पेंच पडला, हे लोक प्रतापरावालाच गुन्हेगार समजून पकडावयाला आले आहेत, कीं आपणावरच त्यांचा रोंख आहे?

प्रकरण १७ वें

महाराजांच्या मुक्कामीं

परंतु आपणाला आतां एकदां महाराजांच्या समाचारासाठीं व ज्या कारणांसाठीं ते वैतागून वनवासवाडीला गेले होते, त्यांचें पुढें काय झालें तें समजून घेण्यासाठीं वनवासवाडीला गेलें पाहिजे. वनवासवाडी म्हणजे खरोखर कांहीं वनवासाचें स्थान नव्हे. तें सातारा राजधानीपासून दूर व सातारा आणि माहुली यांच्या मध्यावर महाराजांनीं वसविलेलें एक एकान्ताचें स्थान होतें इतकेंच. असें असतां त्या स्थानाला वनवासवाडी हें नांव पडण्याचें कारण असें कीं महाराज वैतागून वनवासी वृत्तीचे बनले म्हणजेच तेथें राहावयाला जात. ते सुखासमाधानानें असे वनवासवाडीला आजवर कधींच राहावयाला गेले नव्हते. त्यांना एकुलता एक झालेला मुलगा वारला तेव्हां, विरूबाईचें देहावसान झालें तेव्हां, व एकदां राण्यांची कटकट विकोपाला गेली तेव्हां, अशा दोनतीन प्रसंगीं यापूर्वीं महाराज वनवासवाडीला राहावयाला गेले होते.

विमनस्क होऊन वैतागानें राजवाड्याबाहेर निघून जाण्याचा महाराजांच्या आयुष्यांतील हा जरी पहिलाच्च प्रसंग नव्हता, तरी आजच्याइतके उद्विग्न ते कधींच झाले नव्हते. आपले पेशवे आपल्या कोल्हापूरकर प्रतिस्पर्ध्यांना फितूर झाले, कारभारी आज्ञेंत वागत नाहींत, राण्या शिरजोरपणें वागूं लागल्या व शरिरीं स्वास्थ्य नाहीं. असें चारी बाजूंनीं महाराजांवर जणूं आकाश कोसळून पडलें होतें. राण्यांची कटकट ही नेहमींचीच त्यांच्या कपाळाला चिकटलेली होती; त्यांत कारभारी लोकांच्या बेदरकारपणाची भर दिवसेंदिवस अधिकाधिक पडूं लागली. तिकडे रघूजी भोंसले आज्ञेंत वागेनात व दाभाडे, पवार, गायकवाड वगैरे सरदारही आपल्याच तोऱ्यांत असावयाचे. श्रीमंत थोरल्या बाजीराव पेशव्यांनीं सेनापति त्रिंबकराव दाभाड्यांचें डभोईच्या

लढाईंत पारिपत्य केल्यापासून दाभाडे, गायकवाड, वगैरे मंडळी कोणी उघडपणें तर कोणी आंतून एकगटानें वागूं लागली होती, व तो दाभाड्यांचा गट महाराज किंवा पेशवे यांपैकीं कोणालाच खरा जुमानीत नव्हता. रघूजी भोंसले हे राणीच्या बाजूनें नातलग असल्यानें त्यांना राणीला हाताशीं धरून साताऱ्याच्या अंतर्गत राजकारणांत कोंपरखळ्या मारावयाला चांगलेंच फावत होतें. राहतां राहिले महाराजांच्या दृष्टीनें त्यांचे निष्ठावंत व समर्थ सेवक म्हणजे नानासाहेब पेशवे ! ते देखील थोरल्या तहाच्या निमित्तानें कोल्हापूरकरांना फितुर झाल्याचें कानीं येतांच महाराजांची उमेद पुरी खचली. आतां आपली सद्दी संपली, आतां जगण्यांत अर्थ नाहीं व छत्रपति म्हणवून घेण्यांत शोभा नाहीं असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें. म्हणूनच महाराजांना वनवासवाडीला जाऊन एक दिवस झाला, दोन दिवस झाले, तीन दिवस झाले, चार दिवस झाले, असा जवळजवळ एक आठवडा लोटला तरी महाराजांनीं राजधानींतील कारभाराची नुसती विचारपूसदेखील केली नाहीं. चिटणीस व अमात्य यांनीं रोज महाराजांच्या भेटीसाठीं यावें व महाराजांच्या प्रकृतीला आराम नाहीं, महाराज कोणाचीही तूर्त भेट घेऊं इच्छित नाहींत, असें उत्तर ऐकून माघारें निघून जावें, असा क्रम सतत आठवडाभर चालला होता. अजिमताऱ्याच्या किल्लेदारानें महाराजांची भेट घेण्याचा प्रयत्न केला पण तोही व्यर्थ ठरला. अखेर त्यानें चिटणीस, अमात्य, पुरंदरे व प्रतिनिधि यांची भेट घेऊन सकवारबाईशीं झालेलें संभाषण त्यांना निवेदन केलें, व 'थोरल्या आईसाहेब जशी आग लावतील तशी त्यांना लावूं द्यावयाची काय ?' असें त्यांना विचारलें. त्या कारभारी मंडळींत जरी अंतर्गत राज्यकारभाराविषयीं एकमत नव्हतें, तरी सकवारबाईला औट घटकांची अस्मानीसुलतानी गाजवूं देण्याला कोणीही राजी होईना. पण सकवारबाईच्या लहरीला प्रत्यक्ष विरोध करण्याचें धैर्यही कोणाला होईना. त्या सर्वांनीं महाराजांच्या प्रकृतीला आराम पडेपावेतों निश्चित स्वरूपाची कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं व सकवारबाईच्या धुडगुसाला कदापि मान्यता द्यावयाची नाहीं असें एक विचारें ठरविलें, व किल्लेदार आणि जे जे कोणी इतर अधिकारी पुढें कसें करावयाचें याविषयीं अनुज्ञा मागण्यासाठीं आले त्यांनाही त्याप्रमाणेंच थोपवून धरलें.

सकवारबाईला सभोंवारची एकंदर परिस्थिति पहिल्यापासूनच आवरतां येईनाशी झाली होती. ती एका आठवड्यांत इतकी अनावर झाली कीं, लोकक्षोभाचा तो भडकलेला वणवा शांत करण्यासाठीं महाराजांची मनधरणी करण्याशिवाय तिला गत्यंतर उरलें नाहीं. दुसऱ्याच दिवशीं तिनें नाइकांची सल्ला घेतली व त्याप्रमाणें कांहीं म्होरक्या लोकांना तडकाफडकी शासनही फर्मावलें. परंतु कोणीही अधिकारी तिच्या आज्ञेप्रमाणें वागेना. नगरांतला हरताळ प्रतिदिवशीं पूर्वींच्याहून तीव्र स्वरूप धारण करीत होता. खुद्द राजवाड्यांतदेखील नित्योपयोगी वस्तू मिळण्याची मारामार पडूं लागली होती. मग नगरांतील दैना काय विचारावी? किल्ल्याच्या दरवाज्यापाशीं दाद मागण्यासाठीं जमणारे लोकांचे थवे राणीपाशीं आपली दाद लागत नाहीं असें पाहून वनवासवाडीकडे महाराजांच्या पायांपाशीं लोटूं लागले. परंतु कोणाचींच गाऱ्हाणीं न ऐकण्याचा महाराजांचा निर्धार कायम असल्यामुळें त्यांनीं कोणालाच भेट दिली नाहीं, व लोकांनाही महाराजांच्या प्रकृतीला स्वास्थ्य नाहीं हें माहीत असल्यामुळें त्यांनीं वनवासवाडीला धरणें धरून बसण्यापलीकडे महाराजांना ज्यास्त त्रास दिला नाहीं. अखेर सकवारबाईला आपला सर्व अभिमान गुंडाळून ठेवून वनवासवाडीला जाणें प्राप्त झालें. तेथें जाण्याचा तिचा आणखी एक उद्देश असा होता कीं, लक्ष्मी आणि सखू ह्या अगोदरच महाराजांपाशीं जाऊन बसल्या होत्या. त्यांच्या कारस्थानावर नजर ठेवणें सकवारबाईला अवश्य वाटत होतें. सजणेची त्या दोघींच्या हालचालींवर गुप्त नजर ठेवण्यासाठीं सकवारबाईनें जरी नेमणूक केली होती तरी तेव्हांपासून आजवर आठ दिवसांत सजणेकडून तिला कांहींच बित्तंबातमी मिळाली नव्हती.

त्या दिवशीं पुण्याहून श्रीमंत नानासाहेब पेशवे आपल्या जुजबी फौजफांट्यानिशीं साताऱ्याला येऊन पोहोंचले. साताऱ्याला नानासाहेबांचे पाय लागतांच गाऱ्हाणीं सांगण्यासाठीं रयतेचे थवेच्या थवे त्यांच्या वाड्याकडे लोटूं लागले. लोकांचा आपला विश्वास कीं महाराज आणि पेशवे एकमतानें काय करतील तें खरें. बाकी सारे पाण्यावरचे बुडबुडे; आज उमटले आणि उद्यां फुटले. त्याचा भरंवसा काय धरावयाचा? झाडून समस्त कारभारी मंडळीही आतां पुढें कसें करावयाचें याचा विचार ठरविण्यासाठीं पेशव्यांच्या वाड्यांत

जमा झाली. बाबूजी नाईक एकटे काय ते तिथें आले नाहींत. प्रतिनिधि वगैरे इतर थोर लोक मनमोकळेपणानें नानासाहेबांना भेटावयाला आले होते असें नव्हे; त्यांनीं तो शिष्टाचार म्हणून पाळला होता. पण तेवढाही शिष्टाचार पाळणें नाइकांच्या हातून झालें नाहीं ! ते सकवारबाईशीं चुगल्या करण्यांत, पेशव्यांच्या नाशाचीं कारस्थानें रचण्यांत, व स्वतःला पेशवाई मिळाल्यावर आपण कसा अधिकार गाजवूं असे मनोरथांचे मनोरे रचण्यांत चूर होते ! त्याच वेळीं त्यांनीं रघूजी भोंसल्यांकडे सांडणीस्वार पाठवून त्यांचेंही पुढील एकंदर कारभाराविषयीं मत विचारलें होतें. नानासाहेबांना पेशवाई मिळण्याच्या वेळीं हीच दुक्कल त्यांच्याविरुद्ध कसोशीनें कारवाई करण्यांत प्रमुख होती; व तेव्हांपासून हे दोघे कावळे पेशवाई कारभाराचें प्रेत पडतें केव्हां व आपण त्याच्यावर ताव मारतों केव्हां अशी सहासात वर्षें उत्सुकतेनें वाट पाहत होते !

नानासाहेब साताऱ्याला येऊन पोंहोंचले व कारभारी मंडळी त्यांच्या वाड्यांत जमून खलबत करूं लागली, त्याच वेळीं नाईक घाईघाईनें रंगमहालांतील चोरट्या भुयारी रस्त्यानें किल्ल्यावर सकवारबाईच्या महालांत येऊन पोंहोंचले. भुयाराचा मार्ग म्हणजे कांहीं राजमार्ग नव्हे, कीं वाटेल त्यानें त्या मार्गानें जावें. परंतु सकवारबाईचें गेल्या आठ दिवसांत राजवाड्यांत अवास्तव प्रस्थ माजल्यापासून तिच्या मर्जींतल्या लुंग्यासुंग्या लोकांनादेखील गुप्त वाटाघाटी करण्यासाठीं तो मार्ग मोकळा होता. नाइकांनीं किल्ल्यावर येतांच सकवारबाईला सुचवलें, "आईसाहेब, ही वेळ मोठी आणिबाणीची आहे. सर्व कारभाऱ्यांनीं कसें 'रामाय स्वस्ति; रावणाय स्वस्ति' या न्यायाचें धोरण राखणें चालविलें आहे हें आपण पाहतच आहां. आतां पेशवे महाराजांना जाऊन भेटतील व आपल्या मायावी बोलांनीं महाराजांना अशी भुरळ घालतील कीं ज्याचें नांव तें ! सारी रयत आपल्या विरुद्ध उलटली आहे याचा फायदा घेऊन पेशवे महाराजांच्याविषयीं आपलें मन कलुषित करण्याला चुकणार नाहींत. अशा वेळीं 'हजीर तो वजीर' ! आपण जर ताबडतोब जाऊन महाराजांपाशीं धरणें धरलें तर मात्र आपल्या छायेखालीं महाराज असेपावेतों, दुसऱ्या कोणाचा देव आला तरी त्याचें तेथें कांहीं चालायचें नाहीं. यास्तव तुम्ही ताबडतोब निघून वनवासवाडीला जा कशा !"

" मी जातें. पण माझ्याबरोबर तुम्ही माझे पेशवे मला पाहिजेत! येतां का?" सकवारबाईनें विचारलें. बेडकीनें गर्वानें फुगून बैलाएवढी मोठी होण्याचा मूर्खपणाचा प्रयत्न करावा, त्याप्रमाणें नाईक गर्वानें बेसुमार फुगून गेले. त्यांना वाटलें कीं, आईसाहेबांची आपणांवर बहाल मर्जी आहे व त्यांच्या कारवाईनें नानासाहेबांची पेशवाईवरून आतां हकालपट्टी खात्रीनें होणार; अर्थात् आपण पेशवे झाल्यासारखेच आहोंत! हजीर तो वजीर. आपण आईसाहेबांबरोबर महाराजांसमोर असलों कीं नानासाहेबांऐवजीं पेशवे कोणाला करावें असें महाराज त्यांना विचारणार, व आईसाहेब आपोआप आपल्याकडे बोट दाखविणार. आईसाहेब तेथें असल्या म्हणजे इतर कारभारी तेथें असणार नाहींत. अर्थात् प्रतिनिधींकडे जरी महाराजांचा ओढा असला, तरी त्यांच्या गैरहजेरींत आपणालाच पेशवाईचीं वस्त्रें मिळणार. अशा मनोराज्याच्या भरांत नाइकांनीं सकवारबाईच्या म्हणण्याला ताबडतोब होकार दिला. त्या रात्रौ महाराजांच्या शुश्रूषेसाठीं म्हणून सकवारबाईनें नाइकांसह वनवासवाडीला जावयाचें ठरलें. त्यांचीं पुढील बेताविषयीं आणखीही कांहीं खलबतें व्हावयाचीं होतीं. पण तेवढ्यांत एका सेवकानें येऊन वर्दी दिली, " श्रीमंत पेशवे आपल्या भेटीसाठीं आले आहेत."

"पेशवे? आणि माझ्या भेटीसाठीं आले आहेत?" सकवारबाईनें आश्चर्यपूर्वक नाइकांकडे पाहत प्रश्न केला.

" विस्तवाच्या भेटीला पाणी आलें; हा योग कांहीं अपूर्वच आहे. आईसाहेब, आपण सांभाळा बरें, विस्तवाला पाणी हां हां म्हणतां विझवून टाकील!" नाईक कावेबाज दृष्टीनें सकवारबाईकडे पाहत म्हणाले.

" पण पेशव्यांचें माझ्या भेटीला येण्याचें काय बरें काम असावें?" सकवारबाईनें कपाळाला आंठ्या घालीत विचारलें.

" हें काय विचारतां? वारा वाहील तशी पाठ फिरविणें हा तर पेशव्यांचा हातखंडा गुण आहे. आपल्या शद्बावरून महाराज त्यांच्यावर रागावल्याची वार्ता त्यांना कळली असेल. म्हणून ते आपली मनधरणी करावयाला आले असतील."

" मग त्यांची भेट मीं घ्यावी कीं न घ्यावी?"

"मला विचाराल तर मी भेट घेऊं नये असें सांगेन, त्यांतून आपली मर्जी!"

पेशवाईचा पुनर्विकास

मनुष्याचा अधःपात होऊं लागला कीं त्याला दुर्जनांची सल्लाच नेहमीं पटावयाची. सकवारबाईला नाइकांची सल्ला पटली. तिनें त्या आलेल्या सेवकाला सांगितलें, " जा, पेशव्यांना म्हणावें आईसाहेब तुमची भेट घेऊं इच्छित नाहींत. "

ते शद्ब सकवारबाईच्या तोंडून निघावयाला व नानासाहेब पेशवे तिथें येऊन पोहोंचावयाला एक गांठ पडली. सकवारबाईचे उद्गार ओझरतेच त्यांच्या कानीं पडले होते. त्यावरून किल्ल्यांतील वातावरण किती बिघडलें आहे याची त्यांना आणखी एकदां अटकळ बांधतां आली. सकवारबाईची देवडीवरील सर्व नोकरांना आपल्या परवानगीवांचून कोणालाही आंत येऊं देऊं नका अशी सक्त ताकीद जरी होती, तरी पेशव्यांना अर्थात् मराठशाहीच्या मूर्तिमंत चैतन्यशक्तीला आंत येण्याला प्रतिबंध कोण करणार? तरीही क्षणभर पहारेकऱ्याची इकडे आड व तिकडे विहीर अशी द्विधा मनस्थिति झालीच. पेशव्यांना आंत जाऊं द्यावें तर सकवारबाईचा रोष होणार व प्रतिबंध करावा तर खुद्द पेशवेच रुष्ट होणार. प्रथम सेवकानें नम्रपणानें सकवारबाईची सक्त ताकीद पेशव्यांच्या कानीं घातली, व राणीच्या शद्बांतून स्वतःची मोकळीक करून घेण्यासाठीं त्यांपैकीं एकजण पेशवे आल्याची वर्दी देण्यासाठीं आंत गेला. नानासाहेबांना सेवकांच्या त्या वर्तनाविषयीं जरी मुळींच राग आला नाहीं, ते बिचारे हुकुमाचे ताबेदार आहेत, इतका विवेक जरी त्यांनीं केला, तरी आपणांला आंत जाण्याला प्रतिबंध आणि तो राणीच्या तर्फेनें व्हावा हा अपमान त्यांना दुःसह झाला. होतां होईल तों कोणत्याही प्रकारें राणीचा उपमर्द करावयाचा नाहीं, शक्य तोंवर नमतेपणानें वागावयाचें, असा नानासाहेबांनीं या खेपेला सातान्यांत पाऊल टाकल्यापासून आपल्या मनाशीं दृढ निश्चय केला होता. आणि ते आज जे सकवारबाईची भेट घेण्यासाठीं आले होते, ते तरी झांकली मूठ सव्वा लाखाची राहावी याच उद्देशानें आले होते.

" नाना, तुम्ही माझ्या परवानगीशिवाय आंत कां आलां ? " सकवारबाईनें कठोर शद्बांनीं नानासाहेबांना प्रश्न केला.

" मला वाटतें मीं यांत कांहीं अन्याय केला नाहीं. " नानासाहेब शांतपणें उत्तरले. बोलतां बोलतां नाईक जवळच बसले होते तिकडे त्यांचें लक्ष

गेलें. नाईकांच्या चुगलखोरपणाला आज काल ऊत आला आहे, व सक-वारबाई अनेकदां त्यांच्या तंत्रानें वागते, हें नानासाहेबांना पूर्वींच कळल्यामुळें नाईक तेथें बसलेले पाहून त्यांना विशेष आश्चर्य वाटलें नाहीं. परंतु नाइकांना मात्र आपण चोर म्हणून मुद्देमालासह पकडलों गेलों असें वाटत असल्याचें त्यांच्या घाबरलेल्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें.

" आमच्या सेवकाची एखादी कृति न्यायाची आहे अगर अन्यायाची आहे याचा निर्णय करण्याचा अधिकार सेवकाचा नसून आमचा आहे. तुमचा हा शिरजोरपणा नेहमींचाच आहे. परंतु तो आजवर चालला तसा यापुढें चालणार नाहीं, याद राखून ठेवा. " सकवारबाई पूर्ववत् कठोर वाणीनें म्हणाली.

" बरें; आईसाहेब, मी आतां येतों. " असें म्हणून नाईक तेवढ्यांत तेथून पाय काढण्याच्या उद्योगाला लागले. तें पाहून नानासाहेब त्यांना म्हणाले, " नाईक ! तुम्ही जाऊं नका, तुम्ही बसा. मला आईसाहेबांपाशीं कांहीं चोरटीं खलबतें करावयाचीं नाहींत, किंवा कांहीं चुगलखोरीही करा-वयाची नाहीं. "

नाईक मुकाट्यानें तेथून निघून गेले. नानासाहेब सकवारबाईला म्हणाले, " आईसाहेब, आपण मला वयानें व नात्यानेंही आईच्या ठायीं पूज्य आहांत. आपण कांहींही बोललां तरी मला बालकाला तीं फुलेंच आहेत. परंतु आपण हें ध्यानीं घेतलें पाहिजे कीं आपणासमोर आतां बोलतो आहे हा नुसता आपला मुलगा नसून मराठशाहीचा पेशवा आहे. आपण मुलाला मान देऊं नका; पण पेशव्याचा अपमान करणें म्हणजे प्रत्यक्ष छत्रपतींच्या सिंहासनाचा अपमान करण्यासारखें आहे. "

" मला माहित आहे, पण तुम्ही माझी आज्ञा मोडून इथें कशाला आलांत तें थोडक्यांत सांगा. "

" मी आपणांला हेंच बजावण्यासाठीं आलों आहें. आपण आरंभिलेला उद्योग राजवटीला विघातक व प्रत्यक्ष राजघराण्याला बेअब्रूकारक आहे. आज-वर झाल्या त्या गोष्टी होऊन गेल्या. पण यापुढें तरी आपण हा अनर्थ थांब-वावा व गुण्यागोविंदानें वागूं लागावें अशी आपल्या पायांपाशीं विनंति करण्यासाठीं मी आलों आहें. "

सकवारबाई विकट हास्य करीत म्हणाली, " हें काय ? हें मी काय ऐकतें ? नाना, तुम्ही आसेतुहिमाचल आपला दरारा गाजविणारे, व आपल्या शद्वापुढें आम्हां महाराजांच्या राण्यांना आजवर तुच्छ लेखणारे, तेच पेशवे ही नरमाईची भाषा बोलत आहेत काय ? आपल्या दुष्कर्मांनीं पेशवाईला मुकण्याची वेळ आली, म्हणून हा नम्रपणा तुम्हांला सुचला वाटतें ? "

मनुष्य कितीही सहनशील झाला तरी त्याच्या सहनशीलतेला मर्यादा ही आहेच. नानासाहेब आपला आवेश आवरण्याची शिकस्त करीत उद्गारले, " आईसाहेब, आपणांला मीं एकवार माझ्या मातेच्या ठिकाणीं मानलें आहे म्हणून ! आपल्या ठिकाणीं जर अन्य कोणी माणूस असतें तर प्रकार अगदीं निराळा झाला असता. "

" प्रकार निराळा तो काय होणार ? तुम्ही मला कैदेंत डांबून ठेवणार हेंच कीं नाहीं ? पण नाना ! दिवा विझतांना मोठा होतो म्हणतात त्यांतली ही अरेरावी आहे. सूर्यचंद्रांनादेखील उदय आहे तसा अस्तही आहे. मी सतत माध्यान्हीं तळपत राहीन असा दुराग्रह सूर्यानें धरला व त्या दिमाखांत तो आपल्या तीव्र दाहक शक्तीनें ब्रह्मांडाला जाळूं लागला तरी त्याचें तें माध्यान्हींचें सामर्थ्यदेखील अशाश्वत असतें. तुमच्या अरेरावीची आज परिसीमा झाली आहे. या क्षणीं मी तुम्हांला बजावून ठेवतें, यापुढें एक पेशवे तरी नाहींसे होतील, किंवा ही सकवारबाई तरी जगांतून निघून जाईल. पण भट पेशवे आणि राणी सकवारबाई हीं यापुढें एकाच वेळीं मराठशाहींत पूर्ववत् नांदणें कालत्रयींही शक्य नाहीं. "

आपल्या तोंडून भलता एखादा शद्व निघून जाऊं नये यास्तव जपतां जपतां नानासाहेबांची क्षणोक्षणीं अधिकाधिकच कुचंबणा होऊं लागली होती. ते सकवारबाईशीं जास्त एक अक्षरही न बोलतां 'बरें आहे. मी येतों' असा तिचा निरोप घेऊन तडक बाहेर निघून गेले.

नानासाहेब बाहेर केव्हां जातात या तलासावर नाईक टपून बसलेले होतेच. ते नानासाहेब बाहेर गेल्याचें कळतांच पुन्हा आंत आले. त्यांचें सकवारबाईशीं पुन्हा थोडा वेळ खलबत होऊन दोघांनीं लगेच रातोरात महाराजांकडे जावयाचें ठरलें व मेणा तयार होऊन सकवारबाई मेण्यांतून तावडतोब नाइकांसह वनवासवाडीला जावयाला निघाली.

प्रकरण १८ वें

राणीची मोहिनी

कोणाचीही भेट घ्यावयाची नाहीं, असा महाराजांचा जरी निर्धार होता, व त्याप्रमाणें त्यांचे पहारेकरी कोणालाही आंत प्रवेश देत नसत, तरी सकवारबाई आणि नाईक समवेत आलेलीं पाहतांच त्यांना प्रतिबंध करण्याचें धैर्य पहारेकऱ्यांना झालें नाहीं. नाईक प्रथम थेट महाराजांपाशीं गेले व थोरल्या आईसाहेब समाचारासाठीं आल्या आहेत असें त्यांनीं त्यांना सांगितलें. महाराजांनीं 'त्यांना आंत बोलवा' असें सांगतांच सकवारबाई आंत महालांत गेली. महाराजांना राणी आपल्या समाचाराला आलेली पाहून समाधान वाटलें. याचा थांग आरंभींच कोणाला कसा लागणार ? सकवारबाईनें तेथें जातांच प्रथम ओक्साबोक्शी रडून महाराज वनवासवाडीला वैतागानें निघून आल्याबद्दल स्वतःला परमावधीचें दुःख झाल्याचा असा बेमालूम बहाणा केला कीं तिच्या आंसवांच्या पुरांत पाषाणदेखील विरघळून गेला असता ! मग महाराजांचें मन द्रवलें यांत नवल तें काय ?

याप्रमाणें प्रारंभ जिंकल्यावर सकवारबाईनें प्रथम आपल्या गेल्या आठ दिवसांतील उपद्व्यापांचें आपल्या परीनें समर्थन चालविलें. तिची समजूत कीं राजधानींत गेल्या आठ दिवसांत घडलेल्या सर्व घडामोडी महाराजांच्या कानीं आल्या असतीलच. त्या अनुरोधानें तिनें चिटणीस व अमात्य यांची अनेक खऱ्याखोट्या सबबींनीं नालस्ती करण्याला केलें नाहीं. तिनें भलेबुरें कसलेंही विधान केलें तरी त्याला साथ देऊन त्याचें समर्थन करण्याला नाईक बरोबर होतेच.

महाराजांनीं त्या सर्व तक्रारी शांतपणें ऐकून घेतल्या. त्यांना कोणीही कांहींही सांगावें व संशयाचें वादळ त्यांच्या मनांत उठवून द्यावें; असाच

त्यांचा स्वभाव होता. अशीच आपली बाजू सकवारबाईनें हळूहळू इतकी कांहीं खुलवून सांगितली कीं, तिनें केवळ दौलतीच्या आबादानीसाठींच आठ दिवस कारभार आपल्या हातीं घेतला होता, व तें अमात्य, चिटणीस वगैरे मंडळीला सहन न झाल्यानें त्यांनीं सकवारबाईला विरोध आरंभिला असावा अशी महाराजांची समजूत झाली. आणखी उरल्यासुरल्या आपल्या कठोर पूर्वकृतीच्या वारांनीं महाराजांच्या अंतःकरणाला झालेल्या जखमा साफ बुजून निघाव्या व आपल्या ठायीं महाराजांचा पूर्ण विश्वास बसावा म्हणून सकवारबाईनें अनेकवार त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना यापुढें कोणत्याही बाबतींत दुःख न देण्याच्या व विरोध न करण्याच्या कितितरी आणा शपथा वाहिल्या. कशी झाली तरी ती महाराजांची धर्मपत्नी. महाराजांनीं दयार्द्र अंतःकरणानें तिला तिच्या सर्व अपराधांबद्दल क्षमा करून पुनः राजधानींत येण्याचें वचन दिलेंच !

नंतर पेशव्यांचा प्रश्न निघाला. तेव्हां सकवारबाई हळूच म्हणाली, "पेशवे राजधानींत आल्याचें आपणांला कळलेंच असेल. कदाचित् ते आपणाला भेटून जरूर तो आगलावेपणा करूनही गेले असतील."

"नाहीं, ते अजून आमच्या भेटीला आलेले नाहींत." महाराज उत्तरले.

"तेंही बरोबरच आहे. सकवारबाईला गाडण्यासाठीं खणीत असलेला खड्डा अजून पुरा झाला नसेल. तो झाल्यावर ते इकडे येतील." असे उद्गार काढतां काढतां सकवारबाईनें नेत्रांत आंसवें उभीं केलीं. महाराजांचें मन नानासाहेब पेशव्यांविषयीं कलुषित करण्याच्या त्यांच्या स्वीकृत महत्वाच्या कार्याची ही नांदीच होती. नाईक आणि सकवारबाई यांचा आजकाल प्रचलित घालमेलींत अगदीं एकजीव झाल्याकारणानें एकमेकांनीं एकमेकांची साथ कुठें कशी करावी हें दोघांनाही बेमालूम समजत होतें. येन केन प्रकारेण महाराजांचें मन नानासाहेबांविषयीं कलुषित करून नानासाहेबांची मराठशाही राज्यकारभारांतून कायमची हकालपट्टी कशी होईल हें ध्येय डोळ्यापुढें ठेवून दोघेंही त्या ध्येयपूर्तीसाठीं झटत होतीं. नानासाहेबांचें किल्ल्यांत सकवारबाईशीं जें वर्तन झालें तें कोणाच्याही त्रयस्थ निःपक्षपाती दृष्टीला केवळ सडेतोड दिसलें असतें; या पलीकडे कोणालाही त्यांत वैगुण्य दिसून आलें नसतें. पण सकवारबाईच्या अहंकारपूर्ण विकृत दृष्टीला त्यांतही अत्यंत अप-

मान वाटला. तो वृत्तान्त नाइकांना कथन करतांना तिनें त्यांत पदरच्या कांगावखोरपणाची आणखी भर घातली. त्याला नाइकांनीं आपल्या आगलावेपणाची चांगलीच जोड देऊन त्या कागाळीचा भला मोठा ग्रंथ आपल्या मनाशीं रचून महाराजांपाशीं पाढा वाचण्यासाठीं तयार ठेवला होता. त्या ग्रंथाचा श्रीगणेशा सकवारबाईच्या तोंडून झाल्यावर नाइकांनीं मानभावी-पणानें त्याचें निरूपण केलें. भाजलेल्या जागीं आगीच्या नुसत्या आंचेनेंही फोड उठतो. महाराजांचें मन नानासाहेबांविषयीं अगोदरपासूनच गढूळ झालेलें असल्यानें त्यांना सकवारबाईच्या अश्रूंत प्रामाणिकपणा दिसून आला, व नाइकांची लावालावीही त्यांनीं जमेला धरली. त्यांनीं विचारलें, " नानानें काय केलें ? "

" प्रत्यक्ष किल्ल्यावर जाऊन आईसाहेबांचा अपमान ! हरहर ! तो वृत्तान्त नुसता आठवूनदेखील अंगाचा असा तिळपापड होतो कीं परमेश्वरानें तेव्हां मला तेथें हजर ठेवलें नाहीं ही मोठीच खैर केली. मी तेथें असतों, तर त्या मगरूर अरेराव पेशव्याचें बरेंवाईट करण्याचा अविचार माझ्या हातून खास झाला असता. " नाईक लटक्या आवेशानें म्हणाले.

" नाना काय म्हणाले तें आम्हांला कळूं दे तर खरें ! " महाराजांनीं पुन्हा पण पूर्वींपेक्षां कड्या स्वरांत विचारलें.

आपला प्रत्येक शद्ब महाराजांना कानामात्रेसह पटत चालला आहे असें पाहून मनांतल्या मनांत हर्षून पण बाह्यतः घेतल्या सोंगाची बतावणी करण्याविषयीं शक्य ती दक्षता बाळगून सकवारबाई म्हणाली, " माझा अपमान पेशव्यांनीं केला यांत मला तितकेंसें वाईट वाटत नाहीं.—"

" नाहीं कसें ?—महाराज ! आईसाहेबांचा अपमान म्हणजे कोणा हलक्या-सलक्या माणसाचा अपमान नव्हे कांहीं ! महाराष्ट्राच्या महाराणीचा अपमान म्हणजे काय गोष्ट आहे ! महाराजांनीं जर प्रथमापासून ही पायांतली वहाण पायांत ठेवली असती, तर असा अनवस्था प्रसंग कशाला ओढवता ? "

सकवारबाई म्हणाली, " पेशव्यांनीं राजकारणांत मांडलेला बखेडा महाराजांना असह्य झाल्यानें त्याला आळा घालण्याचा महाराजांचा मानस आहे हें मला अगोदरच ओझरतें कळलें होतें. पेशव्यांचा पाताळयंत्री स्वभावही माझ्या पूर्ण परिचयाचा आहेच. महाराजांच्या मागें पेशव्यांना कुलमुखत्यारी

राज्यकारभारांत कांहीं बखेडे उत्पन्न करण्याला अवसर मिळूं नये म्हणून मीं त्यांना सांगितलें कीं, महाराजांना भेटून येईतों तुम्ही कारभारांत ढवळाढवळ करणें बरें नाहीं. आाण हें देखील केव्हां सांगितलें ? तर ते कोणालाही न जुमानतां मी वाड्यांत एकटी असतांना आंत घुसले तेव्हां. पण वर किल्ल्यांत येतांनादेखील ज्यांना माझी यत्किंचित् मुर्वत बाळगावीशी मुळीं वाटली नाहीं, त्यांना माझा शब्द कसा रुचणार? अवाढव्य सत्तेची धुंदी त्यांच्या डोळ्यांवर आली आहे. त्यांना आमची काय पर्वा ? त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें कीं आपण कोणालाही ओळखीत नाहीं. तशीच वेळ पडली तर महाराजांनादेखील आपण गुंडाळून ठेवावयाला कमी करणार नाहीं, असेंदेखील ते मदोन्मत्त-पणाच्या ओघांत बोलून गेले.—"

अनेक वेळां असें होतें कीं खऱ्यापेक्षां खोटेंच जास्त खरें वाटतें. रत्नापेक्षां कांचदेखील कधीं कधीं ज्यास्त चकाकते. सकवारबाईचे ते खोडसाळपणाचे उद्गार महाराजांना खरेच वाटले. त्यांच्या हृदयाला धक्का बसल्यासारखा झाला. ते ओघासरसे बोलून गेले, "मराठशाहीला लागलेलें पेशव्यांच्या अरे-रावीचें ग्रहण कधीं सुटेल तो सुदिन."

"मीं त्यांना त्याच वेळीं म्हटलें कीं महाराजांविषयीं निदान माझ्या तोंडावर तरी आणि तुमच्यासारख्या जबाबदार माणसानें असें उणें बोलणें बरें नाहीं. तेव्हां त्यांनीं मला निधड्या छातीनें निक्षून सांगितलें कीं ज्यास्त बोलाल तर जी गत ताराबाईआईसाहेबांची झाली आहे तीच तुमचीही होईल! माझें नशीब थोर म्हणून ती दुर्दशा कपाळीं येण्यापूर्वीं मला महाराजांच्या पायांचें दर्शन घडलें." सकवारबाई डोळ्यांना पदर लावून क्षणभर थांबून म्हणाली, "महाराजांविषयीं त्यांच्या जीव कीं प्राण पेशव्याच्या तोंडून असले उन्मत्त-पणाचे उद्गार ऐकण्यापेक्षां निराळें दुर्भाग्य तें कोणतें?"

थोडा वेळ पावेतों यावर कोणी कांहीं बोललें नाहीं. महाराज अत्यंत गंभीर वृत्तीनें विचार करीत होते, तर सकवारबाई व नाईक हीं दोघेंही आपल्या चतुराईचा महाराजांच्या मनावर कितपत परिणाम झाला हें त्यांच्या चेहऱ्या-कडे निरखून पाहून अजमावण्यांत दंग होतीं. त्यांना महाराजांच्या चर्येवरील वाढत्या गांभीर्यावरून अटकळ करतां आली कीं, महाराजांच्या मनांत पेट-लेल्या पेशव्यांविषयींच्या अविश्वासाच्या आगींत आपल्या खोडसाळ लावा-

लावीच्या तेलाची चांगलीच भर पडली आहे. नाईक तर त्याच क्षणीं मनांत मांडे चुरूं लागले कीं आतां महाराज नानासाहेबांची पेशवाईपदावरून खास उचलबांगडी करणार; व आईसाहेबांच्या वशिल्यानें तें पेशवाईपद आपल्याला मिळणार. मग आपण आपलें मुख्य निवासस्थान बारामतीऐवजीं साताऱ्याला मुक्रर करावें कीं पुण्याच्या शनवारवाड्यांतून पेशव्यांना हांकलून देऊन तेथें आपलें वास्तव्य करावें?—तेवढ्यांतल्यातेवढ्यांत त्यांनीं मनाशीं निश्चयदेखील करून टाकला कीं, प्रथम कांहीं वर्षें तरी आपण पेशवे म्हणून शनवारवाड्यांतच मिरवणार.

ह्या प्रश्नाचा याच बैठकींत काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावा म्हणजे सकवारबाई समक्ष आहे तोंवर तिच्या भिडेनें महाराज आपणाला पेशवा करण्याचें अभिवचन देतील अशी नाइकांची अपेक्षा होती. परंतु ऐन वेळीं महाराजांच्या हुजऱ्यानें नानासाहेब पेशवे भेटीला आल्याची वर्दी आणली तेव्हां एथवरचें सारेंच बोलणें खुंटलें. महाराजांनीं हुजऱ्याला सांगितलें, "जा! त्यांना आंत पाठवून दे."

"आतां नानासाहेब पुन्हा सर्व प्रयत्नांना आपल्या मिठ्ठास भाषणानें हरताळ फांसणार, अशी मनांतल्या मनांत चिंता करीत सकवारबाई लगेच अंतर्महालांत गेली. पण ती फार दूर गेली नाहीं; नानासाहेब व महाराज यांचें काय संभाषण होतें तें ऐकण्यासाठीं चिकाच्या पडद्यापाठीमागें अंमळ आडवशाला उभी राहिली. नाईक मात्र तेथें बसले.

नानासाहेबांनीं आंत येतांच महाराजांना नम्रतापूर्वक वंदन करून विनंति केली, "महाराजांच्या आज्ञेप्रमाणें हातांतील कामें अर्धीं टाकून आलों आहें. आतां सेवकाला काय आज्ञा व्हावयाची ती व्हावी."

"तुम्ही आलां, आमच्यावर मोठे उपकार केले. फौजफांटा बरोबर कितीसा आणला आहे?" महाराजांनीं नानासाहेबांना बसादेखील न म्हणतां रागानें विचारलें. नाईक व सकवारबाई यांना तो प्रश्न ऐकून परम संतोष वाटला.

नानासाहेब महाराजांच्या बोलण्याचा रोंख पाहून मनांत चरकून उत्तरले, "महाराजांची जी आज्ञा होईल, तिची तावडतोब अंमलबजावणी करण्याला सुलभ व्हावें म्हणून जरूर तेवढा फौजफांटा घेऊन आलों आहें."

" आम्हांला पदच्युत करून कोल्हापूरचें कळसूत्री बाहुलें आणून साताऱ्याच्या गादीवर बसवावयाचें व मराठशाहीची सर्व सत्ता आपल्या मुठींत ठेवावयाची असाच तुमचा मानस ना ? " महाराजांनीं तीक्ष्ण दृष्टीनें नानासाहेबांकडे रोखून पाहत प्रश्न केला.

नानासाहेब विषादपूर्वक उत्तरले, " नीट चौकशी न करतां भलताच विकल्प डोक्यांत घेऊन महाराज जर ह्या सेवकाविषयीं भलताच संशय धरूं लागले, तर तेथें मी काय करूं ? "

महाराजांनीं एकदम बोलण्याचा रोख बदलून विचारलें, " तें सारें आम्हांला कळतें. तेवढी बुद्धि व धारणाशक्ति परमेश्वरानें आम्हांला दिली आहे. बरें; आजवर तुम्हीं इतक्या मोहिमा मारल्या, तो आमच्या डोक्यावरचा कर्जाचा भार उतरण्यासाठीं कितीसा पैका संचय करून आणला आहे ? "

" दूरवरच्या स्वाऱ्यांच्या निमित्तानें महाराजांच्या दौलतीचा व्याप किती वाढला आहे, हें महाराज जाणतातच. हा वाढता व्याप सर्व काशीपासून रामेश्वरापावेतों सांभाळावयाचा म्हणजे पाण्यासारखा पैका ओतावा लागतो. त्यांतूनही सर्व कारभारी सद्बुद्धीनें व एक विचारें वागत असते, त्यांनीं राजवटीच्या वाढत्या खर्चाचा भार त्यांच्या त्यांच्याकडून होणाऱ्या वसुलापुरता तरी व्यवस्थितपणें उचलला असता, तर कर्ज फिटण्याला अडचण पडली नसती.—"

" पण ते सरदार शिरजोरपणानें वागूं लागले, राजवटीची आस्था त्यांना राहिली नाहीं, याला जबाबदार कोण ? " महाराजांनीं विचारलें.

नाईक लक्षपूर्वक तें संभाषण ऐकत होतेच. ते आगांतुकपणानें मध्येंच म्हणाले, " कारभारी काय किंवा सरदार दरखदार काय, आम्ही सर्व महाराजांचे सेवक आहोंत; पेशव्यांचे नाहीं. रघूजी भोंसल्यांसारख्या खानदानी मातबरांनीं राज्यकारभारांत चोरट्या अंगानें वागावें, व दाभाड्यांसारख्यांनीं ठेवावी तितकी श्रद्धा राजवटीवर ठेवूं नये, याचा अर्थ हाच कीं उपऱ्या पेशव्यांची अस्मानी सुलतानी मराठशाहीच्या जन्मापासूनच्या खानदानीच्या मातबरांना मुळींच मान्य नाहीं. "

या वेळीं नाइकांचेंही उपरेपण बोलून दाखविण्याचें नानासाहेबांच्या अगदीं ओंठावर आलें होतें. पण त्यांनीं प्रसंग ओळखून जीभ आवरली.

" तुम्ही आमच्या विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं ? " महाराज नानासाहेबांना म्हणाले, " तुम्ही ज्यांना विरोधी समजतां, त्यांचा विरोध तरी कां असावा ? याला कांहीं उत्तर तुमच्यापाशीं आहे काय ? "

" उत्तर आहे; पण तें बोलून दाखविण्याला मला तोंड नाहीं. " नानासाहेब उद्गारले.

" अशी टोलवाटोलवीची भाषा नको. स्पष्ट काय तें बोला. " महाराज पुन्हा म्हणाले.

" स्पष्ट बोलण्याला आपल्याला तोंड नाहीं, असें त्यांनीं आतांच सांगितलें ना ? माझ्या इतक्या वर्षांच्या अनुभवांत पेशवे खरें बोलल्याचें आजच मी ऐकतों आहें ! " नाईक पुन्हा मध्येंच म्हणाले.

नानासाहेबांना नाइकांचा मनस्वी संताप आला होता. यावेळीं तरी नाईक हे सांबाच्या पिंडीवरील विंचू आहेत, त्यांना पादत्राण हाणावें तर तें सांबाला लागणार, म्हणून नानासाहेब कसेबसे स्वस्थ होते. परंतु त्यामुळें नाइकांची जीभ ज्यास्तच चुरचुरूं लागलेली पाहून त्यांना तें सहन होईना. ते क्रोधाविष्ट होऊन नाइकांकडे अंगुलिनिर्देश करून उद्गारले, " अशीं माणसें महाराजांच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेऊन शिरजोर बनतात, व आम्हांला जुमानीतनाशीं होतात. पेशवे म्हणजे कुठच्या झाडाचा पाला असें त्यांना वाटतें. बरें, महाराजांच्या आज्ञा तरी ते तत्परतेनें पाळतात असें कुठें आहे ? दाभाडे, भोंसले, गायकवाड, जाधव, यांचीं उदाहरणें महाराजांना माहीत आहेतच. असा प्रत्येकजण अंगचोरपणानें सवत्या सुभ्याचा कारभार मांडूं लागला तर सर्व गोष्टी सुरळीत कशा चालणार ? "

" याचें उत्तर हेंच, कीं जसें करावें तसें भरावें. तुम्हीं पेशव्यांनीं तरी दाभाडे, भोंसले, गायकवाड, वगैरे खानदानी मंडळीला कोठें मानानें वागविलें आहे ? आंग्रे यांचा सत्यनाश अन्यायानें व इंग्रजांसारख्या परक्यांना हातीं धरून तुम्हींच केला ना ? " नाईक महाराजांकडे वळून म्हणाले, "राजवटीचे जुने सेवक पेशव्यांच्या डोळ्यांत सलतात, कारण यांचा उपरेपणा त्या लोकांच्या खानदानीपणामुळें ज्यास्त उघड्यावर पडतो. एवढ्यासाठीं पेशव्यांनीं खानदानी थोरांशीं पिढिजात हेवादावा मांडला आहे; त्यांना आंग्रे नकोत, भोंसले नकोत, दाभाडे नकोत, गायकवाड नकोत, मराठशाहीच्या

आबादानीसाठीं आज उणींपुरीं दोनशें वर्षे ज्यांनीं आपलीं हाडें कसविलीं, ते कोणीही नेकजात मराठे पेशव्यांना आजच्या राजवटींत डोळ्यांसमोर नको आहेत. मग त्या लोकांनीं तरी पेशव्यांचा बोज काय म्हणून राखावा ? ''

नाइकांचे ते वावदूक वृत्तीचे बोल ऐकूनही महाराज स्वस्थ बसतात याचा अर्थ त्यांचें मन आपल्याविषयीं पूर्वींप्रमाणें पाक उरलें नाहीं, हें ओळखून नानासाहेबांनीं नाइकांना कांहीं उत्तर दिलें नाहीं. ते जें बोलले तें महाराजांना जरी रुचलें नाहीं, तरी तें खोटें होतें असेंही नाहीं. महाराजांची संशयी वृत्ति व नेमस्तपणाचें धोरण हेंच राजवटींतील अंतर्गत अव्यवस्थेचें मूळ होतें. होतां होईतों जुनें मोडूं नये व नवें करुं नये ही महाराजांच्या वागण्याची पद्धत ! पेशव्यांनीं एखाद्याला एक हुकूम दिला तर महाराजांनीं निराळाच हुकूम द्यावा, किंवा पेशव्यांचा हूकूम त्या मनुष्यानें न मानल्याबद्दल कागाळी कानीं आली तरी तिकडे कानाडोळा करावा. अशामुळें खुद्द महाराजांचाही राज्यांत खरा वचक नाहींसा झाला होता. पण नानासाहेबांनीं महाराजांच्या तोंडावर इतक्या स्पष्टपणें कोणत्या तोंडानें बोलावें ?

"हें पाहा नाना, आजवर तुमच्या सबबी ऐकून ऐकून आमचे कान किटले. ह्या सबबींखेरीज दुसरें कांहीं पुढें करण्यासारखें भरींव कारण तुमच्यापाशीं कांहीं आहे का ?'' महाराजांनीं पूर्ववत् साशंक वृत्तीनें विचारलें.

नानासाहेब उत्तरले, "आहे ही सारी दौलत स्वामींची आहे, व मी सेवकही स्वामींचाच आहें. यापेक्षां ज्यास्त मला कांहीं बोलतां येत नाहीं. ''

"पण बोललां तें तरी कांहीं खरें बोलावयाचें होतें ! तुम्ही सेवक आमचे, तर कोल्हापूरकरांना फितूर काय म्हणून झालां ? आमच्या मनांतून ह्या अप्रिय गोष्टीची वाच्यता करावयाची नव्हती. पण करून सवरून नामानिराळे राहण्याची तुमची कावेबाज वृत्ति या क्षणापावेतों कायम असल्याचें पाहून बोलणें प्राप्त झालें. ''

"महाराजांनीं त्या गोष्टीचा असा विपर्यास करूं नये. मी कोल्हापूरकरांशीं तेव्हां करारनामा केला खरा. परंतु तसें करण्यांतील माझा हेतु—''

"तुमचा हेतु आम्हांला पूर्णपणें कळला. आतां तुम्ही जा. ''

"महाराजांनीं कृपापूर्वक माझा थोडा खुलासा ऐकून घ्यावा. '' नानासाहेब हात जोडून विनम्र वाणीनें म्हणाले.

" तुमचें एक अक्षरही ऐकून घेण्याची आमची आतां इच्छा नाहीं. तुम्ही जा. " असें पुन्हा म्हणून महाराज त्याच क्षणीं बैठकीवरून उठले. नानासाहेब खिन्न वृत्तीनें आपल्या निवासस्थानाकडे जाण्यासाठीं बाहेर पडले. आपला खुलासादेखील ऐकून घेण्याला महाराज तयार नाहींत, त्या अर्थी आपला ह्या राजवटींतील अन्नोदकाचा ऋणानुबंध संपला, असा धक्का त्यांच्या मनाला बसला. आतां येथून पुढें काय करावयाचें याचा ते विचार करूं लागले. परंतु तशा आणीबाणीच्या वेळीं त्यांना शांतपणाचा विचार कोठून सुचणार ? खवळलेल्या अथांग महासागरांत शीड तुटून सैरावैरा धांवणाऱ्या नौकेला घनदाट धुक्यांतून किनाऱ्याची वाट कुठून सांपडणार ?

प्रकरण १९ वें

नाइकांची कारवाई

नानासाहेब आपल्या निवासस्थानीं जाण्यासाठीं विषण्ण चित्तानें बाहेर पडतांच महाराजांनीं आपल्या एका हुजऱ्याला बोलावून आज्ञा केली, " असाच्या असा जा; आणि चिटणिसांना तांतडीनें असाल तसे बोलाविलें आहे असें सांगून ताबडतोब आपणाबरोबर घेऊन ये. "

हुजऱ्या निघून गेला. नाईक महाराजांजवळ बसून हा सारा प्रकार पाहतच होते. महाराज आणि नानासाहेब यांचा आज चांगलाच खटका उडाला हें पाहून त्यांच्या मनाला समाधान वाटत होतें. परंतु नानासाहेबांच्या मागें पेशवाईचीं वस्त्रें महाराज कोणाला देणार हा प्रश्न शिल्लक होताच. त्या प्रश्नाचा आपल्या मनासारखा निकाल लागला तर लागण्याची हीच वेळ आहे असें हेरून नाईक तसेच लगबगीनें उठले व सकवारबाईपाशीं जाऊन तिला म्हणाले, " आईसाहेब, एथवर परमेश्वरानें आपणाला यश दिलें. परंतु ह्या हातीं घेतलेल्या उद्योगाची तुम्हीं नीट तड लावली तर तिचा उपयोग! नाहींपेक्षां आज मरणोन्मुख झालेला हा सर्प कालांतरानें पुन्हा ताजातवाना होऊन आपला उलटा चावा घ्यावयाला कमी करणार नाहीं. "

या विषयावर सकवारबाई व नाईक यांचें सुमारें दोन घटका बोलणें सुरू होतें. तेवढ्या वेळांत नाईक सकवारबाईवर आपल्या साखरघोळ शब्दांची चांगलीच मोहिनी घालूं शकले. त्यांनीं आपणाला पेशवेपद प्राप्त झाल्यास आपण तिच्या अर्ध्या वचनांत वागण्याचें तर कबूल केलेंच; पण त्याबरोबरच महाराजांना कर्जमुक्त करण्याची जबाबदारीही आपल्या शिरावर घेतली. त्यांनीं सकवारबाईपाशीं तो विषय मुद्दाम काढला, याचें कारण महाराजांनीं नाना-साहेबांपाशीं स्वतःच्या कर्जबाजारीपणाचा विषय नुक्ताच काढलेला त्यांनीं

ऐकला होता; व हें आमिष सकवारबाई पुन्हा आपणाला पेशवे करण्याचा प्रश्न महाराजांपाशीं काढील तेव्हां, महाराजांच्या तोंडून होकार वदविण्याच्या कामीं चांगलेंच उपयोगीं पडेल अशी त्यांना आशा वाटत होती.

याप्रमाणें सकवारबाई आणि नाईक यांचें आपसांत खलबत चाललें असतांना चिटणीस महाराजांपाशीं येऊन पोहोंचले. ते आल्याची वर्दी मिळतांच सकवारबाईच्या सांगण्यावरून नाईक लगबगीनें पुन्हा बैठकखान्यांत येऊन हजर झाले.

चिटणिसांना झाल्या प्रकाराची थोडीशी कुणकूण कळली होतीच; व त्या बाबतींत महाराजांशीं विचारविनिमय करून महाराजांचा गैरसमज दूर करण्याची संधी ते इतके दिवस पाहत होते. पण प्रत्यक्ष महाराजांची गांठ पडतांच महाराजांच्या पहिल्या आज्ञेसरशी चिटणिसांच्या त्या मानसाची हातपाय तोडलेल्या राजा विक्रमासारखी अवस्था झाली.

चिटणिसांनीं समोर येतांच मुजरा केला तो स्वीकारून महाराज म्हणाले, "चिटणीस, आम्हीं तुम्हांला एवढ्यासाठीं तांतडीनें बोलावलें, आतांच्या आतां आमच्या देखत पेशव्यांना आज्ञापत्र लिहा कीं तुम्हांला आम्हीं पेशवाईपदावरून दूर केलें आहे."

महाराजांचे ते शद्ब चिटणिसांच्या कानांना अत्यंत कटु व अमंगळ वाटले. ते महाराजांची समजूत करण्याच्या इराद्यानें म्हणाले, "पण महाराजांनीं या गोष्टीचा शांत चित्तानें विचार— "

"पुरे करा." महाराज हातानेंच चिटणिसांना गप्प राहण्याची सूचना देऊन म्हणाले, "महाराजांनीं सर्व गोष्टींचा शांतपणें विचार जितका करावयाचा तितका अगोदरच केला आहे. आजकाल आमच्या सभोंवार सल्लागारांचें पेंव फुटलें आहे. त्याचा आम्हांला अगदीं वीट आला आहे. असल्या सल्लागारांचें आम्हांला मुखावलोकनदेखील करावयाला नको आहे. आम्हांला राज्यकारभार करण्याची बुद्धि परमेश्वरानें दिली आहे तेवढी पुष्कळ आहे. आतां आमच्या आज्ञा अक्षरशः प्रमाण मानून वागतील अशा आज्ञाधारक सेवकांना फक्त आमच्यापाशीं थारा मिळेल. तुम्हांला आमची आज्ञा मानावयाची आहे कीं नाहीं ? एका शद्बांत काय तें उत्तर द्या. होय म्हणा किंवा नाहीं म्हणा."

" आज महाराजांचें मन पालटलेलें दिसतें. असले उद्गार महाराजांच्या तोंडून ऐकण्याचा हा पहिलाच प्रसंग मी अनुभवीत आहें. " चिटणीस विमनस्कतापूर्वक म्हणाले.

" ह्या अवांतर गोष्टी आम्हांला ऐकावयाच्या नाहींत म्हणून सांगितलें ना ? आमची व राजवटीची यथासांग सेवा आजवर तुमचे वाडवडील करीत आले तशी बिन्बोभाट करावयाची असेल तर आम्ही बोलतों तो शब्द प्रमाण. नाहींपेक्षां जी गत पेशव्यांची, तीच तुमचीही होईल; याद राखून ठेवा. "

चिटणिसांच्या डोक्यांत महाराजांच्या त्या आततांईपणाच्या उद्गारांनीं क्षणभर काहूर माजविलें. आपल्या आज इतक्या पिढ्या छत्रपतींच्या सेवेंत खर्चीं पडल्या, ती सारी सेवा आज अदूरदर्शीपणानें महाराज मातीमोल करीत आहेत, अशा या बेबंदशाहींत यापुढें घोटभर पाणी पिणें किंवा श्वासोच्छ्वास करणें हें देखील पाप आहे. आपण याच क्षणीं याच पावलीं महाराजांचा शेवटचा निरोप घेऊन निघून जावें असें त्यांच्या मनांत आलें. तोंच सकवारबाई आंतून उद्गारली, " चिटणीस स्वतःला महाराजांचे व राजवटीचे निष्ठावंत सेवक म्हणवितात, त्यांच्या स्वामिनिष्ठेची कसोटी आतां कळणार आहे. "

चिटणिसांनीं ते शब्द ऐकून सकवारबाईचा मनांतून शतशः धिक्कार केला. केवळ महाराजांची, व ती महाराजांची अर्धांगी म्हणून तिची अमर्यादा कांहीं केल्या करावयाची नाहीं, ह्या स्वामिभक्तिपूर्ण भावनेनेंच त्यांनीं आपलें तोंड आवरलें. सकवारबाई एथें महाराजांना चिथावणी देण्यासाठीं बसली आहे, त्याचाच हा परिणाम आहे, अशी खात्री होतांच त्यांचा निश्चय मात्र बदलला. 'यावेळीं जर आपण त्राग्यानें राज्यकारभारांतलें अंग काढून घेतलें व महाराजांची इतराजी संपादन केली, तर पेशवे कारभारांतून दूर व्हावयाचे ते होतीलच; पण आपणाबरोबरच इतर बहुतेक कारभारीमंडळीही ह्या बजबजपुरीला विटून कारभारांतून आपलें अंग काढून घेतील. मग राणी आणि तिचे हस्तक यांना मन मानेल तसा सांवळागोंधळ घालण्याला रान मोकाट सांपडून आज वैभवाच्या कळसाला पोहोंचू पाहणारी मराठशाही हां हां म्हणतां उजाड होईल.' हें भावी काळाचें मूर्तिमंत भीषण चित्र त्यांच्या

अंतश्चक्षूंसमोर उभें राहिलें. अखेर या वेळेपुरतें आपण सारासार विचार मार्गे ठेवून महाराजांच्या मर्जीप्रमाणें वागावें, व मागाहून इतर कारभारी-मंडळीला भेटून सर्वांनीं मिळून पुढील धोरण काय तें निश्चित ठरवावें, असा मनाचा धडा करून त्यांनीं मुकाट्यानें आज्ञापत्र लिहावयाला घेतलें. तें आज्ञापत्र लिहितांना त्यांचे हात थर थर कांपत होते, व डोळ्यांवाटे अश्रूंचा पूर वाहत होता. महाराज गंभीरपणें तें सारें पाहत होते. सकवारबाईनें पडद्याआडून पाहून 'पेशव्यांचा चिटणिसांना पुष्कळच ओढा दिसतो. एरव्हीं पेशव्यांनीं महाराजांशीं कसा विश्वासघात आरंभिला आहे हें माहीत असतांना पेशव्यांना एवढ्या भयंकर अपराधाबद्दल इतकें सौम्य शासन झालेलें पाहूनही यांच्या डोळ्यांना पाणी आलें नसतें.' असे झोंबणारे उद्गार काढले. पण तिकडे महाराज किंवा चिटणीस यांपैकीं कोणींही लक्ष्य दिलें नाहीं.

"हें आज्ञापत्र." चिटणिसांनीं आज्ञापत्र लिहून महाराजांपुढें ठेवलें.

"त्यावर राजमुद्रा करून आतांच्या आतां रवाना करा." महाराज पूर्ववत् गंभीरपणानें म्हणाले.

चिटणिसांनीं त्या आज्ञापत्रावर राजमुद्रा केली, व तें मोहोरबंद करून पुन्हां महाराजांसमोर ठेवलें.

"जासुदाच्या हातीं तें आतांच्या आतां रवाना करा." महाराजांनीं आज्ञा केली.

भगवान् श्रीशंकरानें राजा श्रियाळ व सति चांगुणा यांचें सत्त्व पाहण्यासाठीं नरमांसाचें भोजन मागितलें, तेव्हां श्रियाळ व चांगुणा यांना काय वाटलें असेल याची चिटणिसांना आज स्वानुभवावरून कल्पना करतां आली. तरीही त्यांनीं सत्वधीरतापूर्वक तें आज्ञापत्र महाराजांसमक्ष एका हुजऱ्याच्या हातीं नानासाहेब पेशव्यांकडे रवाना केलें, व जड अंतःकरणानें महाराजांचा निरोप घेतला.

चिटणीस गेलेसें पाहून सकवारबाई पुढें येऊन महाराजांना हात जोडून म्हणाली, "महाराजांचें चित्त अस्वस्थ करणारें जबरदस्त जिवंत संकट दूर झालें; भगवंतानें महाराजांना पेशव्यांच्या मायावी मोहजालांतून बाहेर काढून पेशव्यांना कारभारांतून दूर लोटण्याचें धैर्य दिलें. आतां तरी महाराजांना प्रसन्न चित्तानें राजधानींत येण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं असें मला वाटतें."

पेशवाईचा पुनर्विकास

स्त्री म्हणजेच माया! तशांत सकवारबाई म्हणजे तर मूर्तिमंत मायाविनी! ती महाराजांसमोर रडली काय, कढली काय, त्यांच्या पायांवर अश्रूंचा अभिषेक काय केला, आपल्या केशकलापाची त्यांच्या पायांवर चंवरी काय ढाळली; त्या मायेच्या मृगजळाला महाराज भुलून फंसले, व राजधानींत माघारें जावें कीं न जावें याचा विचार करूं लागले. आतां त्यांचा राग बहुतेक शमला होता. पण जनलज्जा त्यांना सोडतां येईना. ते सकवारबाईला म्हणाले, "आम्ही निग्रहेंकरून राजधानीबाहेर पडलों, त्यास ताबडतोबीनें माघारे गेलों तर सर्व जनांत नाचेरपणा दिसेल व आमचा दरारा वाटेनासा होईल. यास्तव आम्हीं आणखी कांहीं दिवस एथूनच कारभार करणें श्रेयस्कर. आणखी थोडे दिवस एथें राहिल्यानें प्रकृतीलाही आराम वाटेल."

"तर मग मीही आपणाबरोबरच वनवास भोगणार. जिकडे शिव तिकडे शक्ति." असें म्हणून सकवारबाईनेंही महाराजांसन्निध राहावयाचें ठरविलें. पण तेथें राहण्यांत तिच्या मनांतील डाव मात्र निराळाच होता!

प्रकरण २० वें

रावजी जगदाळा

मागें वर्णन केल्याप्रमाणें सजणा ते लोक कोणाला पकडण्याला आले असावे याविषयीं चिंतेंत पडून त्या पिंपळाच्या वृक्षाखालीं उभी असतांनाच ते लोक तिला पकडण्यासाठीं पुढें आले. त्यांच्या मुख्यानें त्यांना आज्ञा करतांना पुल्लिंगी संबोधन उपयोगांत आणल्याचें सजणेच्या ध्यानीं होतें. असें असतां त्या लोकांनीं तिच्याकडे मोर्चा वळवितांच तिनें तर्क केला कीं आपण बुरखा घेतल्यामुळें ह्या लोकांची अशी फसगत झाली असावी.

तेवढ्यांत त्या लोकांपैकीं एकानें सजणेचें मनगटदेखील पकडलें. त्याबरोबर तिनें जोराचा हिसडा देऊन आपलें मनगट सोडवून घेत रागारागानें विचारलें, " खबरदार माझ्या अंगाला हात तरी लावाल तर. याद राखून ठेवा, मी थोरल्या आईसाहेबांची दासी आहें. मी त्यांच्या परवानगीवरून कांहीं महत्त्वाच्या गुप्त कार्यासाठीं इकडे आलें आहें." ही पाहा थोरल्या आईसाहेबांची मुद्रा. आतां तरी खात्री झाली ना ?"

आपण जिच्यावर हात टाकला ती स्त्री राणी सकवारबाईची विश्वासांतील दासी आहे, असें कळतांच ते लोक जागच्याजागीं थिजल्यासारखे झाले. काय करावें आणि काय न करावें हेंच त्यांना सुचेना. त्यांची आपसांत कुजबूज सुरू झाली. एकजण दुसऱ्याला म्हणाला, "काय रे ! आतां कसें करावयाचें ?"

दुसरा उत्तरला, " आपणाला काय; आपण हुकुमाचे ताबेदार. " तो पहिल्याला जरा बाजूला ओढून अगदीं हळू त्याच्या कानाशीं तोंड नेऊन म्हणाला, " पण ही स्त्री आहे हें तरी खरें कशावरून ? "

तिसरा त्या दोघांच्या अगदीं जवळ जाऊन हळूच म्हणाला, " मला वाटतें, आपण ह्या माणसाला पकडून शिलेदारांपाशीं घेऊन जाऊं. ते मग

काय चवकशी करावयाची ती करतील. आपण कशाला उगाच नसती जबाबदारी आपल्या शिरावर घ्या ? ते पहा शिलेदार इकडेच येत आहेत." तो समोरून घोडा फेंकीत येणाऱ्या आपल्या मुख्याकडे बोट दाखवून म्हणाला, "आतां आपोआप काय तो उलगडा होईल."

"तुम्हांला तुमच्या शिलेदारानें कोणाला पकडण्याचा हुकूम दिला आहे?" सजणेनें त्यांचें संभाषण ओझरतें ऐकलें होतें, त्यामुळें तिनें शक्य तर त्यांचा आपणाविषयींचा गैरसमज दूर करून पुढील यातायात थांबवावी अशा उद्देशानें विचारलें.

सजणेला कांहींच उत्तर न देतां एकजण पुन्हा आपल्या इतर सोबत्यांना म्हणाला, "गड्या, ही खरेंच कोणीतरी स्त्री दिसते आहे. हा प्रतापराव खास नव्हे."

त्यावरून सजणेनें ओळखलें कीं आपल्या पतीला पकडण्यासाठीं हे लोक आले आहेत. ती त्याच क्षणीं मनांत खचली. इतका आपल्या पतीवर ह्या मंडळीचा दांत कां याचा तिला कांहीं उलगडा होईना. आतां जर प्रतापराव ह्या लांडग्यांच्या हातीं लागला, तर त्याची काय दुर्दशा होईल ह्या चिंतेच्या डोम्बाडोम्बानें तिचें मन अगदीं होरपळून गेलें. जितकी तिला प्रतापरावाच्या जीविताविषयीं काळजी वाटूं लागली, तितकीच—किंबहुना त्याहूनही जास्त काळजी तिला राजपुत्राच्या भवितव्याविषयीं वाटूं लागली. त्यापेक्षां आपण आपलें स्त्रीपण उघड न करतां ह्या लोकांच्या हातीं पकडलों गेलों असतों तर आपली लबाडी उघडकीला येईतों बराच वेळ मध्यें लोटला असता, व तेवढ्या वेळांत प्रतापरावाला अनायासें पुढचा पल्ला गांठावयाला सवड मिळून आपला कार्यनाश होण्याचा हा प्रसंग तूर्त तरी टळला असता असेंही तिला वाटलें. पण आतां त्याचा काय उपयोग!

इतक्यांत तो घोडेस्वार आपला घोडा फेंकीत तेथें येऊन थडकला. तेथें येतांच त्यानें आपल्या लोकांना प्रश्न केला, "गुन्हेगार सांपडला काय?"

"त्याविषयींच आम्हांला शंका आहे शिलेदारसाहेब!" एकजण बुरख्याखालीं सर्वांग झांकून घेतलेल्या सजणेकडे अंगुलिनिर्देश करून म्हणाला, "ही व्यक्ति स्त्री आहे कीं पुरुष आहे याविषयीं आम्ही इथें बुचकळ्यांत पडलों आहों."

सजणा बुरख्यांतून त्या घोडेस्वाराकडे लक्ष्यपूर्वक पाहत त्याला ओळखण्याचा प्रयत्न करतां करतां, आपले दोन्ही हात बुरख्याबाहेर काढून त्या लोकांसमोर धरून म्हणाली, "ह्या पहा माझ्या बांगड्या; आणि ही माझ्या हातांत थोरल्या आईसाहेबांची मुद्रिकाही आहे. यावरून मी थोरल्या आईसाहेबांची विश्वासू दासी त्यांच्या महत्वाच्या कामासाठीं इकडे आल्यें आहें अशी तुमची खात्री पटत नाहीं काय?"

तरीही ते लोक कांहीं न बोलतां आपल्या म्होरप्याच्या तोंडाकडे पाहूं लागले. आतां मात्र ती खरोखरच स्त्री आहे अशी त्यांची खात्री झाली होती.

"ही तर स्त्री आहे!" तो घोडेस्वार सजणेच्या आवाजावरून तिला ओळखण्यासाठीं मागल्या सर्व आठवणी मनांतल्या मनांत पडताळून पाहतां पाहतां त्या लोकांना म्हणाला, "जा तुम्ही. उभे काय राहिलां? टेंभे चुडी पाजळा आणि प्रतापराव ह्या जंगलांत कोठें लपला असेल त्याला हुडकून काढा जा पळा लौकर."

ते लोक निघून गेले. तो घोडेस्वार आपल्या घोड्यावरून खालीं उतरला. सजणेनें त्याला भयभीत चित्तानें विचारलें, "त्यांनीं कोणाचा काय अपराध केला आहे ते तुम्ही त्यांना पकडणार आहां?"

त्या घोडेस्वाराला सजणेचे शब्द ऐकून तिची जास्त ओळख पटली. 'हा तर तिचाच आवाज असावासें वाटतें.' असें स्वतःशीं म्हणत त्यानें सजणेला विचारलें, "तुझें नांव काय?"

सजणेनें शक्य तोंवर आपली ओळख न देण्याच्या इराद्यानें उडवाउडवीच्या भाषेंत विचारलें, "मी थोरल्या आईसाहेबांची दासी आहें हें तुम्हांला कळल्यावर मी माझें नांव सांगण्याला बांधलेली आहें काय? समजा, मी नांव सांगत नाहीं. मग तुम्ही माझें काय करणार?"

"तीच ती यांत संशय नाहीं. तेव्हांच तिनें प्रतापरावाचें नांव घेतलें नाहीं." असें मनांत म्हणत त्या स्वारानें अर्थात् तिच्यावर प्रेम करणाऱ्या रावजी जगदाळ्यानें तिला हांक मारली, "सजणे! तूं मला ओळखलें नाहींस! माझें नांव रावजी. आतां तरी ओळख पटली का?"

सजणेनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, "तेच का तुम्ही?"

"होय."

पेशवाईचा पुनर्विकास

" मला नाहीं खरें वाटत. मी ज्यांना ओळखल्यें, ते रावजी जगदाळे माझ्यावर जिवाभावापलीकडे प्रेम करणारे आहेत. आणि तुम्ही तर माझा सत्यनाश करायला टपलेले आहां. त्या रावजींनीं माझ्यापाशीं म्होतुराची गोष्ट काढली. पण केव्हां ? मी विधवा आहें असा त्यांचा प्रामाणिक समज होता तेव्हां. आणि असल्या गोष्टीमुळें माझ्या मनाला दुःख होतें, मी त्या गांवची नाहीं, असें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हांपासून आजवर त्यांनीं तोंडावाटे चुकून देखील ती गोष्ट काढली नाहीं. मला तर वाटत होतें कीं माझ्या सौभाग्याचा ठेवा परमेश्वरानें मला पुन्हा दिला असें कळतांच खरा निःस्वार्थी आनंद ज्यांना होईल असे तेच एकटे थोर पुरुष आहेत. ते रावजी जगदाळे देव-माणूस होते, तुम्ही सैतान आहां." सजणा संतापानें थरारत मुठी आंवळून उद्गारली, " पण याद राखा, असल्या दगलबाजीनें तुम्हांला सजणा कधींच प्राप्त व्हायची नाहीं. "

" सजणे ! सजणे ! जरा शांतपणानें माझें ऐकून घे आणि मग काय तें बोल. माझ्यावर तूं जो हा भयंकर आरोप केलास, तो बरोबर आहे असें तुझें मन तुला सांगत आहे काय ? तूं आतां म्हणालीस तसा हा रावजी विष-यांध सैतान आहे, असें तुला खरोखर वाटतें का ? " रावजीनें शांत व गंभीर वृत्तीनें विचारलें.

प्रखर सूर्यप्रकाशानें जमीन तापून रखरखते आहे, इतक्यांत आकाशांत एकाएकीं जलमेघ जमावे व त्यांनीं जलवर्षावानें ती जमीन भिजवून थंड करावी, तसाच कांहींसा परिणाम रावजीच्या कळवळ्याच्या उद्गारांचा सजणे-च्या मनावर झाला. तिला रावजीविषयीं वाटणारा अविश्वास ओसरूं लागला व त्याबरोबरच तिचा संतापही बराचसा ओसरला. रावजीला पाहतांज सकृ-दर्शनींच तिला जें वाटलें तें तिनें बोलून सारलें खरें. रागाच्या भरांत मनु-ष्याची सारासार विवेकशक्ति आंधळी बनते. तशांत रावजीचा सजणेशीं आज प्रथमच संबंध येत होता अशांतली गोष्ट नाहीं. अनाथ, अपंग अशा स्थितींत रावजीनेंच तिला साह्य केलें होतें; व प्रतापराव कर्नाटकांतून परत न आल्यानें तो तिकडेच वारला अशी सर्वांची प्रामाणिक समजूत झाल्यावर रावजीनें लग्नासाठीं सजणेला मागणी घातली होती. ह्या प्रेमाचा उगम अर्थात् रावजी-च्या अंतःकरणांत सजणा लौकिक दृष्टीनें विधवा ठरल्यानंतर झाला होता

अर्थात् तेव्हां सजणेचा अभिलाष करण्यांत रावजीच्या हातून कांहीं पाप घडलें होतें होतें असें मुळींच नाहीं. तेव्हां रावजीचें लग्न व्हावयाचें होतें. पण सजणेकडून नकार मिळाल्या दिवसापासून आजवर त्यानें लग्न केलें नव्हतें. त्याला आशा वाटत होती कीं आज ना उद्यां तरी सजणेचें मन पालटेल व ती आपणाशीं म्होतुर लावण्याला तयार होईल. परंतु हें मनोगतदेखील रावजीनें आपल्या हृदयांत अगदीं गुप्त राखलें होतें.

सजणेला आज रावजीच्या हेतूविषयीं क्षणभर संशय आला तोही मनुष्य-स्वभावाला सोडून नव्हता. पण रावजीच्या कळवळ्याच्या उद्गारांनीं तिला तिची उतावळेपणाची चूक पटवून दिली. तरीपण संशयाचा अवशेष शिल्लक राहिलाच. त्या प्रेरणेनें सजणेनें पूर्वीच्याहून पुष्कळच शांतपणें—पेटल्या निखाऱ्यांवर पाणी पडल्यावर निखारे विझतां विझतां कांहींशा उष्ण वाफेचे लोळ त्यांतून निघतात त्याप्रमाणें शांत होऊन रावजीला विचारलें, "हें जर खरें, तर तुम्ही त्यांच्या जिवावर कां उठलां आहां ?"

"याचें कारण सांगूं ? सजणे ! हा सेवाधर्म !"

"ही कोणाची आसुरी सेवा तुम्हीं चालविली आहे ?"

"माझ्या धन्यांची—यमाजीपंत मुतालिकांची."

"त्या नराधमाच्या माझ्या माणसांनीं काय केळी तोडल्या ?"

"मीं असें ऐकलें आहे कीं प्रतापरावानें थोरल्या आईसाहेबांविषयीं अभद्र शद्ब कोठें तरी वापरले, व ती कागाळी थोरल्या आईसाहेबांच्या कानांपावेतों कशी गेली देव जाणे ! त्यांनीं मुतालिकांना आज्ञा केली, त्या आज्ञेची अंमल-बजावणी करण्याचें माझ्या वांट्याला आलें आहे."

"पण थोरल्या आईसाहेबांना तुम्ही ओळखतां ! आणि तुमचे धनी स्वार्थांध बनून थोरल्या आईसाहेबांसमोर गोंडा घोळीत असतात ! थोरल्या आईसाहेबांचे चाळे राजवटीला, महाराजांना—रयतेला—सर्वांनाच कसे जाचीत आहे हें तरी तुम्हांला माहीत आहेच. त्यांनींच जर आमच्या संसाराची माती केली, तर आम्हांला त्यांच्याविषयीं चीड कां येऊं नये ? आमचीच गोष्ट कशाला ! पण कोणत्या जिवंत माणसाला त्यांचीं एकाहून एक लाजिरवाणीं कृष्ण कारस्थानें पाहून चीड आल्याशिवाय राहील ?"

"मला त्यांच्या कृष्णकारस्थानांविषयीं कांहींच माहीत नाहीं."

" माहीत नाहीं तर प्रथम माहीत करून घ्या. आजकाल राजवटींतील कर्त्या पुरुषांत कुणाचा पायपोस कुणाच्या पायीं नाहीं इतका बेबनाव त्याच बयेनें माजविला आहे ! "

असें म्हणून सजणेनें राजपुत्राच्या नाशासाठीं सकवारबाई व गमाजी ह्या दोघांनीं रचिलेल्या कारस्थानाचा इत्थंभूत वृत्तान्त रावजीला थोडक्यांत निवेदन केला, व शेवटीं विचारलें, " ह्या अरिष्टांतून राजपुत्राला वांचविण्यासाठीं आम्हां दोघांची धडपड चालली आहे. या उप्परदेखील तुम्ही घातकी स्वामिभक्तीला बळी पडून राजपुत्राच्या आणि आमच्या नाशाला कारण होणार काय ? "

याप्रमाणें त्या दोघांचें संभाषण चाललें असतांना रावजीच्या लोकांनीं प्रतापरावाला पकडून आणून त्याच्यासमोर हजर केलें.

" तुमचें काम झालें. ह्या गुन्हेगाराला इथेंच असूं द्या. तुम्ही निघून जा. " रावजीनें आपल्या लोकांना आज्ञा केली. ते लोक त्याच क्षणीं रावजीला मुजरा करून निघून गेले. त्यांना तेथला एकंदर प्रकार बराच चमत्कारिक वाटला. शिलेदारसाहेब त्या कोणा तरुणीच्या प्रेमपाशांत गुरफटले गेले असावे असाही त्यांना संशय आला. पण त्यांनीं जास्त खोलांत लक्ष्य घातलें नाहीं.

ते लोक दूर गेलेले पाहतांच रावजी प्रतापरावाला म्हणाला, " प्रतापराव ! तूं जरी माझा कैदी आहेस, तरी तूं आणि सजणा यांनीं हातीं घेतलेलें पवित्र कार्य मला आतांच सजणेच्या तोंडून माहीत झाल्यामुळें मी तुला सोडून देत आहें. परमेश्वरानें माझें आयुष्य व बल देखील तुला द्यावें व तुझ्या हातून राजपुत्राचें रक्षण व्हावें, अशी माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. जा. या गोष्टीचा बभ्रा होण्यापूर्वींच तूं आपल्या कामगिरीवर निघून जा कसा ! जा लौकर. आतां एथें एक क्षणही थांबूं नकोस. " एवढें बोलून रावजी तसाच आपल्या घोड्यावर स्वार झाला, व जास्त एक शब्दही न बोलतां वाऱ्याच्या वेगानें आपला घोडा फेंकीत निघून गेला देखील !

प्रतापरावाला बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें. त्यानें रावजीला ओळखलें, व त्याच्याशीं चार शब्द बोलण्याचाही त्याचा मानस होता. परंतु सवडच मिळाली नाहीं. " काय विचित्र माणूस आहे हा ! " प्रतापराव सजणेपाशीं

उद्गारला, व असें कसें झालें याची चौकशी करूं लागला. सजणेलादेखील कांहीं बोलवेना इतका रावजीच्या अलौकिक उपकारकर्तेपणानें तिचा कंठ दाटून आला. ती उद्गारली, "या वेळीं मला जास्त कांहीं विचारूं नका. परमेश्वर आपला साह्यकारी आहे; तोच तुमच्या मित्राच्या मुखीं उभा राहून आपणांला या वेळीं तारूं शकला आहे. आतां मुकाट्यानें लौकर एथून निघून जा कसे!"

तरीही प्रतापराव तेथेंच उभा होता. सजणेच्या उत्तरानें त्याचें समाधान न होतां त्याची जिज्ञासा मात्र शतपटीनें वाढली. सजणेनें तें ओळखलें, व निष्कारण कालहरण टाळण्यासाठीं—आणि आणखीही कांहीं विचार तिच्या डोक्यांत घोळत होते, त्या भरांत ती तेथून झपझप पावलें टाकीत नगराकडे निघून गेली. ती दिसेनाशी होईतों प्रतापराव तिच्याकडे नजर लावून तेथेंच उभा होता. ती दिसेनाशी होतांच तोही रावजीच्या त्या विचित्र वर्तनाविषयीं अचंबा करीत दोन तीन दीर्घ उसासे सोडून तेथून निघून गेला.

प्रकरण २१ वें

पेशवे पदभ्रष्ट झाले!

नानासाहेब पेशवे पुण्याहून तांतडीनें निघून साताऱ्यांत आले, व एकंदर परिस्थिति समजावून घेऊन त्यांतून मार्ग काढण्यासाठीं जबाबदार मंडळीच्या गांठीभेटी घेण्यांत गढून गेले होते, तेव्हां त्यांची पत्नी गोपिकाबाईही आपल्या परीनें त्या प्रसंगांतून पार पडण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती. इकडे सदरेवर नानासाहेबांच्या मुत्सद्यांशीं वाटाघाटी सुरू असतांना आंत देवघरांत गोपिकाबाईच्या देखरेखीखालीं अरिष्टनिवारणार्थ मारे अनुष्ठानें चालू होतीं. शिवाय कोटेश्वर, ढोल्या गणपति, किल्ल्यांतील मंगळाई, यांच्या देवालयांतही समंत्राभिषेकासारखे धर्मविधि करण्यांत अनेक विद्वान ब्राह्मण गढून गेले होते. एवढ्यावरच गोपिकाबाई थांबली होती अशांतली गोष्ट नाहीं. त्याखेरीज नगरांत जे जे कोणी विद्वान ज्योतिषी, देवऋषि वगैरे होते, त्या सर्वांनाच ह्या अरिष्टनिवारणाच्या कार्याला जुंपण्याचें कार्य ती तत्परतेनें करीत होती. त्या दिवशीं सबंध साताऱ्यांत असें एकही देऊळ शिल्लक राहिलें नाहीं कीं जेथें पेशवीणबाईच्या वतीनें त्या देवाला संतुष्ट करण्यासाठीं कोणी ना कोणी ब्राह्मण अनुष्ठान व अभिषेक करीत आसन घालून बसलेला नाहीं. ह्या प्रमुख देवांशिवाय बिन् देवळांचे देवही साताऱ्यांत व आजूबाजूलादेखील अनेक होते कीं ज्यांची नवसावर, पंचपक्वान्नांच्या नैवेद्यावर किंवा कोंबड्याबकऱ्याच्या बळीच्या मोबदल्यांत नवसाला पावण्याबद्दल ख्याति होती. अर्थात् हें त्या देवांचें महात्म्य त्यांच्या भक्तांनीं वाढविलेलें होतें. गोपिकाबाईनें त्या त्या देवांना त्यांच्या त्यांच्या परीनें संतुष्ट करण्यासाठीं नवसांची व बळींची तर त्या दिवशीं नुसती खैरात चालविली होती. बिचारे कितीतरी कोंबडे बकरे त्या दिवशीं ठिकठिकाणच्या दगडी देवांसमोर बळी दिले गेले व किती

तरी मोहरांची दक्षणेच्या रूपानें खैरात करण्यांत आली. याशिवाय वस्त्रदानें, पात्रदानें, अन्नदानें यांचीही मारे रेलचेल उडून गेली होती.

इतकी गोपिकाबाई दैवाची दास बनल्यावर तिच्या साह्यार्थ जादूटोणा करणारे गारोडी, देवदेवस्की करणारे देवऋषि, ज्योतिषी यांचा ताफा धावून आल्याखेरीज कसा राहील! हे सर्व प्रकारही पेशव्यांच्या वाड्यांत त्या वेळीं अव्याहत सुरू होते. कोणाही माणसाची अशा एखाद्या गुणाविषयींची ख्याति कानीं आली कीं त्यांची पेशव्यांच्या वाड्यांत वर्दी लागलीच!

असेच राघवनाथ या नांवाचे एक माहुलीकर ज्योतिषी तेव्हां प्रसिद्धि पावलेले होते. सकवारबाईचे ते आवडते ज्योतिषी. सकवारबाईनें कोणतीही एखादी गोष्ट करावयाची झाली कीं प्रथम राघवनाथांची सल्ला घ्यावी. राघवनाथांची ज्योतिःशास्त्रापेक्षां सामुद्रिकाविषयीं विशेष प्रसिद्धि होती. त्यांची कीर्ति सकवारबाईच्या कृपेनें इतकी वाढली होती कीं ते सर्वत्र राजज्योतिषी म्हणून ओळखले जाऊं लागले होते. गोपिकाबाईनेंदेखील राघवनाथांची कीर्ति ऐकली होती; पण अनुभव घेतला नव्हता. तो अनुभव तिला आज आणीबाणीच्या वेळीं घ्यावासा वाटला.

नानासाहेब वनवासवाडीकडे महाराजांच्या भेटीला निघून गेले व थोड्या वेळानें राघवनाथ ज्योतिषी गोपिकाबाईच्या आमंत्रणावरून पेशव्यांच्या वाड्यांत येऊन पोंहोचले. गोपिकाबाई तेव्हां लहानग्या विश्वासरावाशीं-आपल्या पुत्राशीं खेळत बसली होती. राघवनाथ त्या मायलेंकरांकडे कांहीं वेळ टक लावून पाहत उभे राहिले. गोपिकाबाईनें त्यांना दोन तीन वेळां सन्मानपूर्वक बैठकीवर बसावयाला सांगितलें, तरी त्यांचें तिकडे लक्ष गेलें नाहीं.

गोपिकाबाईनें राघवनाथांना विचारलें, "शास्त्रीबुवा! इतकें एकाग्र चित्तानें कसलें निरीक्षण चाललें आहे?"

राघवनाथ क्षणभर थांबून स्वतःशीं कांहींतरी विचार करून उत्तरले, "बाईसाहेब! आपल्या आणि ह्या धाकट्या श्रीमंतांच्या चर्येवर चक्रवर्ती राजवैभवाचीं मंगल चिन्हें ढळढळीत दिसत आहेत. मीं उभयतां राणीसाहेबांच्या आणि महाराजांच्यादेखील भूत–भविष्य–वर्तमान दैवाची मुद्रासामुद्रिकाच्या व हस्तसामुद्रिकाच्या शास्त्रीय दृष्टीनें अनेकवार चिकित्सा करून पाहिली. पण तेथेंही अशीं मंगल चिन्हें मला पाहावयाला मिळालीं नाहींत."

" तुम्ही अचूक भविष्य वर्तविणारे आहां अशी तुमची कीर्ति मी इतके दिवस ऐकत आल्यें, म्हणूनच आज तुम्हांला मुद्दाम बोलावून आणलें. सध्यां आमच्यावर केवढें मोठें गण्डान्तर कोसळलें आहे हें तुम्ही जाणतांच. कां ? खरें ना ? "

" होय. तें मी जाणतों. "

" तर मग अगोदर माझा हात पाहा आणि माझ्या नशिबीं काय आहे तें खरेंखुरें मला सांगा. " असें म्हणून गोपिकाबाईनें आनंदी वृत्तीनें आपला हात पुढें केला. आतांच राघवनाथांनीं शुभ भविष्य वर्तविल्यामुळें तेंच पुन्हा विस्तारानें ऐकण्याची तिला उत्कंठा लागली होती.

गोपिकाबाईची इच्छा अपेक्षेपेक्षां अनेक पटींनीं सफल झाली. चक्रवर्ति राजवैभव खुद्द गोपिकाबाईला आणि विश्वासरावाला उपभोगावयाला मिळणार हें राघवनाथांनीं प्रथमच सांगितलें होतें. त्याची त्यांनीं पुन्हा आपल्या रसभरित वाणीनें फोड करून सांगितली. इतकी अप्रतिम शुभवार्ता भविष्य-ज्ञानाच्या भट्टींत तावून सुलाखून राघवनाथांनीं निवेदन केली, व त्याबद्दल त्यांना गोपिकाबाईनें एक भरजरी शाल आणि दहा मोहरा देणगीदाखल देऊन त्यांची रवानगी केली. गोपिकाबाई, नानासाहेब व विश्वासराव यांना खरो-खरीच चक्रवर्ति राजवैभव प्राप्त होण्याच्या गोष्टी तेव्हां फार दूर होत्या. परंतु राघवनाथांचे ग्रह मात्र उच्चीचे होते यांत शंका नाहीं. म्हणूनच त्यांना ताबडतोब तेथून निघून जाण्याची इच्छा झाली. ते आणखी थोडा वेळ—नानासाहेब वनवासवाडीहून माघारे येईतों तेथें थांबले असते, तर वनवास-वाडीला घडलेला प्रकार नानासाहेबांच्या तोंडून ऐकून त्यांच्या भविष्याला चांगलाच हरताळ फांसला गेला असता.

नानासाहेब वाड्यांत येतांच गोपिकाबाईनें उत्सुकतापूर्वक काय झालें म्हणून विचारलें. नानासाहेबांनीं विषण्ण चित्तानें एकंदर प्रकार तिला निवेदन केला. तो गोपिकाबाईला अर्थातच विस्मयकारक वाटला. तरीही तिचा राघव-नाथांच्या भविष्यावर भोळा विश्वास होता. तो तिनें नानासाहेबांपाशीं बोलून दाखविला, तेव्हां त्यांना निराशापूर्वक हंसूं आलें. तरीही उगाच आपल्या पत्नीला नाउमेद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हा विचार करून उद्गार त्यांनीं काढले, " तसें होईल तर आपणाला त्यांत आनंदच आहे."

परंतु तेवढें देखील समाधान त्या दोघांना लाभूं नये अशीच भवितव्य-तेची इच्छा असल्यानें त्या दोघांचें त्या विषयावर चार घटका संभाषण चाललें आहे इतक्यांत एक हुजऱ्या वनवासवाडीहून खलिता घेऊन तेथें आला.

" आतांच आपण महाराजांना भेटून आलां, आणि इतक्यांत हा कसला खलिता ? " गोपिकाबाईनें विचारलें.

नानासाहेबांनीं कांहीं उत्तर न देतां तो खलिता उघडून वाचला, व एक दीर्घ निःश्वास सोडला.

" कां ? काय झालें ? " गोपिकाबाईनें विचारलें.

" महाराजांनीं पेशवाई माझ्याकडून काढून घेतली. प्रभूची इच्छा ! " असें उद्गारून नानासाहेब तसेच उठले व हुजऱ्याला थांबावयाला सांगून त्यांनीं आपल्या हुजऱ्याला आज्ञा केली, " जा. शिक्केकट्यार आणि जरि-पटका घेऊन ये."

हुजऱ्या हुकुमाची तामिली करण्यासाठीं आंत गेला. नानासाहेबांनीं लगेच महाराजांना चिठ्ठी लिहिली, " स्वामींची आज्ञा शिरसामान्य. स्वामींनी जो वृक्ष लावला, स्वामींनी जो जोपासून एवढा नांवारूपाला आणला व त्याज-पासून आजवर सेवा घेतली, त्या वृक्षाच्या मुळावर घाव घालून तो तोडून टाकण्याचें स्वामींच्या मर्जीस आलें. तेथें म्यां सेवकानें अन्यथा बोलण्यांत काय शोभा ! स्वामींची मर्जी ! स्वामींनी ह्या सेवकाला अर्पिलेली शिक्के-कट्यार व जरिपटका स्वामींच्या चरणीं सुपुर्द करीत आहें. सरकारी कारखाना व फौज स्वामींची आहे, ती कोणापाशीं सुपूर्द करावी तेवढें कळविण्याचा सेवकावर अनुग्रह व्हावा. म्हणजे त्याप्रमाणें निरवानिरव करून स्वामींच्या पायांपाशीं दर्शनास येतों."

चिठ्ठी लिहून झाली. तेवढ्यांत हुजऱ्या जरिपटका व शिक्केकट्यार एका चांदीच्या तबकांतून घेऊन तेथें आला. नानासाहेबांनीं चिठ्ठी बंद करून ती महाराजांच्या हुजऱ्याच्या हातीं दिली, व तबकांतील वैभवचिन्हांना उठून दोन्ही हात जोडून अभिवादन केलें. त्यावेळचा देखावा पाहून पाषाणाला-देखील पाझर फुटला असता. जें राजवैभव आज सतत तीन पिढ्या आपण उपभोगिलें, व ज्याला आपण आपल्या कर्तबगारीनें संपादन केलें व भूषविलें, त्या राजवैभवावर अखेरचें पाणी सोडतांना त्या मानी व तेजस्वी तरुणाच्या

अंतःकरणाला किती कष्ट झाले असतील, याची कोणालाही कल्पनादेखील करतां यावयाची नाहीं.

मनुष्य वैभवशिखरावर चढूं लागला कीं त्याला तें शिखर गांठण्यासाठीं किती भयंकर परिश्रम करावे लागतात! पण तेंच त्याचें एक पाऊल चुकलें कीं नजर ठरत नाहीं इतक्या झपाट्यानें तो खालीं कोसळतो! हिंदुपदपादशाहीचा तो एकच एक खरा आधारस्तंभ हां हां म्हणतां असा कोलमडून कसा पडला, याविषयीं हळहळत महाराजांच्या हुजऱ्यानें नानासाहेबांना त्रिवार मुजरा केला, व तो तें साहित्य घेऊन तेथून निघाला. गोपिकाबाई तेथें जवळच उभी होती; आणखी दोन सेवकही उभे होते. त्यांना तो देखावा पाहवेना व कांहीं बोलवेना. सेवक खिन्न मनानें आंत निघून गेले. गोपिकाबाई स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. नानासाहेबांनीं तिचें शांतवन केलें, "वेडी नाहींतर! मी तुला आजवर फार खंबीर मनाची स्त्री समजत आलों; तो तुझ्या मनाचा खंबीरपणा हाच काय? तूं खेद करूं नकोस. माझ्या अंगीं पराक्रम असेल, तुझी पुण्याई थोर असेल, आपल्या पूर्वजांचे शुभाशिर्वाद आपल्या पदरीं असतील, तर आपणाला कोठें कांहींच कमी पडणार नाहीं. मनुष्याला जीवितयात्रेंत असे उन्हाळे–पावसाळे–हिंवाळे भोगावे लागणारच. त्यांत खेद मानण्याचें कांहीं कारण नाहीं." लगेच त्यांनीं आपल्या दोघां सेवकांना बोलावून आज्ञा केली, "आजपासून आपणांला आपल्या लष्कराशेजारीं स्वतंत्र राहुटींत वास्तव्य करावयाचें." ते गोपिकाबाईकडे वळून म्हणाले, "हा वाडा, ही सारी दौलत महाराजांची आहे. तिच्यावर निर्लोभपूर्वक पाणी सोडून तुम्हीं प्राप्त प्रसंगाला समाधानानें व धीरानें तोंड देण्याला तयार झालें पाहिजे."

त्याच दिवशीं नानासाहेब बोलल्याप्रमाणें आपल्या परिवारासह राहता वाडा सोडून दूर लष्कराचा तळ होता त्याच्या शेजारीं एका राहुटींत राहावयाला गेले. तेथून पुढें काय करावयाचें तें त्यांनीं महाराजांचा निरोप येण्यावर अवलंबून ठेवलें होतें. तो महाराजांचा निरोप तिसऱ्या दिवशीं घटकाभर रात्रीला आला, "आमची आज्ञा होईतों तेथेंच रहावें."

तो निरोप गोपिकाबाईला कळला, तेव्हां तिच्या मनांतून महाराजांच्या ह्या दिरंगाईच्या धोरणाबद्दल नानासाहेबांशीं कांहीं बोलावयाचें होतें. त्या

इराद्यानें ती नानासाहेबांच्या बैठकीच्या जागीं येते तोंच हुजऱ्यानें येऊन वर्दी दिली, " थोरल्या आईसाहेबांकडून कुळंबीण आली आहे. तिला सरकारांची आतांच्या आतां भेट घ्यावयाची आहे. "

सकवारबाईकडून कुळंबीण आल्याचें कळतांच नानासाहेब व गोपिकाबाई ह्या दोघांनाही मोठा अचंबा वाटला. गोपिकाबाईला जें बोलावयाचें होतें तें मागेंच राहिलें. नानासाहेबांनीं हुजऱ्याला सांगितलें, " जा, तिला आंत पाठवून दे. "

हुजऱ्या बाहेर जाऊन माघारा आला. त्याच्या मागोमाग सजणा आंत आली व नानासाहेबांना हात जोडून खालच्या मानेनें म्हणाली, " थोरल्या आईसाहेबांनीं आपणाला आतांच्या आतां भेटीला बोलावलें आहे. "

" थोरल्या आईसाहेब सध्यां कुठें आहेत ? " नानासाहेबांनीं विचारलें.

" या वेळीं त्या रंगमहालांत महाराजांसमवेत आहेत. परंतु आपणाला त्या गडावरच्या मंगळाईच्या देवालयांत भेटतील. आपण याल ती गोष्ट अगदीं गुप्त राहिली पाहिजे असें त्यांचें सांगणें आहे. "

" म्हणजे ? महाराज रंगमहालांत राहावयाला आले काय ? " नानासाहेबांनीं प्रश्न केला.

" होय. महाराज कालच थोरल्या आईसाहेबांसमवेत राहावयाला आले. "

" एकूण तूर्त थोरल्या आईसाहेबांची सद्दी आहे म्हणायची ! कारण मी ऐकत्यें कीं चिटणीस, प्रतिनिधि वगैरे थोर थोर मंडळीनें महाराजांची राजधानींत येण्याविषयीं इतके दिवस मनधरणी चालविली असतांही महाराजांनीं त्यांचा शब्द मानला नाहीं; आणि ज्यांच्या जाचाला विटून त्यांना वनवासी व्हावें लागलें, त्यांच्याच शब्दाला त्यांनीं अखेर मान दिला ! " गोपिकाबाई म्हणाली.

" त्या गोष्टी आपणाला बोलून काय करावयाच्या आहेत ! महाराज आणि आईसाहेब उभयतांही आपणाला वडिलांच्या ठिकाणीं आहेत. त्यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानून वागणें एवढें आपलें काम. इतर गोष्टींत आपण मुळींच घालतां कामा नये. " नानासाहेब म्हणाले. वास्तविक जे उद्गार गोपिकाबाईनें वदून दाखविले, तीच कल्पना त्याच क्षणीं नानासाहेबांच्याही डोक्यांत आली होती. परंतु सकवारबाईची दासी आपणापुढें उभी आहे व आपण

आतां काय बोलूं तें ती आपल्या धनिणीला हटकून सांगणार, त्या गोष्टी सकवारबाई महाराजांपाशीं बोलणार; अशा स्थितींत राईचा पर्वत होऊन त्या उभयतांचीं अगोदरच आपणांविषयीं कलुषित झालेलीं मनें आणखी कलुषित होण्याचा संभव फार. इतका दूरवर विचार करून त्यांनीं गोपिकाबाईची घसरणारी बाजू सांवरून घेतली.

इतक्या अपरात्रीं आणि इतक्या गुप्तपणें आपली भेट घेण्याचें ज्या अर्थीं राणीनें योजिलें आहे, त्या अर्थीं तिचा यांत कांहींतरी काळाबेरा बेत खास असला पाहिजे असें नानासाहेबांच्या मनानें पक्कें घेतलें. परंतु भेटीला न गेल्यानें राणी रागावेल व महाराजांच्या कानीं आपणाविषयीं आणखी विष ओतावयाला कमी करणार नाहीं, या भयानें त्यांनीं राणीच्या आज्ञेप्रमाणें तिची ताबडतोब भेट घेण्याचें ठरविलें. न जाणो, महाराजांना विवेकाअंतीं स्वतःच्या हातून झाल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप झाला असेल, व त्यांनींही कदाचित् 'नानाची आतां समजूत तूं कर' असें राणीला सांगितलें असेल, अशीही एक कल्पना नानासाहेबांच्या मनाला स्पर्श करून गेली. ते तसेच कपडे करून बाहेर पडले. तरीही सजणा तेथेंच उभी!

आपणासाठीं नानासाहेब थबकले असावे असें ओळखून सजणा त्यांना म्हणाली, "सरकारांनीं पुढें जावें. मी आणखी जराशानें दुसरीं कामें आहेत तीं करून माघारी जाईन."

"आणखी कामें आमच्यापाशीं आहेत?" नानासाहेबांनीं प्रश्न केला.

"तें सर्व कांहीं गडावरून परत आल्यावर बाईसाहेबांकडून सरकारांना कळेल. यावेळीं मला जास्त कांहीं न विचारण्याची सरकारांनीं कृपा करावी." सजणा म्हणाली. तिच्या त्या उद्गारांचें नानासाहेब व गोपिकाबाई ह्या दोघांनाही कमालीचें आश्चर्य वाटलें. तथापि आपण माघारे आल्यावर काय तें आपोआप कळेल असें आपल्या मनाशीं म्हणून ते गडावर सकवारबाईच्या भेटीसाठीं निघून गेले.

* * *

अनुभवाला आलेल्या रावजीच्या उपकारी वर्तनानें सजणेच्या मनाला चुटपूट लागून राहिल्यामुळें आपण त्याला समक्ष भेटून त्याचें प्रेमळ शब्दांनीं शांतवन करावें असें तिच्या मनानें घेतलें, व त्याच्या शोधार्थ ती उभ्या

सातारा नगरांत दोन तीन दिवस घारीसारखी भिरभिर हिंडली. पण तपास कांहीं लागला नाहीं. रावजीचे धनी यमाजी शिवदेवदेखील रावजी जो गुन्हे-गार प्रतापरावाला पकडून आणण्याच्या कामगिरीवर गेला, तो प्रतापरावासह नाहींसा कोठें झाला या चिंतेंत पडले होते. प्रतापराव सांपडेना हें बरोबर. पण रावजी कोठें नाहींसा झाला असावा; तो आपल्या बाबतींत निराश होऊन कोठें तरी तोंड घेऊन निघून गेला असेल का; कीं त्यानें निराशेच्या भरांत आत्महत्या केली असेल ?—असे नाना परींचे विचार सजणेच्या मनांत सारखे घोळूं लागले होते.

ह्या धांदलींत सजणेला लक्ष्मीची भेट देखील घेण्याची फुरसत झाली नाहीं. पण कावळा बसावयाला व डहाळी मोडावयाला एक गांठ पडावी त्याप्रमाणें ज्या दिवशीं सजणा लक्ष्मीवर नजर ठेवण्यासाठीं म्हणून सकवार-बाईपासून निघून म्हातारीला जाऊन भेटली, त्याच दिवशीं लक्ष्मी आणि सखू ह्या दोघीहीजणी महाराजांची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं वनवासवाडीला निघून गेल्या होत्या. सकवारबाईला सजणेनें अगोदरच गुंगवून ठेवल्यानें सकवार-बाईनें त्या दोघींच्या जाण्याचा सजणेनें सांगितला तोच अर्थ ध्यानीं घेतला; व सजणेच्या प्रामाणिकतेबद्दल तिची पक्की खात्री झाली.

रावजी जगदाळ्याचा शोध कर करून दमल्यावर सजणेनें सोंगाची बतावणी करण्यासाठीं एकदां, सकवारबाई वनवासवाडीला गेली त्याच दिवशीं सकाळीं वनवासवाडीला जाऊन लक्ष्मीची भेट घेतली. हेतु हा कीं सकवारबाईनें कसून चौकशी केलीच तर आपण लक्ष्मीला भेटल्याचें अनायासें तिच्या कानां-वर जावें. त्या भेटींत काय बोलणें झालें हें कोण ऐकावयाला आलें होतें ? सकवारबाईचा तिच्या विश्वासू सजणेवर पूर्ण भरंवसा होताच ! त्या भेटींत सजणेनें एवढेंच केलें, ‘सकवारबाई तुमच्या दोन्ही पुत्रांचा कमालीचा मत्सर करते, व त्यांपैकीं एखाद्याला महाराज पुढें मागें छत्रपति करतील या भयानें ती त्यांना संधी साधून विषप्रयोगही करण्याच्या तयारींत आहे. तरी सावध असा’ असें लक्ष्मीला सांगून तिच्या मनांत नसत्या भयंकर संशयाचें बीजा-रोपण केलें. सकवारबाईनें सजणेला कसकसें छळलें हें लक्ष्मीला माहीत असल्यानें तिचा सजणेच्या शब्दावर तेव्हांच विश्वास बसला, व ती आपल्या पुत्रांच्या जिवाला पूर्वींपेक्षां जास्त जपूं लागली.

हे सजणेचे सकवारबाईवर सूड घेण्याचे उद्योग सुरू असतांना रावजी-विषयींची तिच्या मनाला लागलेली हुरहूर कायमच होती. रावजीनें केवळ आपल्या पायीं स्वतःच्या संसाराचा उन्हाळा करून घेतला, असा तिचा समज दिवसेंदिवस दृढावत चालला होता. पण तिच्या हातीं तरी हुरहुरत बसण्या-पेक्षां आणखी काय होतें? त्या भरांत तिनें रावजीच्या शोधार्थ आणखी कांहीं खेडीं पालथीं घातलीं; देवांना नवस केले; इतक्यांत महाराज व सकवारबाई यांचें पुन्हा सख्य होऊन महाराज वनवासवाडीहून पुन्हा साताऱ्याला गेल्याचें तिला कळलें. त्याबरोबर ती जणूं काय आपल्या इतक्या दिवसांच्या काम-गिरीचा आढावा सकवारबाईला काढून देण्यासाठीं पुन्हा साताऱ्याला गेली. तेथें तिनें सकवारबाईच्या डोळ्यांत वेड्यावांकड्या लोणकढ्या थापांची कशी धूळ फेंकली तें तीच जाणे!

एवढें मात्र खरें कीं तिनें सकवारबाईकडून शाबासकी मिळविली, व त्या दिवसापासून सकवारबाईनें तिला आपली मुख्य कुळंबीण नेमलें. छत्रपतींच्या पेशव्यांना छत्रपतींपाशीं जें महत्त्व, तशाच प्रकारचें महत्त्व सकवारबाईपाशीं सजणेला प्राप्त झालें. एरव्हीं सकवारबाईनें आतांच्यासारखीं महत्त्वाचीं गुप्त कामें तिला सांगितलींच नसतीं. पेशव्यांना सकवारबाईनें कशासाठीं बोलाविलें आहे हें देखील सजणेला माहीत होतें. परंतु तें षट्कर्णी होऊं न देण्याची दोघीही पूर्ण खबरदारी घेत होत्या.

असो. नानासाहेब निघून गेल्यावर सजणा गोपिकाबाईला म्हणाली, "बाई-साहेब! आपणापाशीं माझें एक महत्वाचें खासगी काम आहे."

"बोल ना काय तें." गोपिकाबाई म्हणाली.

"मी बोलत्यें. पण आपण सरकारांखेरीज दुसऱ्या कोणापाशीं त्याची वाच्यता करतां कामा नये. सरकारांना पेशवेपदावरून दूर करायला आणि आपली एवढी हानि करायला कारण थोरल्या आईसाहेब आहेत, हें आप-णाला माहीत आहे ना?"

"पण तूं त्यांची विश्वासू दासी ना?"

"होय. मग मी त्यांच्याविरुद्ध बोलायला कशी धजत्यें असें आपण मला विचारणार असाल तर सांगत्यें." असें म्हणून सजणेनें तिचा सकवार-बाईकडून कसकसा छळ झाला, तो वृत्तान्त गोपिकाबाईला निवेदन केला.

पेशवीणबाईनीं सजणेला म्हटलें, " पुरे झाली बाई तुझी कर्मकथा. त्या तुमच्या खासगी भानगडींशीं आम्हांला काय करावयाचें आहे ? "

सजणेच्या जिव्हारीं ते शद्ब झोंबून राहिले. पण तें सर्व गिळून ती म्हणली, " मी जी इथें थांबल्यें आहें, ती आपणाविषयीं आणि सरकारांविषयीं मला अत्यंत आदर वाटतो, व आपलें सर्वस्व जें महाराजांनीं हिरावून घेतलें आहे तें आपलें वैभव आपणाला पुन्हा प्राप्त व्हावें, ह्या सदिच्छेनें आपणाला कदाचित् या प्रसंगीं उपयोगी पडेल अशी महत्वाची गोष्ट आपणाला सांगण्यासाठीं थांबल्यें आहें. " असें म्हणून तिनें सकवारबाई राजपुत्राच्या नाशाला कशी टपली आहे हा वृत्तान्त सविस्तर निवेदन केला. मात्र प्रतापराव राजपुत्राच्या रक्षणासाठीं गमाजीच्या पाळतीवर गेल्याची गोष्ट तिनें हातची राखून ठेवली. अखेरीला ती म्हणाली, " ही गोष्ट आपण सरकारांमार्फत महाराजांच्या कानीं जाई अशी खटपट करून राजवंश जिवंत राखण्याचें श्रेय घ्यावें, एवढीच आपणाला माझी विनंति आहे. यांत आपणाला राजनिष्ठेचें व्रतपालन यथासांग केल्याचें पुण्य तर लागेलच; पण शिवाय महाराजांनादेखील आपली राणी काय किंमतीची आहे हें कळून येईल; व अशा आगलाव्या राणीच्या शिकवणीला बळी पडून त्यांनीं सरकारांवर जी आग पाखडली, ती चूक केली असें त्यांना वाटूं लागेल. थोरल्या आईसाहेबांनीं सरकारांवर इतकी आग कां पाखडली असावी आणि राजपुत्राचा नाश करण्याचें कृष्णकारस्थान कां रचिलें असावें असें आपणाला वाटतें ? "

" कां ? मला कांहीं नीटसें माहीत नाहीं. "

" त्यांना मराठशाहीची सर्व सत्ता आपल्या मुठींत पाहिजे आहे. त्यांना स्वतःच्या मांडीवर स्वतःच्या मर्जीतला मुलगा दत्तक घेऊन राजमाता म्हणून मिरवायचें आहे. त्यासाठीं त्यांचा हा सारा अट्टाहास चालला आहे. "

" अस्सें ! हें नव्हतें बाई मला माहीत ! "

"म्हणूनच मीं तें माहीत करून दिलें. माझें काम झालें. याउप्पर परमेश्वर आपणाला बुद्धि देईल तसें करा. मी आतां जात्यें. " असें म्हणून सजणा तेथून निघून गेली. ह्या अमोल माहितीचा आपणाला महाराजांच्या रोषामुळें आपल्या झालेल्या हानीची दामदुप्पट फेड करून घेण्याच्या कामीं कसा उपयोग करून घेतां येईल ह्या मनोराज्यांत गोपिकाबाई दंग होऊन गेली.

प्रकरण २२ वें

राणीची व पेशव्यांची भेट

नानासाहेब पेशवे गडावर जावयाला निघाले तों मार्गांत पुरंदऱ्यांची गांठ पडल्यामुळें त्यांच्याशीं अर्धी घटका बोलणें झालें, व नंतर ते थेट मंगळाई-च्या देवालयांत गेले. तेथें सकवारबाई देवीला प्रदक्षणा घालीत होती, व एक दासी देवालयाच्या दरवाजांत उभी होती. नानासाहेबांना पाहतांच सकवारबाईनें दासीला माघारीं राजवाड्यांत जावयाला सांगितलें.

नानासाहेबांनीं तेथें आतां तिसरें कोणी नाहीं असें पाहून सकवारबाईला विचारलें, " आईसाहेबांनीं कशासाठीं मला बोलावलें ? "

सकवारबाई उत्तरली, " तुम्हांला बोलावलें अशासाठीं कीं,—आतां कांहीं तुम्ही पेशवे नाहीं. खरें ना ? "

" होय. देवाची इच्छा ! "

" ही अवकृपा तुमच्या वांटाल्या येण्याला ही थोरली राणीच कारण आहे हें आतां तरी तुम्हांला कळून चुकलें ना ? "

" आपल्या पायांची कृपा ! हें सांगण्यासाठींच जर आपण मला इथें बोलावलें असेल, तर मी म्हणतों कीं आपण ही वृथा तसदी घेतली. "

" तुम्हांला पेशवेपदावरून स्थानभ्रष्ट करण्याचें सामर्थ्य जिच्या अंगीं आहे, तिच्या अंगीं तुम्हांला पुन्हा पेशवे करण्याचेंही सामर्थ्य आहे. हें तुम्हांला कबूल आहेना ? "

" मला सांगा, सूर्य—चंद्रांचें अस्तित्व कोणाला कधींतरी नाकबूल करता येईल का ? "

" मी तुम्हांला पेशवेपद प्राप्त करून द्यावयाला तयार आहें. परंतु तुम्ही माझ्या तंत्रानें वागायला तयार असाल तर ! "

राजकारणांतील आणीबाणीच्या प्रसंगीं माझ्याकडून जर कधीं आई-साहेबांचें मन दुखविलें गेलें असेल, तर त्या नाइलाजाच्या गोष्टीबद्दल क्षमा व्हावी. एरव्हीं मीं कधींच आईसाहेबांचा शद्ब ओलांडल्याचें मला स्मरत नाहीं."

"मला फक्त राजकारणाच्या बाबतींतच बोलायचें आहे." एवढें म्हणून सकवारबाई नानासाहेबांकडून कांहींतरी उत्तर मिळेल या अपेक्षेनें किंचित् थांबली, व कांहीं उत्तर मिळत नाहीं असें पाहून म्हणाली, "आजवर गोष्टी झाल्या त्या होऊन गेल्या. यापुढें तरी तुमचा आणि माझा समेट होणें शक्य व इष्टही नाहीं काय ?"

"ह्या व्यापक प्रश्नाचें उत्तर देणें बरेंच अवघड आहे."

"त्यांत अवघड तें काय ? हें पाहा, महाराजांचा आतां भरंवसा नाहीं. आपण वाईट कधीं बोलूं नये; पण दूरदर्शीपणानें आपण असले जबाबदारीचे प्रश्न सोडवूं लागलों कीं सर्व कांहीं बोलावें लागतें व करावें लागतें. छत्रपतींच्या गादीला वारस पाहिजे हें तर तुम्हांला कबूल ना ?"

"तें कोणाला नाकबूल होईल ?"

"झालें तर. मीं आपल्यांतीलच रघूजीबाबा भोंसल्यांच्या मुलाला किंवा ते नच जमलें असाच एखादा लायक मुलगा शोधून काढून त्याला दत्तक घेण्याचें ठरविलें आहे. महाराजदेखील दत्तक घेण्याच्या योजनेला अगदीं विरुद्ध जातील असें नाहीं. परंतु महाराजांचा स्वभाव पडला गोडा व भिडस्त. उद्यां लक्ष्मीनें त्यांना भीड घातली तर दासीपुत्राला छत्रपति करण्यालाही ते कमी करायचे नाहींत. किंवा सगुणाबाईनें माझ्याशीं जन्माचा दावा साधण्यासाठीं स्वतःच्या मुठींत राहणारा एखाद्दा मुलगा शोधून काढला तर त्यालाही महाराजांच्यानें नकार मिळेलच असें नाहीं. असला वशिल्याचा मुलगा मांडीवर बसला कीं त्या लोकांना राजवटींत नव्हे नव्हे ते बखेडे उत्पन्न करायला फावेल, व मला निर्माल्यवत् होऊन ती मराठशाहीची विटंबना उघड्या डोळ्यांनीं सहन करावी लागेल. तो अनवस्था प्रसंग टाळावा, यासाठीं मीच माझ्या पसंतीनें राजपुत्र हुडकून काढणार, आणि त्याला दत्तक घेऊन छत्रपति करणार. या गोष्टीला तुमची संमति मिळाली पाहिजे. माझी योजना महाराजांना रुचो किंवा न रुचो, ती तुम्हीं अंतःकरणापासून उचलून धरली

पाहिजे व महाराजांना त्याप्रमाणें वागण्याचा आग्रह केला पाहिजे. तुम्ही आणि मी एक झाल्यावर महाराजांची इतरांच्या नादानें आम्हांला विरोध करण्याची काय छाती आहे ?"

" आईसाहेब ! आपण मला एवढें महत्त्व देऊं केलें याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. परंतु ह्या नानाच्या कुडींत प्राण आहे तोंवर त्याच्या हातून महाराजांशीं अशी प्रतारणा होणें नाहीं."

" एकूण तुम्हांला माझ्याविरुद्ध वागून असें अज्ञातवासी राहणें आवडेल म्हणायचें !"

" महाराजांशीं इमानदारी राखतांना मला अज्ञातवासच काय पण मरण आलें तरी बेहेत्तर आहे."

इतक्यांत पूर्वीची दासी घाबऱ्या घुबऱ्या धावत येऊन सकवारबाईला हळूच म्हणाली, " आईसाहेब ! महाराजांची स्वारी—"

" कां ? काय म्हणतोस ?" सकवारबाईनें पुन्हा विचारलें.

" महाराज इतका वेळ आपलें संभाषण ऐकत बाजूला उभे होते."

" कुठें उभे होते महाराज ?" सकवारबाईनें बावरलेल्या दृष्टीनें सभोंवार पाहत विचारलें. दासीनें ती जागा दाखविली. पण तेथें तेव्हां कोणी दिसलें नाहीं. दासीनें महाराज आतां इतक्यांत निघून गेल्याचें सांगितलें. तेव्हां सकवारबाईच्या तोंडचें पाणी पळालें. तिला पुढें काय बोलावें हेंच सुचेना. अशा स्थितींत आतां एथें थांबणें इष्ट नाहीं, महाराजांना पेशवे राणीशीं गुप्त कारस्थानें करतात असा वृथा संशय मात्र यावयाचा, या भयानें नानासाहेबांनीं सकवारबाईचा निरोप मागितला. सकवारबाईनें 'जा' अशा एका शद्बांत त्यांना निरोप दिला, व ती स्वतः साशंक वृत्तीनें घाईघाईनें भुयाराच्या मार्गानें रंगमहालांत जावयाला निघाली. जातांजातांच तिनें महाराजांपाशीं काय बोलावयाचें तें आपल्या मनाशीं ठरवून टाकलें, " नानासाहेब पेशवे आपण होऊन पेशवाईच्या प्राप्तीस्तव सासूबाईशीं गुप्त संधान बांधण्यासाठीं आले होते. ती गोष्ट कोणाच्या डोळ्यांवर येऊं नये यास्तव त्यांनीं मंगळाईच्या दर्शनाचें निमित्त केलें एवढेंच. आपण त्याच वेळीं देवदर्शनाला गेलों तेव्हां अचानक गांठ पडली, व आपण त्यांचें मन पाहण्याठीं त्यांना मुद्दाम कांहीं नाजुक प्रश्न विचारले."

परंतु योगायोग निराळाच होता! महाराज त्या दिवशीं अपरात्रीं आले ते कांहीं सहज सहल करण्यासाठीं आले नव्हते. सजणा जी बाईकडून निघाली, ती थेट रंगमहालांत आली, व महाराजांना तर कळावें पण आपणावर तर चुगली केल्याचा आरोप येऊं नये अश हेतूनें 'आज थोरल्या आईसाहेबांनीं पेशवे सरकारांना रात्रौ मंग देवालयांत भेटीला बोलावलें असून तिकडे थोरल्या आईसाहेब गेल्या अ असें सांगूं लागली. महाराजांना स्वाभाविकपणेंच त्या गोष्टीचें अत्यंत वाटलें. त्यांनीं प्रथम सकवारबाई आपल्या महालांत आहे किंवा समक्ष जाऊन पाहिलें. ती तेथें नाहीं असें आढळून येतांच संशया गडा करून घेण्यासाठीं ते मंगळाईचें दर्शन घेण्याच्या निमित्तानें व वास्तविक नानासाहेब त्यापूर्वीच सकवारबाईला भेटावयाचे. परंतु त्यांना पुरंदरे भेटले व त्याच्याशीं प्राप्त परिस्थितीबाबत चर्चा करण्यां सुमारें घटकाभर वेळ मोडला. तितका त्यांना गडावर येण्याला उशी ते देवालयांत येऊन सकवारबाईशीं त्यांचीं एकदोन प्रश्नोत्तरें होतात तोंच महाराज तेथें आले. त्यांना सकवारबाई व नानासाहेब य महत्त्वाचें संभाषण ऐकावयाला मिळालें. आपण चोरून संभाषण असा आरोप आपणावर करण्याला सकवारबाईला अवसर सांपडूं नये तेथून महाराज रंगमहालांत न जातां ताराबाईचा समाचार घे तिकडे गेले.

ताराबाईला महाराजांनीं प्रचलित राजकारणांत तिनें उलथापाल नये यास्तव कारभारीमंडळींच्या व सकवारबाईच्या मतानें गडावर न ठेविलें होतें. पण त्यांच्याकडून तिचा उपमर्द कधींच झाला नव्हता व इतमामांतही कांहीं उणेपणा राखण्यांत आला नव्हता. महाराज तिला मातुश्रीप्रमाणें मान देत असत, व राजकारणाच्या हरएक बाबतींत सल्ला घेत असत. कारभारीमंडळींचीही तिच्याकडे वारंवार ये जा सु सकवारबाईला जें महत्त्व होतें तें ती राजाची राणी म्हणून. तसें ता नव्हतें. तिच्या कर्तबगारीविषयीं व चातुर्याविषयीं खुद्द महाराजांना वैभवच्युत करण्याचे तिनें आटोकाट प्रयत्न केले होते त्यांनाही वाटे. मग इतरांना तो वाटत असेल हें सांगावयाला नकोच.

पेशवाईचा पुनर्विकास

आज आठ दहा दिवस साताऱ्यांत व वनवासवाडीला ज्या भानगडी चालल्या होत्या, त्या सर्व कर्णोपकर्णी ताराबाईच्या कानीं गेल्याच होत्या. ताराबाई काय, सकवारबाई काय किंवा पेशवे काय, एकमेकांविषयीं एक-मेकांच्या मनांत खरा आपलेपणा व विश्वास नसल्यामुळें यांनीं त्यांच्यावर नजर ठेवावी व त्यांनीं यांच्यावर नजर ठेवावी असल्या गुप्त प्रकारांचें जाळें सर्वत्र विणलें गेलें होतें. गडावर देखील ज्याप्रमाणें सकवारबाई गुप्तचरांच्या नजरेनें ताराबाईच्या हालचालींवर गुप्त पहारा ठेवी, त्याप्रमाणेंच ताराबाईचे लोक कोठें खुट् झालें तरी त्याची खबर ताराबाईला देण्याला तत्पर असत. फार दूर कशाला? प्रतिनिधि, रामचंद्रपंत अमात्य, चिटणीस वगैरे मंडळींची सकवारबाईच्या बाबतींत जेव्हां पूर्ण निराशा झाली व आणखी थोडे दिवस महाराजांचा उद्वेग टिकल्यास सकवारबाई राजवटीचा उन्हाळा करून सोडील अशी खात्री होऊन चुकली, तेव्हां ह्या अडचणींतून मार्ग कसा काढावयाचा याविषयीं ताराबाईची सल्ला गुप्तपणें घेण्याला ते चुकले नव्हते. तेव्हांपासून त्यांचें जें आस्ते कदमाचें धोरण सुरू होतें, त्याचें मूळ ताराबाईकडून त्यांना मिळालेल्या हितोपदेशांतच होतें. त्या प्रसंगीं ताराबाईनें सुचविलेले सर्वच उपाय त्या मुत्सद्यांना रुचले असें नाहीं. उदाहरणार्थ, ताराबाईनें त्यांना सुचविलें कीं शाहूराजे विलासी, मनदुबळे व हलक्या कानांचे, घटकेंत या बायलेचा शब्द खरा मानतील तर घटकेंत त्या बायलेच्या आहारीं जातील तर घटकेंत तिसऱ्याच कोणाच्या हातचें बाहुलें होतील. तशांत त्यांनीं पेशव्यां-सारख्या राजवटींतील एकमात्र सामर्थ्यवान मुत्सद्याशीं चुरस मांडल्यामुळें तर त्यांनीं आपल्या उजव्या हातानें डावा हात तोडून घेतला आहे. अशा सांवळ्या गोंधळांत थोरल्या सूनबाईच्या वशिल्याच्या माणसांचें पेंढार राजवटींत घुसून त्यांनीं राजवटीची धूळधाण करून सोडावयाची, त्यापेक्षां सर्व मुत्सद्यांनीं एक होऊन सातारा आणि कोल्हापूर ह्या दोन्ही गाद्या एक करून सोडाव्या हें हिताचें. हा उपाय अर्थातच त्या मुत्सद्यांना रुचला नाहीं. परंतु त्यांनीं 'विचार करून पाहूं' अशा उडत्या उत्तरानें त्या विचाराची बोळवण तेव्हां केली होती. मात्र दोन्ही गाद्या एक करण्याच्या महत्त्वाकांक्षेचा पसारा मांड-तांना ताराबाईनें राज्याचा खरा वारस आपला नातू राजाराम अज्ञातवासांत दिवस कंठीत आहे, त्याला आणवून संयुक्त राज्याचा छत्रपति करावें अशी

इच्छा प्रगट केली; ती एकच गोष्ट सर्व राजकारणाला जोराची कलाटणी देण्याला कारण होईल हें ओळखावयाला कोणी मुत्सद्दीच पाहिजे होता असें नाहीं. तो राजपुत्र पुढें आल्यास सकवारबाईचे स्वतःला राजमाता होण्याच्या मनोरथांचे मनोरे सपशेल कोसळून पडणार, आणि रघूजी भोंसले वगैरे सर्वांच्याच निराशा पदरीं पडणार, आणि ती मंडळी कांहींतरी वाममार्गाचा आश्रय करावयालाही वेळीं चुकणार नाहीं, हें उघड होतें. परंतु औरस राजपुत्राचा गादीवरील हक्क नाशाबीत करणें कोणालाही शक्य होणार नाहीं हें देखील तितकेंच खरें होतें.

त्या सर्व गोष्टी फार दूरच्या होत्या. प्रथम हा राजपुत्र खरा कीं खोटा याविषयींच शंका होती. अमात्यांना एक खरा प्रकार माहीत होता. परंतु बाकीच्यांचा त्या गोष्टीवर सहजासहजीं विश्वास बसेना. त्यांनीं आपली खातरजमा करून घेण्यासाठीं त्या राजपुत्राचा ठावाठिकाणा ताराबाईला विचारला. परंतु महाराजांची त्या योजनेला संमत्ति मिळेपावेतों तें सांगण्याचें ताराबाईनें साफ नाकारलें. अमात्यांना विचारतां त्यांनीं कानांवर हात ठेवले. अखेर सर्वांनीं एकमतानें ताराबाईच्या संमतीनें ठरविलें कीं प्रथम महाराजांच्या कानीं ही गोष्ट घालून त्यांची संमति मिळवावी, आणि मग त्या राजपुत्राचा शोध करावा. मात्र तोंवर ती गोष्ट अगदीं गुप्त राखण्याविषयीं त्या मुत्सद्यांना ताराबाईच्या आग्रहावरून तिच्यासमोर आणाशपथा घ्याव्या लागल्या होत्या.

त्या गोष्टीविषयीं महाराजांपाशीं विचारविनिमय करण्याची संधी त्या मंडळीला मिळण्यापूर्वींच आज महाराज व ताराबाई यांची अचानक भेट झाली. इकडे ताराबाईनें ज्याप्रमाणें राजारामाला छत्रपति करण्याचें कारस्थान सुरू केलें होतें, त्याप्रमाणेंच तिकडे सकवारबाईनेंही 'दत्तक घ्या. दत्तक घ्या' अशी निकडीची कटकट महाराजांच्या मागें चालविली होती. त्यांतच 'मला पेशवा करा' ह्या नाइकांच्या कटकटीची भर पडली होती. ह्या सर्व गुंतागुंतीचा उलगडा महाराजांना केव्हांतरी ताराबाईच्या संमतीनेंच करावयाचा होता.

तो उलगडा होण्याची वेळ त्या रात्रौ आपोआप जमून आली. त्या दिवशीं ते प्रथम जे रातोरात घाईनें मंगळाईच्या देवालयापाशीं आले, ते नानासाहेब आपल्या राणीला भुरळ घालून आपली ढांसळलेली बाजू पुन्हा

सांवरण्यासाठीं काय काय प्रयत्न करतात तें जाणण्यासाठीं म्हणून आले. त्या वेळीं नानासाहेबांनीं निस्पृहतेनें पण नम्रपणें सकवारबाईला दिलेलीं समर्पक उत्तरें ऐकून परस्पर महाराजांचें मन त्यांना सांगूं लागलें कीं नानासाहेब पेशवे कोल्हापूरकरांना फितूर आहेत असा जो सकवारबाईनें व नाइकांनीं आपला समज करून दिला, त्यांत फारसें तथ्य नसावें.

पण त्यांत जर तथ्य नाहीं, तर पेशव्यांनीं कोल्हापूरकरांशीं सलोख्याचा गुप्त करार केला त्याचा अर्थ काय?—हा प्रश्न कांहीं महाराजांना सोडवितां येईना. तो प्रश्न सोडविण्याला ताराबाईच्या पोक्त सल्ल्याचा कांहीं उपयोग झाला तर पाहावा असा त्यांचा मानस होता.

प्रथम सुखदुःखाच्या चार गोष्टी झाल्यावर महाराजांनीं पेशव्यांसंबंधीं गोष्ट काढली. "आम्ही नानासाहेबाला कामावरून दूर केलें आहे हें आई-साहेबांना कळलें असेलच."

"होय. कळलें आहे. जी गोष्ट महारापोरांच्या तोंडीं झाली, ती मला कळल्याखेरीज कशी राहील! दासदासी येतात त्या कांहीं कांहीं बोलतात. हें देखील तुमची आणि थोरल्या सूनबाईची कृपा आहे तोंवर. यापेक्षांही सक्तीच्या कैदेंत मला कोंडलें आणि चिटपांखरूंदेखील इकडे फिरकूं दिलें नाहीं कीं त्या वाऱ्यावरच्या गोष्टीदेखील मला कळेनाशा होतील." ताराबाई म्हणाली.

"छे! छे! असें कसें म्हणतां? राजेपणाचा बोज सांभाळण्यासाठीं आम्हांला तुमच्याशीं जरा कठोरपणानेंच वागावें लागत आहे हें खरें. परंतु एरव्हीं आम्ही तुम्हांला मातुश्रीच्या ठायीं पूज्य मानतों." महाराज मनांतल्या मनांत ओशाळून उद्गारले.

ताराबाई तो अप्रिय विषय तसाच सोडून म्हणाली, "बरें; पुढें विचार काय ठरला आहे? थोरल्या सूनबाईच्या हातीं समस्त दौलत खेळखंडोबा करण्यासाठीं सोंपवून सर्वसंगपरित्यागपूर्वक काशीरामेश्वराच्या यात्रेला निघा-वयाचें आहे काय?"

ताराबाईच्या प्रत्येक शब्दांत खांचाखोंचा भरलेल्या होत्या त्या महाराजांच्या तेव्हांच ध्यानीं आल्या. ते म्हणाले, "आम्हीं पेशव्यांना कारभारांतून दूर केलें तें आईसाहेबांना रुचलें नाहीं असें दिसतें. पण आईसाहेबांशींदेखील नाना कांहीं आजवर थोड्याथोडक्या बांकानें वागला नाहीं. खरें ना?"

" आईसाहेबांच्या अंगीं एक मोठा दोष आहे कीं कोटमाप रयतेच्या उभ्या मराठशाहीचें भवितव्य स्वतःच्या क्षुद्र मानापमानासाठीं लहरीखातर पणाला कसें लावावें हें त्यांना कळत नाहीं."

पुन्हा तीच भाषा ! तसेच वर्मीं झोंबणारे शब्द ! महाराजांनीं ओळखलें कीं आपण राणीच्या चुगलखोरपणाला बळी पडून पेशव्यांना कामावरून दूर केलें असा ताराबाईचा समज आहे; व राजकारणाच्या दृष्टीनें हें आपण अगदीं अनुचित कृत्य केलें असें तिचें स्पष्ट मत आहे. त्यांनीं ताराबाईला पुन्हा विचारलें, " नाना इतका कर्तबगार व लायक मनुष्य आहे व तो राज्यकार–भाराचा सारा भार उचलण्याला समर्थ आहे असें आईसाहेबांना वाटतें का ?"

" तुम्ही स्वतःच्या मनाला विचारून पाहा ना ! तुम्ही बादशाही कैदेंतून सुटून दक्षिणेंत आलां तेव्हां तुम्हांला गादीची प्राप्ति करून घेण्याला पहिला खंबीर आधार बाळाजी विश्वनाथांचाच मिळाला, म्हणून तुम्ही हे दिवस पाहत आहां. माझ्यासारख्या धोरणी राज्यकर्तीलादेखील पेशव्यांसमोर हात टेकावे लागले. मराठशाहीला हिंदुपदपादशाहीचें विराट स्वरूप प्राप्त करून देण्याच्या धाडसी महत्त्वाकांक्षेचा उगम प्रथम पेशव्यांच्याच अंतःकरणांत झाला. पेशवे एका अर्थानें माझे शत्रु आहेत; त्यांनीं माझी पूर्ण दुर्दशा केली आहे. पेशव्यांनीं मला पावलोपावलीं विरोध केला नसता व त्यांनीं तुम्हांला पाठीशीं घातलें नसतें तर मराठशाहीचीं दोन शकलें खास झालीं नसतीं व कोल्हापुरांत सवता सुभा स्थापन करण्याचा प्रसंग माझ्यावर कधींच आला नसता. मी निःपक्षपाती बुद्धीनें जेव्हां जेव्हां ह्या गोष्टीचा विचार करत्यें तेव्हां तेव्हां मला निमूटपणें स्वतःशीं कबूल करावें लागतें कीं पेशवे एका मराठ–शाहीचीं दोन शकलें होण्याला कारणीभूत झाले असले, तरी त्यांतल्या एका शकलाचें वैभव त्यांनीं अपार वाढविलें आहे. असें असतां पेशव्यांना तुम्हीं दूर लोटलें, तेव्हां छत्रपति आहां झालें ! यापेक्षां आणखी काय म्हणूं !"

" परंतु नाना आम्हांला व राजवटीच्या इतर सर्व मातबरांना फार डोई-जड झाला होता ! अशा स्थितींत त्याचा शिरजोरपणा आम्हीं कोठवर सहन करावयाचा ?"

" दुबळ्या माणसांना पराक्रमी पुरुषांची तेजस्वी पराक्रमी वृत्ति शिरजोर-पणाचीच दिसायची. पण छत्रपति होणें जितकें सोपें आहे तितकें पेशवा

होऊन राज्याची आबादीआबाद राखणें व राज्यवैभवाचा दुंदुभि आसेतु–हिमाचल यशस्वितेनें दुमदुमत ठेवणें सोपें नाहीं."

इतक्या सडेतोड भाषेंत ताराबाईनें महाराजांचा समाचार घेतल्यावर नानासाहेबांनीं कोल्हापूरकरांशीं गु.त तह केला त्या बाबतींत बोलणें काढण्याचें धैर्य महाराजांना मुळींच होईना. ते एखाद्या देवालयांतील मुक्या देवाप्रमाणें अगदीं स्तब्ध बसले होते.

अंमळशानें ताराबाई पुन्हा म्हणाली, "तें राहो. तुम्हीं तुमच्या जबाबदारीवर पेशव्यांना दूर केलें आहे, त्याअर्थीं त्याची एकंदर पुढील निरवानिरव कशी करावयाची याचीही कांहीं योजना तुम्हीं आपल्या मनाशीं ठरविली असलच. आतां तुम्हीं मानली तर तुम्हांला मी अखेरची एक विनंति करणार आहें. मानाल का?"

"सांगा तर खरें काय तें?"

"माझ्या हातून आपल्या आयुष्याच्या अखेरी अखेरीला तरी राजवटीची कांहीं सेवा घडावी अशी उत्कट इच्छा आहे. भोंसल्यांच्या राजवंशाचा जसा तुम्हांला तसाच मलाही अभिमान आहे. दत्तक कोणाला घ्यावें आणि राजमाता कोणीं व्हावें ह्या अहमहमिकेंत राजवटीचे वाभाडे निघू नयेत असें मला अंतःकरणपूर्वक वाटतें. मला सांगा, तुम्हीं तुमच्या पश्चात् राज्याची काय व्यवस्था करण्याचें योजिलें आहे?"

"आम्हीं अजून तशी कांहींच योजना मुक्रर केलेली नाहीं. पण आमच्या पोटीं पुत्रसंतान नाहीं व आतां होण्याची आशा नाहीं; त्याअर्थीं कोणीतरी चांगला पोरगा दत्तक घेऊन गादीला वारस निर्माण करावा असा विचार आहे. ईश्वर काय करील तें खरें."

"तुमच्या पोटीं पुत्रसंतान नाहीं हा परमेश्वरी कोप; त्याला कोणाचा इलाज नाहीं. पण दत्तक घेऊन परक्यांचे हात राज्यकारभारांत घुसण्याला वाव करून देण्यापेक्षां तुमचाच पुतण्या–कैलासवासी धाकट्या शिवाजी महाराजांचा पुत्र आजला अज्ञातवासांत दिवस कंठीत आहे, त्याला आणून राज्यावर बसविल्यास बरें असें मला वाटतें."

"शिवाजी महाराजांचा पुत्र?"

"होय."

"आणि तो कुठें आहे? आजवर त्याची कांहींच खबर आम्हांला मिळाली नाहीं ती कशी?"

"तो एका अज्ञात ठिकाणीं भाग्योदयाची वाट पाहत खितपत पडला आहे. मींच त्याला अज्ञातवासांत ठेविला आहे. त्या राजपुत्राला गादी देण्याचा जर तुमचा मानस असेल, तर त्यांत मला आनंद होईल, व औरस राजपुत्र आपणाला राजा लाभला यांत रयतेलाही आनंद होईल. छत्रपतींच्या गादीविषयींचे भांडणतंटे माझ्या हयातींत संपावे आणि त्या अभागी राज-पुत्राचा वनवास संपून तो स्वस्थानीं शोभूं लागलेला पाहून राम म्हणावा अशी माझी इच्छा आहे. ही माझी अंतकाळची इच्छा आहे असें समजा, व तिला काय मान द्यावयाचा तो द्या."

"चिटणीस वगैरे मंडळीपाशीं तुम्हीं गोष्ट काढली तेव्हां त्यांचें काय मत पडलें?"

"त्यांनीं कांहींच मत दिलें नाहीं. परंतु यावरून ते गादीच्या खऱ्या खुऱ्या वारसांशीं बेइमान होतील असा अर्थ मात्र तुम्ही घेऊं नका. ते बोलले नसतील ते एवढ्यासाठीं—ह्या आंधेरनगरींत आपल्या सरळ बोलण्याचा विप-र्यास केला गेला, आणि जी गत पेशव्यांची झाली तीच आपलीही होण्याचा प्रसंग आला तर काय करा! मी बोलल्यें त्याबद्दल मलाही कांहीं अकल्पित प्रायश्चित भोगावें लागणारच नाहीं असें मलादेखील सांगवत नाहीं. कारण एथें आतां बोलून चालून स्त्रीराज्य सुरू झालें आहे."

पुन्हा घालून पाडून बोलणीं! महाराजांना ताराबाईचे ते वर्मी झोंबणारे वाग्बाण अगदीं असह्य होत होते. पण ताराबाई बोलत होती तें कांहींच गैर बांका बोलत नव्हती; व त्यांतील मथितार्थ ध्यानीं घेण्याइतपत तरी समतोलता महाराजांच्या ठायीं खास होती. मंगळाईच्या देवालयांत दिसून आलेला प्रकार त्यांच्या स्मरणांत अगदीं ताजा होता. त्यामुळें ताराबाईनें थोरल्या राणीवर उगारलेलें वाक्शस्त्र बहुतांशीं यथार्थ आहे व थोरल्या राणीवर विश्वासून आपण वागूं लागलों याचा परिणाम अनर्थकारक होईल ह्या भयानें त्यांच्या मनांत पुन्हा नव्यानें मूळ धरलें होतें. ह्या एकंदर प्रकरणाचा कांहीं तरी सोक्षमोक्ष लौकर केलाच पाहिजे असें मनाशीं ठरवून त्यांनीं ताराबाईचा निरोप घेतला.

पेशवाईचा पुनर्विकास

महाराज तेथून जातात न जातात तोंच ताराबाईच्या एका दासीनें घाबऱ्या घाबऱ्या तेथें येऊन सांगितलें, "आईसाहेब! एक अत्यंत भयंकर वार्ता आतां माझ्या कानीं आली."

"कोणती ती?" ताराबाईनें विचारलें.

"वाशींकडे तिकडे कुठें आपले कोणी राजपुत्र होते ना? त्यांचा मारेकऱ्यांनीं खून केला."

ते शब्द ताराबाईच्या कानीं पडले मात्र; त्याच क्षणीं 'हायरे नशिबा!' असे उद्गार तिच्या मुखावाटे बाहेर पडले, व त्याबरोबरच ती बेशुद्ध होऊन बैठकीवर आडवी पडली!

प्रकरण २३ वें

पति–पत्नींत अबोला

" थोरल्या राणीसाहेबांनीं इतक्या तांतडीनें कशाला बोलावलें होतें ? " नानासाहेबांचा महालांत पाय पडतांच त्यांना कपडे उतरण्याचीदेखील फुरसत न देतां गोपिकाबाईनें विचारलें. सजणा भेटून गेल्यापासून एकंदर प्रचलित भानगडींत आपणाला आपलें गतवैभव परत कसें मिळवितां येईल याविषयीं नानाविध मनोरथांचे मनोरे उभारण्यांत गोपिकाबाई दंग होऊन गेली होती. त्या विचारांच्या भरांत तिला आज दुसरें तिसरें कांहींच सुचेना. विश्वासराव जवळ खेळतां खेळतां उघडाच झोंपीं गेला होता, त्याच्याकडेदेखील तिचें लक्ष्य नव्हतें. तो वास्तविक रोज दासीपाशीं झोंपे. पण आज त्याच्या बाळ-मनानें घेतलें कीं आईपाशींच खेळायचें आणि तिच्याच कुशींत झोंपीं जायचें. त्याला उघडा पडलेला पाहतांच नानासाहेब प्रथम म्हणाले, " अगोदर बाळाला नीट नेऊन पलंगावर निजवायला दासीला सांगा पाहूं ! "

तेव्हां कुठें मुलगा उघडाच नुसत्या बैठकीवर झोंपीं गेला आहे हें गोपिका-बाईच्या ध्यानीं आलें. त्याच क्षणीं राघवनाथ ज्योतिषांनीं वर्तविलेल्या शुभ भविष्याची आठवणही तिला झाली. सूर्यकिरणांच्या तिरपेनें फुलवेलीवरील कळी उमलावी त्याप्रमाणें त्या भविष्याच्या गोड स्मरणानें तिच्या मातृहृदयाची कळी उमलली. त्या भरांत तिनें प्रेमभरानें त्या अर्भकाचें चुंबन घेतलें व लगेच दासीला हांक मारून त्याला तेथून नेऊन पलंगावर निजविण्याला सांगि-तलें. दासी मुलाला घेऊन निघून गेल्यावर तिनें नानासाहेबांना प्रश्न केला, " थोरल्या राणीसाहेबांनीं कशाला इतक्या तांतडीनें बोलावलें होतें ? "

नानासाहेबांनीं मंगळाईच्या देवालयांत घडलेला वृत्तान्त निवेदन केला.

" पण आपण त्यांना नकार कां बरें दिला ? होय म्हणून कांहीं काळ तोंडदेखलें त्यांच्या तंत्रानें वागणें झालें असतें तर काय बिघडलें असतें ? "

“ तें खरें नव्हे. ”

“ खरें आणि खोटें ! हा व्यवहार आहे. राजकारणांत प्रत्येक गोष्टीचा इतका कांटेतोल खरेपणा पारखून थोडेंच भागतें ! खऱ्याची दुनिया आजकाल कोठें उरली आहे ? आपण थोरल्या राणीसाहेबांच्या तंत्रानें वागलां असतां तर त्यांत काय बिघडलें असतें ? आपणाला त्या म्हणजे कोणी सामान्य स्त्री वाटतात का ? ”

“ बरें; तें राहो. ती दासी तुला काय सांगत होती ? ” नानासाहेबांनीं तो वितंडवाद थांबविण्याच्या हेतूनें विषयांतर केलें.

“ तें मी सांगत्यें. पण त्याचा तरी आपणाला आपला भाग्योदय करून घेण्याकडे उपयोग करून घ्यायचा असेल तर. ‘नळी फुंकिली सोनारें; इकडून तिकडे गेलें वारें’ असाच जर प्रकार व्हायचा असेल, तर मी कांहींच सांगत नाहीं. उगाच वाणी शिणवा कशाला ? ”

“ बरें; तुमच्या सांगण्याप्रमाणें वागूं. आतांतरी झालें ? सांगा आतां. ”

“ तसें नाहीं. मला अगोदर वचन पाहिजे आहे. ” गोपिकाबाई हट्टच धरून बसली.

“ बरें हें घ्या वचन. ” असें म्हणून नानासाहेबांनीं गोपिकाबाईच्या हातावर हात दिला.

“ थोरल्या राणीसाहेबांनीं महाराजांचे कान भरून दिल्यावरूनच महाराजांनीं आपणाकडचें पेशवेपद काढून घेतलें आहे. त्या थोरल्या राणीसाहेबांची एक अधमपणाची कारवाई माझ्या कानीं आली आहे. ” असें म्हणून गोपिकाबाईनें सजणेकडून स्वतःला कळलेला सर्व वृतान्त नानासाहेबांना निवेदन केला. तो ऐकून नानासाहेबांच्या अंगावर शहारे उभे राहिले.

“ किती भयंकर स्त्री आहे ही ! स्त्री तरी कसली ? राक्षसीणच म्हणावयाची ! कोण हा राजसत्तेचा हव्यास ! कुठें महाराजांचा देवस्वभाव आणि कुठें ह्या बयेचा हा अमानुषपणा ! कुठें तो पवित्र गंगासागर आणि कुठें ही घाण वाहून नेणारी नागझरी ! हरहर ! महाराजांनीं मागच्या जन्मीं अशीं काय घोर पातकें केलीं, तें या जन्मीं ह्या अवदसेच्या रूपानें त्या पातकांचें फळ त्यांच्या पदरीं पडलें न कळे ! ” असें म्हणून नानासाहेबांनीं एक दीर्घ उसासा सोडला.

"हा प्रकार महाराजांना कळला तर काय होईल ?"

"कांहींही होवो अगर न होवो. पण आपणाला अशी चुगली करणें शोभत नाहीं."

"ही चुगली का ? ताराबाई आईसाहेबांचा नातू हाच महाराजांच्या पश्चात् गादीचा खरा वारस नाहीं का ? नाहींतरी आपण आतां महाराजांचे पेशवे नाहींच आहां. कोल्हापूरकरांशीं सलोख्याचा गुप्त तह आपण केला म्हणूनच पेशवाईवैभवाला मुकण्याचा प्रसंग आपल्यावर आला आहे. आपण कोल्हापूरकरांची सेवा करण्याचें मनांत आणल्यास आपल्या सुखाला आणि मानमरातबाला पारावार उरणार नाहीं." बोलतां बोलतां गोपिकाबाई त्याचा नानासाहेबांच्या मनावर काय परिणाम होतो तें लक्ष्यपूर्वक त्यांच्या चर्येवरून अजमावून पाहत होती. कोल्हापूरकरांचा पक्ष स्वीकारण्याची आपली योजना त्यांना पटत नसावी असें त्यांच्या चर्येवरून दिसून येतांच तिनें आपल्या भाषणाचा ओघ किंचित् बदलला. "कदाचित् लोक आपणाला नांवें ठेवतील म्हणून तो मार्ग आपणाला त्याज्य वाटत असेल तर तें राहूंदे. मीं प्रथम सांगितलें त्याप्रमाणें राजपुत्राचा कैवार घेऊन महाराजांपाशीं बोलणें करायला तर आपणाला कांहीं हरकत नाहीं ना ? त्यामुळें अनायासें राजवंशाची अमोल सेवा केल्याचें श्रेय आपल्या पदरीं पडेल, आणि महाराजांचा आपल्या ठायीं पूर्ववत् विश्वास बसून सकवारबाईचें तिच्या पक्षासह राजकारणांतून उच्चाटण होईल. बरें; तो नवा छत्रपतिदेखील आपल्या प्रयत्नांनीं राजपद मिळालें ह्या जाणिवेनें जन्मभर आपणाशीं कृतज्ञ राहील. हेंही आपणाला पटत नसेल तर आणखीही एक उपाय आहे. आपण सरळ जाऊन ताराबाई आईसाहेबांची एकदां भेट घ्यावी, व त्यांना थोरल्या आईसाहेबांच्या कृष्णकारस्थानाची माहिती देऊन राजपुत्राच्या रक्षणासाठीं त्यांचा पक्ष स्वीकारण्याचें कबूल करावें. ताराबाई आईसाहेब आनंदानें आपणाला पाठीशीं घालायला तयार होतील. त्यांचा पक्ष राजवटींत अगदींच दुबळा ठरला आहे असें समजूं नका. अमात्य वगैरे बरीच कारभारी मंडळी अजून त्यांच्या ओढ्याची आहेत....कां ? विचार कसला चालला आहे ? आपणाला यांतलें कांहीं पटतें का ?" नानासाहेब गंभीरपणें विचारांत गढून गेले आहेत असें पाहून गोपिकाबाईनें किंचित् त्रासलेल्या वृत्तीनें विचारलें.

पेशवाईचा पुनर्विकास

" असें पाहा, इतक्या उतावळेपणानें नक्की करण्याजोग्या ह्या सामान्य गोष्टी नाहींत. हातचा बाण एकदां सुटला कीं तो मुळींच माघारा घेतां येत नसतो. अलम् हिंदुपदपादशाहीच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे, तो तितक्याच जबाबदारीनें व धिमेपणानें सोडविला पाहिजे. घिसाडघाई तेथें कामाची नाहीं. तूं सांगितलेल्या सर्व गोष्टी माझ्या ध्यानीं आहेत. परंतु आणखी थोडा वेळ दम धरून महाराज काय काय करतात तें पाहून मगच मी माझें पुढील धोरण ठरविणार आहें. "

" मग तुमचें कर्म आणि तुम्ही ! बसा असेच जन्मभर विचार करीत ! देव देतो आणि कर्म नेतें असें म्हणतात तें यालाच. पुढें घडणार त्यासारखीच बुद्धि तुम्हांला सुचते आहे. तिथें मी तरी काय करणार ! " असें चडफडत गोपिकाबाई तेथून रागारागानें निघून गेली. तोंच अचानक तिच्या ध्यानीं आलें, " आज शुक्रवार ! शुक्रवारीं केलेले बेत कधींच तडीला जात नसतात. "

शकून व अपशकून हे भविष्यकाळाचे निदर्शक असोत वा नसोत, मनदुबळ्या माणसाला मनाचा विरंगुळा करण्याला तरी त्यांचा चांगला उपयोग होतो एवढें खरें ! आपण सुचविलेले ते उपाय परिणामीं निष्फळ व अनर्थावह होणारे आहेत अशी गोपिकाबाईच्या मनाची खात्री पटणें शक्यच नव्हतें. तिचा राघवनाथाच्या ज्योतिषावर अजूनही अढळ विश्वास होता. शिवाय ठिकठिकाणच्या देवांना अनुष्ठानें चालू होतीं, नवस करण्यांत येत होते, कोंबड्या बकऱ्यांची खैरात सुरू होती, ती सारी खटपट फुकटच ? छे ! असें कसें होईल !

नानासाहेबांना गोपिकाबाई आपणावर रुसली आहे एवढें कळलें. परंतु त्यांचा तेथें नाइलाज होता. मात्र नेहमींच्या परिपाठाप्रमाणें गोपिकाबाईच्या अर्ध्या वचनांत वागण्याचें नानासाहेबांनीं नाकारल्यामुळें त्या पतिपत्नींत जो अबोला निर्माण झाला, तो त्यांना पुढें सातआठ दिवस तरी चांगलाच भोंवला. त्या आठ दिवसांत आणखी अशा कांहीं विचित्र घडामोडी झाल्या कीं—पण पुढें ओघानें वाचकांना तें कळणारच आहे.

प्रकरण २४ वें

खून कोणीं केला ?

महाराज ताराबाईची भेट घेऊन रंगमहालांत येऊन पोहोंचतात तोंच ताराबाईच्या दासीनें घाबऱ्या घुबऱ्या धावत येऊन त्यांना ताराबाई राज-पुत्राचा खून झाल्याची वार्ता ऐकतांच बेशुद्ध पडल्याचें सांगितलें. तें ऐक-तांच छातीवर दगड कोसळून पडल्यासारखा महाराजांच्या अंतःकरणाला धक्का बसला.

सकवारबाई आपलें मंगळाईच्या देवालयांतील कारस्थान अपरिपक्व दशें-तच उघडकीला येण्याचा संभव ओळखून त्यावर आपल्या साखरघोळ शद्बांनीं पांघरूण घालण्यासाठीं महाराजांची मार्गप्रतिक्षा करीत जागत बसली होती. सजणा तिच्याजवळ उभी होती. त्या दोघींनाही ती अनिष्ट वार्ता ऐकावयाला मिळाली; त्याबरोबर सजणेच्या तोंडचें पाणीच पळालें. सकवारबाईनेंही एक-दम दचकल्यासारखें करून त्या दासीला विचारलें, " काय; राजपुत्राचा खून ?"

" होय आईसाहेब!" दासी उत्तरली.

" हा कोणता राजपुत्र ?" जणूं कांहीं आपण त्या गोष्टीला अगदींच अनोळखी आहों असें भासवीत सकवारबाईनें महाराजांकडे वळून विचारलें, " सासूबाईनीं आपल्या नातवाचें गुप्तपणें रक्षण करून त्याला पंढरपुराकडे कुठेंतरी कोल्हापुरकरांच्या भयानें लपवून ठेवलें होतें असें नुक्तेंच मीं ऐकलें होतें. त्याचा तर खून नाहीं ना झाला ?"

" त्याचाच खून झाला असावा. एरव्हीं ताराबाई आईसाहेबांच्या मनाला एवढा धक्का बसला नसता. नुक्तें आतांच त्यांनीं आमच्यापाशीं तें रहस्य उघडें केलें; आणि ते त्यांचे शद्ब हवेंत विरतात न विरतात तों त्या राज-

पुत्राचा नाश झाल्याचें ऐकणें आमच्या कपाळीं आलें." एवढें बोलून महाराजांनीं खिन्न अंतःकरणानें उसासे सोडीत आपल्या कर्माला हात लावला!

" अरेरे! एकूण मी फुटक्या नशिबाची हेंच खरें. मीं मनांत योजिलें होतें कीं आपण त्या राजपुत्राचा शोध करून तो खरोखर सासूबाई सांगतात त्याप्रमाणें आपल्या वंशांतील आहे अशी खात्री झाल्यास त्याचाच पुत्रवत् सांभाळ करावा, व तोच उद्यांचा छत्रपति व्हावा. कोणीतरी दत्तक घेऊन मातीचे कुल्ले चिकटवायचे, त्यापेक्षां ही योजना फळाला येती तर सोन्याहून पिंवळें झालें असतें. पण देवानें दिलें आणि कर्मानें नेलें! कोणा चांडाळाचें हें कृत्य असेल बरें ?" सकवारबाई दुःखातिरेकानें उन्माद चढल्याप्रमाणें दांत करकर चावीत उग्र चर्या करून महाराजांना म्हणाली, " आपणाला याचा कसून शोध केला पाहिजे. पेशव्यांचा या भयंकर कृत्यांत कांहींतरी संबंध असावा असा मला जबर संशय येतो आहे."

सजणा तेव्हां स्वतःशीं उद्गारली, "गरळ ओकली, नागीण गरळ ओकली. तिचेंच गरळ तिला पाजून परमेश्वरा, तिला अद्दल घडविशील का रे ?"

महाराजांना सकवारबाईची मंगळाईच्या देवळांतील कारवाई माहीत असल्यानें तिनें पेशव्यांवर जो आळ घेतला तो त्यांना मुळींच रुचला नाहीं. आणि खुद्द सकवारबाईच ह्या अरिष्टाच्या मुळाशीं असेल असेंही त्यांना वाटलें नाहीं. तें कृत्य कोणाचेंही असलें तरी अत्यंत भयंकर आहे व त्याचा शोध लावलाच पाहिजे, एवढें मात्र त्यांच्या मनानें घेतलें. त्या बाबतींत यापेक्षां जास्त चौकशी करण्यापूर्वी ताराबाईच्या समाचारासाठीं जाणें त्यांना प्राप्त होतें. सकवारबाईला देखील वाटलें कीं देखल्या देवा दंडवत घालण्याची संधी प्राप्त झाली आहे, तिचा आपणही उपयोग करून घ्यावा. या वेळीं सासूबाईच्या समाचाराला जाऊन फुकटचा मोठेपणा आपल्या पदरीं पाडून घ्यावा!

" सजणे! चल माझ्याबरोबर." सकवारबाई सजणेला म्हणाली.

ती बातमी ऐकून सजणेच्या अंतःकरणांत विलक्षण हलकल्लोळ माजला होता. कारण तिच्या भवितव्याचा राजपुत्राच्या भवितव्याशीं अगदीं निकटचा संबंध होता. प्रतापरावानें राजपुत्राच्या रक्षणार्थ जातांना 'अपयश घेऊन जिवंत माघारा येणार नाहीं' अशी सजणेपाशीं शपथ घेतली होती. त्याची तिकडे काय गत झाली असेल, तो आपली कामगिरी बजावतां बजावतां बळी

पडला असेल काय, वगैरे भलभलत्या शंकांनीं भांबावून गेलेल्या सजणेला आपल्या धनिणीचा तो अनुग्रह योग्यच वाटला. ती आपल्या अंतरंगाचा माणूसदेखील आपल्या चर्येवर दिसणार नाहीं अशी खबरदारी घेऊन महाराजांमागोमाग सकवारबाईबरोबर गडावर गेली.

महाराज, सकवारबाई व सजणा तेथें जाऊन पोहोंचतात तों ताराबाई शुद्धीवर येऊं लागली होती. कांहीं तांतडीचे उपचार केल्यावर ती चांगली शुद्धीवर आली. त्याच क्षणीं तिनें शोकपूर्ण किंचाळी फोडली, " राम ! राम ! माझ्या रामराजाचा असा घात कोणीं हो केला? कोणा वैऱ्यानें हा दावा साधला? ...देवा ! कुळाचा समूळ विध्वंस पाहण्यासाठींच कारे तूं मला थेरडीला इतकें आयुष्य दिलेंस ? निर्दय काळा ! तूं त्या कोंवळ्या पोरावर झडप घातलीस, त्यापेक्षां त्याच्याऐवजीं मला रे कां ओढून नेलें नाहींस? हाय हाय ! ज्या कोणीं चांडाळानें कीं चांडाळणीनें राज्यलोभानें माझ्या राजाला ठार करविलें, त्याचा परमेश्वरा, सत्यनाश कर ! " असें म्हणून म्हातारीनें कडकडां बोटें मोडलीं.

विषाचें पाणी दिलेल्या पोलादी बाणांच्या माऱ्यापेक्षांही वाग्बाणांचा मारा फार भयंकर! पोलादी बाण शरिराला जखम करतो; पण वाग्बाण जिव्हारीं जाऊन झोंबतो. पोलादी बाणानें झालेली जखम कालांतरानें योग्य औषधोपचारांनीं भरून येते; पण वाग्बाणानें अंतःकरणाला केलेली जखम कांहीं केल्या बुजत नसते. आणखी असें कीं पट्टीच्या धनुर्धाऱ्याचा बाणदेखील एखादे वेळीं नेम चुकून वायां जाईल; पण एखाद्या नवख्या माणसाचा वाग्बाणदेखील स्वतःचें लक्ष्य स्वतः शोधून काढून नेमका तेथें जाऊन घुसेल. ताराबाईनें राजपुत्राला ठार मारणाऱ्या माणसाच्या नांवानें तळमळतांना 'कोणा चांडाळानें कीं चांडाळणीनें' असे उद्गार काढले, त्यांचा रोख वास्तविक कोल्हापुरकर संभाजी राजे व राणी जिजाबाई यांच्यावर होता. यापूर्वी एकदोनदां असे निष्फळ प्रयत्न कोल्हापुरकरांकडून झाल्याचें ताराबाईला माहीत असल्यानें तिला तसा संशय येणें स्वाभाविक होतें. पण सकवारबाईला वाटलें, आपण ह्या कारस्थानाचीं सूत्रें हलवीत असल्याचा संशय तर ह्या म्हातारीला आला नसेल ना? ती म्हणाली, " कोल्हापुराहून पूर्वी असे प्रयत्न झाल्याचें मीं ऐकलें होतें. त्यांचेंच तर हें कृत्य नसेल ना ? "

" परमेश्वर जाणे ! मलादेखील अगदींच नाहीं असें म्हणवत नाहीं. पण माझा शाप मात्र खरा झाल्याखेरीज राहणार नाहीं. ज्यांनीं माझा असा घात केला. त्या चांडाळांचा निर्वंश–समूळ सत्यनाश होईल ! " असें कळकळत ताराबाईनें बिछान्यावर धाडकन अंग टाकलें.

सजणा ते उद्गार ऐकून किंचित् जीभ चावीत तीक्ष्ण दृष्टीनें सकवारबाईकडे पाहूं लागली.

" आईसाहेब ! आम्ही ह्याचा कसून तपास करतों, व अपराधी कोण तो शोधून काढून त्याला शासनासाठीं आपणासमोर हजर करावयाला लावतों. " महाराज म्हणाले. सकवारबाईनें त्या क्षणीं चमत्कारिक भेदक नजरेनें महाराजांकडे पाहिलें, व तशाच भावनेनें सजणेनें सकवारबाईकडे पाहिलें. पण तें एकमेकांच्या ध्यानीं मुळींच आलें नाहीं.

" राजे ! तुमचे खटाटोप व्यर्थ आहेत. तुम्ही तपास करा; पण त्यांत तुम्हांला यश येईल असें मला मुळींच वाटत नाहीं. " ताराबाई म्हणाली.

सकवारबाई महाराजांकडे पाहत म्हणाली, " माझें मन तर मला पुन्हा पुन्हा निक्षून सांगतें आहे कीं हा घातकी दुष्ट माणूस कोणीतरी आपल्या अगदीं निकटचा व आपल्या मर्जींतला असला पाहिजे. "

सजणेनें सकवारबाईच्या बोलण्याचा रोंख पेशव्यांवर आहे हें ओळखून मनांत म्हटलें, " याला म्हणतात खरें उरफाटें काळीज ! "

महाराजांनींदेखील ओळखलें कीं सकवारबाईचा रोंख नानासाहेबांवर असावा. ते अजूनदेखील तें सर्व खरें मानावयाला तयार नव्हते. पण खुद्द पेशव्यांनीं जरी राजपुत्राचा खून करण्यांत प्रत्यक्ष पुढाकार घेतला नसला तरी कोल्हापूरकरांना तसें करण्याला प्रोत्साहन वेळीं दिलें असेल; त्याचा काय नेम !– अशी अर्धवट शंका महाराजांच्या मनांत उत्पन्न करण्याइतके तरी सकवारबाईचे उद्गार प्रभावी ठरले. पण तो मनांतला किंतु महाराजांनीं मनांतच ठेवला व चौकशीला सुरुवात केली, " ही बातमी एथवर कशी आली ? "

ताराबाईनें तोच प्रश्न बातमी आणणाऱ्या आपल्या दासीला विचारला. दासीनें दुसऱ्या एका दासीचें नांव सांगितलें. तिला बोलावून आणून विचारतां तिनें एका हुजऱ्याकडे बोट दाखविलें. अशी चौकशीची लांबण लागतां लागतां गमाजीचें नांव पुढें आलें. महाराजांनीं गमाजीला ताबडतोब बोलावून

खरा प्रकार विचारला, तेव्हां त्याच्याकडून ' खरा प्रकार ' कळला तो असा कीं, गमाजी कांहीं खासगी कामासाठीं कोल्हापुरीं गेला होता; तेथें कोल्हापूरकर संभाजी राजांकडून राजपुत्राला ठार करण्याच्या कामावर नेमलेला मनुष्य खुद्द त्याला भेटला, व त्यानें हा वृत्तान्त सांगितला.

अर्थात् राजपुत्राचा खून झाला व तो कोल्हापूरच्या राजघराण्याकडून झाला एवढें निश्चित झालें. आतां प्रश्न सुटावयाचा इतकाच राहिला कीं यांत नानासाहेब पेशव्यांचें अंग कितपत होतें?

ती सबंध रात्र सजणेचा डोळयाला डोळा लागला नाहीं. प्रतापरावाविषयीं तर तिच्या मनाला हुरहूर लागून राहिलीच होती; पण शिवाय कोल्हापूरकरांकडून राजपुत्राचा खून करविण्यांत आला अशी गप्प जी गमाजीनें सर्वत्र उठवून दिली, तिच्यांत कितपत तथ्य आहे याची तिला जबर शंका होती. तिनें ती सारी रात्र नगरांत सर्वत्र हिंडून करतां आला तेवढा तपास केला. परंतु नवीन असा कांहींच सुगावा तिला लागेना, मिळालेल्या माहितीवर तिचा विश्वास बसेना, व मनाचें समाधान कांहीं केल्या होईना.

ती रात्र तशीच गेली. पहांटेच्या वेळीं पहिला कोंबडा आरवल्यावर सकवारबाई एकटीच आपल्या महालांतून हलकेच बाहेर पडली. तिनें एकाही दासीला हांक मारली नाहीं. पण सजणा जागीच होती, तिनें तें पाहिलें. तिला वाटलें कीं सर्व दासी झोंपीं गेल्या असतील म्हणून आईसाहेब एकट्याच बाहेर पडल्या आहेत. ती लगेच पुढें गेली व म्हणाली, " आईसाहेब, मी जागीं आहें."

सजणेला पाहतांच सकवारबाई चपापून म्हणाली, " अग! तूं इतक्या लौकर कशाला उठलीस? रात्रीं जाग्रण झालें आहे ना? जा. झोंप जा. मी वरून सासूबाईंचा समाचार घेऊन येत्यें."

सासूबाईची कळकळ ह्या सूनबाईला किती होती तें सजणेला चांगलें माहीत होतें. बरें सासूबाईंच्या प्रकृतीची चौकशी करावयाला जावयाचें झालें तरी अशा अवेळीं, विश्वासू दासी हाताशीं असतांना, एकट्यानेंच जाण्याची इच्छा सकवारबाईला कां व्हावी? यांत कांहींतरी काळेंबेरें आहे असें सजणेच्या मनानें घेतलें, व सकवारबाईबरोबर जाण्याचा आग्रह धरला नाहीं. उलट तिला म्हटलें, " आईसाहेब! आपण माझी इतकी काळजी घेतां ही आपली माझ्या-

वर कृपा आहे. आपण माघाऱ्या येईतों मी आपल्या वेणी फणीची आणि स्नानाची तयारी करून ठेवत्यें."

"चांगली सुखानें झोंप घे म्हटलें तर तें कपाळीं नाहीं. बरें तर. आज सांगूं का; तूं आतां जागीच आहेस तर एवढें कर; बागेंतलीं बरीक गुलाबाचीं फुलें तोडून तीं माझ्या स्नानाच्या पाण्यांत घालून ठेव. आणि आज मोगऱ्या-च्या कळ्यांची वेणी माझ्यासाठीं तूं गुंफणार आहेस ना?" सकवारबाईनें विचारलें. आपणामागोमाग येण्याला सजणेला सवड मिळूं नये, ती कांहीं तरी कामाला उजाडेपावेतों गुंतून राहावी, एवढ्यासाठीं हें कांहींतरी निमित्त तिनें शोधून काढलें होतें.

पण सकवारबाई ठक तर सजणा होती महाठक! तिनें सकवारबाईचा कावा तेव्हांच ओळखला. पण वरकरणीं अगदीं सरळपणानें हंसून ती म्हणाली, "आईसाहेब, एक विचारूं का?"

"काय विचारणार आहेस?"

"थट्टा केली म्हणून राग नाहीं ना येणार?"

"चहाटाळपणानें कांहींतरी विचारणार असशील!"

"म्हटलें, डोहाळेबिहाळे..." एवढें बोलून सजणेनें जीभ चावली, व पदराचें टोंक उजव्या हाताच्या करंगळीला गुंडाळीत गालांतल्या गालांत हंसत ती खालीं मान घालून किलकिल्या नजरेनें सकवारबाईकडे पाहूं लागली.

"चल! फाजील कुठची! आमच्या वयाकडे तरी कांहीं पहाशील कीं नाहीं? वेडी कुठची!" असें उद्गारत सकवारबाईनें लाडिकपणानें तिच्या गालावर हळूच एक चापटी मारली; व तेथून ती आपल्या संकल्पित कामाला निघून गेली.

सजणा तरी आपल्या धनिणीला पुत्ररत्नाचा लाभ झाला नाहीं तो व्हावा म्हणून थोडीच झुरणीला लागली होती! परंतु सकवारबाई जसें सजणेचें लक्ष्य दुसरीकडे वेधण्यासाठीं कांहींतरी बोलली, तसेंच सजणाही आपलें लक्ष्य त्या विषयांत पूर्णपणें रमून गेलें आहे असें भासविण्यासाठीं कांहींतरीच बोलली होती. सकवारबाई दृष्टीआड होईतों ती जागींच उभी होती. पण तिची तीक्ष्ण नजर मात्र सकवारबाईचा अचूक पाठलाग करीत होती. सकवारबाई दिसेनाशी होतांच सजणाही तिला दाद लागूं न देतां फुलें तोडण्याच्या मिषानें

तिच्या मागोमाग थोडा वेळ चालत गेली. सकवारबाई वर गडावर जाण्याच्या भुयाराकडे न वळतां जवळच्या जलाशयापाशीं जाऊन कांहीं क्षण थांबली, व तेथून मधल्या चौकांतून राजवाड्याच्या मुख्य दरवाजाकडे जाऊं लागली. तें सजणेनें पाहिलें, व मुख्य दरवाजापाशीनें तिच्या बऱ्याच अंतरावरून पाठलाग केला. सकवारबाई दरवाजाबाहेर पडून समोरच्या उद्यानांत शिरली. सजणा तशीच मागें परतली, व राजवाड्यांतील दुसऱ्या एका दासीला उठवून सकवारबाईच्या वेणी-फणी—स्नानाची सारी तयारी तिला करावयाला सांगून गुलाबाचीं फुलें तोडण्याच्या मिषानें सकवारबाई ज्या उद्यानांत जाऊन बसली होती त्या उद्यानाकडे गेली. वास्तविक सकवारबाईची आवडती गुलाबाची आणि मोगऱ्याची बाग जलाशयाच्या पलीकडे राजवाड्याच्या आवारांतच मुद्दाम तयार करण्यांत आली होती, व तशीच बागशाही गडावर मंगळाईच्या देवालयासभोंवारही उठवण्यांत आली होती. त्यासाठीं सजणेला बाहेरच्या उद्यानांत जाण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. पण सजणेला तर सकवारबाईच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठीं त्या उद्यानांत जाणें प्राप्त होतें. तेथें आपणाला जर यदाकदाचित् सकवारबाईनें अगर दुसऱ्या कोणीं पाहिलेंच, तर तिकडच्या मोगऱ्याला बहर फार चांगला येतो म्हणून आईसाहेबांच्या वेणीसाठीं मोगऱ्याचीं फुलें तोडण्यासाठीं आपण इकडे आलों हें उत्तर तिनें अगोदरच आठवून ठेवलें होतें. इतकेंच नव्हे पण देवडीवाल्याला कदाचित् आपला संशय येईल यास्तव तिनें त्याला देखील जवळपासच्या गुलाबाचीं फुलें तोडण्याच्या कामाला जुंपण्याला कमी केलें नाहीं! देवडीवाल्याला तें खरेंच वाटलें, व आईसाहेबांची या निमित्तानें सेवा आपल्या हातून घडून आपलें नांव आईसाहेबांच्या कानांवर अनायासें जाणार याबद्दल त्याला आनंदही वाटला.

सजणा मांजराच्या पावलांनीं अगदीं लपतछपत चोरट्या अंगानें उद्यानांत शिरली व तेथें सकवारबाई पुष्करिणीवर उभी असल्याचें आढळून येतांच त्या पुष्करिणीच्या डाव्या बाजूला कुंदाचा घनदाट व विस्तीर्ण मंडप कुंदपुष्पांनीं अगदीं डंवरला होता त्या मांडवाच्याखालीं आडवशाला जाऊन उभी राहिली. ती हातानें फुलें वेंचण्याचें मिष करीत होती. पण तिचे डोळे आणि कान मात्र पुष्करिणीकडे वेधून राहिले होते.

पेशवाईचा पुनर्विकास

थोड्याच वेळांत कोणीतरी पुष्करिणीच्या रोंखानें बाहेरून येत असल्याचें सजणेला पहांटेच्या चांदण्यांत अस्पष्ट दिसलें. ती व्यक्ति आणखी थोडी पुष्करिणीजवळ येतांच तो कोणीतरी पुरुष आहे व त्याच्या खांद्यावर कसलेंतरी गांठोडें आहे एवढें सजणेला दिसलें. त्याबरोबर तिचें कुतूहल वाढूं लागलें. तो माणूस कोण असावा तें मात्र त्या अस्पष्ट चंद्रप्रकाशांत तिला ओळखतां आलें नाहीं. पण तो माणूस पुष्करिणीजवळ येतांच तेंही कोडें आपोआप सुटलें.

" कोण गमाजी ? " सकवारबाईनें हळूच हांक मारली.

" आईसाहेब ! " गमाजीनें प्रत्युत्तर दिलें.

" काम फत्ते ना ? "

" अगदीं सोळा आणे फत्ते. "

" तें मीं रात्रींच ओळखलें. "

" प्रथम राजपुत्राचा खून झाल्याची बातमी आपल्या कानीं आली तेव्हां आपण कांहीं वेळ बुचकळ्यांत पडलां असाल. "

" प्रथम थोडी बुचकळ्यांत पडल्यें खरी. "

" त्यावरून आपण अंदाज केला असेल कीं हें गमाजीचेंच काम. मी मुद्दामच साताऱ्यांत पाऊल टाकतांक्षणीं राजपुत्राचा खून झाल्याची बातमी फैलावून दिली. लोकांचें लक्ष्य आपणाकडून ढळवून भलतीकडेच वेधलें जाण्यासाठीं कधीं कधीं असले डावपेंच लढवावे लागतात. बाकी आईसाहेब ! आपण मला कामगिरी सांगितली ती निव्वळ सुळावरची पोळी होती. ती पोळी हातीं लागण्याऐवजीं मीं सुळावर लटकण्याची पाळी आली होती. पण माझें नशीब आणि आपली पुण्यायी थोर, म्हणून ती वेळ निभावली. "

सजणा विशेष लक्ष्यपूर्वक कान टवकारून ऐकूं लागली.

गमाजी खांद्यावरचें गाठोडें पुष्करिणीच्या फरसबंदीवर ठेवून सांगूं लागला, " आपली ती कुळंबीण सजणा आहे ना ? तिचा दादला तो प्रतापराव !— गुलामाला कशी बातमी कळली परमेश्वर जाणे ! त्यानें मला नकळत माझा थेटपावेतों पाठलाग केला. अखेर पानगांवला मला एकट्याला बेसावध गांठून ठार करण्याची वेळ त्यानें आणली होती. पण ऐन वेळीं रावजी जगदाळा या आमच्या एका विश्वासू शिलेदारानें मला वांचविलें. त्यानें प्रतापरावाला भुलवून एका बाजूला नेलें आणि ठार केलें.

" अस्सें ! " सकवारबाई म्हणाली.

सजणेला तें ऐकतांना कोणींतरी आपल्या कानांत शिशाचा रसरशीत रस ओतीत आहे असा भास झाला. ती मट्‌कन कंबर खचून खालीं बसली. तिच्या डोळ्यांसमोर आंधारी येऊं लागली. "

" आणि ती म्हातारी ? तिनें नाहीं का कांहीं अडथळा केला ? " सकवारबाईनें जरा थांबून प्रश्न केला.

" ती कसला अडथळा करते ? तिला मीं प्रथम पैसे चारून वश केली, आणि तिच्यामार्फतच राजाराम महाराजांचा पत्ता काढून घेतला."

" कसा काय होता तो ? "

" गुराखी—निव्वळ गुराखी. परक्या कोणीं पाहिलें असतें तर त्याला खरेंदेखील वाटलें नसतें हा राजपुत्र आहे असें. ते इतके दिवस इतर गुराख्यांबरोबर गुरें चारीत असत. आपण कोण आहों हें त्यांना मुळींच माहीत नव्हतें."

" तो कसा काय तुमच्या हातीं लागला ? "

" सांगतों काय; म्हातारीसमोर तांब्याभर मोहरा ठेवतांच तिनेंच त्याच रात्रीं त्याचें मुंडकें कापून दिलें. आणि माझें काम होतांच मग म्हातारीचें मुंडकें मीं माझ्या हातानें धडावेगळें केलें."

" पण म्हातारीनें तुला फसवलें तर नाहीं ना ? "

" ती थेरडी मला काय फसवते ? रावजी जगदाळा सतत तिच्या आणि राजाराम महाराजांच्या पाठीवर होता. "

" कुठें आहे तें मुंडकें ? "

" हें पाहा. " असें म्हणून गमाजीनें बरोबर आणलेलें गांठोडें सोडून दाखविलें.

सकवारबाईनें चांदण्याच्या अंधुक प्रकाशांत तें मुंडकें नुसतें ओझरतें पाहिलें व दुर्गंधी येतांच नाकाला पदर लावून तोंडानें श्वासोच्छ्‌वास करीत म्हटलें, " त्यांत पाह्यचें तें काय ! ठेवा तें गुंडाळून. आणि इथून गेल्यावर पहिल्या प्रथम त्याची कोणाला ग्रंधवार्तादेखील न कळतां अशी विल्हेवाट लावाल कीं—मला पाहूंदे तुमची शहामत. "

गमाजीनें गांठोडें बांधून दूर नेऊन ठेवलें व पुन्हा मागें येऊन सकवारबाईला सांगितलें, " कार्यभाग होतांच तशीच ह्या मुंडक्यासह घोड्यावर मांड

ठोकून घोडा असा दौडवला असा दौडवला कीं तो घोडा दोन मजलांत पोटीं फुटून मरून गेला. पण मीं अगोदरच टप्याटप्याला जरूर लागेल तसे घोडे मिळण्याची आगाऊ व्यवस्था केली होती त्यामुळें कुठें कांहीं अडलें नाहीं."

" भले शाबास! तूं अगदीं सत्रा आणे कामगिरी केलीस. त्याबद्दल तुला हें घे बक्षिस." सकवारबाईनें आपल्या गळ्यांतला कंठा काढून गमाजीच्या गळ्यांत घातला व म्हटलें, " आतां आणखी अशाच एका कामीं मला तुझें साह्य पाहिजे आहे. हें पाहा, पेशव्यांची मिरास मीं उखडून टाकली आहे."

" आपणासारख्याला म्हणून तें शक्य झालें. तेथें इतर कोणाची कांहींच मात्रा चालली नसती."

" पण त्यांचा अजून व्हावा तसा नायनाट झालेला नाहीं. तो झाला पाहिजे."

" तेंच तर अवघड आहे. खरा धोका तिथेंच आहे. आजवर पेशव्यांची उचलबांगडी करण्याचे प्रयत्न कांहीं थोडे थोडके झाले नाहींत. पण ते सारे प्रयत्न पेशव्यांनीं धुडकावून लावले, व स्वतः चोरावर मोर होऊन बसले आहेत."

" त्याच कामीं मला तुझें साह्य पाहिजे आहे. कोल्हापुरकरांकडून राजपुत्राचा खून झाल्याची गप्प ठोकून दिलीस, ती कल्पना तुला अगदीं शुभ वेळीं सुचली. त्या कारस्थानाशीं नानासाहेबांची सांगड घालून देण्याचे माझे प्रयत्न सुरू आहेत. पांचांमुखीं परमेश्वर ही जगाची रीत आहे. महाराज, कारभारी वगैरे सर्वांच्या डोक्यांत पुरें भिनलें पाहिजे कीं राजपुत्राचा वध करण्याला नानासाहेब पेशवेच खरे कारण; त्यांनीं कोल्हापूर व सातारा ह्या दोन्ही गाद्या एक करून एकट्या संभाजीराजांना छत्रपति करण्याचें ठरवून त्याच्या आणि जिजाबाईच्या हस्तें राजपुत्राचा नायनाट करविला. अशी कारभाऱ्यांची एकवार खात्री झाली कीं नानासाहेबाच्या वतीनें महाराजांपाशीं बोलण्याचें धैर्य त्यांना होणार नाहीं. मी माझ्या परीनें महाराजांचे कान भरीतच आहें. पण बाहेरदेखील नानासाहेबाविरुद्ध सर्वत्र गवगवा इतका झाला पाहिजे कीं महारापोराच्या तोंडीदेखील राजपुत्राच्या नाशाला पेशवे कारण ही बातमी घोळूं लागली पाहिजे. म्हणजे महाराजांना तें खरें वाटेल आणि आपण आरंभिलेलें कार्य सोळा आणे सिद्धीला जाईल."

" ठीक आहे तें काम माझें. मी महिना पंधरा दिवसांत उभ्या महाराष्ट्रभर ह्या बनावट बातमीची कशी आग भडकवून देतों पाहा तर खरी ! "

याप्रमाणें सकवारबाई व गमाजी यांचें संभाषण होईतों दिशा चांगल्याच फांकल्या व रस्त्यानें रहदारी सुरू झाली. आतां फार वेळ बोलत बसणें इष्ट नाहीं असें पाहून गमाजीनें सकवारबाईचा निरोप घेतला. त्यानें त्या मुंडक्याचें गांठोडें बांधून खांद्यावर घेतलेलें पाहून सकवारबाईनें विचारलें, " त्याची निरवानिरव तूं कशी करणार ? "

" माहुलीला जातों आणि हें मुंडकें कृष्णार्पण करतों. कसे झाले तरी ते राजपुरुष होते. त्यांचें क्रियाकर्मांतर नाहीं तर नाहीं; एवढी सद्गति तरी त्यांना मिळूं द्या !"

प्रकरण २५ वें

नागीण दंश करायला निघाली !

गमाजी मुंडक्याचें गांठोडें बांधूं लागलेला पाहतांच सजणेनें कुंदाच्या मंडपांतून हळूच पाय काढला, व थेट बागेच्या दुसऱ्या टोंकाचा रस्ता सुधारला. तेथून ती झप्‌झप् पावलें उचलीत रंगमहालाकडे निघून गेली. गमाजी तेथून निघून गेल्यावर सकवारबाईही रंगमहालाकडे परतली. ती जाऊन पोंहो-चण्यापूर्वींच सजणा तेथें जाऊन पोंहोचली होती. दुसऱ्या दासीनें सकवार-बाईच्या स्नानाची सर्व तयारी करून ठेवलीच होती, व देवडीवाल्यानें तोडून आणून दिलेल्या मोगऱ्याच्या फुलांची वेणीही गुंफून तयार ठेवली होती. त्या तयारीवर एकवार नजर टाकून सजणा सकवारबाईपाशीं जाऊन म्हणाली, " आईसाहेब ! स्नानाची सर्व सिद्धता झाली आहे. आपण वेणी घालायला येणार ना ? "

" ही पहा आल्येंच मी. " असें म्हणून सकवारबाई उठली. त्या दिवशीं सजणेनें इतक्या लक्ष्यपूर्वक नीटनेटकेपणानें सकवारबाईची वेणीफणी केली कीं सकवारबाईच्या प्रसन्नतेला सीमा राहिली नाहीं. वेणीफणी झाल्यावर सजणेनेंच तिच्या सर्वांगाला सुवासिक तेलाचें मर्दन केलें, व स्नानही घातलें. ही सेवा करतांना ' आपणाला रात्रभर ताराबाई आईसाहेबांच्यामुळें फारच त्रास झाला. रात्रभर काळजीमुळें झोंपदेखील यावी तशी आली नसेल ! आतां आपण अगोदर जाऊन झोंपा. विश्रांति मिळाल्याशिवाय आपल्या जिवाला आराम वाटायचा नाहीं. ' हा स्तुतिपाठात्मक मंत्रजागर मधून मधून सजणेनें सुरू ठेवलाच होता. पण तें सारें नाटक पार पाडतांना ती मनांतल्या मनांत प्रतापरावासाठीं एकसारखी मुकें रडें रडत होती, व म्हातारी आणि प्रताप-राव यांच्या नांवानें जळत होती. त्यांतल्या त्यांत तिच्या समाधानाला कोठें

जागा असेल तर प्रतापरावाला वीरोचित मरण आलें हीच होय. पण तें समाधान तरी नुसतें मानून घेण्यापुरतें होतें. वैधव्याची कुऱ्हाड बिचारीच्या मानेवर कोसळली, तें दुःख तसल्या समाधानानें थोडें रतिभर तरी कमीच होणार होतें !

सजणेच्या दृष्टीनें ती म्हातारी, रावजी व प्रतापराव यांत प्रतापराव हेंच जरा कच्चें मडकें होतें. रावजी व म्हातारी यांच्यासारखीं स्वामिनिष्ठ देवमाणसें त्रिभुवनांतदेखील सांपडणार नाहींत अशी तिची राजपुत्राच्या वधाचा वृत्तान्त कळेपावेतों ठाम समजूत होती; ती आतां पार बदलली. "म्हातारीला गमाजीनें ठार मारलें, हें त्या थेरडीला तिच्या घोर पातकाचें यथायोग्य प्रायश्चित्त मिळालें." सजणा उद्यानांतून बाहेर पडल्यापासून सकवारबाईची समाधान पूर्वक सेवा करतां करतां आपल्या मनाशीं बोलत होती, "त्यांचा या कामीं बळी पडला, यांत माझ्या जन्माचा सत्यनाश झाला, तरी त्यांच्या जीविताचें सार्थक सोनें झालें. पण इतके सायास मीं राजपुत्राचा जीव वांचविण्या-साठीं व थोरल्या राणीवर सूड घेण्यासाठीं केले, ते सर्व निर्फळ झाले. बिचारा राजपुत्र अखेर ठार झालाच; व थोरल्या राणीचा डाव साधला. तिला मन मानेल तसा धांगडधिंगा घालायला आतां मोकाट रान मिळालें. त्याप्रमाणेंच तो रावजी—तो सैतान इतका अधमपणा करून सवरून पुन्हा ह्या जगांत साळसूद म्हणून मिरवणार! नुसता मिरवणार नाहीं, तर सकवारबाई त्याला आतां मोठ्या भाग्याला चढविण्यालाही कमी करणार नाहीं! हा ह्या जगांतला न्याय! तें कांहीं नाहीं. ह्या चांडाळाला शासन झालेंच पाहिजे." सजणा आपल्या मनाशीं निर्धारपूर्वक म्हणाली, "आणि ज्या अर्थीं देव अशा दुष्टांना पृथ्वितलावर सैतानी धुडगूस घालूं देण्याइतका झोंपीं गेला आहे, त्या अर्थीं हा न्याय मींच केला पाहिजे."

सकवारबाईची वेणीफणी, स्नान वगैरे आटोपल्यावर ती आपल्या महा-लांत गेली, तेव्हां सजणेला विचार करण्याला पुरेसा एकान्त मिळाला. इतका वेळ तिला पतिनिधनाबद्दल रडण्याचीदेखील चोरी होती. तिच्यासारख्या सदा-चारी पतिव्रतेला पतिनिधनाचें दुःख म्हणजे मरणापेक्षांही भयंकर असें जिवंत-पणींचें मरण होतें. तें सारें दुःख आंतल्या आंत गिळून बाहेर चर्या उमलत्या गुलाबाच्या फुलासारखी हंसतमुख राखवावयाची म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट

नव्हे. पण सजणा आपल्या मनोनिग्रहाच्या जोरावर त्या हटयोगाच्या कसोटीला पूर्णपणें उतरली. सकवारबाईला सजणेची इतकी प्रसन्न मुद्रा यापूर्वी कधींच दिसली नसेल. पुरेसा एकान्त मिळाल्यावर सजणेनें दुःखातिशयाच्या भरांत एकदां आत्महत्या करण्याचाही विचार केला. पण दुसऱ्याच क्षणाला तिचा तो विचार पालटला. तिच्यासारख्या पतिनिष्ठ स्त्रीला पतिवेगळ्या जगांत जगण्यांत गोडी ती काय वाटणार? कोणाला झालें तरी जगण्यांत कांहींतरी स्वारस्य वाटतें तोंपर्यंतच कोणीही जगेल. सजणेला लोभाचें—मायेचें माणूस असें जगांत दुसरें कोणीही नसल्यानें जगण्यापेक्षां मरण्यांतच तिला कमी दुःख वाटावें हें क्रमप्राप्तच होतें. तो विचार अंमलांत आणण्यासाठीं ती पलीकडच्या विहिरींत जीव देण्यासाठीं कोणालाही न सांगतां निघालीही.

पण सजणेचा आत्महत्येचा तो विचार अर्ध्या वाटेंतच पालटला. " मरण तर ठरलेंच; पण तें पराजय पदरीं घेऊन? मी मरूं आणि माझ्या जन्माचें वाटोळें करणाऱ्या त्या चांडाळाला—त्या रावजीला संसारांतील मौजा मारायला जिवंत ठेवूं? नाहीं नाहीं!" ती मध्येंच थबकली. रावजीवर सूड घेण्याचा तिचा निश्चय ठरला. सकवारबाईवर सूड घेण्याच्या निश्चयाची तिला प्रथमपासून आठवण होतीच; पण तेवढ्यासाठीं कंटाळवाणें जिणें जगण्याची तिची इच्छा नव्हती. प्रतापराव जिवंत असता, राजपुत्राचें रक्षण झालें असतें, तर गोष्ट निराळी होती. परंतु स्वतःचें घर पेटल्यावर त्यावेळीं त्यांतले दोन निखारे घेऊन शत्रूच्या घराला आग लावण्याचें कोणाला कसें सुचेल? आतां सजणेनें रावजीवर सूड घेण्याला तयार होणें म्हणजे देखील त्यांतलाच प्रकार होता. पण—संतापानें बेभान बनलेल्या माणसाला इतका बुद्धीचा समतोलपणा कोठून सुचावयाला? जातिवंत वीराचें शीर रणांगणावर धडावेगळें झालें तरी तें धड जिवंतपणांतील अवशिष्ट आवेशाच्या वेगांत धावत जात असतांना तें दूर जाऊन पडेतों त्याच्या हातांतील तरवारीला कितीएकांचे बळी पडतील; त्यांतलीच सजणेची अवस्था झाली होती.

रावजीवर सूड घ्यावयाचा सजणेचा विचार ठरला खरा. परंतु रावजीचा पत्ता कोठें होता? तो पत्ता कसा लागेल याचा विचार करतां करतां सजणेला गमाजीच्या प्रिय पात्राची आठवण झाली. सकवारबाई व गमाजी यांचा राजपुत्राचा नाश करण्याविषयीं जो बेत ठरला, त्याची बित्तंबातमी सजणेला

त्याच्या अंजनी नांवाच्या बाईकडून मिळाली होती. इतकें गुप्त व महत्वाचें कारस्थान देखील ज्या गमाजीनें अजनीपाशीं ओकून टाकलें होतें, तो गडी आपल्या विजयाची फुशारकी तिच्यापाशीं गाइल्याशिवाय बरा राहिला असेल !

झालें. सजणेचा बेत ठरला. तिला बातम्या काढण्यासठीं पाहिजे तिकडे जाण्याची मोकळीक सकवारबाईकडून पूर्वीच मिळाली होती. ती अगदीं साळसूदपणें सकवारबाईपाशीं गेली आणि खोटेंच म्हणाली, " आईसाहेब ! पेशवे आणि ताराबाई आईसाहेब यांचें कांहींतरी नवीन कारस्थान सुरू असल्याचें माझ्या कानीं आलें आहे. त्याचा तेवढा मी तपास करून येऊं का ?"

" जा. अवश्य जा. " सकवारबाईनें परवानगी दिली.

तेवढ्यांत सजणेला सुचलें, रावजीचा तपास अंजनीपाशीं लागला नाहीं तर त्याच्या गांवीं किंवा आणखी सुगावा लागेल तेथें तेथें आपणाला जावें लागेल. त्याची साकसुरत परवानगी मिळविण्यासाठीं ती पुढें म्हणाली, " तसेंच पेशव्यांनीं कोल्हापूरकर महाराजांशीं फितुरी आरंभिल्याचें आपणाला माहीत आहेच. त्या कटाचे धागेदोरे शोधून काढण्यासाठीं मला वेळीं कोल्हापूराकडेही जावें लागेल. परवानगी आहे ना ? "

इतकी सजणा आपल्या हिताविषयीं दक्षता बाळगते, याबद्दल तिची पाठ थोपटून सकवारबाईनें तिला आनंदानें परवानगी दिली. इतकेंच काय पण तिचें पैशासाठीं अडूं नये म्हणून शंभर मोहराही आपल्या खासगींतून तिला दिल्या !

तो दिवस सजणेनें रंगमहालांतच काढला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून ती प्रथम अंजनीकडे गेली. अंजनी तिची मैत्रीण होती. अंजनी प्रथमच नशिबाच्या गोष्टी बोलूं लागली त्यावरून गमाजीची व तिची भेट झाली असावी व प्रतापरावाला रावजीनें ठार केल्याचें तो तिच्याजवळ बोलला असावा अशी तिची खात्री होऊन चुकली. सजणेला ती आठवण दुःखकारक होती. पण तें सर्व दुःख गिळून त्या प्रसंगींही तिनें प्रसंगावधान राखलें. तिला रावजीचा पत्ता पाहिजे होता. पण तो विचारावा कोणत्या तोंडानें ? उगाच संशय यावयाचा. तें टाळण्यासाठीं सजणा बळेंच घुश्शांत येऊन असत्य बोलली, " असले नवरे असले काय आणि नसले काय, सारखेच. बरें झालें, आमच्या वाटेंतली धोंड आपोआप दूर झाली. "

“ तुमच्या म्हणजे कोणाच्या ?” अंजनीनें विस्मयपूर्वक प्रश्न केला.

त्या प्रश्नाचें सरळ उत्तर देण्याचें टाळून सजणा म्हणाली, “ रावजीनें कांहीं कारण नसतांही माझ्या दादल्याला ठार केलें असतें तरीदेखील मीं त्याला दोष दिला नसता. पूर्वजन्मीं मीं काय पातक पुजलें होतें नकळे, त्यासारखी त्याच्या नांवानें बाटल्यें. तेव्हांच रावजीशीं माझें लग्न झालें असतें, तर आजवर कसा सुखानें संसार केला असता. ”

“ इतका तुझा रावजीवर जीव आहे ?” अंजनीनें प्रश्न केला. पूर्वीचा तिच्या वृत्तींतील गंभीरपणा सजणेच्या तोंडचे शब्द ऐकून ओसरूं लागला होता. ”

“ त्याशिवाय का त्याची चौकशी करायला मी इथें आल्यें ? तुझे धनी तुझ्यापाशीं कांहींतरी बोलले असतील. तो केव्हां परत येणार याविषयीं कांहीं कळलें का ?”

“ नाहीं. पण पाहिजे तर आज पुन्हा मालकांची गांठ पडली कीं विचारून घेईन बापडी. ”

“ अवश्य विचारून ठेव, मी आतां जात्यें. थोरल्या आईसाहेब वाट पाहत बसल्या असतील. ” असें म्हणून सजणा–ती दुखावलेली नागीण रावजीचा दावा धरून त्या दावेदाराला दंश करण्यासाठीं सुगावा लागेल तिकडे चालली !

प्रकरण २६ वें

शंकानिरसन

तशाच स्थितींत आणखी सुमारें दीड दोन महिने लोटले; नानासाहेब पेशवे तसेच आपल्या राहुटींत खितपत पडले होते. त्यांना महाराजांकडून निरोपही मिळेना, किंवा महाराज पुन्हा कारभार पहावयालाही सांगेनात. नातवाचा खून झाल्याची वार्ता कानीं येताच ताराबाई जी अंथरुणाला खिळली तें अंथरुण अजून सुटलें नव्हतें. राजपुत्राचा खून झाला ह्या वार्तेला निरनिराळ्या अनुमानांच्या पारंब्या फुटून व तर्ककुतर्कांच्या भुसभुशीत जमिनींत हां हां म्हणतां मुळें खोल जाऊन तेवढ्या थोड्या अवधींत वटवृक्षासारखा त्याचा प्रचंड वृक्ष बनला होता. सकवारबाईनें त्या खुनांत पेशव्याचें अंग असल्याचें वारंवार महाराजांशीं बोलतांना ध्वनित करावें, व महाराजांनींही त्याविषयीं अगदीं कसून चौकशी चालविली होती. परंतु त्या गुन्हेगाराचा नक्की तपास कांहीं केल्या लागेना. नानासाहेबांचें त्यांत अंग आहे असेंही ठरेना व नाहीं असेंही ठरेना.

प्रतिनिधि वगैरे नानासाहेबांची विरोधी मंडळी सातार्‍यांत बसून ह्या निमित्तानें बुद्धिबळाचा डाव खेळत होतीच. तसेंच रघूजी भोंसले, दाभाडे, गायकवाड, वगैरे प्रतिस्पर्धी लोक तर नानासाहेबांना पेशवाईपदावरून उखडून टाकण्यासाठीं टपून बसले होते. त्यांचे गुप्त बातमीदार राजधानींतील धोरणाची वारंवार बित्तंबातमी देण्यासाठीं सातार्‍यांत ठाणें देऊन बसलेच होते. त्यांना ही वार्ता कळतांच बहुतेक सर्वांनीं सवत्या सुभ्याची परस्पर कारवाई जारीनें चालविली, व रघूजी भोंसले तर सकवारबाईच्या खास निमंत्रणावरून धांवपळीनें सातार्‍याकडे येत असल्याच्या बातम्या येऊन धडकूं लागल्या! रघूजी भोंसल्यांचा फार दिवसांपूर्वीचा मानस कीं आपण पेशवे व्हावें व

आपला पुत्र छत्रपति व्हावा. सकवारबाईचाही मानस कीं रघूजी भोसले आपल्या आप्तांतले, त्यांचा पुत्र दत्तक घेतल्यास तो आपल्या तंत्रानें वागेल व भोंसले पेशवे झाले तरी आपल्या शद्बाबाहेर जावयाचे नाहींत; आपणाला मग ताराबाईप्रमाणें मुखत्यारीनें राज्य करतां येईल. तिनें साताऱ्यांत पेटलेल्या ह्या होळीवर आपली महत्वाकांक्षेची पोळी भाजून घेण्यासाठीं सांडणीस्वार पाठवून भोंसल्यांना साताऱ्यांत पाचारण केलें होतें. नानासाहेबांच्या पदभ्रष्टतेची व राजपुत्राच्या वधाची वार्ता कोल्हापूरकर संभाजी राजांच्या कानीं जातांच त्यांनीं साताऱ्याची गादी बळकावण्यासाठीं चंग बांधून एकेकाला आपल्या बाजूनें फितविण्याचें काम जारीनें सुरू केलें होतें. ठिकठिकाणचा वसूल व खंडण्या यावयाच्या बंद झाल्या, पैसा खजिन्यांत नाहींसा झाल्यामुळें जागोजागचे उद्योग थांबले, व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहींसा झाला. ही बिघडलेली घडी पुन्हा नीट कशी बसवावी हें महाराजांना कळेनासें झालें. तें काम नानाचें नानाच करूं जाणे असें ते आतां मनांतल्या मनांत कबूल करूं लागले. प्रतिनिधि, चिटणीस, मंत्री वगैरे कारभारी मंडळीला जवळ बोलावून पुढें कसें करावयाचें याविषयीं रोज खलबतांवर खलबतें होऊं लागलीं.

सकवारबाईनें सल्ला द्यावी कीं भोंसल्यांचा पुत्र दत्तक घ्या आणि भोंसल्यांनाच पेशवे करा, म्हणजे पुन्हा सर्वत्र आबादीआबाद होईल. मात्र अशी सल्ला देताना सकवारबाईनें 'तुमच्या तंत्राप्रमाणें सर्वस्वी वागेन' अशी कबुली रघूजी भोंसल्यांकडून घेतली असावी.

बाबूजी नाइकांनीं सांगावें कीं मला पेशवा करा; मी सर्व कर्जे वारून राजवटीची अशी चोख व्यवस्था ठेवतों कीं आपण ती पाहून तोंडांत बोटें घालाल. अर्थात् नाइकांचा हा प्रयत्न सकवारबाईमार्फत चालला होता, व तिला नाइकांची अजून गरज असल्यानें कधीं कधीं त्याच्या तोंडापुरती महाराजांपाशीं तशी संपादणी करावीही लागे. नाइकानीं भोंसल्यांपाशींदेखील सूत बांधलें होतें कीं मला पेशवा करीत असाल तर महाराज तुमच्या पुत्राला दत्तक घेतील अशी व्यवस्था मी करतों, नाहींपेक्षां महाराजांच्या मनांतून येसाजी किंवा कुसाजी ह्या दोन दासीपुत्रांपैकीं कोणातरी एकाला आपल्या पश्चात् छत्रपति करावयाचें आहे, तीच योजना फलद्रूप होण्यासाठीं आपण झटूं.

अशी सर्व बाजूंनीं महाराजांची कुचंबणा झाली असतांना एके दिवशीं नानासाहेबांचा हुजऱ्या चिठ्ठी घेऊन आला. त्या चिठ्ठींत नानासाहेबांनीं आपला काय तो सोक्षमोक्ष लौकर करण्याविषयीं महाराजांना विनंति केली होती. त्यांचें म्हणणें असें कीं कांहीं सेवा तरी सांगा; किंवा कारखाना फौजफांटा स्वाधीन करून घेऊन निरोप तरी द्या, म्हणजे पोटाचा दुसरा उद्योग कांहीं पाहतां येईल. नानासाहेब दुसरा उद्योग पाहणार म्हणजे काय करणार हें महाराजांना तरी भयच होतें. आपण नानासाहेबांना पुन्हा पेशवाईचें काम न सांगितल्यास ते काय करतील, याचा महाराजांनीं सर्व बाजूंनीं विचार करून पाहिला. कोल्हापूरकर संभाजीराजांशीं नानासाहेबांनीं पेशवाईपदावर आरूढ होण्याच्या सुमाराला केलेला गुप्त करार त्यांनीं ध्यानीं आणला. सकवारबाईच्या प्रेरणेनें पेशवे कोल्हापूरकरांना फितूर आहेत; व त्या दोघांच्या संगनमतानेंच राजपुत्र मारला गेला असावा अशा बातम्या रोज नव्या नव्या तोंडानें सर्वत्र फैलावल्या जात होत्याच. त्यावरून महाराजांना संशय आला कीं पेशवे बहुधा एथून मोकळीक मिळाल्यावर संभाजीराजांना जाऊन मिळतील. त्याचा निवाडा करून घेण्यासाठीं महाराजांनीं रामचंद्रपंत अमात्यांना एके दिवशीं एकांतांत बोलावून घेतलें व विचारलें, "लोक बोलतात यांत तथ्य कितपत आहे?"

ह्या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें याचा अमात्यांना मोठा पेंच पडला. आपण ताराबाईच्या पक्षाचे आहों असा महाराजांना संशय असल्याचें अमात्यांना ठाऊक होतें. त्यामुळें अमात्य राजवटींत अगदीं मुठींत जीव घेतल्यासारखे भिऊन वागत होते. ते उत्तरले, "हा प्रश्न महाराजांनीं माझ्यापेक्षां विश्वासाला पात्र व लायक अशा कोणाला विचारावा."

"तुमच्यावर आमचा विश्वास नाहीं कीं काय?"

या प्रश्नावर अमात्य काय उत्तर देणार? ते स्तब्ध राहिले.

"विश्वासानें व योग्य ती सल्ला आम्हांला अशा प्रसंगीं तुम्ही देऊं शकाल अशी आमची मनोदेवता आम्हांला सांगत असल्यानें तुम्हांला आम्ही विचारतों." महाराज पुन्हा म्हणाले.

"मलाच महाराज विचारतात म्हणून मी सांगतों, राजपुत्रावर मारेकरी घालण्याइतके अधम वृत्तीचे नानासाहेब खास नाहींत."

"पण मूळपासून त्यांचें कोल्हापुरकरांशीं सूत आहे त्याचें काय?"

पेशवाईचा पुनर्विकास

" हिंदुपदपादशाहीच्या चिरस्थायित्वासाठीं सातारा व कोल्हापूर ह्या दोन्ही गाद्यांत खुल्या मनाचा सलोखा असणें अत्यंत अवश्य आहे, हें ध्यानीं घेऊनच नानासाहेबांनीं दूरदर्शीपणानें कोल्हापुरकरांशीं संगनमत केलें असावें असें मला तरी वाटतें."

" आम्हांला एकदां त्यांची कसोटी पाहावयाची आहे."

" ते आपल्या कसोटीला पूर्णपणें उतरतील अशी मला आशा आहे."

" ती कसोटी आम्हीं तुमच्या मार्फतीनें पाहावयाचें योजिलें आहे. तुम्हीं नानांकडे जावें आणि पुढें काय करण्याचा त्यांचा मानस आहे याचा अंदाज घ्यावा."

" जशी महाराजांची आज्ञा." असें म्हणून अमात्यांनीं ती कामगिरी शिरावर घेतली. महाराजांप्रमाणेंच खुद्द त्यांनाही जो संशय होता, तो ह्या उपायानें अनायासें फिटणार असल्यानें व हा पेशव्यांचा प्रश्न अखिल मराठ-शाहीच्या भवितव्याचा असल्यानें त्यांनीं महाराजांच्या सूचनेला होकार दिला. ते महाराजांकडून निघाले ते थेट नानासाहेबांकडेच गेले. परस्पर नमस्कार झाल्यावर अमात्यांनीं विचारलें, " एका महत्त्वाच्या बाबतींत श्रीमंतांचें मत घेण्यासाठीं मी आलों आहें."

" श्रीमंत आतां दुबळे आहेत. भंगलेल्या देवाला जगांत कोण विचार-णार ?" नानासाहेब उदासवाण्या वृत्तीनें म्हणाले.

" पण दगडधोंड्याची मूर्ति भंगली तरी देवाचें देवपण थोडेंच भंगतें! देवाचें देवपण सदा अभंग आहे."

" बरें; बोला तुमचें काय काम तें."

" पुढें श्रीमंतांनीं काय करावयाचें ठरविलें आहे?"

" काय करावें असें तुमचें मत आहे ?"

" महाराजांपाशीं आपल्या गुणांचें चीज नाहीं हें श्रीमंतांना माहीत झालेंच आहे. अशा बेभरंवशाच्या धन्याची नोकरी शहाण्यानें करूं नये."

" मग काय करावें ?"

" महाराजांचें आतां अगदीं उतारवय झालें आहे. तेव्हां हा डोल्हारा आज ना उद्यां ढांसळणार हें निश्चित. त्यांच्या पश्चात् राण्या आपापसांत भांडणार व दौलतीची वाताहात लावणार. पण जग मात्र त्याबद्दल आम्हां

राजवटीचा कर्त्या पुरुषांना दोष देणार. त्यापेक्षां मी म्हणतों, आपण कोल्हापूरकरांशीं सख्य केलेलें बरें नाहीं का ?"

नानासाहेब यावर नुसते हंसले. अमात्यांना तेवढ्यावरून कळून कीं आपला विचार त्यांना मुळींच रुचत नाहीं. पण तें बळेंच मनावर घे टाकून त्यांनीं विचारलें, "श्रीमंतांना हंसूं कसलें आलें ?"

"रामचंद्रपंतबाबा! आम्ही तुमच्यापुढें केवळ पोर! तुम्ही आ आमच्या वडिलांच्या ठायीं पूज्य आहां. पण इतक्या कठोरपणें तुमच बोलण्याचा प्रसंग परमेश्वरानें आणला, हें आमचें कमनशीब! दुसरें असली बदसल्ला तुम्हीं तरी आम्हांला द्यावयाला नको होती."

"आतां जरा स्पष्ट बोलूं का ?"

"बोला अवश्य बोला. आमचें कांहीं चुकत असेल तर कान आम्हांला मार्गावर आणा. तुम्हांला तसा अधिकार आहे."

"तसा अधिकार कांहीं मला नाहीं. नुसत्या वयावर व शरिराच्या रुंदीवर जर मोठेपणा मोजतां येईल, तर एरंड शेवग्यांना काय दुष्काळ आहे! आम्ही किती झालें तरी श्रीमंतांचे आज्ञांकित. श्रीमंतांनीं पेशव अधिकार धारण करतांना कोल्हापूरकरांशीं दोस्तीचा तह केल्याचा म पडल्यावरून श्रीमंतांना सुचवावेंसें वाटतें कीं जिकडे श्रीमंत तिकडे अमा

रामचंद्रपंतबाबा! तुमच्यासारख्या मुरलेल्या मुत्सद्यांनीं देखील त्या गो असा विपरीत अर्थ ध्यानीं घ्यावा ना ? राजकारणाचे सारे ओघ अ ओळखून त्याप्रमाणें सावधान चित्तानें पण निष्ठा व दानत न सोडतां वा एक तुम्ही आणि दुसरे चिटणीस हे दोनच थोर पुरुष आज आम आदर्शवत् वाटतात. तो तुमच्या शिकवणीचा हाच धडा आम्ही गिर वयाचा काय ?"

"श्रीमंतांचा व कोल्हापूरकरांचा इतका ऋणानुबंध जमला आहे म एवढें बोलण्याचें धाडस मीं केलें. तें श्रीमंतांना रुचत नसेल तर माझें मा पाशीं राहिलें."

"तुम्ही आम्हांला असें सांगा; आपल्या महाराष्ट्राच्या दुर्दैवानें म शाहीचीं सातारा व कोल्हापूर अशीं दोन शकलें होऊं नयेत तीं झालीं, त कांहीं इलाज नाहीं. पण त्यानंतर तरी तीं शकलें स्पर्धेच्या भरांत एक

वर आदळत राहावीं व त्यांत दोघांचाही आजवर चक्काचूर झाला तसाच पुढेंही होत राहावा व कालांतरानें मराठी साम्राज्य नामशेष व्हावें, हें तुम्हांला तरी रुचेल का ? ”

“ तें कसें बरें रुचेल ? ”

“ खरें ना ? तर मग ती स्पर्धा थांबावी, दोन्ही राज्यांची शक्ति शक्य तों एकवटून देशोद्धाराच्या कामीं आणावी, हें एकच ध्येय दृष्टीसमोर ठेवून तेव्हां आम्हीं तरी संभाजी महाराजांना तसें वश करण्याचा प्रयत्न केला. या दोघांपैकीं एकानें दुसऱ्याच्या नाशाला उद्युक्त होऊन शत्रूच्या आहारीं जाऊन आपल्या उजव्या हातानें डावा हात तोडून घेऊं नये, एवढाच आमचा त्या वेळीं संभाजी महाराजांशीं तसा करार करण्यांत हेतु होता. याचें दृश्य फळ तेव्हांपासून आजवर सहासात वर्षांत सर्वांना पाहावयाला मिळतही आहे. कोल्हापूरकर त्यापूर्वी आज चंद्रसेन जाधवाच्या तर उद्यां निजामाच्या अशा कोणा ना कोणा शत्रूच्या कच्छपीं लागून साताऱ्याच्या गादीवर घोरपड आण–ण्याची खटपट करीत, त्या त्यांच्या उपद्व्यापांना अलीकडे सहासात वर्षें पुष्कळच आळा बसला आहे. परंतु इतका दूरवर विचार न करतां विघ्न–संतोषी लोकांच्या आहारीं जाऊन महाराजांनीं आमच्यावर आग पाखडली ! –परमेश्वराची इच्छा ! ”

अमात्यांना नानासाहेबांचे ते उद्गार ऐकून पराकाष्टेचा संतोष वाटला. इतका इमानी व तसाच परमप्रतापी वजीर बुद्धिबळाच्या खेळांत महाराजांनीं यःकश्चित प्याद्यांच्या पायांखालीं तुडविला जाऊं द्यावा, हा महाराजांचा व उदयोन्मुख हिंदुपदपादशाहीचा अत्यंत कठोर दैवदुर्विलास होय, ह्या जाणिवेनें त्यांच्या कंठीं गहिंवर दाटून आला. पण अंतःकरण उघडें करून बोलण्याची ती वेळ नव्हती. त्यामुळें अमात्यांनीं घेतलेल्या सोंगाची बतावणी फोल ठरली असती. तो प्रसंग साजवून नेण्यासाठीं अमात्य वरकरणीं म्हणाले, “ एकूण श्रीमंतांचें या कामीं आम्हांला साह्य मिळणार नाहीं म्हणावयाचें. नाइलाज आहे. पण श्रीमंतांनीं माझ्यावर एवढी तरी कृपा करावी, आतां आपलें जें संभाषण झालें त्याविषयीं कोणापाशींही कांहीं बोलूं नये. आणखी कांहीं नाहीं; आमचे बेत तडीला जाणें बाजूला राहून उलट आमचाच त्यांत चेंदामेंदा व्हावयाचा. ”

" ही तुमची विनंति आम्ही एका अटीवर मान्य करावयाला तयार आहों."

" ती अट कोणती?"

" तुम्हीं महाराजांच्या विरुद्ध अशी कोणतीही गोष्ट करतां कामा नये. तुम्हांला महाराजांच्या चरणांची शपथ आहे. याउपरही तुम्ही जर अन्यथा वर्तन करावयाला तयार झालां, तर मात्र हा नानासाहेब पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही असला तरी तुमच्या प्रतिकारासाठीं व छत्रपतींच्या सातार्‍यांतील सिंहासनाच्या रक्षणासाठीं आपले प्राणदेखील खर्ची घालावयाला कमी करणार नाहीं."

त्या प्रसंगीं नानासाहेबांना मुक्तकंठानें धन्यवाद देण्याची स्वयंस्फूर्ति अमात्यांना अत्यंत कष्टांनीं आवरती घ्यावी लागली. ते तेथून बाहेर पडले व महाराजांकडे जावयाला निघाले, तेव्हां कृतज्ञतेच्या आनंदाश्रूंचे पवित्र ओहोळ त्यांच्या गालांवरून वाहूं लागले. ते त्यांनीं आजूबाजूला पाहत शेल्याच्या टोंकानें पुसले. या वेळीं आपणाला पक्ष्यांप्रमाणें पंख असते, तर फार बरें झालें असतें; तितकी लौकर ही बातमी महाराजांच्या कानीं घालतां आली असती, असें अमात्यांना वाटलें.

प्रकरण २७ वें

पेशव्यांना महाराजांचें निमंत्रण

"खोटें! खोटें! हें साफ खोटें! सर्व कारभारी मंडळीनें पेशव्यांना सामील होऊन महाराजांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा निश्चय केला आहे, एवढाच याचा अर्थ!"

"म्हणजे? अमात्यदेखील खोटेंच बोलतात असें तुमचें म्हणणें? इतरांची गोष्ट सोडून देऊं. पण अमात्यांविषयीं–"

"तेंच–मी म्हणत्यें तें तेंच. महाराजांचा भोळा स्वभाव झाडून सर्वांनीं ओळखून ठेवला आहे; त्याप्रमाणें ते वागतात. अमात्य काय किंवा दुसरे कोणी काय, सारे एका माळेचे मणी. छत्रपतींचा निर्वंश होऊन मराठशाही उघड्यावर पडावी व तिच्यावर आपणाला मनमुराद चरतां यावें असें पुष्कळांना वाटतें. महाराजांनीं गादीला धनी म्हणून दत्तक घेण्याचा हट्टच घेतला तर जन्मभर आपली ताबेदारी पत्करून नामधारी छत्रपति होऊन राहण्यांत ज्याला भूषण वाटेल असें एखादें देव्हाऱ्यांतल्या निर्जीव देवाप्रमाणें जिवंत बाहुलें महाराजांच्या मांडीवर बसवून त्याच्या नांवावर आपला तळिराम यथास्थित गार करून घ्यावा, असा इथून तिथून सर्वांनीं कटच केलेला दिसतो. मी भोंसल्यांचा सूर्यासारखा तेजस्वी मुलगा दत्तक घ्यावा म्हणत्यें. तसें झाल्यावर ह्या गिधाडांना मराठशाहीच्या मढ्याचे लचके तोडून खावयाला मिळणार नाहींत, म्हणून त्यांनीं मला हाणून पाडून आपला कावा साधण्यासाठीं पेशव्यांचा पक्ष उचलून धरण्याची ही नवी युक्ति शोधून काढली आहे. पण मी महाराजांना निर्वाणीचें सांगून ठेवत्यें, त्या सापाला सहानुभूतीच्या उबाऱ्यांत पुन्हा ताजातवाना करून महाराज पुन्हा पेशवा म्हणून आपल्या कंठीं धारण करतील, तर ती स्वतःची व उभ्या राजवटीची अप्रतिष्ठा पाहायला ही सकवारबाई एक क्षणभरदेखील जिवंत राहणार नाहीं."

अमात्यांनीं नानासाहेबांकडून येतांच महाराजांना सारा वृत्तान्त निवेदन केला; तेव्हां सकवारबाई महाराजांपाशींच होती. महाराजांचें मन त्या क्षणीं नानासाहेबांविषयीं निवळूं लागलेलें पाहून तिच्या सर्वांगाचा संतापानें अगदीं भडका उडाला. त्या भडक्याच्या भरांत ती वरच्याप्रमाणें निष्ठुरपणें अद्वातद्वा बोलून हातपाय आपटीत दांतओंठ खात नागिणीसारखी फोंफावत आंत निघून गेली.

* * *

असे आणखी आठ दिवस लोटले. नानासाहेब एका राहुटीनिशीं सातान्यांतच अज्ञातवासाचा काळ कंठीत होते. कारभाऱ्यांची ये जा व खलबतें अव्याहत सुरू होतीं. याचा पुढें काय परिणाम होणार याविषयीं सर्वजण आपापल्या ठिकाणीं अगदीं हवालदील झाले होते. अशा स्थितींत दौलतीविषयीं एखादी बारीकसारीक गोष्ट करावयाची झाली तरी तीदेखील करण्याला चिटणीस, अमात्य, मंत्री वगैरे मुत्सद्दी मंडळी धजेना! त्यांना भय हें कीं सकवारबाईच्या पाताळयंत्री उपद्व्यापांमुळें आपलें काम जर फंसलें तर अपयशाला धनी कशाला व्हा! प्रतिनिधि पेशव्यांचे कट्टे विरोधक ना; पण त्यांना देखील प्रत्यक्ष कारभार करतांना अनुभव येऊं लागला कीं प्रतिनिधि या नात्यानें आजवर आपली जी प्रतिष्ठा होती ती, वरवर दिसण्यापुरते कां असेनात पण सर्वसमर्थ पेशवे डोक्यावर होते म्हणून! तेजाच्या बाबतींत सूर्यासमोर ज्याप्रमाणें चंद्राची बढाई चालत नसते, सूर्यापासून तेजाची उसनवारी केल्याशिवाय चंद्राला उगवतांच येणें शक्य नसतें, तशीच आपली अवस्था आहे हें हरघडी प्रतिनिधींच्या प्रत्ययाला येऊं लागलें तेव्हां त्यांचीही खातरजमा होऊन चुकली कीं नानासाहेब पेशवे हें जिवंत संकट असलें तरी अपरिहार्य संकट आहे. दगडाशीं टक्कर देऊन आपला निभाव लागावयाचा नाहीं.

अशी सर्व बाजूंनीं सर्वांचीच पुरी कुचंबणा झाली; तरीही महाराजांकडून कांहींच निरोप मिळत नाहीं असें पाहून नानासाहेब अगदीं हताश झाले. आतां एक घाव दोन तुकडे केल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें पाहून एके दिवशीं त्यांनीं तेथून निघून जाण्याचा निश्चय केला. सायंकाळीं चिटणीस भेटीला आले असतां त्यांनीं त्यांच्यापाशीं वैतागून उद्गार काढले, " आमची दाद घ्यावी असें महाराजांच्या मनांत येत नाहीं. धड मरणें नाहीं, धड जगणें नाहीं.

हे क्लेश आतां अगदीं असह्य झाले. इतके दिवस निरोपाची वाट पाहिली. आतां आणखी वाट पाहण्यांत शोभा राहिली नाहीं. म्हणून या घटकेस आम्ही बाहेर निघालों. आमचा इथला ऋणानुबंध आतां तुटला. "

त्यावर चिटणिसांनीं परोपरीनें विनवून त्यांना दोन दिवसांसाठीं थांबवून घेतलें, व रातोरात महाराजांना भेटून काय तो निकाल तावडतोब करून घेतल्याशिवाय राहात नाहीं असें शपथेवर सांगितलें. तरीही नानासाहेब ऐकत नाहींत असें पाहून अखेर चिटणीस त्यांच्या वाटेवर आडवे पडले व म्हणाले, " मला तुडवून कुठें जावयाचें असेल तिकडे जा. "

तेव्हां मात्र नानासाहेबांचा नाइलाज झाला. त्यांनीं शेवटीं चिटणिसांच्या भिडेखातर पुण्याच्या वाटेवर वडूथ मुक्कामीं आणखी दोन दिवस थांबण्याचें कबूल केलें. त्या रात्रौ चिटणीस नानासाहेबांपाशीं कबूल केल्याप्रमाणें महाराजांच्या भेटीला गेले. परंतु सकवारबाईनें भेट होऊं न दिल्यामुळें असो कीं आणखी कांहीं कारण असो, त्या वेळीं त्यांना महाराजांची भेट होऊं शकली नाहीं. यामुळें नानासाहेबांचा कदाचित् गैरसमज होईल व ते त्राग्यानें निघून जावयाला कमी करावयाचे नाहींत हें जाणून चिटणिसांनीं तावडतोब नानासाहेबांना हुजऱ्याच्या हातीं चिठ्ठी पाठवून कळविलें, " आज महाराजांची भेट झाली नाहीं; तरी उदयीक दुपारीं अवश्य भेट घेतों. भेटून तड लावल्याखेरीज अन्नग्रहण करणार नाहीं. मी स्वतःच आपल्या भेटीला येणार होतों. पण प्रकृतीला आराम नाहीं. तरी अविचार कृपा करून करूं नये. "

इतक्या कळकळीनें चिटणिसांनीं लिहिलें, त्यांचा शब्द नानासाहेबांना कसा मोडवणार ! त्यांनादेखील महाराजांशीं सलोखा झाला तरी पाहिजेच होता. त्यांनीं आपल्या परीनें सर्व खुलासा चिटणिसांपाशीं वेळोवेळीं केलाच होता. तथापि चिटणीस आणि महाराज यांची भेट होईल तेव्हां सर्व गोष्टींचा एका बैठकींत खुलासा व्हावा यास्तव त्यांनीं एक खुलासेवार पत्र चिटणिसांना तावडतोब लिहिलें :

× × ×

" आशिर्वाद उपरी. रात्रीं राजश्री स्वामींची गांठ पडली नाहीं म्हणून पत्र लिहिलें, ऐशियास ईश्वरी इच्छेस तुमचा इलाज काय ? या उपरी खामखाय गांठ दुपारीं घालून येणेंप्रमाणें विनंति करणें.—

क. १ दोनही महालांतील गुंते फार करून दूर केले. रोज निघतात त्यांस मात्र आमचा इलाज नाहीं. सांप्रत महालांतील गुंता नाहीं. मोघम बोलले चालले असतील. वारूं. महाराज कर्जाचे मजकुराचा गुंता तो, महाराज सर्व विचार ध्यानीं आणून आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक जेथें असतील तेथें करूं. हुजूर असल्यास आज्ञा मान्य करूं, बाहेर गेल्यास न करूं ही सबब होणार नाहीं. परंतु निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे. सांप्रत मनसबा होऊन खचित जाहला आहे. मनसब्याचा कळस रक्षण करावयाचे दिवस थोडे असतात. यास्तव दोन्ही वाड्यांत समजून सेवकास निरोप द्यावा. एका दों दिवसांत हा अर्थ उत्तम असें महाराजांनीं कृपा करून करावें.

क. २ महाराजांचे कर्जाचा उरक करावा तेव्हांच जावें, ऐशीच मर्जी असेल तर पुण्यास न जातांच इकडून फिरून सेवेसी येऊं. सावकाशीनें महाराज कृपा करून पुण्यास व वसईस जावयास आज्ञा देतील तेव्हां जाऊं. या मनसब्याचा डौल पंधरा दिवसांअलिकडे आहे. तेव्हां मालकास ऐसा गुंता काढल्यानें मनसबा नासतो. ये समयीं महिन्या दोन महिन्यांचा निरोप द्यावा. फिरून सावकाशी सुमुहूर्ते महाराजांनीं देणें तर द्यावा.

क. ३ नायकांशीं कज्जा करावयासी जातां ऐसा संदेह जनवार्तेवरून मनास वाटला असला तर महाराजांनीं त्याविशीं निशा करून घ्यावी. जो तालुका महाराजांनीं नायकास करार केला, त्यांत त्यांनीं जावें. कज्जा करावा हे गोष्ट महाराजांचे हुकुमावांचून सहसा होणार नाहीं.

क. ४ चिरंजीव भाऊ तिकडे गेले आहेत. नबाबही तिकडे गेले म्हणजे गोव्याच्या शहरास अंतर होऊन आणखी किरकोळ गुंते तसेच अडकून पडतील. तेव्हां त्याचा लौकिक एक प्रकारें होऊन जाईल, हा अर्थ महाराजांनीं ध्यानीं आणावा. सरकारांत भर करूं द्यावा. तो उगवला पाहिजे. सर्वही गोष्टींत आम्हांवर तोटा पडे असें करावें कीं काय? निदान येथून दों मजलींवर जाण्यास आज्ञा करावी. सर्व फौज चिरंजिवाकडे रवाना करतों आणि सेवेसी फिरोन येतों.

क. ५ महाराज निरोप देतात हा लौकिक जनांत जाहला. नबाबापावेतों बातमी जाईल. फिरोन दिल्हें हेंही वर्तमान जाईल. तेव्हां सर्व-

प्रकारें आम्ही इतराजींत हा लौकिक जाहला आहे, व बाकी राहिला आहे ह्राही होईल.

इतके प्रकार निखालसेनें विनंति केली असतां महाराज ध्यानीं न आणतील तर ईश्वरें या दौलतीवर इतराजी केली अशी जाणावी. मग बाहेरीलही इजातीचा दरकार सोडून बसूं. सर्व मजकूर वरल्याप्रमाणें विनंति करून उत्तर घेऊन येणें.

× × ×

दुसऱ्या दिवशीं नानासाहेबांचें पत्र घेऊन चिटणीस रंगमहालांत महाराजांच्या भेटीला गेले. सुदैवानें सकवारबाई तेव्हां गडावर गेली होती. त्यामुळें दोघांनाही शांत चित्तानें विचार करावयाला अवसर मिळाला.

" काल रात्रौ मुद्दाम महाराजांच्या भेटीला आलों होतों. पण भेट झाली नाहीं. म्हणून आतां आलों. हें श्रीमंतांकडून आलेलें पत्र." असें म्हणून चिटणिसांनीं तें पत्र महाराजांपुढें ठेवलें व सांगितलें, " श्रीमंत तर कंटाळून सातारा सोडून निघून गेलेच. दौलतीची काय दैना उडत आहे हें महाराजांना माहीत आहेच. आतां तरी महाराजांनीं कृपाळु होऊन श्रीमंतांना माघारे बोलवावें व त्यांच्या हातीं पूर्ववत् अधिकार देऊन दौलतीचें रक्षण करावें, एवढीच महाराजांच्या चरणांपाशीं विनंति."

" वाचा पाहूं तें पत्र!" महाराज शांतपणें म्हणाले. चिटणिसांनीं पत्र वाचून दाखविलें.

" एकूण नाना फारच चिडलेला दिसतो. पण इतकें असतांही राजकारणाबाबत जबाबदारीच्या तांतडीच्या गोष्टींकडे त्याचें दुर्लक्ष्य झालेलें नाहीं असें या पत्रावरून दिसतें. याला म्हणतात खरा सेवक!"

" मग श्रीमंतांना काय लिहावयाचें?"

" त्याला ताबडतोब प्रथम माघारे यावयाला लिहा. त्याची नाराजी दूर केलीच पाहिजे."

चिटणिसांनीं तसें पत्र लिहून महाराजांना विचारलें, "हें पाठवावयाचें ना?"

" पाठवावयाचें तर! पण तें काम फालतुक माणसावर सोंपविणें आम्हांला हिताचें वाटत नाहीं. कारण आमच्या हातून नानाची अमर्याद विटंबना झाली आहे. तो मानी पुरुष आहे. आज्ञेशिवाय निघून गेला असला तरी आमच्या-

विषयीं अन्यथा विचार त्याच्या ध्यानींमनींही कधीं येणें शक्य नाहीं. याविषयीं आम्हांला शंका नाहीं. त्याला सामान्य हुजऱ्याच्या हातीं आम्हीं बोलावणें कसें पाठवावें !" असें म्हणून त्यांनीं आपल्या खास मर्जीतील शेटी मलिकाला बोलावून त्याला सांगितलें, " तें पत्र घेऊन नाना आहे तेथें जा व त्याला पत्र देऊन आमचा निरोप सांग कीं ताबडतोब असाल तसे येणें. त्याला तूं पुढें घातल्याखेरीज येऊं नकोस."

श्रीरामांचा हनुमान तसा महाराजांचा शेटी मलिक. तो तसाच पत्र घेऊन निघाला. तेव्हां आपल्या डोक्यावरचा निम्मे भार उतरल्यासारखें चिटणिसांना वाटलें.

महाराजांचा निरोप घेऊन तेथून निघून गेल्यावर थोड्या वेळानें सकवारबाई गडावरून खालीं आली. तेव्हां महाराज एकटेच महालांत बसलेले तिला आढळले. तिनें दासीपाशीं कोणी आल्यागेल्याची चौकशी केली तेव्हां चिटणीस येऊन गेल्याचें तिला कळलें. लगेच तिनें महाराजांपाशीं जाऊन विचारलें, " चिटणीस कशाला आले होते ?"

" सहज रोजच्या कामाची विचारपूस करण्यासाठीं आले होते." महाराज उत्तरले. सकवारबाईनें आणखी कसून चौकशी केली, तरीही त्यांनीं अशींच उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं.

प्रकरण २८ वें

मधुर मीलन

सजणा सातार्‍याहून निघाली ती थेट रावजीचा शोध करीत वडूथला आली. पण तो घरीं नव्हता. घरांतल्या माणसांना विचारतां तो घरीं आलाच नाहीं असें तिला कळलें. आतां आपलें काळें तोंड सजणेला कसें दाखवावें असा शरमिंदा होऊन तो आपणाला भेटावयाचें टाळीत असेल असा सजणेला जबर संशय आला. तिनें जास्त चौकशी केली तेव्हां रावजीसाठीं घरच्या माणसांनीं गांवांतल्या गांवांत एक चांगली सोयरीक ठरवून ठेविली आहे व सर्व मंडळी त्याच्या येण्याची वाट पाहत आहेत असा सुगावा तिला लागला. त्यावरून तो आज ना उद्यां चार आठ दिवशीं तरी घरीं खास येणार, असें समजून ती नागीण त्याला दंश करून आपली सूडाची प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठीं तेथेंच राहिली. नानासाहेबांचा मुक्काम वडूथला आलेला तिला दुसर्‍या दिवशीं कळतांच तेथें कांहीं तपास लागला तर पाहावा म्हणून ती पेशव्यांचा मुक्काम त्या दिवशीं जेथें होता, त्या निवासस्थानाकडे गेली. प्रथम तिला वाटलें कीं आपण थेट गोपिकाबाईकडे जाऊन चौकशी करावी. परंतु पुन्हा वाटलें, नको. बभ्रा झाला तर आपला सूडाचा बेत सिद्धीला जाण्याला अडथळा येईल. बाहेरून बाहेरून नोकरचाकरांकडे चौकशी करून पाहिलें तर एथेंच तपास लागेल अशा आशेनें पेशव्यांच्या निवासस्थानासमोरच एक पडकें देवालय होतें त्या देवालयांत बसून ती पेशव्यांकडे जाणार्‍या येणार्‍या मंडळीवर पाळत राखूं लागली.

सजणा तेथें त्या देवालयांत जाऊन बसण्यापूर्वींच शेटी मलीक पेशव्यांकडे जाऊन पोंहोचला होता. तो महाराजांचें पत्र नानासाहेबांना पावतें करून महाराजांच्या आज्ञेप्रमाणें नानासाहेब परिवारासह माघारे सातार्‍याला जावयाला

निघेपावेतों तेथेंच थांबला होता. महाराजांच्या पत्रानें नानासाहेबांच्या निवासस्थानीं सर्वत्र आनंदीआनंद वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. गोपिकाबाई इतके दिवस नानासाहेबांवर ते आपला शद्ब जुमानीत नाहींत म्हणून ज्या रुसल्या होत्या व नानासाहेबांनीं महाराजांची पर्वा न करतां सातारा सोडल्यामुळें जें त्यांचें मन कांहींसें उमलूं लागलें होतें, त्यांनादेखील शेटीनें आणलेला शुभसंदेश ऐकून संतोष वाटला. शेटीची त्या उभयतांच्या मागें ताबडतोब माघारें निघण्याची घाई होती; व नानासाहेब त्याच घटकेला निघावयाला तयार होते. गोपिकाबाईची उत्सुकताही कमी नव्हती. परंतु तिचा शकून—अपशकुनांवर दांडगा भरवसा. तिनें सुमुहूर्त पाहून निघावयाचें असें म्हटलें; व नानासाहेबांनाही तिचा शद्ब मोडतां येईना. लगेच तेथल्या ग्रामोपाध्यायाला मुहूर्त विचारण्यासाठीं बोलावून आणण्यांत आलें. आणि गोपिकाबाईला सुमुहूर्त हवा होता तसा मिळाला; ग्रामोपाध्यायाला पांच मोहरा दक्षणा मिळाली. ग्रामोपाध्याय हर्षभरित अंतःकरणानें आपल्या घरीं निघून गेला. सर्व मंडळीची सुमुहूर्तावर प्रयाण करण्याची तयारी झाली. गोपिकाबाईची पालखी प्रथम निघाली, व नानासाहेब अंमळ मागाहून निघण्याच्या तयारींत असतांना त्यांच्या आगमनाची शुभवार्ता महाराजांना कळविण्यासाठीं शेटी नानासाहेबांची आज्ञा घेऊन घोड्यावर स्वार होऊन पुढें निघाला.

वाटेंत एखादें देऊळ दिसलें कीं दर्शन घेतल्याखेरीज पुढें जावयाचें नाहीं असा नेहमींचा परिपाठ होता. तो समोरच्या देवालयाजवळून जातांना घोड्यावरून उतरून मुद्दाम देवदर्शनाला जातो तों सजणा तेथें अचानक त्याला भेटली. त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें सजणेला विचारलें, "सजणे ! तूं इकडे कुठें ?"

सजणा गोंधळली. आपला विचार तिला प्रगट करावयाचा नव्हता. ती उत्तरली, "आल्यें होत्यें एका कामासाठीं."

सजणेच्या मनांत शेटीपाशीं रावजीची चौकशी करावी कीं करूं नये असा विचार घोळतो आहे इतक्यांत शेटीनें हंसून तिला म्हटलें, "पोरी ! तूं कां आलीस तें मला कळत का नाहीं ? पण इतकी उतावीळ कशाला झालीस ? प्रतापराव कांहीं कुठें पळून जात नव्हता ! तो कांहीं कायमचा घरदार सोडून इथेंच राहणार नव्हता."

"म्हणजे?" सजणेनें एकदम चकित होऊन विचारलें. आपण हें स्वप्न तर पाहत नाहींना, असा तिला भास झाला. प्रतापराव रावजीच्या हातून ठार मारला गेला, तो इकडे कोठून येईल? तिनें काकुळतीनें येऊन विचारलें, "शेटी, माझी अशी निर्दयपणें थट्टा कां बरें करतां?"

शेटी जास्तच हंसूं लागला.

सजणेनें पुन्हा दीनवाणीनें विचारलें, "शेटी! मी तुमची लेंक आहें असें समजा. तुमच्या ह्या लेंकीवर वैधव्याचा डोंगर कोसळला असतां तिची अशी थट्टा करणें तुम्हांला शोभतें का?"

शेटी अधिकच हंसून म्हणाला, "अग वेडे! तूं साताऱ्यांत उठलेली बाजारगप्प खरीच मानतेस वाटतें! तुला खरें वाटत नाहीं तर चल माझ्याबरोबर." असें म्हणून शेटी घोड्याला तेथेंच एका खुंटाशीं बांधून ठेवून माघारा निघाला. आश्चर्यातिरेकानें दिग्मूढ झालेली सजणा मंतरलेल्या पुतळीप्रमाणें त्याच्या मागोमाग गेली. तीं दोघेंही नानासाहेबांच्या निवासस्थानाच्या दरवाजांत जातात तोंच प्रतापराव दरवाजांत उभा आहे व नानासाहेब त्याच्याशीं कांहीं बोलत आहे असा देखावा सजणेला पाहावयाला मिळाला! त्या वेळीं तिला काय वाटलें असेल याचें वर्णन कोण करील! तें वर्णन करावयाचें नव्हतें; अनुभवावयाचें होतें.

"तो पाहा तुझा प्रतापराव. आतां तरी खात्री झाली ना?" शेटीनें प्रतापरावाकडे बोट दाखवून म्हटलें. दोघांचीही दृष्टादृष्ट झाली, त्याबरोबर दोघांच्याही अंगावर हर्षभरानें रोमांच उमटले. दोघेंही अगदीं गोंधळल्यासारखीं झालीं.

"कां शेटी! माघारा कां आलास?" नानासाहेबांनीं विचारलें.

शेटी सजणेकडे बोट करून म्हणाला, "ही प्रतापरावाची सजणा. हिची कल्पना होती कीं प्रतापराव साताऱ्यांत बातमी उठली होती त्याप्रमाणें खरोखरच पानगांवच्या कामगिरींत ठार झाला असावा. तिला सांगितलें तें खरेंच वाटेना, म्हणून मुद्दाम प्रतापरावाची भेट करून देण्यासाठीं तिला बरोबर घेऊन आलों."

"अस्सें!" एवढेंच नानासाहेब त्यावर प्रसन्न चित्तानें उद्गारले, व आंत गेले. आंत जातां जातां त्यांनीं प्रतापरावाला सांगितलें, "तूं आमच्याबरोबर

रहाण्याचें कांहीं कारण नाहीं. साताऱ्यांत येऊन तुम्ही दोघें आम्हांला भेटा म्हणजे तूं राजाराममहाराजांच्या रक्षणाची कामगिरी जिवापाड झटून पार पाडल्याबद्दल तुम्हांला एका गांवच्या इनामदारीची सनद करून देऊं."

नानासाहेबांनीं मुद्दाम त्या पति-पत्नींना एकमेकांशीं निःसंकोचपणें बोलण्याचालण्याला सवड मिळावी या हेतूनेंच प्रतापरावाला निरोप दिला. शेटीदेखील 'तो पाहा तुझा प्रतापराव. झालें आतां? त्याला नीट सांभाळ' असें विनोदानें बोलून हंसत हंसत तेथून निघून गेला.

अंमळशानें नानासाहेब गेल्यावर त्या पति-पत्नींना तेथें भरपूर एकान्त सांपडला. दोघेंही त्या पडक्या देवालयांत जाऊन बसलीं. प्रतापरावानें सजणेला विचारलें, "आपण राजाराममहाराजांना ठार करून आलों अशी त्या नीच गमाजीनें साताऱ्यांत येऊन मोठी शेखी मिरवली असेल नाहीं?"

"होय तर! पण हें तुम्हांला कसें कळलें?"

"मला इथें श्रीमंतांपाशीं तें सारें समजलें."

"पण राजाराममहाराजांचा खून झाला नाहीं हें तरी खरें का?"

"खरें का म्हणून काय विचारतेस? त्यांचा खून झाला असता तर हा प्रतापराव तुला जिवंत भेटला तरी असता का?"

"तर मग गमाजीनें राजाराममहाराजांचें शीर म्हणून एक मुंडकें आणून थोरल्या आईसाहेबांना दाखविलें, तें कुठचें?"

"तें कुठचें!" प्रतापराव एक दीर्घ निःश्वास सोडून उद्गारला, "अग! तें म्हातारीच्या मुलाचें मुंडकें होतें."

"म्हणजे काय?"

"आतां तुला सारी हकिकत सांगतों. रावजीनें मला सोडून दिल्यावर मी गमाजी व म्हातारी यांच्या पाळतीवर होतों. तीं दोघें चाललीं होतीं व मी त्यांच्या मागोमाग त्यांना सुगावा लागूं न देतां चाललों होतों. कांहीं अंतरावर दुसऱ्याच मुक्कामांत रावजी प्रथम मला येऊन भेटला, व 'राजपुत्राचें आणि म्हातारीचें रक्षण करण्याच्या कामीं माझें तुला पूर्ण साह्य आहे. मात्र मला बाह्यात्कारीं गमाजीपंतांच्या तंत्रानें वागावें लागेल. त्याविषयीं तूं गैरसमज करून घेऊं नकोस.' असें त्यानें मला सांगितलें, व राजपुत्राच्या रक्षणाची तजवीज करण्यासाठीं मला पुढें पाठविलें. 'धन्यांना खूष करण्या-

साठीं मी प्रतापरावाला ठार मारून आलों असें सांगणार आहे' असेंदेखील रावजी तेव्हां मला म्हणाला. मीं पुढें जाऊन राजपुत्राला लपवून ठेवण्याची व्यवस्था केली. लगेच एक दोन दिवसांत गमाजी, ती म्हातारी व रावजी अशीं तिघेंही पानगांवीं येऊन पोंहोचलीं. तेथें मी, रावजी व म्हातारी अशा तिघांनीं एकत्र बसून पुढें काय करावयाचें याचा विचार केला. एकदां आम्हांला वाटलें कीं गमाजीला ठार करावें. पण अशानें राजपुत्राचें रक्षण होणार नाहीं असें तूं मला पटवून दिलें होतेंस तें माझ्या ध्यानीं होतें. गमाजीचा रावजीवर पुरा विश्वास. त्याचाच आम्हीं या कामीं उपयोग करून घेण्याचें ठरविलें. रावजीनें म्हातारी पैशांना वश होण्याजोगी आहे असें संगनमतानें गमाजीला जाऊन सांगितलें. तेव्हां गमाजीनें त्याच्यापाशीं भरपूर पैसे म्हातारीला देण्यासाठीं दिले, व राजपुत्राला आपणासमोर आणण्याला सांगितलें. तेव्हां मात्र आम्हांला मोठाच पेंच पडला. अखेर म्हातारीनें तिचा एक राजपुत्राच्याच वयाचा अर्धवट मुलगा गुराख्याचें काम करीत असे त्याला राजपुत्र म्हणून पुढें केलें. तेवढ्या दरम्यान् मीं राजपुत्राला दूरच्या एका खेडेगांवीं घेऊन गेलों. आमची कल्पना होतीच कीं तो चांडाळ दगा देणार. आम्हीं म्हातारीला तशी स्पष्ट जाणीवही दिली होती. पण त्या माउलीनें धैर्यानें सांगितलें कीं राजपुत्राच्या रक्षणासाठीं मी माझा मुलगा आनंदानें बळी द्यावयाला तयार आहें. आमचा तो संशय खरा ठरला. रावजीनें त्या मुलाला राजपुत्र म्हणून पुढें आणतांच गमाजीनें रावजीच्याच हस्तें त्याचा शिरच्छेद करविला."

"अहाहा! धन्य तो मुलगा कीं जो आपल्या राजाच्या रक्षणासाठीं मरून अजरामर झाला! आणि धन्य ती माता कीं जिनें स्वामिभक्तीसाठीं आपला पोटचा गोळा बळी दिला!" सजणा गहिंवरून मध्येंच म्हणाली, "पण म्हातारीचें पुढें काय झालें? तिचा त्या चांडाळानें शिरच्छेद केला हें खरें काय?"

"होय. तेथें तर त्याच्या विश्वासघाताची आणि क्रूरपणाची कमालच झाली." प्रतापराव उद्गारला.

"आणि रावजीचें पुढें काय झालें?"

"तो बहुधा आतां इकडे परत येणार नाहीं. राजपुत्राला ठार मारण्याचा आपला बेत केवळ ह्या एका माणसामुळें फसला असें सकवारबाई व गमाजी

यांना माहीत झाल्यावर आपण जर त्यांच्या हातीं सांपडलों तर आपल्या जिवाला धोका आहे. त्यापेक्षां आपण तूर्त कांहीं काळ तरी तिकडेच कांहीं-तरी उद्योगधंदा करणार असें तो मला म्हणाला. आणि आपणालादेखील आतां कोठेंतरी दूरच्या प्रांतीं जावें लागेल असें वाटतें. निदान साताऱ्यांत तरी राहतां कामा नये. पण हा वृत्तांत दुसऱ्या कोणालाही सांगावयाचा नाहीं बरें! मी श्रीमंतांनादेखील सांगणार नव्हतों. रावजीच्या घरीं त्याची खुशाली कळवावी व गुप्तपणें साताऱ्यांत येऊन तुला भेटावें असें मीं ठरविलें होतें. पण राजपुत्राच्या वधाचा आरोप श्रीमंतांवर लादण्याचा थोरल्या राणीसाहेबांचा प्रयत्न सुरू आहे असें कळलें; आणि महाराजांनीं बाईलबुद्धीला बळी पडून निराळा दत्तक घेण्याच्या खटपटींत पडूं नये यासाठीं त्यांनाही हा खरा वृत्तांत कळणें अवश्य होतें, म्हणून मीं श्रीमंतांना भेटून त्यांना आणि श्रीमंतांच्याच सांगण्यावरून महाराजांना कळण्यासाठीं शेटीला हा प्रकार सांगितला. याची दुसऱ्या कोठेंही वाच्यता करावयाची नाहीं, थोरल्या राणीसाहेबांना तर यांतील गंधवार्तादेखील कळतां कामा नये असें श्रीमंतांनीं मला पुन्हा पुन्हा बजावून सांगितलें आहे."

"त्याची काळजी तुम्हांला नको."

"बरें; पण तूं आतां पुन्हा थोरल्या राणीसाहेबांपाशीं जाणार का?"

"तें आपण विचार करून ठरवूं. त्यांचा एवढासा पराजय झाला, यानें माझें समाधान झालेलें नाहीं. त्यांचा पुरा पुरा नाश करीन अशी माझी प्रतिज्ञा आहे. ती तडीला गेल्याखेरीज माझें मन शांत होणार नाहीं."

"म्हणजे? तोंवर तूं माझ्यापासून दूर राहणार काय? मी शिरावर घेत-लेली कामगिरी चोख बजावली असतांना माझ्या संसाराचा उन्हाळा कर-ण्याचा तुला काय बरें अधिकार?" असें विचारीत प्रतापरावानें सजणेला आपल्या हृदयाशीं घट्ट कंवटाळून धरलें, व प्रेमभरानें तिचें चुंबन घेतलें. सजणेनें तेव्हां फक्त 'असे काय हें? हें देऊळ आहे ना? आणि जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनीं कोणीं पाहिलें तर काय म्हणतील?' असें उद्गारून प्रताप-रावाच्या बाहूंतून आपली सुटका करून घेतली. त्यांतच प्रतापरावाला त्याच्या प्रश्नाचें उत्तर मिळालें. तेथून तीं दोघें सुखदुःखाच्या गुजगोष्टी बोलत साताऱ्याच्या वाटेला लागलीं.

प्रकरण २९ वें

नानासाहेब यशस्वी झाले

नानासाहेबांकडून शेटी केव्हां येतो याची महाराज रंगमहालाच्या गच्चीवरून चातकाप्रमाणें वाट पाहत होते. तो शेटी एकदांचा आला. त्याच्या हंसतमुख चर्येवरून महाराजांनीं ओळखलें कीं हा काम फत्ते करून आला असावा.

शेटीनें महाराजांना नम्रतापूर्वक मुजरा करून वृत्तान्त निवेदन केला, "श्रीमंत पेशवे सरकार माझ्याबरोबरच महाराजांच्या दर्शनार्थ साताऱ्यांत माघारे यावयाला निघाले आहेत. बाईसाहेब माझ्या अगोदरच पालखींतून इकडे यावयाला निघाल्या होत्या. त्या इथें येऊन पोंचल्याही असतील. वाड्यांत तपास करावयाला हुजऱ्याला पाठवूं का ?"

"हो ! हो ! पाठव तर ! पण आम्हांला वाटतें, नाना मोठा मानी आहे. तो जो इरईनें वाड्याबाहेर पडला आहे, तो सर्व स्थिरस्थावर झाल्याशिवाय वाड्यांत पाऊल टाकणार नाहीं. तेव्हां त्याच्या राहुटीकडेही एका हुजऱ्याला पाठविला पाहिजे. पण काय रे, तुला नानाचा एकंदर रागरंग कसा काय दिसला ?"

शेटी उत्तरला, "मी तर सरकारांना पूर्वीपासूनच सांगतों आहें कीं सरकारांनीं श्रीमंतांवर उगाच आग पाखडली. त्यांच्यासारखा निष्ठावंत व तसाच पराक्रमी सेवक महाराजांना अन्य मिळावयाचा नाहीं. तेंच माझें मत श्रीमंतांच्या व माझ्या याही भेटींत ज्यास्त ठाम झालें आहे."

"तूं सांगतोस तेंच खरें. लवंडीचे लोक भलतेंच कांहींतरी सांगून माझ्या नानाचा दुष्टावा साधूं पाहतात. लोकांचे मजकूर मानण्यांत आम्हीं आजवर चूक केली. तशी चूक पुन्हा आमच्या हातून कदापि व्हावयाची नाहीं.

बारांना नाना वाईट असला तर खुशाल असूं दे. माझा तेवढा चाकर माझे पदरीं मातबर आहे. देवानें त्याला उदंड आयुष्य देऊन सुखी करावें, आणि त्याच्या हातून हिंदुपदपादशाहीचा उद्योग सारें हिंदुस्थान व्यापून उरे इतका वाढवावा."

या वेळीं राजपुत्राचें रहस्य महाराजांपाशीं प्रगट करण्याचें शेटीच्या मनांत आलें. परंतु तें त्यांना पेशव्यांच्याच तोंडून कळलेलें बरें असें म्हणून तो गप्प राहिला. पेशवे आले किंवा नाहीं याचा तपास करण्यासाठीं ताबडतोब दोन ठिकाणीं हुजरे रवाना झाले. तेव्हांपासून सुमारें प्रहरभर त्या दोघांच्या पेशव्यांबाबत गप्पागोष्टी चालल्या होत्या. सकवारबाई तेव्हां वाड्यांतच आपल्या महालांत होती. ती अलीकडे महाराज आतां आपल्या तंत्रानें वागत नाहींत म्हणून महाराजांवर रुसून यवतेश्वरीं जाऊन राहण्याच्या तयारींत होती. महाराजांपाशीं आपलें आतां पेशव्यांच्या बाबतींत तरी कांहीं चालत नाहीं, तेव्हां आपण राजकारणाचे पुढील डावपेंच एकान्तीं आपल्या सहकाऱ्यांशीं विचारविनिमय करून मुक्रर करावे असाही यवतेश्वरीं जाण्यांतील तिचा अंतस्थ मानस असेल. ती जाणार म्हणाली तेव्हां महाराजांनींही तिला नको म्हटलें नाहीं. पेशवेपदाच्या एका गोष्टीपुरते महाराज आतां अनुभवानें बरेच निगरगट्ट बनले होते.

त्या दोघांचें संभाषण चाललें असतांना चिटणीस व अमात्य पुढें काय झालें याची चवकशी करण्यासाठीं तेथें आले. त्यांच्याशींही त्याच विषयावर खल झाला, व नानासाहेबांना पुन्हा पेशवाईचा कारभार सांगावयाचा असा महाराजांनीं आपला मानस निःसंदेहपणें प्रगट केला. तें ऐकून चिटणीस व अमात्य यांना हायसें वाटलें. नानासाहेब आले किंवा कसें याची चौकशी करण्यासाठीं हुजरे गेले आहेत असें कळतांच ते परत येण्याची वाट पाहत चिटणीस तेथेंच राहिले.

तोंच पेशव्यांच्या वाड्यांत चौकशी करण्यासाठीं गेलेला हुजऱ्या बातमी घेऊन आला, "पेशवे सरकार वाड्यांत आलेले नाहींत. जास्त तपास करतां ते नगराबाहेर तंबूंत उतरले आहेत असें कळतें."

"पाहा!" महाराज शेटीकडे वळून म्हणाले, "आम्ही सांगितलें तें खरें झालें कीं नाहीं पहा! आमच्या सेवकाचा स्वभाव आम्ही सर्वांपेक्षां चांगला

ओळखतों. ज्या ठिकाणीं सोनें वेंचलें त्या ठिकाणीं गोंवऱ्या वेंचणाऱ्या सामान्यांपैकीं नाना नव्हे. तो पुन्हा अधिकारारूढ होईल तेव्हांच वाड्यांत पाऊल ठेवील. तोंवर असाच अज्ञातवासांत राहील. ”

एवढें महाराज बोलत आहेत तोंच पेशव्यांच्या तंबूकडे चौकशीसाठीं गेलेला हुजऱ्या आला, व मुजरा करून उभा राहिला.

“ कायरे ? ” महाराजांनीं विचारलें.

“ श्रीमंत पेशवे सरकारांची स्वारी मी तेथें जाऊन पोंचण्यापूर्वींच तंबूतून महाराजांच्या दर्शनाला यावयाला निघाली होती. स्वारी बाहेर आज्ञेची वाट पाहत उभी आहे. ”

“ जा त्यांना आंत यावयाला सांग जा. ” महाराज म्हणाले, व नानासाहेबांचें स्वागत करण्यासाठीं स्वतः सामोरे गेले. नानासाहेबांनीं येतांच महाराजांचे पाय धरून पायांवर मस्तक नमवून प्रार्थना केली, “ स्वामींच्या आज्ञेप्रमाणें भेटीला आलों आहें. पायांपाशीं कोणती सेवा करणें ती आज्ञा होऊन पायांचा वियोग मात्र न व्हावा, एवढेंच मागणें आहे. ”

“ या. बसा अगोदर. ” असें म्हणून महाराजांनीं नानासाहेबांना आपल्या शेजारीं उजव्या हाताला गादीवर बसवून घेतलें व कुशल विचारून नंतर म्हटलें, “ आमचें सोनें बावन कशी आणि शंभर नंबरी होतेंच. पण कोण्या निमित्तानें तें ह्या भट्टींतून तावून निघालें हेंही फार चांगलें झालें. दौलतीची एवढ्या दिवसांत कांहींशी घडी बिघडली आहे हें खरें आहे. पण त्यावरून एक गोष्ट जी आम्ही वेळोवेळीं आमच्या वरकड कारभाऱ्यांना सांगत आलों ती आपोआप सिद्ध झाली, कीं आमचा नाना आमच्या दौलतीचा जीव कीं प्राण आहे. नाना आहे तर दौलत आहे. नानाच्या नुसत्या दराऱ्यानें जीं कामें परस्पर होतील, तीं इतरांनीं हाडें झिजवूनही होणार नाहींत. ”

चिटणीस व अमात्य यांना ती परस्परांची दिलजमाई पाहून आनंद झाला. चिटणीस म्हणाले, “ महाराजांनीं कृपाळु होऊन श्रीमंतांना पुन्हा घरीं बोलावून आणलें, आतां राजवटीचें पुढें कसें होईल, याविषयींची चिंता आम्हांला मुळींच उरली नाहीं. आतां एक गोष्ट मात्र अनुचित झाली; पण तें दैव म्हणावयाचें. गादीला धनी देवानें दिला होता, त्याचा कोल्हापूरकरांनीं असा घात करावयाचा नव्हता. ”

" पण त्यांत श्रीमंतांचें अंग मुळींच नाहीं अशी महाराजांची पूर्वींच खात्री मीं पटवून दिली आहे. " अमात्य म्हणाले.

" त्याचा आमच्या मनांत आमच्या पेशव्यांविषयीं किंतु मुळींच नाहीं; आम्ही आमच्या कुलस्वामिनीला स्मरून सांगतों. कोल्हापूरकरांनीं मात्र खराच दावा साधला. तें त्यांचें कर्म त्यांच्यापाशीं. " महाराज गहिंवरून उद्गारले.

" त्या बाबतींत मला दोन शब्द बोलण्याची स्वामींची आज्ञा आहे ना? " नानासाहेबांनीं नम्रतापूर्वक विचारलें.

" खुशाल बोला. पण आमच्या मतें तुम्ही कांहीं बोलावयालाच नको आहे. तुमचें त्यांत लवमात्र अंग नाहीं अशी आमची पूर्ण खातरजमा झाली आहे. " महाराज म्हणाले.

नानासाहेब म्हणाले, " मला तें बोलावयाचें नाहीं. मला एवढेंच आनंदाचें वृत्त सांगावयाचें कीं महाराजांच्या पुण्यप्रतापानें आणि परमेश्वराच्या कृपेनें धाकटे राजाराम महाराज स्वस्थानीं सुखरूप आहेत. "

महाराज आनंदाच्या ऊर्मीसरसे उठून उभे राहून म्हणाले, " खरेंच कीं काय? "

चिटणिसांनींदेखील ती वार्ता ऐकून तोंडांत बोटें घातलीं. अमात्यांना ती शुभवार्ता पूर्वींच खुद्द नानासाहेबांच्या तोंडून कळली होती. पण त्यांनीं-देखील जणूं कांहीं आपणाला कांहींच माहीत नव्हतें अशा भावनेनें सानंदाश्चर्य प्रगट केलें.

महाराजांनीं सद्गदित अंतःकरणानें नानासाहेबांची पाठ थोपटून त्यांची परोपरीनें प्रशंसा केली, व हें कसें काय म्हणून विचारलें. त्यावर नानासाहेब उत्तरले, " महाराजांनीं कृपा करून तो खुलासेवार वृत्तांत मात्र सेवकाला इतक्यांत विचारूं नये. आणखी कांहीं काळ तरी धाकट्या राजाराममहाराजांनीं पूर्ण अज्ञातवासांत राहणेंच इष्ट आहे. त्यांच्या जिवावरचें संकट आज एक टळलें, पण त्याची पुनरावृत्ति होणार नाहीं याचा काय नेम? यास्तव हें एवढेंच राहूं द्या. यथाकाळीं सर्व कांहीं महाराजांच्या पुण्याईनें आणि परमेश्वराच्या कृपेनें यथासांग होईल. "

" कांहीं हरकत नाहीं. तुमचा शब्द आम्हांला प्रमाण. " असें म्हणून महाराजांनीं चिटणिसांकडे वळून आज्ञा केली, " चिटणीस, ही आनंदाची वार्ता

नगरांत हत्तीवरून साखर वांटून जाहीर करण्याची व्यवस्था करा–पण जरा थांबा." असें म्हणून महाराजांनीं रावणाच्या लंकेंत सीतेचा शोध लागल्यावर हर्षभरित झालेल्या हनुमानाप्रमाणें हर्षभरित झालेला शेटी जवळच बसला होता, त्याला जवळ बोलावून हळूच त्याच्या कानांत कांहींसें सांगितलें.

शेटी आंत गेला, तो लगेच शिक्केकट्यार, जरिपटका व वस्त्रें तबकांतून घेऊन आला. महाराजांनीं आपल्या हातानें तें साहित्य नानासाहेबांना अर्पण करून चिटणिसांना सांगितलें, " ही शुभवार्ताही त्याबरोबरच हत्तीवरून साखर वांटून नगरांत जाहीर होऊं द्या."

नानासाहेबांनीं प्रणामपूर्वक त्या अधिकारसाहित्याचा स्वीकार करून पुन्हा एकदां महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवलें.

* * *

ती वार्ता कळतांच सर्व नगरांत आनंदीआनंद उसळला. पेशव्यांच्या उत्कर्षाविषयीं असंतोष मानणाऱ्या कांहीं करंट्या व्यक्ति असतील त्यांना मात्र दुःख झालें असेल. पण तसल्या आनंदोत्सवांत त्याची पर्वा कोण करणार!

* * *

दुसऱ्या दिवशीं प्रतापराव व सजणा पूर्वसंकेतानुसार नानासाहेबांना येऊन भेटलीं. नानासाहेबांनीं त्यांना त्यांच्या मूळ गांवची इनामी सनद कबूल केल्याप्रमाणें करून दिली, व शिवाय प्रतापरावाला सोन्याचा तोडा बक्षीस देऊन आपल्या हातानें पागोटें बांधलें. सजणेलाही चोळी बांगडी म्हणून प्रतापरावाच्या गांवाशेजारचा एक गांव इनाम करून दिला.

सजणेनें विनंति केली, "मी स्वामिमहाराजांची सेवा करीत होत्यें तेव्हां स्वामींनीं मला चोळी बांगडी म्हणून धावडशीला बिघाभर जमीन बक्षिस करून दिली होती. ती दरम्यानच्या माझ्या ग्रहदशेंत सरकारजमा झाली आहे ती मोकळी होऊन स्वामिमहाराजांच्या समाधीच्या पूजेला फुलें मिळण्यासाठीं परस्पर लावून दिली जावी."

सजणेचा परमहंस ब्रम्हेंद्रस्वामींच्या ठायीं इतका पूज्यभाव असलेला पाहून नानासाहेबांना फार कौतुक वाटलें. त्यांनीं लौकरच तशी तजवीज करण्याचें वचन देऊन शिवाय सजणेला आपली आठवण म्हणून, गोपिकाबाईला कांहींतरी सौभाग्याचें वाण देण्याला सांगितलें.

गोपिकाबाईनें पन्नास पुतळ्यांच्या हारांत गुंफलेलें एक रत्नजडित मंगळसूत्र सजणेच्या गळ्यांत घातलें. प्रतापराव व सजणा जोडप्यानें उभयतां सरकार स्वाऱ्यांच्या पायां पडूं लागलीं तेव्हां नानासाहेब विनोदानें म्हणाले, "अरे! ही आतां सजणा नसून पुतळाच झाली कीं!"

झालें. त्या दिवसापासून सजणेचें पुतळा हेंच नांव पडलें. ह्या पुतळेचा पुढील पराक्रम वाचकांना 'पेशवाईची मध्यान्ह' या पुढील पंधराव्या कादंबरींत शाहूमहाराजांच्या मृत्युसमयीं साताऱ्यांत माजलेल्या भयंकर राजकीय घडामोडींच्या रोमहर्षण प्रसंगाबरोबर वाचावयाला मिळेल.

इत्यलम्

कादंबरींतील ऐतिहासिक व्यक्तींची ओळख

छत्रपति शाहू महाराज : हे छत्रपति शिवाजीचे नातू व संभाजीचे पुत्र होत. संभाजीच्या वधानंतर यांना औरंगजेब बादशहानें दिल्लीला आपल्या बादशाही कैदेंत नेऊन ठेवलें. त्यांचें सर्व बाळपण बादशाही जनानखान्यांतील विलासी वातावरणांत गेलें. मराठशाहींत फूट पाडण्यासाठीं त्यांना बादशहानें आपला मांडलिक मानून मराठशाहीचें राज्य करण्यासाठीं इ. स. १७०८ मध्यें दक्षिणेंत पाठविलें. तेव्हां त्यांची चुलती राणी ताराबाई राज्य करीत होती. बादशहाचा हेतु सिद्धीला गेला. ताराबाईचें व शाहूमहाराजांचें वैमनस्य आलें व ताराबाईनें कोल्हापूर एथें आपला सवता सुभा स्थापन केला. पण मराठशाही मोडण्याचा बादशहाचा मनोदय मात्र तडीला गेला नाहीं. पेशव्यांसारख्या पराक्रमी व राजकार्यकुशल कारभाऱ्यांचें पाठबळ शाहूमहाराजांना मिळाल्यामुळें त्यांच्या कारकीर्दींत मराठशाहीची उत्तरोत्तर एकसारखी भरभराटच होत गेली. शाहूमहाराज सज्जन पण विलासी व नकर्ते होते. त्यांच्या दीर्घ कारकीर्दींत मराठशाहीची जी भरभराट झाली व हिंदुपदपादशाहीचें विराट् उज्ज्वल जें स्वरूप तिला प्राप्त झालें, तो सर्व त्यांच्या कारभाऱ्यांचा पराक्रम होय. उलट ‘ नवें करूं नये व जुनें मोडूं नये ’ अशा शाहूमहाराजांच्या मिळमिळित धोरणामुळें पेशव्यांचा नाइलाज होऊन त्यांच्या धडाडीचा व कर्तबगारीचा व्हावा तसा उपयोग होऊं शकला नाहीं.

ताराबाई : ही छत्रपति राजारामाची राणी. राजारामाच्या पश्चात् त्याचा पुत्र दुसरा शिवाजी हा गादीवर बसला. पण तो वेडा होता. त्यामुळें सर्व राज्यकारभार ताराबाईच पाहत असे. ती अत्यंत पराक्रमी, धोरणी राजकारणकुशल व महत्त्वाकांक्षी स्त्री होती. शाहूमहाराजांच्या सुटकेनंतर तिचें व त्यांचें पटलें नाहीं; बहुतेक सर्व कारभारी शाहूला जाऊन मिळाले; व तिचा

नाइलाज झाला. तरी तिनें हिंमतीनें कोल्हापूर एथें जाऊन स्वतंत्र राज्य स्थापन केलें. तेंच सध्याचें कोल्हापूरचें राज्य होय. वंशपरंपरेनें राजेपण प्राप्त होण्याच्या जुनाट रीतीप्रमाणें मराठशाहीवर शाहूचा, तो छत्रपति संभाजीचा पुत्र म्हणून हक्क असेल, पण ताराबाईनें त्याला विरोध केला तोही बरोबर. आयत्या बिळांत नागोबा अशीच शाहूची स्थिति होती. एरव्हीं विचार करतां ताराबाईच खरी कर्तबगार व राज्य करण्याला शाहूपेक्षां लायक होती. पण ती स्त्री होती, व तेव्हांच्या राजनिष्ठेच्या कल्पनाही चमत्कारिक होत्या; म्हणून स्त्रीजातीविषयीं अनुदार अशा तेव्हांच्या आंधळ्या राजनिष्ठ महाराष्ट्रांत ताराबाईच्या कर्तबगारीचें चीज झालें नाहीं; व तिला अखेरपावेतों साताऱ्याच्या किल्ल्यांत छत्रपतींच्या म्हणजे पर्यायानें पेशव्यांच्या कैदेंत राहावें लागलें.

बाळाजी बाजीराव ऊर्फ **नानासाहेब पेशवे :** छत्रपति शाहू महाराजांच्या कारकीर्दींत श्रीवर्धनकर भट घराण्यांतील बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे पेशवाई आली. थोरले बाजीराव हे बाळाजी विश्वनाथांचे पुत्र व दुसरे पेशवे होत; व नानासाहेब हे थोरल्या बाजीरावांचे चिरंजीव. यांना वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षींच इ. स. १७२० सालीं पेशवाईपदाचा लाभ झाला. इ. स. १७६१ सालीं पानिपतचें घनघोर युद्ध आटोपल्यावर थोड्याच दिवसांनीं नानासाहेबांचा दुःखकारक अंत झाला. तथापि वयाच्या अवघ्या चाळीस वर्षांत वीस वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं मराठशाहीला हिंदुपदपादशाहीचें विराट स्वरूप प्राप्त करून दिलें. नानासाहेब लढवय्ये नव्हते तरी पहिल्या प्रतीचे राजकार्यकुशल होते.

सकवारबाई व **सगुणाबाई :** ह्या शाहूमहाराजांच्या एकंदर चार राण्यांपैकीं दोन राण्या होत. सकवारबाई ही शिर्क्यांची माहेरवाशीण. ती फार तडफदार, दुराग्रही, महत्त्वाकांक्षी, उपद्व्यापी पण अत्यंत कोत्या व स्वार्थी विचारांची होती. शाहूमहाराजांचा विलासी व बालबोध स्वभाव, व राण्या सर्व कमीअधिक प्रमाणांत भांडखोर! त्यामुळें शाहूमहाराजांना त्यांच्या आयुष्याच्या अखेरीला शांतता कशी ती मुळींच लाभली नाहीं. सकवारबाईनें तर शेवटीं सर्व दृष्टींनीं—विशेषतः दत्तकाच्या बाबतींत तर कहर केला, अशी इतिहासाची स्पष्ट साक्ष आहे. तेव्हां राजवटीच्या कारभारीमंडळींत दोन तट होते, व त्यांपैकीं एका तटाला सकवारबाईचा भरपूर पाठिंबा होता.

लक्ष्मीबाई व धाकटी सखू : शाहू महाराजांच्या नाटकशाळांपैकीं ह्या दोन प्रमुख नाटकशाळा होत. लक्ष्मीला येसाजी व कुसाजी असे दोन पुत्र होते.

गोपिकाबाई : ही नानासाहेब पेशव्यांची धर्मपत्नी, व रास्ते यांची माहेरवाशीण. ती अत्यंत चतुर व कर्तबगार असली तरी कोत्या विचारांची स्त्री होती. नानासाहेबांवर तिचा बराच पगडा होता, व पेशव्यांच्या घरांत भाऊबंदकीचीं बीजें हिच्या वेळीं रुजूं लागलीं.

बाबूजी नाईक बारामतीकर : हा पेशव्यांचा अत्यंत निकटचा आप्त, व इरसाल सावकार. केवळ श्रीमंतीच्या व पेशव्यांच्या नातलगपणाच्या जोरावर बाबूजीनें तत्कालीन मराठी राजकरणांत पुष्कळच लुडबुड केली; व त्याचा पेशवाईवरही डोळा होता. शाहूमहाराज कर्जबाजारी झाले असतांना अखेरीला त्यांना द्रव्यसाह्याचें आमिष दाखवून पेशवाई हबकण्याचा प्रयत्न करण्यासही बाबूजीनें कमी केलें नाहीं, व पेशव्यांनाही सावकारीच्या जोरावर भयंकर त्रास दिला.

गमाजी : हा प्रतिनिधींचे मुतालिक यमाजी शिवदेव यांचा मुलगा. मुतालिकांचें पेशव्यांशीं प्रारंभापासून वैमनस्य होतें. अर्थात् ते सकवारबाईच्या पक्षाचे होते. गमाजी हा अत्यंत क्रूर होता. तो सकवारबाईचा एक हस्तक होता.

जगजीवनराव प्रतिनिधि : श्रीपतराव पर्शरामपंत प्रतिनिधि हे शाहू–महाराजांच्या अष्टप्रधानांतील एक, व अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र. श्रीपतराव वारल्यावर त्यांचे बंधु जगजीवनराव यांना प्रतिनिधि नेमण्यांत आलें. प्रतिनिधि हे पेशव्यांचे प्रतिस्पर्धी खरे. पण नानासाहेबांना शाहूमहाराजांनीं अल्पकाळ पेशवाईपदावरून दूर केलें, तेव्हां जगजीवनरावांनीं राजवटीच्या शाश्वत कल्याणाकडे लक्ष्य देऊन नानासाहेबांचाच यथामति पाठपुरावा केला.

रामचंद्रपंत अमात्य : हे व यांचे चिरंजीव भगवंतराव हे ताराबाईच्या राजवटींत वहिवाटलेलें व तिच्या पक्षाचे होते. पण त्यांची स्वामिनिष्ठा राजनिष्ठेशीं विसंगत नव्हती. रामराजाला कोल्हापुरकरांच्या वक्र दृष्टींतून वांचविण्यासाठीं अमात्यांनीं ताराबाईच्या वतीनें अखेरपावेतों पराकाष्ठा केली. किंबहुना अमात्यांचें पाठबळ नसतें तर रामराजाचें रक्षण होणें शक्यच नव्हतें. अमात्य पितापुत्र मोठे राजकाणी पुरुषही होते.

गोविंदराव चिटणीस : छत्रपतींच्या निःसीम स्वामिनिष्ठ सेवकांत चिटणिसांचें घराणें अग्रस्थानीं शोभतें. छत्रपति संभाजीनें ज्या बाळाजी आवजी चिटणिसांना हकनाहक हत्तीच्या पायाला बांधून ठार मारलें, त्यांचेच गोविंदराव हे चिरंजीव. हे शांत स्वभावी, राजकार्यकुशल, फड्यी कारकुनी बाण्याचे, व राजवटीचे एकनिष्ठ असे सेवक होते.

मलिक शेटी : हा शाहूमहाराजांचा एक अत्यंत विश्वासू सेवक होता. नानासाहेबांना पेशवाईवरून काढल्यावर पुन्हा पेशवे म्हणून नेमीपावेतोंच्या पत्रोपत्रीं चाललेल्या उलाढालींत मलिक शेटी विश्वासानें पत्रें व निरोप नेत आणीत होता.